# आदर्श आचारसंहिता

# अनुदेशांचा सारसंग्रह

# (३१ ऑगस्ट २०१३ पर्यंत सुधारित)

भारत निवडणूक आयोग

# आदर्श आचारसंहिता

# अनुदेशांचा सारसंग्रह

# (३१ ऑगस्ट २०१३ पर्यंत सुधारित)

**भारत निवडणूक आयोग**

वाय २८५६—१

## प्रस्तावना

आपल्या देशात मुक्त व निःपक्ष वातावरणात निवडणुका पार पाडण्याच्या दृष्टीने निवडणुकांसाठीची आदर्श आचारसंहिता ही, आवश्यक व महत्त्वाचे साधन आहे.

**२.** हा सारसंग्रह, आदर्श आचारसंहितेबाबत्या अनुदेशांचा सारसंग्रह, २००९ याची अद्ययावत आवृत्ती आहे. आयोगाने आदर्श आचारसंहितेबाबत दिनांक ३१ ऑगस्ट २०१३ पर्यंत दिलेल्या विविध अनुदेशांचा या अद्ययावत आवृत्तीमध्ये समावेश आहे. या विषयावरील हे अत्यंत उपयुक्त असे निदेशपुस्तक व्हावे या हेतूने, आदर्श आचारसंहितेबाबतचे सर्व महत्त्वाचे अनुदेश यामध्ये अंतर्भूत करण्याचे प्रयत्न करण्यात आलेले आहेत. आदर्श आचारसंहितेचा मूलपाठदेखील तात्काळ संदर्भाकरिता समाविष्ट करण्यात आला आहे.

**३.** ही आवृत्ती निवडणूकसंबंधातील सर्व अधिकारी आणि अन्य हितसंबंधित व्यक्ती यांना उपयुक्त ठरेल, अशी आशा आहे. या सारसंग्रहात समाविष्ट अनुदेशांमध्ये कोणतीही भर वगळणूक, दुरुस्ती व संकलन करावयाचे असेल तर, त्याबाबतीत या आवृत्तीच्या सर्व वापरकर्त्यांकडून येणाऱ्या सूचनांचे आयोग स्वागत करील.

नवी दिल्ली,
दिनांक १८ सप्टेंबर २०१३.

**विनोद झुत्शी,**
निवडणूक उप आयुक्त.

# भारताचा निवडणूक आयोग

## राजकीय पक्ष व उमेदवार यांच्या मार्गदर्शनासाठी आदर्श आचारसंहिता

**(एक) सर्वसाधारण आचरण**

(१) कोणत्याही राजकीय पक्षाने किंवा उमेदवाराने, वेगवेगळ्या जातीजमाती, भिन्न धर्मीय किंवा भिन्न भाषिक यांच्यामध्ये असलेले मतभेद वाढतील किंवा जातीय वैमनस्य निर्माण होईल अशा प्रकारच्या कोणत्याही कृत्यामध्ये भाग घेऊ नये.

(२) जेव्हा इतर राजकीय पक्षांवर टीका करण्यात येईल तेव्हा ती त्या पक्षांचे धोरण आणि कार्यक्रम आणि त्याचे पूर्वीचे कामकाज एवढ्यापुरतीच मर्यादित असावी. राजकीय पक्ष किंवा उमेदवार यांनी इतर पक्षांचे नेते किंवा कार्यकर्ते यांच्या सार्वजनिक कामकाजाशी संबंध नसलेल्या खाजगी जिवनातील गोष्टींवर टीका करण्यापासून नेहमीच दूर रहावे. इतर पक्ष किंवा त्यांचे कार्यकर्ते यांच्यावर बिनबुडाचे आरोप करून किंवा त्यांच्या कृत्यांचा विपर्यास करून टीका करण्याचे टाळावे.

(३) उमेदवारांनी मते मिळविण्यासाठी जातीय आधारावर किंवा जातीय भावनांच्या आधारावर आवाहन करू नये. मशिदी, चर्च, मंदिरे किंवा इतर प्रार्थनास्थळे यांचा निवडणुकीच्या प्रचारासाठी व्यासपीठ म्हणून वापर करता कामा नये.

(४) सर्व पक्षांनी व उमेदवारांनी मतदारांना लाच देणे, त्यांना धाकदपटशा दाखवणे, मतदारांबाबत तोतयेगिरी करणे, मतदान केंद्रापासून १०० मीटर्सच्या आत प्रचार करणे, मतदान संपण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेस संपणाऱ्या ४८ तासांच्या मुदतीत सार्वजनिक सभा घेणे आणि मतदान केंद्रावर मतदारांची ने-आण करणे यांसारख्या " भ्रष्टाचारी प्रथा " आणि निवडणूक कायद्यान्वये गुन्हा समजल्या जाणाऱ्या गोष्टी करण्याचे कटाक्षाने टाळावे.

(५) प्रत्येक व्यक्तीचा शांततापूर्ण व निवांत जीवन जगण्याचा अधिकार जपला पाहिजे. मग त्या उमेदवाराची किंवा राजकीय पक्षाची राजकीय मते किंवा कामे कितीही प्रतिकूल असोत. कोणत्याही परिस्थितीत, एखाद्या व्यक्तीच्या मतांचा किंवा कामांचा निषेध करण्यासाठी तिच्याविरुद्ध निदर्शने करणे किंवा तिच्या घरासमोर धरणे धरणे या गोष्टींचा अवलंब करता कामा नये.

(६) कोणताही राजकीय पक्ष वा उमेदवार ध्वजदंड उभारण्यासाठी, फलक टांगण्यासाठी, सूचना चिटकवण्यासाठी, घोषणा लिहिण्यासाठी वगैरे कोणत्याही व्यक्तीची जमीन, इमारत, कुंपण इत्यादींचा त्याच्या परवानगीशिवाय वापर करण्याची, त्याच्या किंवा पक्षाच्या अनुयायाला परवानगी देणार नाही.

(७) आपले समर्थक, इतर पक्षांनी आयोजित केलेल्या सभा किंवा मिरवणुका यामध्ये अडथळा निर्माण करीत नाहीत किंवा ते उधळून लावीत नाहीत, याची राजकीय पक्षांनी आणि उमेदवारांनी खातरजमा करून घ्यावी. एका राजकीय पक्षाचे कार्यकर्ते आणि समर्थक, दुसऱ्या राजकीय पक्षाने आयोजित केलेल्या सार्वजनिक सभांमध्ये तोंडी किंवा लेखी प्रश्न विचारून किंवा स्वतःच्या पक्षाची पत्रके वाटून अडथळा निर्माण करणार नाहीत. एक पक्ष सभा घेत असेल अशा ठिकाणी दुसरा पक्ष मिरवणूक घेऊन जाणार नाही. एका पक्षाने लावलेली भित्तिपत्रके दुसऱ्या पक्षाच्या कार्यकर्त्यांनी काढता कामा नये.

**(दोन) सभा**

(१) स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांना वाहतुकीचे नियंत्रण करणे आणि शांतता व सुव्यवस्था राखणे शक्य व्हावे यासाठी पक्ष किंवा उमेदवार, कोणत्यारी प्रस्तावित सभेची जागा आणि वेळ त्यांना पुरेशी अगोदर कळवील.

(२) ज्या ठिकाणी सभा घेण्याचे योजिले असेल त्या ठिकाणी काही प्रतिबंध किंवा मनाई करणारे आदेश आहेत किंवा काय याची राजकीय पक्षाने किंवा उमेदवाराने आगाऊ खातरजमा करून घ्यावी. जर असे काही आदेश असतील तर त्याचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. जर या आदेशातून काही सूट हवी असेल तर त्यासाठी अर्ज करून ती अगोदरच घेण्यात यावी.

(३) ध्वनिक्षेपकाचा वापर करण्यासाठी किंवा प्रस्तावित सभेच्या संदर्भात इतर कोणत्याही सुविधेसाठी परवानगी किंवा लायसेन्स मिळवावयाचे असल्यास पक्ष किंवा उमेदवार संबंधित प्राधिकाऱ्याकडे त्यासाठी पुरेसे अगोदर अर्ज करून अशी परवानगी किंवा लायसन्स प्राप्त करील.

(४) सभेमध्ये अडथळा उत्पन्न करणाऱ्या किंवा इतर मार्गांनी गोंधळ माजविण्याऱ्या व्यक्तींचा बंदोबस्त करण्याकरता सभेचे आयोजक कर्तव्यार्थ असलेल्या पोलिसांची मदत न चुकता घेतील. आयोजक स्वतः अशा व्यक्तींविरुद्ध कारवाई करणार नाही.

**(तीन) मिरवणूक**

(१) मिरवणूक काढणाऱ्या राजकीय पक्षाने किंवा उमेदवाराने मिरवणुकीची वेळ व ती जेथून निघणार असेल ते ठिकाण, मिरवणूक ज्या मार्गाने जाणार तो मार्ग आणि मिरवणूक जेथपर्यंत न्यावयाची ते ठिकाण व त्यासंबंधीची वेळ अगोदर ठरवून घेतली पाहिजे. सर्वसाधारणपणे या कार्यक्रमात काहीही बदल करण्यात येऊ नये.

(२) आयोजकांनी स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांना कार्यक्रमाची सूचना द्यावी म्हणजे पोलीस अधिकाऱ्यास आवश्यक ती व्यवस्था करणे शक्य होईल.

(३) आयोजकांनी मिरवणूक ज्या भागातून जावयाची असेल त्या भागात काही निर्बंधक आदेश काढण्यात आले आहेत किंवा काय याची खातरजमा करून घ्यावी आणि सक्षम प्राधिकाऱ्याकडून खास सूट मिळालेली नसेल तर अशा निर्बंधाचे पालन करावे. रहदारीच्या बाबतीत कोणतेही विनियम किंवा निर्बंध असल्यास त्यांचेदेखील काळजीपूर्वक पालन केले पाहिजे.

(४) वाहतुकीची कोंडी होणार नाही किंवा वाहतुकीस अडथळा येणार नाही या दृष्टीने आयोजकांनी मिरवणुकीचा मार्ग ठरवून देण्याची आगाऊ व्यवस्था करावी. जर मिरवणूक खूप मोठी असेल तर, तिचे योग्य त्या अंतराने भाग पाडण्यात यावेत म्हणजे सोयीस्कर अंतरावर विशेषकरून जेथे मिरवणूक रस्त्याच्या जंक्शनवर जाणार असेल तेथे वाहतुकीची कोंडी न होता ती टप्प्याटप्प्याने सुरू करता येईल.

(५) मिरवणूक शक्यतोवर रस्त्याच्या उजव्या बाजूने नेण्यात येईल आणि कर्तव्यार्थ पोलिसांचे निदेश व सूचना यांचे काटेकोरपणे पालन करता येईल.

(६) जर दोन किंवा अधिक राजकीय पक्षांनी किंवा उमेदवारांनी एकाच मार्गाने किंवा त्याच्या भागावरून एकाचवेळी मिरवणूक काढावयाचे ठरविले असेल तर आयोजकांनी आगोदरपासूनच पोलीस यंत्रणेशी संपर्क साधून मिरवणुकींची टक्कर होऊ नये किंवा वाहतुकीस अडथळा येऊ नये म्हणून कोणत्या उपाययोजना करता येतील ते ठरवून घेतले पाहिजे. ही व्यवस्था समाधानकारक व्हावी म्हणून त्यांनी स्थानिक पोलिसांचे सहाय्य घेतले पाहिजे. याकरिता राजकीय पक्षांनी लवकरात लवकर पोलिसांशी संपर्क साधला पाहिजे.

(७) राजकीय पक्ष किंवा उमेदवार यांनी अनिष्ट प्रवृत्तीच्या लोकांकडून विशेषतः प्रक्षुब्ध क्षणी ज्या गोष्टींचा दुरुपयोग होण्याची शक्यता आहे अशा गोष्टी मिरवणुकीत घेऊन जाणाऱ्यांच्याबाबतीत जास्तीतजास्त खबरदारी घेतली पाहिजे.

(८) इतर राजकीय पक्षांचे, सदस्यांचे किंवा त्यांच्या नेतृत्वाचे प्रतिनिधित्व करीत असल्याचे समजल्या जाणाऱ्या त्यांच्या प्रतिकृती घेऊन जाणे, त्यांचे जाहिरपणे दहन करणे हे आणि असे निदर्शनांचे प्रकार कोणत्याही पक्षाकडून किंवा उमेदवाराकडून चालवून घेतले जाणार नाही.

**(चार) मतदानाचा दिवस**

(१) सर्व राजकीय पक्ष व उमेदवार यांनी—

(एक) मतदान शांततापूर्ण आणि सुनियोजित रितीने पार पाडावे आणि मतदारांना कोणाच्या संतापाला किंवा अडथळ्यांना बळी न पडता, स्वतंत्रपणे मताधिकार वापरता यावा यासाठी निवडणुकीच्या कामावर असलेल्या अधिकाऱ्यांशी पूर्णपणे सहकार्य करावे ;

(दोन) आपल्या अधिकृत कार्यकर्त्यांना आवश्यक ते बिल्ले व ओळखपत्रे द्यावीत ;

(तीन) त्यांनी आपल्या मतदारांना पुरवलेली ओळखपत्रे कोऱ्या (सफेद) कागदावर असावीत आणि त्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवाराचे नाव किंवा पक्षाचे नाव असता कामा नये ;

(चार) मतदानाच्या दिवशी किंवा तत्पूर्वीच्या ४८ तासांत मद्य देऊ करण्याचे किंवा वाटण्याचे टाळले पाहिजे ;

(पाच) कार्यकर्ते आणि पक्षाचे व उमेदवारांचे समर्थक यांच्यामधील संघर्ष आणि तणाव टाळण्याच्या दृष्टीने पक्षांनी आणि उमेदवारांनी मतदान केंद्राजवळ उभारलेल्या तात्पुरत्या कार्यस्थानाजवळ विनाकारण गर्दी होऊ देऊ नये.

(सहा) उमेदवाराचे तंबू अगदी साधे असतील याची खात्री करावी तेथे कोणत्याही प्रकारची भित्तिपत्रके, ध्वज, चिन्हे किंवा प्रचाराचे प्रचारसाहित्य लावण्यात येऊ नये. तेथे कोणत्याही प्रकारचे खाद्यपदार्थ देण्यात येऊ नयेत किंवा गर्दी जमू देऊ नये ; आणि

(सात) मतदानाच्या दिवशी वाहने चालविण्यावर बसवावयाच्या निर्बंधाचे अनुपालन करताना प्राधिकाऱ्यांशी सहकार्य करतील आणि त्यासाठी परवाने मिळवून ते त्या वाहनाच्या दर्शनी भागावर ठळकपणे लावले जातील.

**(पाच) मतदान केंद्र**

मतदारांखेरीज निवडणूक आयोगाचा कायदेशीर पास असल्याशिवाय कोणीही मतदान केंद्रात प्रवेश करता कामा नये.

**(सहा) निरीक्षक**

निवडणूक आयोगाकडून निरीक्षकांची नेमणूक करण्यात येते. उमेदवार किंवा त्यांचे प्रतिनिधी यांना निवडणुकीच्या कामकाजासंबंधात जर काही विशिष्ट तक्रार किंवा अडचण असेल तर त्यांनी ती निरीक्षकांच्या निदर्शनास आणावी.

**(सात) सत्ताधारी पक्ष**

सत्ताधारी पक्षाने—मग तो केंद्रात असो वा संबंधित राज्यामध्ये किंवा राज्यांमध्ये निवडणूक मोहिमेच्या प्रयोजनासाठी आपल्या अधिकृत पदाचा वापर केला आहे अशा तक्रारीस जागा उरणार नाही याची खबरदारी घ्यावी आणि विशेषतः —

(एक)(क) मंत्रिमहोदयांनी आपल्या सरकारी दौऱ्याची निवडणुकीच्या कामकाजाशी सांगड घालू नये आणि निवडणुकीच्या कामाच्या वेळी सरकारी यंत्रणा किंवा कर्मचारीवर्ग यांचा वापर करू नये.

(ख) सरकारी विमाने, वाहने यांसह सरकारी वाहतूक साधने, यंत्रणा आणि कर्मचारीवर्ग यांचा सत्तारुढधारी पक्षाच्या हिताकरिता वापर करता कामा नये.

(दोन) निवडणूक सभा घेण्यासाठी आणि निवडणुकीच्या संबंधातील हवाई दौऱ्यासाठी हेलिपॅड म्हणून वापरण्यासाठी मैदानासारख्या सार्वजनिक स्थळांचा वापर, आपलीच मक्तेदारी असल्यासारखा करण्यात येऊ नये. सत्ताधारी पक्षाकडून अशा जागा आणि सुविधा ज्या अटींवर व शर्तीवर जशा वापरण्यात येत असतील त्याच अटींवर व शर्तीवर त्या पक्षांनी व संघटनांनी वापरण्याची/घेण्याची मुभा असेल.

(तीन) शासकीय विश्रामगृहे, डाक बंगले किंवा इतर शासकीय निवास व्यवस्था यावर फक्त सत्ताधारी पक्षांचा किंवा त्यांच्या उमेदवारांचाच हक्क असू शकणार नाही आणि अशा निवासव्यवस्थेचा वापर इतर पक्षांना व उमेदवारांनाही न्याय्य पद्धतीने करून देता येईल, मात्र कोणत्याही पक्षाला किंवा उमेदवाराला अशी निवासव्यवस्था (तीत संलग्न असलेल्या जागेसह) निवडणूक मोहिमेच्या कार्यालयासाठी किंवा निवडणूक प्रचाराच्या कामासाठी, सार्वजनिक सभा घेण्याच्या प्रयोजनासाठी वापरता येणार नाही.

(चार) सत्ताधारी पक्षाने निवडणुकीतील यशाची संभाव्यता वाढेल या दृष्टीने एकांगी राजकीय वृत्त देण्यासाठी आणि त्या पक्षाने केलेल्या प्रगतीसंबंधात निवडणुकीच्या कालावधीमध्ये वृत्तपत्रांमध्ये आणि इतर माध्यमांद्वारे सरकारी तिजोरीतील खर्चाने जाहिरात देण्याचे आणि सरकारी जनसंपर्क साधनांचा गैरवापर करण्याचे कटाक्षाने टाळावे.

(पाच) आयोगाने निवडणूक जाहीर केल्यापासून मंत्र्यांनी किंवा इतर प्राधिकाऱ्यांनी स्वेच्छा निधीतून अनुदानाची/प्रदानाची रक्कम मंजूर करता कामा नये ; आणि

(सहा) आयोगाने निवडणुका जाहीर केल्यापासून मंत्री आणि इतर प्राधिकारी,—

(क) कोणत्याही रुपातील वित्तीय अनुदाने जाहीर करणार नाहीत ; किंवा

(ख) कोणत्याही प्रकारच्या प्रकल्पांच्या किंवा योजनांच्या कोनशिला बसवणार नाहीत ; किंवा

(ग) रस्ते बांधणी, पिण्याच्या पाण्याची सोय यासारखे कुठलेही आश्वासन देणार नाहीत ; किवा

(घ) ज्याचा परिणाम सत्ताधारी पक्षाला मते मिळण्यामध्ये होईल अशी शासन, सरकारी उपक्रम इत्यादींमध्ये कोणतीही एतदर्थ नियुक्ती करणार नाहीत.

**टीप.**—कोणत्याही निवडणुकीच्या बाबतीत आयोग ज्या दिनांकास अधिसूचना काढण्याची शक्यता असेल त्या दिनांकापासून सर्वसाधारणपणे तीन आठवड्यांपेक्षा अधिक नसेल एवढा काळ अगोदर तो (आयोग) त्या निवडणुकीचा दिनांक जाहीर करील.

(सात) केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या मंत्रिमहोदयांनी, उमेदवार किंवा मतदार किंवा अधिकृत प्रतिनिधी असल्याखेरीज करून कोणत्याही मतदान केंद्राच्या ठिकाणी किंवा मतमोजणीच्या जागी प्रवेश करता कामा नये.

# अनुदेशांचा सारसंग्रह

## भाग—तीन

## आदर्श आचारसंहिता

ए १ — विविध शासकीय योजना, इ. करीता आदर्श आचारसंहिता

ए २ — स्वेच्छा निधीतून प्रदान आणि संसद सदस्य (खासदार)/विधानसभा सदस्य (आमदार) स्थानिक क्षेत्र विकास योजना

ए ३ — मंत्र्यांचे दौरे

ए ४ — विमाने/शासकीय वाहने यांचा वापर

ए ५ — अधिकाऱ्यांची पदस्थापना व बदलीवरील बंदी

## अनुक्रमणिका

### ए १—शासनाच्या विविध योजना इत्यादींकरिता आदर्श आचारसंहितेचे अनुदेश

### अनुदेश


| अनुदेश अ. क्रमांक (१) | पत्र क्रमांक (२) | दिनांक (३) | विषय (४) | पृष्ठ क्रमांक (५) |
|---|---|---|---|---|
| १ | ४६४/आयएनएसटी/२००७-पीएलएन-एक. | ७-१-२००७ | आचारसंहिता—काय करावे व काय करू नये | २-७ |
| २ | ४३७/६/२००९-सीसी व बीई. | ५-३-२००९ | सार्वत्रिक निवडणुका—आदर्श आचारसंहिता लागू करण्याबाबत | ८-१० |
| ३ | ४३७/६/आयएनएसटी/२००९-सीसी व बीई. | ९-३-२००९ | विविध शासकीय योजना/प्रकल्प, इत्यादींसाठी आदर्श आचारसंहिता लागू करणे. | ११ |
| ४ | ४३७/६/आयएनएसटी/२००८-सीसी व बीई. | १९-३-२००९ | आयोग, महामंडळे, समित्या, इत्यादींना आदर्श आचारसंहिता लागू करणे | १२ |
| ५ | ४३७/६/२०११/सीसी व बीई. | ११-१०-२०११ | | १३ |
| ६ | ४३७/६/आयएनएसटी/२०१२-सीसी व बीई. | २६-४-२०१२ | लोकसभा/विधानसभांच्या पोटनिवडणुका—आदर्श आचारसंहिता अंमलात आणण्याच्या अनुदेशांच्या संबंधात. | १४ |
| ७ | ४३७/६/आयएनएसटी/२०११-सीसी व बीई. | ५-४-२०११ | राजकीय पक्ष व उमेदवार यांच्या संबंधातील नगरपालिकांच्या बैठकीच्या मार्गदर्शकतत्त्वांसाठीच्या आदर्श आचारसंहितेबाबत. | १५ |
| ८ | ४३७/६/९३/जे. एस. दोन. | ३१-१२-१९९३ | सार्वत्रिक निवडणुका व पोट निवडणुका—मुक्त व निःपक्ष वातावरणात निवडणुका पार पाडण्याच्या दृष्टीने मोफत प्रवास पासांच्या गैरवापरास पायबंद घालण्यासाठी विशेष अनुदेश. | १६ |
| ९ | ४३४/६/पीएलएन–तीन | २२-३-१९९६ | मोठ्या निविदा व लिलाव—यासंबंधात | १७ |
| १० | ४३७/६/९८-पीएलएन–तीन | ८-१-१९९८ | निवडणुकीच्या प्रयोजनासंबंधी राजकीय पक्षांच्या बैठका आयोजित करण्यासाठी शासकीय अतिथिगृहे, भवन व राज्य सदने यांचा वापर करण्यावर निर्बंध घालणे. | १८ |
| ११ | ४३७/६/९८-पीएलएन–तीन | १०-१-१९९८ | प्रजासत्ताक दिन साजरा करणे—राजकीय पदाधिकाऱ्यांची उपस्थिती | १९ |
| १२ | ४३७/६/९९-पीएलएन–तीन | २८-७-१९९९ | स्वातंत्र्य दिन साजरा करणे—राजकीय पदाधिकाऱ्यांची उपस्थिती | २० |
| १३ | ४३७/६/आयएनएसटी/२०१२-सीसी व बीई. | २४-१-२०१२ | प्रजासत्ताक दिन साजरा करणे—राजकीय पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीबाबतच्या स्पष्टीकरणासंबंधी. | २१ |
| १४ | ४३७/६/९९-पीएलएन–तीन | १६-८-१९९९ | सद्भावना दिवस समारंभ साजरा करणे—राजकीय पदाधिकाऱ्यांचा सहभाग. | २२ |
| १५ | ४३७/६/आयएनएसटी/२०१२-सीसी व बीई. | १४-९-२००९ | आदर्श आचारसंहिता लागू करणे—निवडणुका जाहीर झाल्यानंतर जात, धर्म, किंवा भाषा यांच्या आधारे अधिवेशने घेण्यावर बंदी घालण्याबाबतच्या प्रस्तावाच्या संबंधात. | २३ |
| १६ | ४३७/६/३८/२००४-पीएलएन–तीन. | ६-४-२००४ | आदर्श आचारसंहिता—विश्रामगृहे, डाक बंगले व इतर शासकीय निवासस्थान यांचा वापर. | २४ |

**अनुदेश—**चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १७ | ४३७/६/९८/पीएलएन–तीन. | २३-१-१९९८ | नवरा किंवा बायको राष्ट्रीय आखाड्यात सक्रीय आहेत अशा अधिकाऱ्यांचे दौरे/रजा यांवरील निर्बंध. | २५ |
| १८ | ईसीआय/जीई ९८-४३७/६/बीआर/९८-पीएलएन-तीन. | २७-१-१९९८ | इफ्तार पार्टी—राज्याच्या खर्चाने मुख्यमंत्री यांच्या निवासस्थानी १०,००० निमंत्रित. | २६ |
| १९ | ४३७/६/९८-पीएलएन–दोन | १५-९-१९९८ | नवीन राज्य विधानसभांची निवडणूक घेण्यासाठी निवडणुकीची तयारी | २७ |
| २० | ४३७/६/२००२-पीएलएन-तीन. | २५-१-२००२ | आदर्श आचारसंहिता—निवडणूक काळात राज्य शासनाच्या वित्तीय संस्थांद्वारे वसुली रकमा आणि बुडित कर्जे माफ करण्याच्या संबंधात. | २८ |
| २१ | ४३७/६/३/२००४-पीएलएन-दोन. | १९-२-२००४ | अनधिकृत बांधकामे इत्यादींचे निष्कासन करण्यावरील/अनधिकृत बांधकामे पाडून टाकण्यावरील निर्बंध–यासंबंधात. | २९-३० |
| २२ | ४३७/६/२००४-पीएलएन-तीन. | ८-३-२००४ | सरकारी राज्यकोषाच्या रकमेतून जाहिराती व जाहिरात फलक प्रदर्शित करणे. | ३१ |
| २३ | ४३७/६/आयएनएसटी/२००८-सीसी व बीई. | १३-४-२००९ | आदर्श आचारसंहिता लागू करणे—सरकारी राज्यकोषाच्या रकमेतून जाहिराती प्रदर्शित करणे व जाहिरात फलक उभारणे. | ३२ |
| २४ | ४३७/६/१६/२००४ | ९-३-२००४ | आदर्श आचारसंहिता | ३३-३४ |
| २५ | ४३७/६/२३/२००४-पीएलएन-तीन. | ११-३-२००४ | सार्वत्रिक निवडणुका २००४—दुष्काळ निवारण कार्य करणे–यासंबंधात | ३५ |
| २६ | ४३७/६/६/२००४ | २५-३-२००४ | सभापती व उप सभापती यांना आदर्श आचारसंहिता लागू करणे | ३६ |
| २७ | ४३७/६/१६/२००३-पीएलएन-तीन. | १-४-२००४ | ग्रामविकास कार्यक्रमांच्या अंमलबजावणी संदर्भातील स्पष्टीकरण | ३७ |
| २८ | ४३७/६/२००४-पीएलएन-तीन. | ८-५-२००४ | २००४ च्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका—मुक्त व निःपक्ष निवडणुकीची खात्री करून घेण्यासाठी वाहनांच्या हालचालींवर वाजवी निर्बंध–संबंधीचे स्पष्टीकरण. | ३८ |
| २९ | ४३७/६/१/२००४-पीएलएन-तीन. | ११-८-२००४ | महाराष्ट्र विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक—अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे–महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ—यासंबंधात. | ३९ |
| ३० | ४३७/६/२००४-पीएलएन-तीन. | २६-८-२००४ | संसद सदस्य/विधानसभा सदस्य यांच्या स्थानिक क्षेत्र विकास योजनेच्या अंतर्गत निधी देणे. | ४० |
| ३१ | ४३७/६/२००४-पीएलएन-तीन. | २८-९-२००४ | गांधी जयंती साजरी करणे—राजकीय पदाधिकाऱ्यांचा सहभाग | ४१ |
| ३२ | ४३७/६/२००४-पीएलएन-तीन. | २९-९-२००४ | हज अर्थसहाय्याशी संबंधित असणारे निवेदन | ४२ |
| ३३ | ४३७/६/२८/२००४-पीएलएन-तीन. | २९-९-२००४ | ४ ऑक्टोबर २००४ रोजी राष्ट्रीय दैनिकांमध्ये जागतिक अधिवास दिनानिमित्त जाहिराती देण्यासंबंधात. | ४३ |
| ३४ | ४३७/६/आयएनएसटी/२००९-सीसी व बीई. | २३-२-२००९ | जागतिक अधिवास दिन, पल्स पोलिओ/एचआयव्ही जनजागृती मोहिमा यांसारख्या निमित्तांसंबंधातील तसेच स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, गांधी जयंती, राज्य स्थापना दिन यांसारखे विविध दिवस साजरे करण्याच्या संबंधातील जाहिराती प्रसिद्ध करणे. | ४४ |

**अनुदेश—**चालू



| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ३५ | ४३७/६/२००४-पीएस-तीन. | ७-१०-२००४ | धार्मिक व भाषिकदृष्ट्या अल्पसंख्याकांमधील सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास घटकांच्या कल्याणाकरिता राष्ट्रीय आयोग स्थापन करणे. | ४५ |
| ३६ | ४३७/६/२००४-पीएलएन-तीन. | २४-१२-२००४ | सरकारी राज्यकोषातील खर्चाने जाहिराती व जाहिरात फलक प्रदर्शित करणे. | ४६ |
| ३७ | ४३७/६/आयएनएसटी/२०१३-सीसी व बीई. | २५-६-२०१३ | आदर्श आचारसंहिता—लोकसभा/विधानसभा पोट निवडणुकांमध्ये केंद्र/राज्य शासनांकडून जाहिरातींचे प्रकाशन करण्यासंबंधात. | ४७ |
| ३८ | ४३७/६/२००४-पीएलएन-तीन. | ३०-१२-२००४ | आदर्श आचारसंहिता—व्हिडिओवरून परिसंवाद करण्यास बंदी—यासंबंधात. | ४८ |
| ३९ | ४३७/६/३३/२००४-पीएलएन-तीन. | ३१-१२-२००४ | बिहार, झारखंड व हरियाणा यांच्या राज्य विधानसभांची सार्वत्रिक निवडणूक, २००५—आदर्श आचारसंहिता लागू करण्याच्या संबंधात. | ४९ |
| ४० | ४३७/६/२००६-पीएलएन-तीन (खंड तीन). | १६-३-२००६ | राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियमाची (नरेगा) अंमलबजावणी-आदर्श आचारसंहिता लागू करणे—यासंबंधात. | ५० |
| ४१ | ४३७/६/२००६-पीएलएन-तीन (खंड दोन). | १-४-२००६ | शासकीय अतिथिगृहांचे वाटप—यासंबंधात. | ५१ |
| ४२ | ४३७/६/२००७/आयएनएसटी/पीएलएन-तीन. | २१-११-२००७ | लोकसभेच्या व राज्य विधानसभेच्या सार्वत्रिक/पोट निवडणुकांच्या निवडणूक कालावधीत अधिकृत संकेतस्थळावरील राजकारणी व्यक्ती/मंत्री यांचे सर्व संदर्भ वगळण्याची संबंधित असणाऱ्या अनुदेशांशीच्या संबंधात. | ५२ |
| ४३ | ४६४/आयएनएसटी/२००७-पीएलएन-एक. | ८-१-२००७ | प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर मतदारसंघामध्ये राजकीय पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीवर निर्बंध. | ५३ |
| ४४ | ४३७/६/२००६-पीएलएन-तीन. | २३-११-२००७ | निवडणुकांच्या कालावधीत वाहनांचा गैरवापर करण्यास प्रतिबंध. | ५४-५७ |
| ४५ | ४३७/६/आयएनएसटी/२००८-सीसी व बीई. | २८-३-२००९ | निवडणुकीच्या कालावधीत वाहनांचा गैरवापर करण्यास प्रतिबंध यासंबंधात. | ५८ |
| ४६ | ४६४/आयएनएसटी/२००७-पीएलएन-एक. | १२-१०-२००७ | प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर एखाद्या मतदारसंघामध्ये राजकीय पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीवर निर्बंध. | ५९ |
| ४७ | ३/८/ /२००० जेएस-दोन | २६-१२-२००० | निवडणूक प्रचार मोहिमांमधील ध्वनिक्षेपकांचा वापर-एकत्रित अनुदेश. | ६०-६१ |
| ४८ | ५०९/७५/२००४/जेएस-एक. | १५-४-२००४ | दूरचित्रवाणी वाहिनी व केबल नेटवर्क यांवरील राजकीय स्वरुपाच्या जाहिरातींसंबंधातील दिनांक १३ एप्रिल २००४ रोजीचा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश. | ६२-६९ |
| ४९ | पीएस/एके/२००५ | १०-९-२००५ | राजकीय पदाधिकाऱ्यांद्वारे मतदानाच्या गुप्ततेचा भंग. | ७० |
| ५० | पीएस/एके/२००५ | १०-९-२००५ | ज्या राजकीय पदाधिकाऱ्यांना राज्य शासनाकडून सुरक्षा देण्यात आली आहे त्या राजकीय पदाधिकाऱ्यांच्या, प्रचार कालावधी संपल्यानंतर आणि त्यांनी त्यांचे मत दिल्यानंतर मतदानाच्या दिवशीच्या उपस्थितीवर निर्बंध. | ७१ |
| ५१ | ४६४/आयएनएसटी/२००६/पीएलएन-एक. | १७-३-२००६ | आसाम, केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल व पाँडेचेरी विधानसभांच्या सार्वत्रिक निवडणुका-वाहन परवान्यांच्या संबंधात. | ७२ |

**अनुदेश—**चालू


| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ५२ | ४३७/६/आयएनएसटी/२००८ सीसी आणि बीई | ३१-१०-२००८ | लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७(१) अंतर्गत देण्यात आलेल्या स्पष्टीकरणाच्या खंड (क) द्वारे लाभ घेऊन पक्ष प्रचारकर्त्यांनी मार्ग परिवहनाचा वापर करण्यासंबंधात. | ७३ |
| ५३ | ३/९/२००४/जेएस-दोन | २४-८-२००४ | पत्रके, भित्तिपत्रके इत्यादींच्या मुद्रणावरील निर्बंध. | ७४ |
| ५४ | ४६४/आयएनएसटी/२००८/ इपीएस. | ७-१-२००७ | “डमी उमेदवारांबद्दलच्या” प्रतिक्रिया—या संबंधात हाती घ्यावयाच्या उपाययोजना. | ७५-७६ |
| ५५ | ४६४/आयएनएसटी/२००८/ पीएलएन—एक. | २७-२-२००८ | प्रचाराचा कालावधी समाप्त झाल्यानंतर एखाद्या मतदारसंघातील राजकीय पदाधिकाऱ्याच्या उपस्थितीवरील निर्बंधांच्या संबंधात. | ७७ |
| ५६ | ३/९/२००७/जेएस-दोन | ३-८-२००७ | वर्तमानपत्रे व अन्य मुद्रण प्रसारमाध्यमातील निवडणुकीच्या संबंधातील जाहिराती निवडणूक प्रचार मोहिम—यासंबंधात. | ७८ |
| ५७ | ३/९/२००७/जेएस-दोन | १६-१०-२००७ | पत्रके, भित्तिपत्रके इत्यादींच्या मुद्रणावरील निर्बंध. | ७९ |
| ५८ | ३/९/२००७/पीएलएन-तीन | २४-१०-२००७ | गुजरात विधानसभा, २००७ ची सार्वत्रिक निवडणूक—मंत्री/उमेदवार यांच्या सुरक्षाकवचा—संबंधात. | ८० |
| ५९ | ४६४/आयएनएसटी/२००८- ईपीएस | २-१२-२००८ | प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर मतदारसंघात राजकीय पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीवरील निर्बंध. | ८१ |
| ६० | ४३७/६/आयएनएसटी/ २००९/सीसी आणि बीई. | ९-३-२००९ | लोकसभा २००९ ची सार्वत्रिक निवडणूक-अर्थसंकल्प सादर करणे—आदर्श आचारसंहिता—यासंबंधात. | ८२ |
| ६१ | ४३७/६/आयएनएसटी/२००८ सीसी आणि बीई. | ३०-३-२००९ | आदर्श आचारसंहिता लागू करणे—भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामांचे अधिग्रहण करणे—यासंबंधात. | ८३ |
| ६२ | ४३७/६/आयएनएसटी/२००८ सीसी आणि बीई | १७-४-२००९ | आदर्श आचारसंहिता लागू करणे—केंद्रीय वखार महामंडळाच्या (केंवम) गोदामांचे अधिग्रहण आणि निवडणूक कर्तव्यातून केंद्रीय वखार महामंडळाच्या अधिकाऱ्यांना सूट देणे—यासंबंधात. | ८४ |
| | | | **ए २-स्वेच्छानिधींतून प्रदान आणि संसद सदस्य (खासदार) विधानसभा सदस्य (आमदार) स्थानिक क्षेत्र विकास योजना** | |
| ६३ | ५७६/१७/८४ | ९-११-१९८४ | सार्वत्रिक निवडणुका किंवा पोट-निवडणुका यांच्या अगदी लगतपूर्वीच्या काळात स्वेच्छानिधीतून रकमा प्रदान करणे. | ८६ |
| ६४ | ४३७/६/८९ | ७-११-१९८९ | सार्वत्रिक निवडणुकांच्या अगदी लगतपूर्वीच्या काळात मंत्र्याच्या स्वेच्छा अनुदानांमधून रकमा प्रदान करण्याच्या संबंधात. | ८७-९४ |
| ६५ | ४३७/७/२००४/पीएलएन- तीन. | २९-२-२००४ | लोकसभा आणि आंध्र प्रदेश, कर्नाटक, ओरिसा व सिक्किम या राज्यांच्या विधानसभांच्या सार्वत्रिक निवडणुका-खासदार/आमदार यांच्या स्थानिक क्षेत्र विकास योजनेअंतर्गत निधी देणे. | ९५ |
| | | | **ए ३-मंत्र्यांचे दौरे** | |
| ६६ | ४३७/६/ईएस ००२५/ ९४/एमसीएस. | २१-१०-१९९४ | निवडणूक कालावधी—मंत्र्यांचे दौरे.. | ९८-९९ |
| ६७ | ४३७/६/९६/पीएलएन-तीन | १७-१-१९९६ | सार्वत्रिक निवडणुका—मंत्र्यांचे दौरे. | १००-१०१ |

**अनुदेश—**चालू

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ६८ | ४३७/६/आयएनएसटी/ २०१०-सीसी आणि बीई/ खंड-दोन. | ५-४-२०११ | निवडणूक प्रचारासाठी वाहनांचा वापर-सुरक्षेच्या कारणास्तव पुरविलेली बुलेटप्रुफ वाहने-अनुदेशांसंबधीत. | १०२ |
| ६९ | ४३७/६/आयएनएसटी/ २००९-सीसी आणि बीई. | १८-२-२००९ | आदर्श आचारसंहिता-लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम ७७ याचे तत्वतः व अक्षरशः अनुपालन—यासंबंधात. | १०३-१०४ |
| ७० | ४३७/६/२००७- पीएलएन-तीन | २३-११-२००७ | मंत्र्यांचे दौरे-सार्वत्रिक निवडणुका. | १०५-१०८ |
| ७१ | ४३७/६/७/२००४/ पीएलएन-तीन | २८-१२-२००४ | केंद्रीय रेल्वे मंत्री यांचे दौरे. | १०९ |
| ७२ | ४३७/६/आयएनएसटी/ २०११-सीसी आणि बीई. | २४-०३-२०११ | मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यासंबंधात. | ११० |
| ७३ | ४३७/६/आयएनएसटी/ २०११-सीसी आणि बीई. | १-४-२०११ | मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यासंबंधात. | १११ |
| ७४ | ४३७/६/आयएनएसटी/ २०११-सीसी आणि बीई. | २७-४-२०११ | मुख्यमंत्री व केंद्र सरकारच्या मंत्र्यांच्या दौऱ्यांसंबंधात | ११२ |
| ७५ | ४३७/६/आयएनएसटी/ २०१०-सीसी आणि बीई. | ७-६-२०१० | निवडणूक मोहिमेसाठी विशेष सुरक्षा गटाचे संरक्षण असणाऱ्यांसाठी (प्रधानमंत्र्यांशिवाय इतरांना) बुलेटप्रुफ वाहनांचा वापर करण्यासंबंधात | ११३ |
| | | | **ए-४ विमाने/शासकीय वाहने यांचा वापर** | |
| ७६ | ४३७/६/९४/एमसीएस– खंड-पाच. | २०-१०-१९९४ | विमाने व हेलीकॉप्टर भाड्याने देणे. | ११६ |
| ७७ | ४३७/६/९६/पीएलएन-तीन | ०९-०४-१९९६ | सार्वत्रिक निवडणुका—मंत्री/उमेदवार यांना सुरक्षाकवच. | ११७ |
| ७८ | ४३७/६/९८-पीएलएन-तीन | ०८-०१-१९९८ | राजकीय पक्षांकडून विमानांचा वापर. | ११८ |
| ७९ | ४३७/६/९८-पीएलएन-तीन | १८-०८-१९९९ | निवडणुकीच्या कालावधीदरम्यान विमानाचा वापर. | ११९ |
| ८० | ४३७/६/९८-पीएलएन-तीन | १८-०८-१९९८ | राजकीय पक्षांकडून व शासकीय पदाधिकाऱ्यांकडून अनुसूचित वाणिज्यिक विमानांखेरीज अन्य खाजगी मालकीच्या विमानांचा वापर. | १२० |
| ८१ | ४/२००१/जेएस-दोन | ३०-०३-२००१ | निवडणुकीच्या काळात वाहनांच्या गैरवापरास प्रतिबंध करण्याबाबत —स्पष्टीकरण. | १२१ |
| ८२ | ४/२००१/जेएस-दोन | ०८-०५-२००१ | मतदान व मतमोजणीच्या दिवशी खाजगी स्थिर पंखे असलेली विमाने व हेलिकॉप्टर्स यांचा वापर करून राजकीय पक्षांच्या नेत्यांनी मतदान व मतमोजणी यांच्या प्रक्रियेवर देखरेख ठेवणे व संनियंत्रण करणे —याबाबत. | १२२ |
| ८३ | ४३७/६/२००८/सीसी आणि बीई. | ०९-०४-२००९ | राजकीय पक्षांनी विमाने/हेलिकॉप्टर यांचा वापर करणे—यासाठी आचारसंहिता लागू करणे याबाबत. | १२३ |
| ८४ | ४३७/६/२००८/सीसी आणि बीई. | १९-१०-२००८ | विधानसभा, २००८ च्या सार्वत्रिक निवडणुका—विविध मंडळे/आयोग इत्यादींच्या पदाधिकाऱ्यांकडून शासकीय वाहनांच्या वापरासंबंधात. | १२४ |
| ८५ | ४६४/आयएनएसटी/२०११/ ईपीएस. | २३-०३-२०११ | विधानसभाच्या सार्वत्रिक निवडणुका—निवडणूक प्रचार मोहिमेच्या प्रयोजनाकरिता उमेदवार, राजकीय पक्ष, नेते इत्यादींकडून हेलिकॉप्टरचा वापर—याची योग्य नोंद ठेवणे—यासंबंधात. | १२५ |

**अनुदेश—**समाप्त

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| --- | --- | --- | --- | --- |
| ८६ | ४६४/आयएनएसटी/२०११/ इपीएस. | २३-०३-२०११ | वरील राज्यांच्या विधानसभांच्या सार्वत्रिक निवडणुका—निवडणुकीत युती करणाऱ्या किंवा जागांची विभागणी करणाऱ्या पक्षांचा पक्षध्वज फडकविण्यासाठी परवानगी यासंबंधात. | १२६ |
| ८७ | ४६४/आयएनएसटी/२०११/ इपीएस. | २३-०३-२०११ | राज्य विधानसभांच्या सार्वत्रिक निवडणुका—प्रसिद्धी साहित्याची वाहतूक करण्यासाठी वाहन परवानगीकरिता राजकीय पक्षांची विनंती यांसंबंधात. | १२७ |
| ८८ | ४६४/आयएनएसटी/२०११/ इपीएस. | २३-०३-२०११ | राज्य विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका, २०११—मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या जिल्हा पदाधिकाऱ्यांना वाहन परवाना देण्यासंबंधात. | १२८ |
| | | | **ए-५ अधिकाऱ्यांची पदस्थापना आणि अधिकाऱ्यांच्या बदल्यांवरील बंदी** | |
| ८९ | ४३७/६/आयएनएसटी/ २००९-सीसी आणि बीई. | ०४-०२-२००९ | लोकसभेची सार्वत्रिक निवडणूक, २००९—अधिकाऱ्यांच्या पदस्थापनेसंबंधी. | १३०-१३१ |
| ९० | ४३७/६/आयएनएसटी/ २००९-सीसी आणि बीई. | १८-०२-२००९ | अधिकाऱ्यांची पदस्थापना करण्यावरील आयोगाचे दिनांक ४ फेब्रुवारी २००९ च्या अनुदेशाबाबतचे स्पष्टीकरण. | १३२ |
| ९१ | ४३७/६/१/२००८ | १९-१०-२००८ | आदर्श आचारसंहितेचे उपयोजन—राज्य विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांबाबत. | १३३ |

# ए-१ शासनाच्या विविध योजना इत्यादींकरिता आदर्श आचारसंहितेचे अनुदेश

## अनुदेश क्रमांक १

सर्व राज्ये व संघराज्य क्षेत्रे यांचे मुख्य सचिव व यांना पाठविलेले पत्र क्रमांक ४६४/आयएनएसटी/२००७-पीएलएन-१, दिनांक ७ जानेवारी २००७.

**विषय.—**आचारसंहिता-काय करावे व काय करू नये.

आयोगाने, आचारसंहितेचे पालन करण्याबाबत वेळोवेळी विविध अनुदेश दिलेले आहेत. आचारसंहितेचे महत्त्वाचे घटक खालीलप्रमाणे पुन्हा उद्धृत करण्यात आले आहेत.

**कल्याणकारी योजना व शासकीय कामकाजाबाबत :**

१. सत्तेत असलेल्या राजकीय पक्षाचा मतदारांवर प्रभाव पडेल असे नवीन प्रकल्प किंवा कार्यक्रम किंवा कोणत्याही स्वरूपातील सवलती किंवा वित्तीय अनुदाने घोषित करणे अथवा त्यांची आश्वासने देणे किंवा त्याची कोनशिला बसवणे इत्यादींस मनाई करण्यात आली आहे.

२. हे निर्बंध, नवीन योजना व तसेच चालू असलेल्या योजना यांना सारखेच लागू असतील परंतु, याचा अर्थ असा नाही की, ज्या योजना अगोदरच पूर्णत्वाच्या टप्प्यावर आल्या आहेत अशा राष्ट्रीय, प्रादेशिक किंवा राज्य उपयोगी योजना, त्याचा उपयोग किंवा काम, लोकहितार्थ थांबविले पाहिजे किंवा विलंबित केले पाहिजे. आदर्श आचरसंहिता अंमलात आल्यामुळे अशा योजना कार्यान्वित राहत नाहीत किंवा त्या ठप्प होतात अशी कोणतीही सबब सांगता येऊ शकत नाही. त्याचवेळी अशा योजनांचे कार्यान्वयन कोणत्याही राजकीय यंत्रणेस सहयोगी करून घेतल्याशिवाय व कोणताही गाजावाजा न करता किंवा कोणताही समारंभ न करता नागरी प्राधिकरणाकडून करण्यात आले आहे, जेणेकरून असे कार्यान्वयन सत्ताधारी राजकीय पक्षाचा निवडणुकीवर प्रभाव टाकण्याच्या दृष्टीने करण्यात आले आहे, असा कोणताही ग्रह होणार नाही किंवा ग्रह निर्माण केला जाणार नाही, याची खात्री केली पाहिजे. या संबंधात जर कोणतीही शंका असेल तर मुख्य निवडणूक अधिकाऱ्याकडून/भारत निवडणूक आयोगाकडून स्पष्टीकरण मिळवावे.

३. आणखी असेही स्पष्ट करण्यात येते की, कोणत्याही विशिष्ट योजनेसाठी अर्थसंकल्पीय तरतूद करण्यात आली आहे किंवा योजनेस यापूर्वीच मंजुरी देण्यात आली आहे किंवा राज्यपालांच्या किंवा मंत्र्याच्या अर्थसंकल्पीय भाषणात योजनेचा निर्देश करण्यात आला होता केवळ ऐवढ्याच्या कारणावरून याचा अर्थ असा नाही की, आचारसंहिता अंमलात असतेवेळी निवडणुका जाहीर झाल्यानंतर अशा योजना जाहीर करता येऊ शकतात किंवा त्याचे उद्‌घाटन करता येऊ शकते किंवा अन्य प्रकारे त्या हाती घेता येऊ शकतात. त्यांचा मदतारांवर प्रभाव पडण्याचा इरादा स्पष्ट असल्याने अशी कृती जर ती हाती घेतली असेल तर आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन असल्याचे समजण्यात येईल.

४. शासकीय योजनांना नव्याने मंजुरी देण्यात येणार नाही. लाभादी योजनांचे जरी त्या चालू असल्या तरी, राजकीय कार्याधिकाऱ्याद्वारे (मंत्री इत्यादी) घेण्यात येणारा आढावा व लाभाभिमुख योजनांचे संस्करण, निवडणुका पूर्ण होईपर्यंत थांबविण्यात यावे. राज्याच्या ज्या भागात निवडणूक घेण्यात येत आहे अशा कोणत्याही भागात, आयोगाच्या पूर्वपरवानगी शिवाय कल्याणकारी योजना व बांधकामे याकरिता नव्याने निधी देऊ नये किंवा बांधकामांचे कंत्राट देऊ नये. जर कोणतीही योजना राज्यामध्ये कार्यान्वित करण्यात आली असेल तर, संसद सदस्य (राज्यसभेच्या सदस्यांसह) स्थानिक क्षेत्र विकास निधी किंवा विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य स्थानिक विकास निधी याखालील कामांचा देखील यात समावेश होतो.

५. आदर्श आचारसंहिता अंमलात येण्यापूर्वी कामाचे आदेश देण्यात आले असले तरी, जर क्षेत्रामध्ये प्रत्यक्षात कामाला सुरूवात करण्यात आली नसेल तर, असे कोणतेही काम सुरू करण्यात येणार नाही, ही कामे, निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतरच केवळ सुरू करता येऊ शकतील. तथापि, जर एखादे काम प्रत्यक्षात सुरू करण्यात आले असेल तर, ते चालू ठेवता येऊ शकेल.

६. संबंधित अधिकाऱ्यांची खात्री पटण्याच्या अधीन राहून, पूर्ण झालेल्या कामाची (कामांची) रक्कम प्रदान करण्यास कोणताही रोध असणार नाही.

७. आकस्मिक परिस्थितीचे किंवा अवर्षण, पूर, साथीचे रोग किंवा अन्य नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या लोकांना मदत पुरविणे या सारख्या अकल्पित आपत्तीचे निवारण करण्यासाठी किंवा वृद्ध, विकलांग इत्यादींसाठी कल्याणकारी उपाययोजना करण्यासाठी हाती घेतलेल्या योजनांकरिता मान्यता देण्यास आयोग कोणताही नकार देणार नाही. तथापि, याबाबतीत आयोगाची पूर्वमान्यता घेतली पाहिजे आणि सर्व प्रकारचे दिखावू समारंभ कटाक्षाने टाळण्यात यावेत आणि अशा कल्याणकारी उपाययोजना किंवा मदत व पुनर्वसन कामे, सत्ताधारी पक्षाच्या मतदारांवर प्रभाव पाडण्यासाठी शासनाकडून हाती घेण्यात येत आहेत व त्या गोष्टींचा इतर पक्षांच्या निवडणूक भवितव्यावर प्रतिकूल परिणाम होईल असा ग्रह निर्माण होणार नाही किंवा निर्माण होण्यास वाव असणार नाही.

**अधिकाऱ्यांच्या बदल्या व पदस्थापना करण्याबाबत :**

आयोग असे निदेश देत आहे की, निवडणुकीच्या कामकाजाशी संबंधित असलेल्या सर्व अधिकाऱ्यांच्या/कर्मचाऱ्यांच्या बदलीवर पूर्णपणे बंदी असली पाहिजे. यामध्ये पुढील गोष्टींचा, परंतु त्यापुरतेच मर्यादित नाही, समावेश होतो.

(एक) मुख्य निवडणूक अधिकारी व अपर/सह/उप मुख्य निवडणूक अधिकारी,

(दोन) विभागीय आयुक्त,

(तीन) जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी व निवडणुकीच्या कामकाजाशी संबंधित असलेले इतर महसुली अधिकारी,

(चार) महानिरीक्षक व उप निरीक्षक या दर्जाचे निवडणूक व्यवस्थापनाशी संबंधित असलेले पोलीस विभागाचे अधिकारी, वरिष्ठ पोलीस अधीक्षक व पोलीस अधीक्षक, पोलीस उप अधीक्षक दर्जाचे उप विभागीय पातळीवरील पोलीस अधिकारी आणि लोक प्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ याच्या कलम २८क अन्वये आयोगाकडे प्रतिनियुक्तीवर असलेले अन्य पोलीस अधिकारी,

(पाच) वाहतूक शाखा, इ. व्ही. एम. शाखा, मतदान साहित्याचे प्रापण व वितरण शाखा, प्रशिक्षण शाखा, मुद्रण शाखा, इत्यादीमध्ये निवडणुकीच्या कामासाठी नियुक्त केलेले प्रक्षेत्रिय व क्षेत्रिय अधिकारी यासारखे इतर अधिकारी, राज्यातील निवडणुकीचे व्यवस्थापन करण्यामध्ये ज्यांचा सहभाग असेल असे वरिष्ठ अधिकारी यांचा देखील या निदेशांद्वारे समावेश केला आहे.

(सहा) वरील प्रवर्गाच्या बाबतीत, निवडणुका जाहीर केल्याच्या तारखेपूर्वी काढण्यात आलेले परंतु जेव्हा आदर्श आचारसंहिता अंमलात आली त्या तारखेपर्यंत अंमलात न आलेले बदल्याचे आदेश आयोगाकडून विशेष परवानगी घेतल्याशिवाय अंमलात येणार नाहीत.

(सात) ही बंदी, निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत अंमलात राहील.

(आठ) जेव्हा प्रशासकीय निकडीच्या कारणामुळे एखाद्या अधिकाऱ्याची बदली करणे आवश्यक वाटत असेल त्याबाबतीत, राज्य शासन संपूर्ण समर्थनासह, आयोगाची पूर्व मान्यता घेईल.

(नऊ) **आयोगाच्या पूर्व मान्यतेशिवाय या कालावधीमध्ये शासनामध्ये/सार्वजनिक उपक्रमांमध्ये कोणत्याही नियुक्त्या किंवा पदोन्नत्या करण्यात येणार नाहीत.**

**शासकीय यंत्रणेचा गैरवापर करण्याबाबत :**

१. निवडणूक प्रचार कार्यासाठी शासकीय वाहनांचा वापर करता येऊ शकणार नाही.

**शासकीय वाहनामध्ये :—**

- केंद्र व राज्य सरकारे,
- केंद्र व राज्य शासनाचे सार्वजनिक उपक्रम,
- केंद्र व राज्य शासनाचे संयुक्त क्षेत्र उपक्रम,
- स्थानिक संस्था, महानगरपालिका, नगरपरिषदा,
- पणन मंडळे (मग त्यांना कोणत्याही नावाने संबोधण्यात येवो.),
- सहकारी संस्था,
- स्वायत जिल्हा परिषदा, किंवा,
- ज्यांच्या सार्वजनिक निधीमध्ये एकूण भागांपैकी कितीही लहान भाग गुंतविण्यात आला आहे असा अन्य कोणताही विकास यांच्या मालकीच्या सर्व वाहनांचा आणि तसेच,
- संरक्षण मंत्रालयाच्या आणि गृह कार्य मंत्रालय व राज्य शासन यांच्या अखत्यारीतील केंद्रीय पोलीस संघटना यांच्या मालकीच्या वाहनांचा समावेश होता.

२. केंद्रीय किंवा राज्याच्या मंत्र्यास खाजगी भेटी देण्यासाठी त्याच्या किंवा तिच्या खाजगी वाहनाचा (वाहनांचा) वापर करण्याची मोकळीक असेल, अशा खाजगी भेटींसाठी, त्यांच्या सोबत मंत्र्यांचा शासकीय स्वीय कर्मचारीवर्ग असणार नाही. तथापि, जनहितार्थ जो टाळता येऊ शकत नाही अशा निव्वळ शासकीय कामकाजाकरिता जर एखादा मंत्री, त्यांच्या मुख्यालयाबाहेर काही आकस्मिक परिस्थितीमुले प्रवास करीत असेल तर, ज्या ठिकाणी भेट देण्याचा मंत्र्याचा इरादा आहे. त्या ठिकाणाबाबत राज्याच्या मुख्य सचिवास, विभागाच्या संबंधित सचिवाकडून तशा आशयाचे प्रमाणित

करणारे पत्र पाठविण्यात आले पाहिजे व त्याची प्रत आयोगाला पाठविली पाहिजे. अशा दौऱ्याच्या वेळी, मुख्य सचिव, अशा मंत्र्यास त्याच्या शासकीय दौऱ्यासाठी शासकीय वाहन व निवास व्यवस्था आणि इतर नेहमीचा राजशिष्टाचार पुरवू शकेल. तथापि, अशा शासकीय दौऱ्याच्या लगतपूर्वी किंवा त्या दरम्यान किंवा त्या दौऱ्याला जोडून कोणताही मंत्री कोणतीही निवडणूक प्रचार मोहीम किंवा राजकीय कार्यक्रम पार पाडणार नाही किंवा ते एकत्रितपणे घेणार नाही. आयोग, त्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याशी रीतसर सल्लामसलत करून अशा व्यवस्थांवर लक्ष ठेवील.

३. कोणताही मंत्री मग तो केंद्राचा मंत्री असो की, राज्याचा मंत्री असो, निवडणुका जाहीर झाल्यापासून सुरू होणाऱ्या कालावधीत कोणत्याही शासकीय चर्चेसाठी, मतदारसंघाच्या किंवा राज्याच्या निवडणुकीशी संबंधित असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास पाचारण करणार नाही. जेव्हा संबंधित विभागांचा प्रभारी या नात्याने एखादा मंत्री किंवा मुख्यमंत्री कायदा, सुव्यवस्था ढासळल्यामुळे किंवा एखाद्या नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा अन्य कोणत्याही आकस्मिक परिस्थितीमुळे त्या ठिकाणी पहाणी करण्याच्या, भेट देण्याच्या/मदत करण्याच्या प्रयोजनार्थ आणि तत्सम प्रयोजनार्थ, एखाद्या मतदारसंघात भेट देत असतील तेव्हा त्या प्रयोजनार्थ अशा मंत्र्यांच्या/मुख्यमंत्र्याच्या उपस्थित जातीने उपस्थित राहणे आवश्यक असेल तेव्हाच केवळ अपवाद होईल.

४. मंत्र्यांना शासकीय कामासाठी त्यांच्या शासकीय निवासस्थानापासून त्यांच्या कार्यालयापर्यंत जाण्यासाठीच केवळ त्यांची शासकीय वाहने वापरण्याचा हक्क असेल. परंतु, कार्यालयात जाता जाता कोणतेही निवडणूक प्रचार कार्य किंवा कोणताही राजकीय कार्यक्रम एकत्रितपणे करता येणार नाही.

५. मंत्र्यांना मग ते केंद्रीय मंत्री असोत किंवा राज्याचे मंत्री असोत कोणत्याही रीती निवडणूक प्रचारकार्याबरोबर त्यांचा शासकीय दौरा एकत्रितपणे करता येणार नाही.

६. कोणत्याही राजकीय कार्याधिकाऱ्यास, मग तो खाजगी दौऱ्यावर असो की, शासकीय दौऱ्यावर असो, जरी राज्य प्रशासनाने, अशा दौऱ्याच्या वेळी त्याच्या सोबत सशस्त्र सुरक्षारक्षकांची उपस्थिती आवश्यक असणारे सुरक्षा कवच दिलेले असले, तरी देखील पायलट कार किंवा कोणत्याही रंगाचे संकेतदीप असलेली कार अथवा कोणत्याही प्रकारचे सायरन लावलेली कार वापरता येणार नाही. मग असे वाहन शासनाच्या मालकीचे किंवा खाजगी मालकीचे असले तरी, हा निदेश लागू असेल.

७. जो अधिकारी, जेथे निवडणुका घेण्यात येत आहेत, अशा मतदारसंघात खाजगी भेटीवर असताना मंत्र्यांची भेट घेईल असा कोणताही अधिकारी, संबंधित सेवा नियमांन्वये गैरवर्तणुकीबाबत दोषी असेल, आणि जर तो लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ च्या कलम १२९(१) मध्ये नमूद केलेला एखादा अधिकारी असेल तर त्याने याशिवाय त्या कलमाच्या सांविधिक तरतुदींचे उल्लंघन केले असल्याचे मानण्यात येईल आणि त्यान्वये तरतूद केलेल्या दंडात्मक कारवाईस पात्र असेल.

**निवडणुका घोषित झाल्यापासून ते निवडणूक प्रक्रिया संपेपर्यंत उमेदवार आणि राजकीय पक्ष यांच्या मार्गदर्शनासाठी "काय करावे" आणि "काय करू नये" याबाबतची अंमलात आणावयाची तत्त्वे :—**

निवडणुका घोषित झाल्यापासून निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत उमेदवारांनी आणि राजकीय पक्षांनी **"काय करावे" व "काय करू नये" याची आयोगाने सूची तयार केली आहे.** यास सर्वाधिक व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी व यात अंतर्भूत असलेले मजकूर सर्व उमेदवारांच्या व राजकीय पक्षांच्या निदर्शनास आणून देण्यात यावेत. तसेच तो राज्याच्या राजभाषेमध्ये प्रसिद्ध करण्यात यावा याविषयी आयोगाने निदेश दिलेले आहेत.

**उमेदवारांच्या व राजकीय पक्षांच्या असे स्पष्टपणे निदर्शनास आणून देण्यात यावे की, "काय करावे" व "काय करू नये" याची सूची केवळ वानगीदाखल असून ती सर्वसमावेशक नाही आणि ज्यांचे काटेकोरपणे पालन व्हावयास पाहिजे असे इतर तपशीलवार निदेश/अनुदेश हे पर्यायी म्हणून किंवा त्यामध्ये फेरबदल करण्याचा हेतू नाही.**

**"काय करावे" :**

(१) **निवडणुका घोषित होण्यापूर्वी क्षेत्रात प्रत्यक्षपणे सुरू करण्यात आलेले कार्यक्रम पुढे चालू ठेवता येतील.**

(२) पूर, अवर्षण, रोगाची घातक साथ किंवा इतर नैसर्गिक आपत्ती यांच्यामुळे प्रभावित झालेल्या क्षेत्रांतील जनतेसाठी पीडानिवारण आणि पुनर्वसन कार्य सुरू करता व चालू ठेवता येऊ शकेल.

(३) मरणासन्न किंवा गंभीररित्या आजारी असलेल्या व्यक्तींना उचित मान्यतेने रोख रक्कम किंवा वैद्यकीय सुविधा देणे चालू ठेवता येऊ शकेल.

(४) मैदानांसारखी सार्वजनिक ठिकाणे निवडणूक सभा घेण्यासाठी सर्व पक्षांना/निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना निःपक्षपातीपणे उपलब्ध झाली पाहिजे. त्याचप्रमाणे हेलिपॅडचा वापरही सर्व पक्षांना/निवडणूक लढवणाऱ्या उमेदवारांना निःपक्षपातीपणे करता आला पाहिजे.

(५) इतर राजकीय पक्ष आणि उमेदवार यांच्यावरील टीका, त्यांची धोरणे, कार्यक्रम पूर्वीची कामगिरी आणि कार्य यांच्याशीच संबंधित असावी.

(६) शांततापूर्ण आणि उपद्रवरहित गृहस्थजीवन जगण्याचा प्रत्येक व्यक्तीचा अधिकार पूर्णपणे जतन करण्यात यावा.

(७) **स्थानिक पोलीस प्राधिकाऱ्यांना प्रस्तावित सभांची जागा आणि वेळ याबाबत पुरेशी आगाऊ सूचना देऊन आवश्यक ती परवानगी घेतलेली असावी.**

(८) प्रस्तावित सभेच्या जागी कोणतेही निर्बंधक किंवा प्रतिबंधक आदेश जारी केलेले असल्यास त्याचे पूर्णपणे पालन करण्यात यावे. आवश्यक असल्यास, त्याबाबत सूट मिळण्याकरिता अर्ज केला पाहिजे आणि अशी सूट वेळीच मिळवावी.

(९) **प्रस्तावित सभेसाठी ध्वनिवर्धकाचा वापर करण्याची आणि अशा इतर कोणत्याही सुविधांसाठी परवानगी मिळवावी.**

(१०) सभांमध्ये अडथळे आणणाऱ्या किंवा अन्यथा सुव्यवस्था बिघडवणाऱ्या व्यक्तींचा बंदोबस्त करण्यासाठी पोलिसांची मदत घेण्यात यावी.

(११) **मिरवणूक सुरू होण्याची वेळ आणि जागा, ती जेथून जाणार असेल तो मार्ग आणि ती जेथे संपणार असेल ती वेळ आणि जागा अगोदर निश्चित करण्यात येईल आणि पोलीस प्राधिकाऱ्यांकडून त्यासाठी आगाऊ परवानगी घेण्यात यावी.**

(१२) मिरवणूक जेथून जाणार असेल त्या भागांमध्ये कोणताही निर्बंधक आदेश जारी असल्यास, त्याबाबत खात्री करून घेऊन, त्याचे पूर्णपणे अनुपालन करण्यात यावे. त्याचप्रमाणे वाहतूक विनियम आणि इतर निर्बंध यांचेही अनुपालन करण्यात यावे.

(१३) मिरवणुकीमुळे वाहतुकीला अडथळा होऊ देऊ नये.

(१४) मतदान शांततापूर्ण आणि सुनियोजित रीतीने पार पडावे यासाठी निवडणूक अधिकाऱ्यांना नेहमीच सहकार्य करावे.

(१५) सर्व कार्यकर्त्यांनी बिल्ले व ओळखपत्र ठळकपणे लावावीत.

(१६) मतदारांना पुरविण्यात आलेल्या अनौपचारिक ओळखचिठ्ठ्या साध्या (पांढऱ्या) कागदावर असाव्यात आणि त्यावर कोणतेही चिन्ह, उमेदवाराचे नाव किंवा पक्षाचे नाव असू नये.

(१७) प्रचाराच्या कालावधीमध्ये व मतदानाच्या दिवशी वाहने चालविण्यावरील निर्बंधाचे पूर्णतः पालन करण्यात यावे.

(१८) निवडणूक आयोगाकडून वैध प्राधिकारपत्र मिळविलेल्या व्यक्तींनाच फक्त मतदार, उमेदवार व त्यांचे निवडणूक/मतदार प्रतिनिधी यांव्यतिरिक्त कोणत्याही मतदान कक्षात प्रवेश करता येईल, इतर व्यक्ती कितीही उच्चपदस्थ असली तरी (उदा. मुख्यमंत्री, मंत्री, खासदार किंवा आमदार इत्यादी) तिला अटीतून सूट मिळणार नाही.

(१९) निवडणुका घेण्याविषयीची कोणतीही तक्रार किंवा समस्या, आयोग/निवडणूक निर्णय अधिकारी/क्षेत्र/प्रक्षेत्र दंडाधिकारी/भारत निवडणूक आयोग यांनी नियुक्त केलेल्या निरीक्षकांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात.

(२०) निवडणूक आयोग/निवडणूक निर्णय अधिकारी/जिल्हा निवडणूक अधिकारी यांचे निवडणुकीच्या विविध पैलूंशी संबंधित असलेल्या सर्व बाबींविषयीचे निदेश/आदेश/सूचना यांचे पालन करण्यात यावे.

(२१) आपण एखाद्या मतदारसंघातील मतदार किंवा उमेदवार किंवा त्या उमेदवाराचा निवडणूक प्रतिनिधी नसला तर प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर आपण त्या मतदारसंघातून निघून जावे.

**“काय करू नये” :**

(१) सत्ताधारी पक्ष/शासन यांनी केलेल्या कामगिरीविषयी सरकारी राज्यकोषातील खर्चाने कोणतीही जाहिरात व सर्व जाहिराती काढण्यास प्रतिबंध आहे.

(२) **कोणताही मंत्री तो किंवा ती उमेदवार असल्याशिवाय किंवा फक्त मतदानासाठी मतदार म्हणून आला असेल त्याशिवाय मतदान कक्षात किंवा मतमोजणीच्या जागी प्रवेश करणार नाही.**

(३) **शासकीय कामाची निवडणूक मोहीम/निवडणूक प्रचार कार्यासोबत सरमिसळ करू नये.**

(४) मतदाराला, पैशाचे किंवा अन्य कशाचेही प्रलोभन दाखवू नये.

(५) मतदारांच्या जातीय समूह भावनांना आवाहन करू नये.

(६) वेगवेगळ्या जाती समूह किंवा धार्मिक किंवा भाषिक गट यांच्यामधील विद्यमान मतभेत वाढवील किंवा परस्पर द्वेष किंवा तणाव निर्माण करील असे कोणतेही काम करण्याचा प्रयत्न करू नये.

(७) इतर पक्षांचे नेते किंवा कार्यकर्ते यांच्या सार्वजनिक जीवनाशी संबंधित नसलेल्या खाजगी आयुष्याच्या कोणत्याही पैलूवर टीका करण्याची परवानगी दिली जाणार नाही.

(८) इतर पक्ष किंवा त्यांचे कार्यकर्ते यांच्यावर, आंधळेपणाने केलेले आरोप आणि विपर्यस्त माहिती यांच्या आधारावर टिकाटिप्पणी करू नये.

(९) देवळे, मशिदी, चर्च, गुरुद्वार किंवा इतर कोणतेही प्रार्थनास्थळ यांचा वापर निवडणूक प्रचाराची भाषणे, भित्तीपत्रके, संगीत यांच्यासह निवडणूक प्रचाराची जागा म्हणून केला जाणार नाही.

(१०) मतदारांना लाच देणे, मतदारांवर गैरवाजवी दडपण, मतदारांना धाकदपटशा दाखविणे तोतयेगिरी, मतदान केंद्रापासून १०० मीटर्सच्या आत प्रचार करणे, मतदान समाप्त करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेच्या आधीच्या ४८ तासात सार्वजनिक सभा घेणे, आणि मतदारांची मतदान केंद्रावर ने-आण करण्यासाठी वाहनाची व्यवस्था करणे यासारख्या भ्रष्ट आणि निवडणूक अपराध समजल्या जाणाऱ्या गोष्टींना मनाई आहे.

(११) लोकांच्या मतांचा किंवा त्यांच्या कामांचा निषेध करण्यासाठी त्यांच्या घरासमोर निदर्शने करणे किंवा धरणे यांचा कोणत्याही परिस्थीतीत अवलंब केला जाणार नाही.

(१२) स्थानिक कायद्यांच्या अधीन राहून, कोणत्याही व्यक्तीची जमीन, इमारत, आवर भिंत, वाहने इत्यादींच्या मालकाच्या विशिष्ट परवानगीशिवाय (जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला दाखविण्यासाठी व त्यांच्याकडे जमा करण्याकरिता) ध्वजदंड उभारण्यासाठी, निशाण्या लावण्यासाठी, सूचना चिकटविण्यासाठी, घोषणा लिहिण्यासाठी कोणीही वापर करणार नाही.

(१३) इतर राजकीय पक्ष आणि उमेदवार यांनी आयोजिक केलेल्या सार्वजनिक सभा किंवा मिरवणुका यांच्यामध्ये कोणताही अडतळा निर्माण करू नये.

(१४) ज्या ठिकाणी इतर पक्षांच्या सभा घेतल्या जात असतील अशा ठिकाणांहून मिरवणूक नेऊ नये.

(१५) मिरवणुकीतील लोक, क्षेपणास्त्र किंवा शस्त्र म्हणून ज्याचा दुरुपयोग केला जाऊ शकतो अशा कोणत्याही वस्तू जवळ बाळगण्यात येऊ नयेत.

(१६) इतर पक्षांनी व उमेदवारांनी लावलेली भिंतीपत्रके काढून टाकू नयेत अथवा विद्रुप करू नयेत.

(१७) मतदानाच्या दिवशी ओळखचिठ्ठया वाटपाच्या ठिकाणी किंवा मतदान कक्षाच्या जवळ भित्तीपत्रके, ध्वज, चिन्हे आणि इतर प्रचार साहित्य यांचे प्रदर्शन करू नये.

(१८) ध्वनिवर्धकांचा मग ते एका जागा लावलेले असोत किंवा चालत्या वाहनावर बसविलेले असोत, त्यांचा सकाळी ६-०० पूर्वी किंवा रात्री १०-०० नंतर आणि संबंधित अधिकाऱ्यांच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय वापर करण्यात येऊ नये.

(१९) संबंधित प्राधिकाऱ्याच्या लेखी पूर्वपरवानगीशिवाय, सार्वजनिक सभा आणि मिरवणुका यांच्या मध्येही ध्वनिवर्धकाचा वापर करण्यात येऊ नये. सर्वसाधारणपणे अशा सभा/मिरवणुका रात्री १०-०० नंतर चालू ठेवण्याची परवानगी देण्यात येऊ नये आणि त्याशिवाय त्याचा वापर स्थानिक कायदे, त्या जागेच्या सुरक्षा व्यवस्थेचे प्रत्यक्ष ज्ञान आणि हवामानाची स्थिती, सणासुदींचा मोसम, परीक्षेचे दिवस इत्यादींसारख्या परिस्थितीच्या अधीन असेल.

(२०) निवडणुकीच्या काळात दारूचे वाटप केले जाणार नाही.

(२१) ज्या व्यक्तीच्या सुरक्षिततेला धोका असल्याबाबत खात्री पटली आहे आणि म्हणून तिला सरकारी सुरक्षा पुरविण्यात आली आहे. अशी कोणतीही व्यक्ती, मतदानाच्या दिवशी, त्याच्या सुरक्षा कर्मचारीवर्गासह मतदान केंद्र असलेल्या जागेच्या परिसरात (१०० मीटरसच्या आत) प्रवेश करणार नाही. तसेच, अशी कोणतीही व्यक्ती, मतदानाच्या दिवशी, त्याच्या सुरक्षा कर्मचारीवर्गासह मतदारासंघामध्ये फिरणार नाही. जर सरकारी सुरक्षा पुरविलेली व्यक्ती, मतदार असेल तर, केवळ मतदान करण्यासाठी सोबत असेलेल्या सुरक्षा कर्मचारीवर्गासह त्याच्या/तिच्या ये-जा करण्यावर निर्बंध घालील.

(२२) ज्या व्यक्तीच्या सुरक्षितलेला धोका असल्याबाबत खात्री पटली आहे आणि म्हणून तिला सरकारी सुरक्षा पुरवली आहे किंवा त्या व्यक्तीकडे खाजगी सुरक्षा रक्षक आहेत अशा कोणत्याही व्यक्तीची निवडणूक प्रतिनिधी किंवा मतदान प्रतिनिधी किंवा मतमोजणी प्रतिनिदी म्हणून नियुक्ती करण्यात येऊ नये.

**टीप.— "काय करावे" किंवा "काय करू नये"** यांची वरील सूची केवळ वानगीदाखल असून ती सर्वसमावेशक नाही. वरील विषयावरील इतर तपशीलवार आदेश, निदेश/सूचना यांना पर्यायी असणार नाही. त्यांचे काटेकोर पालन करावेच लागेल.

**या बाबतीत कोणतीही शंका असेल तर, भारताचा निवडणूक आयोग/आपल्या राज्याचे मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडून स्पष्टीकरण/मान्यता मिळविण्यात यावा.**

# अनुदेश क्रमांक २

कॅबिनेट सचिव, भारत सरकार आणि सर्व राज्यांचे व संघराज्यक्षेत्रांचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहलेले भारत निवडणूक आयोगाचे (ईसीआय)पत्र क्रमांक ४३७/६/२००९-सीसी व बीई, दिनांक ५ मार्च २००९.

**विषय.—**सार्वत्रिक निवडणुका–आदर्श आचारसंहिता लागू करण्याबाबत.

**महोदय,**

आपणास असे कळवण्याचा मला आदेश आहे की, आयोगाने, सार्वत्रिक निवडणुकांच्या कालावधीतील आचारसंहितेच्या संदर्भात, अनेक दृष्टीने विचार केला आहे आणि केंद्र सरकार व राज्य शासनाकडून विविध प्रकल्प, योजना, ग्रामीण विकास कार्यक्रम इत्यादींची अंमलबजावणी/ कार्यवाही यासंबंधात, मार्गदर्शकतत्त्वे जारी करण्याचे ठरविले आहे :

१. आदर्श आचारसंहितेशी संबंधित सर्व निदेश केवळ आयोगाकडूनच जारी करण्यात येतील. मंत्रिमंडळ सचिवालय किंवा कोणतेही अन्य शासकीय अभिकरण यांनी आयोगाच्या निदेशांचे पालन करण्यासाठी त्यांचा पुनरुच्चार करावा आणि प्रसार करावा.

२. भारतीय रिझर्व बँक, मुद्रा धोरण प्रश्नांवर कोणत्याही आडकाठीविना निर्णय घेऊ शकेल.

३. आदर्श आचारसंहिता अंमलात आल्यानंतर, वित्त मंत्रालयाला, कोणत्याही धोरणविषयक घोषणा, राजकोषीय उपाययोजना, कराशी संबंधित बाबी आणि यासारखे अन्य वित्तीय सहाय्य यासंबंधात, आयोगाच्या पूर्वमान्यतेची आवश्यकता असेल. तसेच, अन्य मंत्रालये/ विभाग यांना, कोणतेही सहाय्य/लाभ जाहीर करण्यापूर्वी आयोगाची पूर्वमान्यता घेण्याची आवश्यकता असेल.

४. आदर्श आचारसंहिता अंमलात आल्यानंतर, शासकीय अधिकाऱ्यांना **निवडणूक आयोगाच्या निदेशाशिवाय** पुढील प्रकारची विद्यमान कामे पुढे चालू ठेवता येतील :—

(क) आवश्यक त्या सर्व मंजुरी प्राप्त केल्यानंतर प्रत्यक्ष या कारणास्तव सुरू केलेले बांधकाम प्रकल्प ;

(ख) आदर्श आचारसंहिता अंमलात येण्यापूर्वी जेथे विनिर्दिष्ट लाभार्थ्यांची नावे निश्चित करण्यात आली आहेत असे, लाभदायी प्रकल्प ;

(ग) राष्ट्रीय रोजगार हमी योजनेच्या (नरेगाच्या) नोंदणीकृत लाभार्थ्यांचा विद्यमान प्रकल्पांतर्गत समावेश करण्यात यावा. राष्ट्रीय रोजगार हमी योजनेंतर्गत नवीन प्रकल्प हे, केवळ याआधी नोंदणी केलेल्या लाभार्थ्यांसाठीच असेल, आणि हा प्रकल्प मान्यता व मंजुरी प्रकल्पांच्या यादीत आधीच सूचीबद्ध असून त्याकरिता आधीच निधी राखून ठेवण्यात आले असतील तर, या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये अनिवार्य असल्यास प्रकल्पाचे काम हाती घेण्यात यावे.

५. निर्धारित कार्यपद्धती व वित्त विभागाची सहमती यांच्या अधीन राहून, पूर्ण केलेल्या कामाच्या कोणत्याही हिश्श्याचा निधी देण्यास कोणतीही आडकाठी असणार नाही.

६. आदर्श आचारसंहिता अंमलात येण्यापूर्वी पुढील सर्व शर्तींची पूर्तता करणारी पुढील प्रकारची नवीन कामे (लाभार्थी असोत किंवा कार्याभिमुख) आयोगास कळवून हाती घेता येतील :—

(क) संपूर्ण निधीकरणबद्ध असलेली ;

(ख) प्रशासकीय, तांत्रिक व वित्तीय मंजुरी घेण्यात आलेली ;

(ग) निविदा देण्यात आलेली, मूल्यमापन केलेली व निवाडा केलेली आणि ;

(घ) दिलेल्या मुदतीत काम सुरू करणे व संपवणे हे संविदात्मक आबंधन आहे आणि तसे न केल्यास कंत्राटदारावर शास्ती लादण्यासंबंधिचे आबंधन आहे ;

(ङ) अशा प्रकरणात वरीलपैकी कोणत्याही शर्तींची पूर्तता करण्यात येत नसेल तर, आयोगाची पूर्व मान्यता मिळविण्याचा प्रयत्न करून ती प्राप्त करण्यात येईल.

७. आधीच बदलत्या स्वरूपात असलेल्या जागतिक निविदा ज्यांना अशा प्रयोजनासाठी कोणतीही विनिर्दिष्ट मुदत दिली असेल तर त्यांचे मूल्यमापन करण्यात येईल आणि त्यांची अंतिम निश्चिती करता येईल.

८. जागतिक निविदांखेरीज अन्य निविदा, ज्या आधीच बदलत्या स्वरूपात आहेत त्या निविदांचे मूल्यमापन करण्यात यावे. परंतु, आयोगाच्या पूर्व मान्यतेशिवाय त्यांना अंतिम रूप देता येणार नाही. जर त्या (निविदा) आधीच बदलत्या स्वरूपात नसतील तर, त्यांमध्ये आयोगाच्या पूर्वमान्यतेशिवाय कोणतेही बदल करता येणार नाहीत.

९. आयोग, मानव-निर्मित किंवा नैसर्गिक आपत्ती यामुळे आवश्यक आहे असे काम करण्याबाबत न चुकता मानवतावादी दृष्टीकोन स्विकारीत असते :–

(क) आपत्ती नंतरच्या परीणामामुळे बाधित झालेल्या व्यक्तींना सहाय्याचे सध्याच्या दराने/प्रमाणानुसार, आयोगाला कळवून, सानुग्रह रकमा व अनुग्रह सहाय्य प्रत्यक्षपणे देता येईल. तथापि, आयोगाच्या पूर्वपरवानगीशिवाय, विद्यमान दरांत/प्रमाणांत रकमा देण्याच्या प्रचलित व विहित प्रमाणांत कोणताही बदल करण्यात येणार नाही ;

(ख) आयोगाकडे निर्देश न करता वैयक्तिक रुग्णांना (लाभार्थ्यांना) थेट रोख रक्कम प्रदान करण्याऐवजी मुख्यमंत्री/पंतप्रधान सहायता निधीतून थेट रुग्णालयांना थेट रक्कम प्रदान करण्याची परवानगी असेल ;

(ग) एखाद्या आपत्तीत बाधा पोहचलेल्या व्यक्तींच्या हालअपेष्टा, प्रत्यक्षपणे व केवळ, कमी करण्याचा उद्देश असलेली निकडीची राहतकारी कामे व उपाययोजना आयोगाला माहिती देऊन, हाती घेता येईल ;

(घ) तथापि, बंधारे, पाण्याचे कालवे, इत्यादींची दुरूस्ती यांसारखी नैसर्गिक आपत्तींचा संभाव्य परिणाम कमी करण्याच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांच्या मार्गाने करणे आवश्यक असतील अशी नवीन कामे, केवळ आयोगाच्या पूर्वपरवानगीनेच हाती घेता येऊ शकतील ;

(ङ) तसेच, आयोगाच्या पूर्वमान्यतेशिवाय, एखादे क्षेत्र हे, अवर्षणग्रस्त/पूरग्रस्त क्षेत्र म्हणून किंवा असे कोणतेही आपत्तीग्रस्त क्षेत्र म्हणून घोषित केले जाणार नाही. आपत्तीग्रस्त असल्याचे आधीच घोषित केलेल्या क्षेत्राची व्याप्ती आयोगाच्या पूर्वमान्यतेशिवाय विस्तारित केली जाऊ शकणार नाही ;

(च) तसेच, पंतप्रधान किंवा मुख्यमंत्री सहायता निधीतून व्यक्तींच्या गटाला कोणतेही निवडक सहाय्य देताना आयोगाच्या पूर्वमान्यतेची आवश्यकता असेल.

१०. पुढील प्रकारच्या कार्यक्रमांसाठी **आयोगाची पूर्वपरवानगी** आवश्यक असेल :—

(क) कोणत्याही स्वरूपाच्या स्वेच्छाधिकार निधीतून नवीन कामे व प्रकल्प हाती घेतली जाऊ शकत नाहीत. या संदर्भात, स्वेच्छाधिकार निधी यात, सामान्य रीतीने, ज्याची अर्थसंकल्पात तरतूद केलेली आहे आणि आदर्श आचारसंहिता अंमलात येण्यापूर्वी ज्याकरिता कोणताही निश्चित केलेला व मंजूर केलेला प्रकल्प अस्तित्त्वात नाही अशा निधीचा समावेश होतो ;

(ख) सार्वजनिक क्षेत्रातील आजारी उपक्रमांचे (पीएसयू) पुनरुज्जीवन शासनाने उपक्रम ताब्यात घेणे, इत्यादीचे प्रस्ताव (किंवा त्या धर्तीवरील कोणताही धोरणात्मक निर्णय) हाती घेतले जाऊ शकत नाही ;

(ग) जरी वार्षिक लिलावाची वेळ आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत येत असली तरीदेखील दारु विक्री, इत्यादीचे नवीन लिलाव, घेतले जाऊ शकणार नाहीत. जेव्हा आवश्यक असेल तेव्हा शासनाने, त्यांच्या संबंधित कायद्यांमध्ये तरतूद केल्याप्रमाणे, अंतरिम व्यवस्था करावी ;

(घ) कोणतेही विद्यमान प्रकल्प/योजना/कार्यक्रम यांचे कार्यक्षेत्र, विस्तारित केले जाऊ शकत नाही किंवा वाढविले जाऊ शकत नाही ;

(ङ) शासनाकडून कोणत्याही संस्थेस मग ती वैयक्तिक असो किंवा उपक्रम असो, कोणत्याही जमिनीचे वाटप केले जाणार नाही ;

(च) जेथे शासन पक्षकार आहे तेथे कोणताही समझोता करार किंवा करारनामा स्वाक्षरित करताना, आयोगाच्या पूर्वपरवानगीची देखील आवश्यकता असेल.

११. केंद्रीय लोकसेवा आयोग, राज्य लोकसेवा आयोग किंवा कर्मचारी निवड आयोग किंवा इतर कोणतेही सांविधिक प्राधिकरण यांच्यामार्फत होणारी नियमित सेवाभरती/नियुक्ती किंवा पदोन्नती नियमितपणे चालू राहू शकेल. असांविधिक संस्थांमार्फत होणाऱ्या सेवाभरतीसाठी आयोगाची पूर्वपरवानगी आवश्यक असेल.

१२. कोणतेही काम (कोणत्याही राहतकारी कामासह) किंवा विकासविषयक कार्यक्रम सुरू करताना, कोणत्याही राजकीय कार्याधिकाऱ्यास सहभागी करून कोणताही औपचारिक कार्यक्रम आयोजित करता येणार नाही. एक चांगल्या पद्धतीची बाब म्हणून, शासकीय कार्याधिकाऱ्यांची उपस्थिती असली तरी देखील नेहमीचे कार्यक्रम आणि प्रसिद्धी किमान मर्यादेतच असली पाहिजे.

१३. आंतरराष्ट्रीय वचनबद्धतेंची पूर्तता करताना जेव्हा कामे हाती घ्यावयाची असतील किंवा कार्यक्रम घ्यावयाचे असतील तेव्हा, आयोगाची पूर्वसहमती घेतली जाईल.

१४. भारत सरकारचे सर्व निर्देश अधिमान्यतेने मंत्रिमंडळ सचिवालयामार्फत भारताच्या निवडणूक आयोगाकडे करण्यात येतील. जेथवर राज्य शासनांकडील निर्देशांचा संबंध असेल तेथवर ते, संबंधित राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यामार्फत (सीईओ) भारताच्या निवडणूक आयोगाकडे करण्यात येतील.

हे सर्व संबंधित प्राधिकरणांच्या निदर्शनास आणून द्यावे.

## अनुदेश क्रमांक ३

श्री. एस. बी. अग्नीहोत्री, सहसचिव, मंत्रिमंडळ सचिवालय, नवी दिल्ली यांना उद्देशून लिहिलेले भारताच्या निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/आयएनएसटी/२००९-सीसी व बीई, दिनांक ९ मार्च २००९.

**विषय.—**विविध शासकीय योजना/प्रकल्प, इत्यादींसाठी आदर्श आचारसंहिता लागू करणे.

श्री. जे. पी. प्रकाश, उप निवडणूक आयुक्त यांना उद्देशून लिहिलेले आपले अर्धशासकीय पत्र क्रमांक जेएस (एसबीए)/२००९/०४, दिनांक ४ मार्च २००९ च्या संदर्भात आपणास असे कळवण्याचा मला आदेश आहे की, आपल्या पत्रात उल्लेख केलेल्या पुढील योजनांखालील कोणतेही अतिरिक्त काम हे आयोगाच्या पूर्वपरवानगीने हाती घेण्यात येईल असे आयोगाने ठरविले आहे :—

१. वेगवर्धित सिंचन लाभ कार्यक्रम (ए.आय.बी.पी.)—जल संपदा मंत्रालय.

२. राष्ट्रीय सामाजिक सहाय्य कार्यक्रम (एन.एस.पी.)—ग्रामविकास मंत्रालय.

३. जवाहरलाल नेहरू राष्ट्रीय नागरी पुनरुत्थान अभियान (जे.एन.एन.यु.आर.एम.)—नागरी परिवहन यंत्रणेसाठी बसेसची खरेदी करण्याच्या योजनेसह नगरविकास मंत्रालय.

४. वेगवर्धित ऊर्जा व विकास सुधारणा कार्यक्रम (ए.पी.डी.आर.पी.)—ऊर्जा मंत्रालय.

५. इंदिरा आवास योजना (आय.ए.वाय.)—ग्रामविकास मंत्रालय.

६. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना (एस.जी.एस.वाय.)—ग्रामविकास मंत्रालय.

७. संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना (एस.जी.आर.वाय.)—ग्रामविकास मंत्रालय.

८. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (पी.एम.जी.एस.वाय.)—ग्रामविकास मंत्रालय.

९. तंत्रज्ञान श्रेणीवाढ निधी योजना (टी.यु.एफ.एस.)—वस्त्रोद्योग मंत्रालय.

१०. राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियम (एन.आर.ई.जी.ए.)—ग्रामविकास मंत्रालय.

११. गृहनिर्माण व नागरी दारिद्र्य निर्मूलन मंत्रालय (एच.यु.पीए) यांच्याद्वारे अंमलबजावणी करावयाची—परवडण्याजोगी घरे.

कृपया या पत्राची पोच द्यावी.

## अनुदेश क्रमांक ४

कॅबिनेट सचिव, भारत सरकार, सर्व राज्ये व संघराज्य क्षेत्रांचे मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले भारताच्या निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/आयएनएसटी/२००८-सीसी व बीई, दिनांक १९ मार्च २००९.

**विषय.—**आयोग, महामंडळे, समित्या इत्यादींना आदर्श आचारसंहिता लागू करणे.

आपणास असे कळवण्याचा मला आदेश आहे की, राष्ट्रकूल खेळ आयोजन समिती, डी.डी.ए. वीज नियामक आयोग, जल मंडळे, परिवहन महामंडळे, अन्य कोणतेही विकास प्राधिकरण इत्यादींसारख्या केंद्र सरकारकडून किंवा कोणत्याही राज्य शासनाकडून संपूर्णतः किंवा अंशतः निधी पुरवठा करण्यात येत असलेल्या सर्व संघटना/समित्या, महामंडळे/आयोग, इत्यादींना आदर्श आचारसंहितेच्या तरतुदी लागू करण्याबाबत स्पष्टीकरण देण्याचे आयोगाने ठरविले आहे. राजकीय पक्ष किंवा उमेदवार यांनी आपली कामगिरी ठळकपणे निदर्शनास आणून देणाऱ्या किंवा नवीन अर्थसहाय्य प्रशुल्क किंवा योजना घोषित करणाऱ्या त्यांनी दिलेल्या त्यांच्या जाहिरातीची कोणतीही प्रसिद्धी करण्यासह त्यांच्याकरिता आदर्श आचारसंहितेमध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींचे उल्लंघन करण्यातील कोणतीही कृती ही, आदर्श आचारसंहितेच्या तरतुदींचे लक्ष वेधून घेईल व त्यांचे उल्लंघन केल्यासारखेच असेल.

## अनुदेश क्रमांक ५

मंत्रिमंडळ सचिव, भारत सरकार, राज्यांचे व केंद्रशासित प्रदेशांचे मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी यांना पाठविलेले भारतीय निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ४३७/६/२०११/सीसीॲन्डबीई, दिनांक ११ ऑक्टोबर २०११.

**विषय.—**लोकसभा/राज्य विधानसभा/विधानपरिषदा यांच्या सार्वत्रिक/पोट-निवडणुका—आदर्श आचारसंहिता लागू राहण्याचा कालावधी यासंबंधात.

मला असे कळविण्याचा निदेश आहे की, आयोगाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे :—

(एक) लोकसभा/राज्य विधानसभा यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या बाबतीत, निवडणूक आयोगाने निवडणुकीचे वेळापत्रक घोषित केल्याच्या दिनांकास लागू होणारी आदर्श आचारसंहिता ही, निवडणूक अधिसूचनांमध्ये नमूद केल्याप्रमाणे, ज्या दिनांकास निवडणूक प्रक्रिया पूर्ण होणार आहे त्यापूर्वीच्या दिनांक (त्यापूर्वीचे दिनांक) लक्षात न घेता, आयोगाने संबंधित नवीन सभागृह (सभागृहे) घटित करणारी रीतसर संविधानिक अधिसूचना एकदा काढली की त्यानंतर लागू असण्याचे बंद होईल ;

(दोन) लोकसभा/राज्य विधानसभा यांच्या पोट-निवडणुकांच्या बाबतीत, आदर्श आचारसंहित ही, संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने पोट-निवडणुकीचा निकाल औपचारिकपणे जाहीर केल्यानंतर तात्काळ लागू असण्याचे बंद होईल.

(तीन) राज्यांच्या विधानपरिषदांच्या सर्व निवडणुकांच्या बाबतीत, जेथे आदर्श आचारसंहिता लागू असेल तेथे, संबंधित निवडणूक निर्णय अधिकाऱ्याने निवडणुकीचा निकाल जाहीर केल्यावर आचारसंहिता लागू असण्याचे बंद होईल.

हा अनुदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा.

## अनुदेश क्रमांक ६

कॅबिनेट सचिव, भारत सरकार, मुख्य सचिव आणि मुख्य निवडणूक अधिकारी आंध्र प्रदेश, गोवा, झारखंड, केरळ, मध्यप्रदेश, महाराष्ट्र, तामिळनाडू, त्रिपूरा, उत्तरप्रदेश व पश्चिम बंगाल यांना उद्देशून लिहिलेले भारतीय निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/आयएनएसटी/२०१२/सीसी/ॲण्ड बीई, दिनांक २६ एप्रिल २०१२.

**विषय.—** लोकसभा/विधानसभांच्या पोट निवडणुका आदर्श आचार संहिता अंमलात आणण्याच्या अनुदेशांच्या संबंधात

आपणास असे कळविण्याचा मला आदेश आहे की, दिनांक २४ एप्रिल २०१२ च्या प्रसिद्धीपत्रकाद्वारे, निवडणूक आयोगाने विविध राज्यातील विवक्षित लोकसभा व विधानसभा मतदारसंघातील पोट-निवडणुका घोषित केल्या आहेत. या प्रसिद्धीपत्रकात आयोगाने, आदर्श आचार संहितेच्या विविध तरतुदी अंमलात आणण्यासाठीच्या सूचना, त्या तरतुदी ज्या जिल्ह्यात/जिल्ह्यांत विधानसभा/लोकसभा मतदारसंघ येत असेल अशा संपूर्ण जिल्ह्यात/जिल्ह्यांत पूर्णतः अंमलात आणण्याच्या अटींसह, जारी केल्या आहेत.

पोट-निवडणुकीदरम्यान संपूर्ण जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता अंमलात आणण्यामुळे संपूर्ण जिल्ह्यातील विकास कामांना बाधा पोहचेल म्हणून जिल्ह्याचा काही भागच निवडणूक प्रक्रियेमध्ये अंतर्भूत करण्यात यावा. याकरिता आदर्श आचारसंहिता संपूर्ण जिल्ह्यात अंमलात आणण्याच्या मुद्याचा फेरविचार करण्याची विनंती अनेक राज्यातील प्रशासनांकडून आयोगास करण्यात आली आहे.

आयोगाने, या बाबतीतील सर्व संबद्ध घटक विचारात घेतल्यानंतर, प्रायोगिक तत्त्वावर, दिनांक २४ एप्रिल २०१२ च्या प्रसिद्धी पत्रकाद्वारे घोषित पोट-निवडणुकांकरिता आदर्श आचारसंहितेच्या या आधीच्या सूचनांमध्ये अंशतः फेरबदल करून खालील सूचनांचे पालन करण्यात यावे, असा निर्णय घेतला आहे :—

**(१) मनरेगा, नैसर्गिक आपत्ती ओढावल्यास, दुष्काळ पडल्यास, पूर आल्यास सहाय्य वाढवून देणे व कामे सुरू करणे, पिण्याचे पाणी पुरविणे, कूपनलिका खोदणे, शेतकऱ्यांना वैरण कृषीविषयक सामग्री पुरवणे आणि त्यासाठी अर्थसहाय्य देणे, खासदार स्थानिक क्षेत्र विकास योजना, आमदार (विधानसभा सदस्य व विधानपरिषद सदस्य) स्थानिक क्षेत्र विकास योजना यांसह नवीन विकास कामे काढणे (लाभार्थी किंवा रोजगारभिमुख), नवीन प्रकल्पांची घोषणा करून ते प्रकल्प सुरू करणे, सवलती देणे, वित्तीय अनुदाने देणे, मालमत्तेचे नुकसान भरून देणे, प्रचार मोहिमेच्या प्रयोजनार्थ शासकीय मालमत्तेचा वापर करणे, इत्यादी योजनांच्या कार्यान्वयनाच्या विनियमाकरिता आयोगाने जारी केलेल्या सर्व सूचना ता पोट-निवडणुका घेण्यात येणारा विधानसभा मतदार संघ (अनेक मतदारसंघ) लोकसभा मतदारसंघ (अनेक मतदारसंघ) ज्या क्षेत्रात येतो/(येतात) त्या क्षेत्रापुरतीच लागू होतील आणि ज्या जिल्ह्यात/(जिल्ह्यांमध्ये) असा मतदारसंघ येतो/(येतात) त्या संपूर्ण जिल्ह्यासाठी (जिल्हांसाठी) लागू होणार नाहीत.**

**(२) तथापि, मंत्र्यांचे दौरे, वाहने, जाहिराती, शासकीय अतिथी गृहांचा वापर आणि परिच्छेद (१) मध्ये नमूद केलेल्या सूचनांव्यतिरिक्त आयोगाच्या सध्याच्या सर्व सूचना, अधिकारी इत्यादींच्या बदल्या यासारख्या प्रकरणात आदर्श आचारसंहितेच्या आयोगाच्या विद्यमान सर्व इतर सूचना, पोट-निवडणूक होणारा मतदार संघ ज्या जिल्ह्यात (जिल्ह्यांत) येतो त्या संपूर्ण जिल्ह्यासाठी (जिल्ह्यांसाठी) लागू असण्याचे चालू राहील.**

ही बाब सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून यावी.

प्रत.—सर्व मान्यताप्राप्त पक्षांचे अध्यक्ष/सरचिटणीस यांना.

## अनुदेश क्रमांक ७

सर्व राज्यांच्या आणि संघराज्य क्षेत्रांच्या मुख्य सचिवांना आणि मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना उद्देशून असलेले भा. नि. आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/आयएनएसटी/२०११/सीसीॲण्ड बीई, दिनांक ५ एप्रिल २०११.

**विषय.—** राजकीय पक्ष व उमेदवार यांच्या संबंधातील नगरपालिकांच्या बैठकीच्या मार्गदर्शक तत्त्वांसाठीच्या आदर्श आचारसंहितेबाबत.

महोदय,

आपणास असे कळविण्याचा मला आदेश आहे की, कुल्टी नगरपालिकेच्या पालिका सदस्यांची कोणतीही बैठक आदर्श आचारसंहिता अंमलात असतांना घेतली जाणार नाही असे प्रतिज्ञापन मागवून, उच्च न्यायालय, कलकत्ता यांच्या समोर सन २०११ ची रिट याचिका क्रमांक ४७६६ (डब्ल्यू) (श्री. सुजित रॉय विरुद्ध पश्चिम बंगाल व इतर) दाखल केली होती.

मा. उच्च न्यायालय, यांनी त्याचे आदेश दिनांक ११ मार्च २०११ अन्वये आयोगाने हे ठरविण्याचा प्रश्न आहे असे निरीक्षण नोंदवून ही योचिका खारीज केली आणि या आदेशाची प्रत आयोगास पाठविण्यात यावी असा सुद्धा निदेश दिला.

ही बाब आयोगाकडून विचारात घेण्यात आली आहे. आयोगाने असे ठरवले आहे की, नगरपालिका व पंचायत समित्या आणि संस्था यांना टाळता येऊ शकत नाहीत, अशा बैठकींमध्ये निवडणुका संपेपर्यंत कोणतेही नवीन धोरणात्मक निर्णय व घोषणा केल्या जाणार नाहीत व नेहमीच्या दैनंदिन व्यवस्थापन विषयक प्रश्नांशी संबंधित व तातडीच्या प्रश्नांवरील निर्णयच केवळ अशा बैठकींमध्ये घेण्यात येतील, या शर्तीच्या अधीन राहून अशा सांविधिक बैठका घेण्याबाबत आयोगाचा कोणताही आक्षेप नसेल.

## अनुदेश क्रमांक ८

(१) सचिव, भारत सरकार नागरी विमानचालन व पर्यटन मंत्रालय, सरदार पटेल भवन, नवी दिल्ली, (२) सचिव, रेल्वे मंडळ, रेल भवन, नवी दिल्ली यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/९३ जे.एस.दोन, दिनांक ३१ डिसेंबर १९९३.

**विषय.—** सार्वत्रिक निवडणुका व पोट-निवडणुका मुक्त व निःपक्ष वातावरणात निवडणुका पार पाडण्याच्या दृष्टीने मोफत प्रवास पासांच्या गैरवापरास पायबंद घालण्यासाठी विसेष अनुदेश.

मला असे कळवण्याचा आदेश आहे की, हिमाचल प्रदेश, मध्यप्रदेश, मिझोरम, राजस्थान, उत्तरप्रदेश आणि देशाची राजधानी असलेले दिल्ली राज्यक्षेत्र यांच्या विधानसभांच्या नुकत्याच पार पडलेल्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये, रेल्वे व शासकीय विमान कंपन्यांनी दिलेल्या मोफत पासांचा, सार्वत्रिक निवडणुका असणाऱ्या राज्यांमध्ये/मतदारसंघामध्ये/भागांमध्ये प्रवास करण्यासाठी गैरवापर करण्यात आल्याची अनेक उदाहरणे आयोगाच्या निदर्शनास आलेली आहेत. अशा प्रकारचे पास दिल्यामुळे पासधारकांना संपूर्ण देशभर मोफत प्रवास करून निवडणुकींशी संबंधित कार्यक्रमांमध्ये सहभागी होणे शक्य झाले आणि अशाप्रकारे, मुक्त व निःपक्ष वातावरणात निवडणुका पार पाडण्याच्या प्रक्रियेमध्ये बाधा आणण्याचा प्रयत्न करण्यात आला.

२. आयोगाने या सर्व गोष्टी थांबवण्याचा निर्णय घेतलेला आहे. तद्नुसार आयोगाने असे निर्देशित केले आहे की, यापुढे सार्वत्रिक निवडणुकांच्या/पोट निवडणुकांच्या काळात मतदान चालू असणाऱ्या राज्यांमध्ये/मतदार संघांमध्ये/ भागांमध्ये ये-जा करण्याकरिता प्रवास करण्यासाठी गोल्डन पास, मोफत पास, सवलतीच्या दराचे पास किंवा अन्य कोणत्याही प्रकारचे पास देण्यात येणार नाहीत किंवा ते वापरण्याची परवानगी देण्यात येणार नाही. ही बंदी, सार्वत्रिक निवडणुका/ पोट निवडणुका जाहीर झाल्याच्या दिनांकापासून निवडणुकांचे निकाल घोषित होण्याच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीमध्ये लागू असेल.

३. पूर्वोक्त बंदीच्या कक्षेतून कुणालाही सूट मिळणार नाही. फक्त दौरा-प्रबंधक व प्रवास एजंट हे याबाबतीत अपवाद असतील.

४. भविष्यकाळात होणाऱ्या सर्व सार्वत्रिक निवडणुकांच्या/पोट-निवडणुकांच्या काळात या अनुदेशांचे काटेकोरपणे पालन व्हावे म्हणून सर्व संबंधितांना या बाबतीत योग्य त्या सूचना द्याव्यात. दिलेल्या सूचनांची एक प्रत आयोगाला पाठवावी.

कृपया पोच द्यावी.

## अनुदेश क्रमांक ९

सर्व राज्ये व संघराज्य क्षेत्रांचे मुख्य सचिव यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३४/६/पीएलएन-तीन, दिनांक २२ मार्च १९९६ आणि पुनरुक्ती : सर्व राज्ये व संघराज्य क्षेत्रे यांचे मुख्य निवडणूक अधिकारी

**विषय.—** मोठ्या निविदा व लिलाव या संबंधात

आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, मद्य, तेंदूची पाने यांची विक्री व अशाच प्रकारच्या इतर बाबींच्या संबंधात अनेक मोठ्या निविदा, लिलाव इत्यादी यांची सध्या प्रक्रिया चालू आहे. अशा काही लिलावामुळे सत्ताधारी पक्षाला/इतरांना अनुचित लाभ/तोटे होण्याची शक्यता असून, या बाबीकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

२. म्हणून, आयोग असा निदेश देत आहे की, जेव्हा मोठ्या प्रमाणात असे लिलाव इत्यादी घेण्यात येतील तेव्हा ते संबंधित क्षेत्रामध्ये निवडणुका पूर्ण होण्याच्या शेवटच्या दिवसापर्यंत पुढे ढकलण्यात आले पाहिजेत आणि राज्य शासनाने न टाळता येण्याजोग्या परिस्थितीत आवश्यक ती अंतरिम व्यवस्था केली पाहिजे.

३. या बाबीचे अनुपालन न केल्यास आदर्श आचारसंहितेचा भंग झाला आहे असे समजून कडक कारवाई करण्यात येईल.

## अनुदेश क्रमांक १०

सर्व राज्यांचे व संघराज्य क्षेत्रांचे मुख्य सचिव, निवासी आयुक्त व मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/९८-पीएलएन-तीन, दिनांक ८ जानेवारी १९९८.

**विषय.—** निवडणुकीच्या प्रयोजनासंबंधी राजकीय पक्षांच्या बैठका आयोजित करण्यासाठी शासकीय अतिथि गृहे, भवन व राज्य सदने यांचा वापर करण्यावर निर्बंध घालणे.

काही राजकीय पक्षांकडून निवडणुकीशी संबंधित कार्यांसाठी विविध राज्य अतिथि गृहे, भवन व दिल्ली येथील सदने यांचा वापर करण्याबाबतची नोंद आयोगाने घेतली आहे. यामध्ये, पक्षाच्या बैठका घेणे, वार्ताहर परिषदा आयोजित करणे व विचारविनिमय करणे यांचा समावेश आहे. आयोगाने सर्व वास्तविकता विचारात घेऊन, असे ठरविले आहे की, अशा जागेच्या कोणत्याही भागाचा, आधीच वर नमूद केलेल्या कोणत्याही प्रकारच्या राजकीय कार्यांसाठी वापर करण्यात येणार नाही. सर्व राज्ये व दिल्लीची संघराज्य क्षेत्रे यांचे निवासी आयुक्त व संपर्क अधिकारी यांना, याद्वारे, या संबंधातील सूचनांचा भंग होणार नाही याची सुनिश्चिती करण्याविषयी सूचित करण्यात येत आहे.

तथापि दिल्लीचा अधिकृत दौरा करण्याच्या प्रयोजनासाठी केवळ, राजकीय पदाधिकाऱ्यांसह अधिकारी व इतर अभ्यागत यांच्या खऱ्याखुऱ्या निवास विषयक गरजांसाठी भवनांच्या वापरावर निर्बंध असणार नाहीत. खोल्यांचे वाटप हे योग्य व समान पद्धतीने करण्यात आले पाहिजे अशा सूचना देखील निवासी आयुक्त संपर्क अधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत आणि राजकीय पदाधिकारी व पक्ष यांना अनन्य वापराकरिता व वाढीव कालावधीकरिता संपूर्ण माळे व मोठे कक्ष देणे हे अयोग्य ठरेल.

कृपया पोच द्यावी.

## अनुदेश क्रमांक ११

कॅबिनेट सचिव, नवी दिल्ली, सर्व राज्यांचे व संघराज्य क्षेत्रांचे मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/९८-पीएलएन-तीन, दिनांक १० जानेवारी १९९८.

**विषय.—** प्रजासत्ताक दिन साजरा करणे—राजकीय पदाधिकाऱ्यांची उपस्थिती

प्रजासत्ताक दिनाच्या समारंभामधील राजकीय पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीविषयी विविध राज्यांकडून संदर्भ प्राप्त झाले आहेत. आगामी लोकसभेच्या व विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका व काही उप निवडणूका याचा विचार करता आयोगाने सर्व संबंधित घटक विचारात घेतले आहेत. आयोगाने असे ठरविले आहे की, त्यांनी त्यांच्या भाषणांत, देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यामधील हुतात्म्यांची कामगिरी, भारताचे वैभव व अशाच प्रकारची प्रशंसा करण्यापर्यंत स्वतःला मर्यादित ठेवावे या अटीच्या अधीन राहून, विविध ठिकाणांच्या मुख्य प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमांमध्ये मानवंदना देण्यास केंद्रीय मंत्री/मुख्यमंत्री/राज्यांतील मंत्री यांना कोणताही आक्षेप असणार नाही. ते कोणत्याही परिस्थितीत याला राजकीय मंच बनविणार नाही.

प्रजासत्ताक दिनाचे कार्यक्रम हे, निवडणूक प्रक्रियेच्या कालावधीत येतील व राजकीय पक्ष व आघाड्यांचे असलेले केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री व राज्यांतील मंत्री आणि उमेदवारदेखील, ही बाब लक्षात घेता आयोग केवळ समान संधीची खात्री करण्यासाठी असा आदेश देत आहे की, कोणताही केंद्रीय मंत्री/मुख्यमंत्री/राज्यांतील मंत्री किंवा कोणताही अन्य राजकीय कार्यकर्ता/माजी खासदार हे, त्यांच्या स्वजिल्ह्यातील किंवा मतदारसंघातील किंवा जेथून तो/ती उमेदवार म्हणून निवडणूक लढवित आहे किंवा निवडणूक लढविण्याचे ठरविले आहे तेथील कोणत्याही ठिकाणी प्रजासत्ताक दिनांच्या कोणत्याही कार्यक्रमांना मानवंदना देणार नाहीत.

तथापि, आयोगाला कवि संमेलन, मुशायरा आयोजित करण्यास किंवा प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमाशी संबंधित आयोजित करण्यात आलेले अन्य सांस्कृतिक कार्यक्रमांना केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री, राज्यांतील मंत्री व इतर राजकीय पदाधिकारी उपस्थित राहण्यास कोणताही आक्षेप असणार नाही. तथापि, अशा प्रसंगी कोणतीही राजकीय भाषणे करण्यात येणार नाहीत याची सुनिश्चिती करून घेण्याची सर्वोतोपरि काळजी घेण्यात यावी.

आयोगाने आणखी असेही ठरविले आहे की, राष्ट्रीय व राज्य स्तरावरील स्थापना समारंभांचे कार्यक्रम आणि स्वातंत्र्य सैनिकांना ताम्रपत्रांचे वितरण हे कार्यक्रम विद्यमान संकेतानुसार करण्यात येतील.

वरील सूचना, काटेकोरपणे अनुपालन करण्यासाठी सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात.

## अनुदेश क्रमांक १२

सर्व राज्यांचे आणि संघराज्य क्षेत्रांचे कॅबिनेट सचिव, मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/९९/पीएलएन-तीन, दिनांक २८ जुलै १९९९.

**विषय.—** स्वातंत्र्य दिन साजरा करणे—राजकीय पदाधिकाऱ्यांची उपस्थिती.

स्वातंत्र्य दिन साजरा करताना, राजकीय पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीविषयी विविध राज्यातून संदर्भ प्राप्त झाले आहेत. आयोगाने, लोकसभा व विवक्षित राज्यांच्या व विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुका लक्षात घेता, संबंधित सर्व घटकांचा विचार केला आहे. आयोगाने असे ठरविले आहे की, ते, त्यांचे भाषण देशाच्या स्वातंत्र्य प्राप्तीमधील हुतात्म्यांच्या कामगिरीचा गुणगौरव, भारत देशाचा गौरव आणि तत्सम विषयापुरतेच मर्यादित ठेवतील. या शर्तींच्या अधीन राहून राज्यांमधील केंद्रीय मंत्री/मुख्यमंत्री/मंत्री यांनी विविध ठिकाणच्या स्वातंत्र्य दिनाच्या मुख्य समारंभास, मानवंदना देण्यासाठी कोणताही आक्षेप असणार नाही. कोणत्याही परिस्थितीत, असा समारंभ, राजकीय प्रचाराचे व्यासपीठ होता कामा नये.

सार्वत्रिक निवडणुक, १९९९ च्या निवडणूक प्रक्रियेच्या कालावधीत स्वातंत्र्य दिन समारंभ साजरे करण्यात येतील. राजकीय पक्ष व आघाड्यांमध्ये सामील असलेले राज्यांमधील केंद्रीय मंत्री, मुख्यमंत्री व मंत्री हे लोकसभा किंवा विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवार असतील. निव्वळ समान पातळीवर लढत होण्याची खात्री करण्याच्या दृष्टीने, आयोग असे निदेश देत आहेत की, राज्यातील कोणत्याही केंद्रीय मंत्री/मुख्यमंत्री/मंत्री किंवा अन्य कोणताही राजकीय पदाधिकारी/माजी संसद सदस्य यांना, त्यांच्या मूळ जिल्ह्यातील किंवा मतदार संघातील किंवा तो किंवा ती तेथून उमेदवार म्हणून निवडणूक लढवीत आहे किंवा लढविण्याचे उद्देशित आहे त्या मतदारसंघातील कोणत्याही ठिकाणच्या स्वातंत्र्य दिन कार्यक्रमात मानवंदना देणार नाही. तथापि, दीर्घकाळ चालू असलेल्या प्रथांप्रमाणे, पंतप्रधान व मुख्यमंत्री यांना राष्ट्राच्या राजधानीत किंवा राज्याच्या मुख्यालयात राजधानीत असे करता येईल.

स्वातंत्रय दिन समारंभाच्या संबंधात कवी संमेलन, मुशायरा किंवा इतर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यास त्यास राज्यातील केंद्रीय मंत्री/मुख्यमंत्री, मंत्री यांना आणि इतर राजकीय पदाधिकाऱ्यांना उपस्थित राहण्यास देखील आयोगाचा कोणतीही आक्षेप नाही. तथापि, याप्रसंगी, सत्ताधारी पक्षाची कामगिरी ठळकपणे दर्शविणारे कोणतेही राजकीय भाषण होणार नाही याची सुनिश्चिती करण्याची सर्वतोपरी काळजी घेतली पाहिजे. आयोगाने आणखी असेही ठरविले आहे की, राष्ट्रीय व राज्यस्तरावरील पदवीदान समारंभ आणि स्वातंत्र्य सैनिक इत्यादींना ताम्रपत्र वितरण समारंभ आणि असे इतर कार्यक्रम विद्यमान परंपरांनुसार करण्यात येतील.

वरील अनुदेश त्यांचे काटेकोरपणे पालन करण्यासाठी सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे. कृपया याची पोच द्यावी.

## अनुदेश क्रमांक १३

गोवा, पंजाब, मणीपूर, उत्तराखंड व उत्तरप्रदेश यांचे मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/आयएनएसटी/२०१२/सीसी आणि बीई, दिनांक २४ जानेवारी २०१२.

**विषय.—** प्रजासत्ताक दिन साजरा करणे राजकीय पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीबाबतच्या स्पष्टीकरणासंबंधी

आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/आयएनएसटी/२०११-सीसी आणि बीई, दिनांक २८ डिसेंबर २०११ याकडे आपले लक्ष वेधण्याचे मला आदेश असून, यामध्ये आयोगाने खालीलप्रमाणे निदेश दिले आहेत :—

**" निवडणूक प्रक्रियेमध्ये प्रजासत्ताक दिन येईल आणि राज्यातील केंद्रीय मंत्री, व मंत्री हे राजकिय पक्षाचे व युतीचे असतात आणि ते उमेदवार देखील असू शकतात ही वस्तुस्थिती लक्षात घेता, निव्वळ समान पातळीवर लढत होण्याची सुनिश्चिती करण्याच्या दृष्टीने, आयोग असे निदेश देत आहेत की, राज्यातील कोणताही केंद्रीय मंत्री/मुख्य मंत्री/मंत्री किंवा अन्य कोणतीही राजकीय पदाधिकारी/माजी संसद/सदस्य यांना, त्यांच्या मूळ जिल्ह्यातील किंवा मतदारसंघातील किंवा तो किंवा ती जेथून उमेदवार म्हणून निवडणूक लढवीत आहे किंवा लढविण्याच उद्देशित आहे. त्या मतदारसंघातील कोणत्याही ठिकाणच्या कोणत्याही प्रजासत्ताक दिन कार्यक्रमांस मानवंदना देणार नाही. "**

**आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/२००७/पीएलएन-तीन, दिनांक २३ नोव्हेंबर २००७ याच्या परिच्छेद ३ देखील लक्ष वेधण्यात येत असून त्यात खालीलप्रमाणे तरतूद केली आहे :—**

" (३) असे स्पष्ट करण्यात येते की, मंत्र्यांना शासकीय कामासाठी त्यांच्या निवासस्थानापासून त्यांच्या कार्यालयाच्या ठिकाणी त्यांच्या मुख्यालयात असलेली शासकीय वाहने वापरण्याचा हक्क आहे. परंतु अशा प्रवासाची निवडणुकीच्या कोणत्याही प्रचाराशी किंवा कोणत्याही राजकीय कार्यक्रमाशी, ज्यात पक्षाचे कार्यालय, येण्या-जाण्याच्या वाटेवर असले तरी, त्याला भेट देण्याचा समावेश होईल, सांगड घालता येणार नाही. कोणत्याही पथदर्शी गाडीचा (गाड्यांचा) किंवा कोणत्याही रंगाचे संकेत दिवे असलेल्या गाडीचा (गाड्यांचा) किंवा त्यांची उपस्थिती ठळकपणे दाखविणाऱ्या कोणत्याही प्रकारचे भोंगे (सायरन) लावलेल्या गाडीचा (गाड्यांचा), कोणत्याही मंत्र्याला, त्याच्या/तिच्या निवडणुकविषयक भेटींमध्ये, जरी त्यांना रात्र्याच्या प्रशासनाने अशा भेटीवर असताना त्यांच्या सोबत शस्त्रधारी सुरक्षा कर्मचारी उपस्थित असणारे सुरक्षा आवरण त्यांना दिलेले असले तरी देखील वापर करता येणार नाही. "

यासाठी मुख्य निवडणूक अधिकारी, पंजाब यांच्याकडून असे निर्देश मिळाला आहे की, पंजाबचे मुख्यमंत्री राम मंडीमध्ये प्रचार करीत असताना तेथून त्यांना २६ जानेवारी २०१२ रोजी राष्ट्रीय ध्वज रोहणासाठी फिरोझपूर येथे जावे लागले. मुख्य मंत्र्यांच्या प्रधान सचिवाने अशी विनंती केली की, मुख्यमंत्र्यांनी रमामंडी ते फिरोझपूर आणि परत अशा केलेल्या प्रवासाचा खर्च, राज्य शासनाने उचलावा.

आयोगाने, वर निर्दिष्ट केलेल्या अनुदेशांच्या उपरोल्लिखित तरतुदींच्या अनुषंगाने, हे प्रकरण विचारात घेतले आमि एक विशेष बाब म्हणून आयोगाने, असे ठरविले की, ज्या उच्चपदस्थ व्यक्ती प्रजासत्ताक दिन कार्यक्रमात राष्ट्रीय ध्वज रोहण करतील त्या व्यक्ती, कोणत्याही असल्यास, निवडणूक प्रचाराच्या ठिकाणापासून थेट याठिकाणी प्रवास करू शकतील. या प्रयोजनासाठी झालेला प्रवासखर्च, संबंधित राज्य शासनाने सोसावा. त्यांनी, अशा ठिकाणा दरम्यान मुख्यालय मार्गे प्रवास करण्याची गरज नाही. तथापि, **मंत्र्यांनी, त्यांच्या मूळ जिल्ह्याच्या ठिकाणी किंवा ज्या मतदारसंघातून ते निवडणूक लढविणार आहेत ते मतदारसंघ ज्या जिल्ह्यात येतात त्या जिल्ह्यांमध्ये ध्वजरोहण करता येणार नाही** याचा पुनरुच्चार करण्यात येत आहे.

## अनुदेश क्रमांक १४

सर्व राज्यांचे व संघराज्यक्षेत्रांचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/९९-पीएलएन-तीन, दिनांक १६ ऑगस्ट १९९९.

**विषय.—** सद्‌भावना दिवस समारंभ साजरा करणे—राजकीय पदाधिकाऱ्यांचा सहभाग

देशभरात साजऱ्या केल्या जाणाऱ्या सद्‌भावना दिवसाच्या समारंभामध्ये, राजकीय पदाधिकाऱ्यांच्या सहभागासंबंधात स्पष्टीकरण मिळविण्यासाठी अनेक निर्देश करण्यात आल्याचे सांगण्याचे मला निदेश आहेत. आयोगाने लोकसभेच्या आणि काही राज्यांमधील विधानसभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांच्या दृष्टीने, सर्व संबंधित घटक विचारात घेतले आहेत आणि असे ठरविले आहे की, राज्यांमधील केंद्रीय मंत्री/मुख्य मंत्री/मंत्री यांना, त्यांच्या भाषणाचा विषय हा, केवळ लोकांमध्ये सद्‌भावना प्रस्थापित करण्यापुरताच मर्यादित असावा या शर्तीच्या अधीनतेने, सद्‌भावना दिवसाच्या समारंभामध्ये सहभागी होता येईल आणि याप्रसंगी, सत्ताधारी पक्षाच्या कामगिरीवर प्रकाशझोत टाकणारी कोणतीही राजकीय भाषणे केली जाणार नाहीत. याची सर्वतोपरी काळजी घेण्यात यावी. कोमत्याही परिस्थितीत, तो निवडणुकीच्या प्रचाराचे व्यासपीठ होणार नाही. मंत्र्यांच्या नावे दिलेला कोणतेही संदेश असल्यास संदेश, राष्ट्रीय एकात्मतेच्या विषयापुरते मर्यादित असले पाहिजे आणि त्यासोबत संबंधित मंत्र्यांचे छायचित्र असता कामा नये.

वरील अनुदेशांचे काटेकोपपणे अनुपालन करण्यासाठी ते सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणावे.

## अनुदेश क्रमांक १५

सर्व राज्ये व संघ राज्यक्षेत्रे यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेले भारताचा निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/२००९/सीसी आणि बीई, दिनांक १५ सप्टेंबर २००९.

**विषय.—** आदर्श आचारसंहिता लागू करणे—निवडणुका जाहीर झाल्यानंतर जात, धर्म किंवा भाषा यांच्या आधारे अधिवेशने घेण्यावर बदी घालण्याबाबतच्या प्रस्तावाच्या संबंधात.

आपल्या पत्र क्रमांक डीपीएआर १०६ सीयु एम एम ए एस ए एम-२००९, दिनांक ३१ ऑगस्ट २००९ च्या संदर्भात मला असे कळविण्याचा आदेश आहे की, सदर बाब आयोगाने विचारात घेतली होती आणि त्याबाबत आयोगाने असा निदेश दिला आहे की, अशा बैठकींवर (सभांवर) बारीक लक्ष ठेवण्यात यावे, त्यांचे व्हिडीओ चित्रण करण्यात यावे आणि तर राजकीय/निवडणूक प्रयोजनांसाठी " जातीचा " वापर करण्यात येत असल्याचा काही पुरावा आढळून आला तर, आयोगास कळवून कायद्याच्या आदर्श आचारसंहितेच्या योग्य तरतुदीन्वये कारवाई करण्यात यावी.

कृपया पत्र मिळण्याची पोच देण्यात यावी.

## अनुदेश क्रमांक १६

सर्व राज्ये व संघ राज्यक्षेत्रे यांच्या मुख्य सचिवांना आणि सर्व राज्ये व संघराज्य क्षेत्रे यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/३८/२००४-पीएलएन-तीन, दिनांक ६ एप्रिल २००४.

**विषय.—** आदर्श आचारसंहिता विश्रामगृहे, डाकबंगले व इतर शासकीय निवासव्यवस्था यांचा वापर

आयोगाकडे, विविध राज्ये व संघ राज्यक्षेत्रे यांच्यामध्ये आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन करून विश्रामगृहे, डाक बंगले व इतर शासकीय निवास व्यवस्था याचे वाटप व वापर करण्याच्या तरतुदींची एकरुपता नसलेल्या रीतीने अंमलबजावणी केल्या संबंधात निवेदन प्राप्त झालेली आहेत.

आयोगाने याबाबीत अंतर्भूत असलेले विविध मुद्दे विचारात घेतल्यानंतर आणि सर्व संबंधित घटक विचारात घेऊन, आयोगाने असे ठरविले आहे की, आदर्श आचारसंहितेच्या संबंधित तरतुदींची शब्दशः व तत्वतः अंमलबजावणी करावी आणि उपलब्ध निवासव्यवस्थेचे, निःपक्ष व समन्याय रीतीने वाटप करण्यात यावे. त्यातील संबंध भाग पुढीलप्रमाणे आहेत :—

**बाब सात सत्ताधारी पक्ष :**

**“ (तीन) विश्रामगृहे, डाक बंगले किंवा इतर शासकीय निवासव्यवस्था यांवर सत्ताधारी पक्षाची किंवा त्याच्या उमेदवारांची मक्तेदारी असणार नाही आणि अशा निवासव्यवस्थेचा अन्य पक्षांना व उमेदवारांना निःपक्ष रीतीने वापर करण्याची मुभा असेल. परंतु कोणताही पक्ष किंवा उमेदवार, अशा निवासव्यवस्थेचा त्याच्याशी संबंध असलेल्या जागेंसह, प्रचार कार्यालय म्हणून किंवा निवडणूक प्रचाराच्या प्रयोजनांसाठी कोणतीही सार्वजनिक सभा घेण्यासाठी वापर करणार नाहीत किंवा त्यास वापर करण्याची मुभा असणार नाही. ”**

कोणताही पदाधिकारी, विश्रामभवन, डाकबंगला यांचा प्रचार कार्यालय उभारण्यासाठी वापर करू शकणार नाही याची खात्री करून घेण्यात येईल कारण विश्राम भवने/डाकबंगले हे अशा पदाधिकाऱ्यांच्या प्रवासाच्या कालावधीत केवळ तात्पुरत्या वास्तव्यासाठी भोजन/निवास व्यवस्था आहेत.

आयोग, आणखी असेही निदेश देत आहे की,—

(एक) शासनाच्या मालकीच्या अतिथी भवन, इत्यादींच्या जागेंमध्ये राजकीय पक्षांच्या सदस्यांद्वारे प्रासंगिक बैठक देखील घेण्यास परवानगी असणार नाही आणि या बाबतचे कोणतेही उल्लंघन हे, आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन असल्याचे मानण्यात येईल.

(दोन) केवळ विश्रामगृहामध्ये निवासव्यवस्था करण्यात आलेल्या व्यक्तीला घेऊन जाणाऱ्या वाहनालाच परवानगी असेल आणि दोनपेक्षा अधिक इतर वाहने, जर त्या व्यक्तीने उपयोगात आणली असतील तर, विश्रामगृहाच्या कुंपणाच्या आत आणण्यास परवानगी नसेल.

(तीन) कोणत्याही एकट्या व्यक्तीला ४८ तासांपेक्षा अधिक कामासाठी कक्ष उपलब्ध करून दिला जाणार नाही.

तथापि, कोणत्याही विशिष्ट क्षेत्रातील मतदान संपण्यापूर्वी ४८ तास आधी असे कक्ष मतदान किंवा पुनर्मतदान संपेपर्यंत बंद करण्यात येतील. आयोग असा निदेश देत आहे की, मुख्य निवडणूक अधिकारी या मार्गदर्शकतत्त्वांची कडक आणि निःपक्षपाती अंमलबजावणी करण्यासंबंधी देखरेख करतील.

## अनुदेश क्रमांक १७

सर्व राज्यांचे व संघराज्य क्षेत्रांचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/९८/पीएलएन-तीन, दिनांक २३ जानेवारी १९९८.

**विषय.—** नवरा किंवा बायको राजकीय आखाड्यात सक्रिय आहेत, अशा अधिकाऱ्यांचे दौरे/रजा यांवरील निर्बंध

भारतीय प्रशासकीय सेवा, भारतीय पोलीस सेवा यांमध्ये असणारे अधिकारी आणि इतर राज्य शासनाच्या वरिष्ठ अधिकारी वर्ग, ज्यांचे नवरा किंवा बायको एकतर निवडणुकांमध्ये उमेदवार म्हणून किंवा राजकीय पक्षांचा सक्रिय सदस्य म्हणून राजकीय आखाड्यात सक्रीय आहेत अशी अनेक उदाहरणे आयोगाच्या निदर्शनास आली आहेत.

आयोग मुक्त व निःपक्ष मतदानाच्या दृष्टीने असा निदेश देत आहे की, अशा सर्व प्रकरणांमध्ये संबंधित अधिकारी यांनी सर्व बाबतीत निवडणुका पूर्ण होईपर्यंत एकतर रजा किंवा दौऱ्यास्तव त्यांची मुख्यालये सोडू नयेत.

जर, काही कारणासाठी त्यांना मुख्यालये सोडणे आवश्यक असेल तेव्हा निवडणूक कालावधीमध्ये त्यांची मुख्यालये सोडण्यापूर्वी त्यांनी मुख्य सचिवांची विशिष्ट लेखी परवानगी मिळवावयाची आहे. मुख्य सचिवांनी असे अधिकारी त्यांच्या नवरा किंवा बायोकच्या राजकीय कार्यांमध्ये कोणत्याही प्रकारे सहभागी होणार नाहीत याची खात्री करावी.

कृपया या पत्राची पोच देण्यात यावी.

## अनुदेश क्रमांक १८

मुख्य निवडणूक अधिकारी, पाटणा यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ईसीआय/जीई ९८-४३७/६/बीआर/९८-पीएलएन-तीन, दिनांक २७ जावेवारी १९९८ आणि कॅबिनेट सचिव, नवी दिल्ली, सर्व राज्यांचे व संघ राज्यक्षेत्रांचे मुख्य सचिव यांना आणि सर्व राज्यांचे (बिहार सोडून) व संघ राज्यक्षेत्रांचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना त्या पत्राची पृष्ठांकित केलेली प्रत.

**विषय.—** इफ्तार पार्टी—राज्याच्या खर्चाने मुख्यमंत्री यांच्या निवासस्थानी १०,००० निमंत्रित

ज्याचा खर्च राजकोषातून करण्यात येईल अशा सुमारे १०,००० निमंत्रित उपस्थित राहणाऱ्या इफ्तार पार्टीचे मुख्यमंत्री आयोजने करू शकतात किंवा कसे यासंबंधी स्पष्टीकरण मागणारा प्रश्न बिहार राज्याकडून आयोगाकडे निर्दिष्ट करण्यात आला आहे. आयोगाचा असा दृष्टीकोन आहे की, धार्मिक प्रसंगी आणि खासकरून निवडणूक प्रक्रिया चालू असताना राज्याच्या खर्चाने कोणतेही मनोरंजन योग्य ठरणार नाही. तथापि, कोणीही व्यक्ती, तिच्या वैयक्तिक क्षमतेवर अशा कोणत्याही पक्षाच्या यजमानासाठी सर्व मार्गानी असे करण्यास आणि त्याचा किंवा तिचा स्वतःच्या वैयक्तिक खात्यातून खर्च भागविण्यास मुक्त आहे. ही बाब सर्व राज्य व संघराज्य क्षेत्र यांच्या शासनाच्या आणि त्यावर यथोचित कारवाई करण्यासाठी कॅबिनेट सचिवाच्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

## अनुदेश क्रमांक १९

(१) मध्यप्रदेश–भोपाळ, (२) राजस्थान–जयपूर, (३) मिझोरम–एझवाल, (४) राष्ट्रीय राजधानी क्षेत्र

शासनाचे मुख्य सचिव यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/९८-पीएलएन-दोन, दिनांक १५ सप्टेंबर १९९८ आणि (१) मध्यप्रदेश–भोपाळ, (२) राजस्थान–जयपूर, (३) मिझोरम–एझवाल, (४) राष्ट्रीय राजधानी क्षेत्र दिल्लीचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना पृष्ठांकित केलेली प्रत.

**विषय.—** नवीन राज्य विधानसभांची निवडणूक घेण्यासाठी निवडणुकीची तयारी.

राज्यातील विधानसभेचा कालावधी डिसेंबर, १९९८ मध्ये संपत आहे आणि लवकरच निवडणुका घ्यावयाच्या आहेत. आपल्याला माहीत असल्याप्रमाणे, आयोग आणि राज्य निवडणूक अधिकारी व्यवस्थांवर सक्रियपणे लक्ष केंद्रीत करीत आहेत आणि सर्व व्यवस्थांना अंतिम रूप देण्यासाठी दिल्ली येथे व तुमच्या राज्यातील मुख्यालयांच्या ठिकाणी नियमितपणे बैठका घेण्यात येत आहेत. त्यामुळे भारताचा निवडणूक आयोग व संपूर्ण राज्य निवडणूक यंत्रणा निवडणूक तयारीमध्ये सक्रीय आहे.

मुक्त व निःपक्ष निवडणुका घेण्याच्या दृष्टीने, भारताचा निवडणूक आयोगाची व सर्व राजकीय पक्षांची समान पातळीवर लढत होण्याची इच्छा आहे. आयोग, लवकरच निवडणुकांचे सविस्तर वेळापत्रक जाहीर करणे अपेक्षित आहे. म्हणून, आयोगाची अशी अपेक्षा आणि अत्यंत पोटतिडकीने अशी विनंती करीत आहे की, औपचारिकपणे निवडणूक प्रक्रिया सुरू होण्यास फारच थोडा कालावधी शिल्लक असल्याने, राज्य शासनांनी, या घडीला (अशावेळी), ज्या उपक्रमांमुळे सर्व पक्षांच्या खासकरून विरोध पक्षाच्या समान पातळीवरील लढतीस व्यापकपणे बाधा निर्माण होऊ शकेल असे मोठे आर्थिक आणि इतर उपक्रम हाती घेण्यापासून दूर रहावे. आयोगाची अशी खात्री आहे की, राज्य शासनाने, आपल्या ४ वर्ष ९ महिने इतक्या कालावधीत त्याला ज्या हाती घेण्याची इच्छा होती अशा सर्व लाभदायक विकासविषयक उपाययोजना हाती घेतलेल्या आहेत. केवळ काही महिने राहीलेले असताना, आता या स्वरूपाच्या कोणत्याही मोठ्या घोषणांचा खचितच विपरित अर्थ लावला जाईल आणि भारताच्या ५ दशकांच्या परिपक्व लोकशाहीमध्ये कोणत्याही राजकीय पक्षाकडून हे अपेक्षित नाही.

कोणतेही नवीन प्रशासकीय घटक किंवा मोठ्या शिक्षण संस्था, इत्यादीची निर्माण न करण्याचा सल्लादेखील आयोग देईल साधारणपणे आयोगाची अशी अपेक्षा आहे की, जी मतदारांवर अनिष्ट प्रभाव टाकण्यासाठी केवळ त्यांना दिलेले बक्षीस असल्याचे दिसून येईल, अशी कोणतीही गोष्ट, सत्ताधारी राजकीय पक्षाद्वारे करण्यात येणार नाही.

आयोगाने आणखी असेही निदेश दिले आहेत की, राज्यातील सेवांचे प्रमुख म्हणून, तुम्ही, राज्यातील संपूर्ण प्रशासकीय यंत्रणा केवळ तटस्थच राहणार नाहीत तर, सर्वसामान्य जनतेस व सर्व राजकीय पक्षांना, ती तशी असल्याचे दृश्यस्वरूपात दिसून येईल याची खात्री करण्याची काळजी व सावधानता बाळगली पाहिजे.

## अनुदेश क्रमांक २०

सर्व राज्यांचे मुख्य सचिव/मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/२००२-पीएलएन-तीन, दिनांक २५ जानेवारी २००२.

**विषय.—** आदर्श आचार संहिता—निवडणूक काळात राज्य शासनाच्या वित्तीय संस्थांद्वारे वसुली रकमा आणि बुडीत कर्जे माफ करण्यासंबंधात.

आपणास माहितच आहे की, निवडणुकांतील प्रतिस्पर्धी पक्ष व उमेदवारांमधील निःपक्षपातीपणाची सुनिश्चिती करणे शक्य व्हावे आणि सोबतच निवडणूक प्रक्रियेतील साधन सुचिता दूषित होणार नाही यासाठी आयोगाकडून आदर्श आचारसंहिता आणि इतर संबंधित परिनियम, नियम, विनियम इत्यादी अन्वये सूचना जाहीर करण्यात येत आहेत. संविधानाच्या अनुच्छेद ३२४ अन्वये, मुक्त व निःपक्षपणे निवडणुका पार पाडण्यासाठी आयोगास दिलेले अधिकार आयोगाने जारी केलेल्या या आदेशांचा मूळ उगम आहेत.

२. विविध प्रकारच्या राज्य शासकीय संस्था या सद्यःस्थितीत वाणिज्यिक व बँकींग उपक्रमांमध्ये सहभागी आहेत. कृपाल सिंग विरूद्ध उत्तम सिंग (एआयआर १९८६ सर्वोच्च न्यायालय ३००) या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने ‘ आजकाल राज्याचे उपक्रम हे फारच बहुविध आणि बहुप्रसव झालेले असल्यामुळे, योग्य व्यवस्थापन आणि प्रशासनाच्या उद्देशाने आणि त्याहीपुढे राज्याच्या धोरणांबाबतच्या मार्गदर्शक तत्वांसाठी केवळ निमित्तमात्र असलेली विविध महामंडळे स्थापन करणे राज्याला भाग पडत आहे ’ असे मत नोंदवले आहे. सर्वोच्च न्यायालयाने त्याहीपुढे सत्रुचारला चंद्रशेखर विरूद्ध बैरीचेरला प्रदीपकुमार (एआयआर १९९२ सर्वोच्च न्यायालय, १९५९) या प्रकरणात असे म्हटले आहे की, कायद्याने संस्थापित निगम निकायांना ते शासनापासून स्वतंत्र असल्याचे सूचित करावे, परंतु तेसुद्धा निर्णायक ठरणार नाही, कारण काही वेळा या निगम निकायांचे कायद्याने संस्थापन शासनापासून स्वतंत्र असूनही, प्रत्यक्षात ते शासनाचा स्वप्रतिष्ठेत झालेले असते. त्यानुसार विविध राज्य शासकीय वित्त संस्थांनी कर्ज मंजुरी, कर्जवसुलीची पुनर्रचना, बऱ्याच प्रकरणांत बुडीत व थकीत कर्जे माफ करणे या सारखे वाणिज्यिक व बँकिंग उपक्रम हाती घेतले आहेत. ज्याअर्थी, अशा राज्य शासकीय वित्त संस्थांचे असे सामान्य उपक्रम हे निवडणुकेतर कालावधीत सुरू राहतात, त्याअर्थी निवडणूक काळात काहीवेळा ते बाधक होतात आणि राजकीय पक्ष, उमेदवार आणि सामान्य जनतेकडून त्यांच्या संशयास्पदरितीने पाहिले जाते. वर्तमानकालिन शासनावर सत्ताधारी पक्षाचा लक्षणीय प्रभाव असतो हे नाकारता येऊ शकत नाही आणि असा पक्ष जो सत्तेत परतण्यासाठी निवडणुकासुद्धा लढवत असतो तो अशाप्रकारचे बुडीत किंवा थकीत कर्ज निर्लेखित करून ज्यांची कर्जे निर्लेखित करण्यात येतात अशी व्यापार संस्था किंवा व्यक्ती या पक्षाला निवडणूक प्रचार मोहिमेत मदत करण्यासाठी पक्षाच्या खजिन्यात अंशदान करीत असतात अशा प्रकारचे आरोप होऊ शकतात. लोकानुनयी स्वरूपाच्या घाईगडबडीतील कर्जविषयक उपक्रमांचा अन्य दुरूपयोग हा एकगठ्ठा मतांच्या उद्देशानेसुद्धा होऊ शकेल त्यामुळे कर्ज देणाऱ्या संस्थेच्या स्वतःच्या क्षमतेवर दीर्घकालिन दुष्परिणाम होईल.

३. वरील पार्श्वभूमी आणि वास्तविक परिस्थिती लक्षात घेता, आयोगाचे असे विचारपूर्वक मत झाले आहे की, राज्य शासनाकडून अंशतः किंवा पूर्णतः निधी प्राप्त होणाऱ्या सर्व वित्तीय संस्थांनी, आयोगाच्या पूर्वपरवानगीशिवाय कोणत्याही व्यक्ती, कंपनी, भागीदारी संस्था इत्यादींना आदर्श आचारसंहिता अंमलात आहे अशा कालावधीमध्ये अग्रिम कर्जे निर्लेखित करण्याचा अवलंब करू नये. त्याचप्रमाणे, आदर्श आचार संहिता अंमलात असतांना, इतरवेळी कर्ज मंजूर करतांना किंवा कर्जव्याप्ती वाढवतांना, वित्तीय संस्था, ज्या वित्तीय मर्यादांचे पालन करतात त्या वित्तीय मर्यादांमध्ये लाभार्थ्यांना मनमानीपणे कर्ज वाटप करण्यासंबंधात वाढ केली जाणार नाही.

४. आयोगाचे वरील निर्देश हे सर्व उपरिनिर्दिष्ट वित्तीय संस्था व इतर संबंधितांच्या माहितीस्तव व काटेकोर अनुपालनास्तव तात्काळ निदर्शनास आणून देण्यात यावे. या संबंधातील त्यांना दिलेल्या सूचनांची एक प्रत कृपया आयोगाकडे माहिती व अभिलेखास्तव पृष्ठांकीत करावी.

कृपया पत्राची पोच तात्काळ देण्यात यावी.

## अनुदेश क्रमांक २१

कॅबिनेट सचिव, भारत सरकार, सचिव, भारत सरकार, गृह कार्य मंत्रालय, सचिव, भारत सरकार, नगरविकास व दारिद्र्य निर्मूलन मंत्रालय आणि सर्व राज्यांचे व संघ राज्यक्षेत्रांचे मुख्य सचिव/मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशुन लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/३/२००४-पीएलएन-दोन, दिनांक १९ फेब्रुवारी २००४.

**विषय :** अनधिकृत बांधकामे इत्यादींचे निष्कासन करण्यावरील अनधिकृत बांधकामे पाडून टाकण्यावरील निर्बंध, यासंबंधी.

आपणास माहितच आहे की, १३ वी लोकसभा विसर्जित करण्यात आली आहे आणि लोकसभेची सार्वत्रिक निवडणूक त्याचबरोबर काही राज्य विधानसभांची निवडणूक एकाच वेळी, लवकरच घेण्यात येणार आहे.

२. नागरी कार्ये व इतर विकासविषयक प्रकल्पांसाठी जबाबदार असलेल्या शासनाच्या विविध एजन्सींनी अनधिकृत बांधकामे झुग्गी झोपड्या, सामुहिक बांधकामे, क्लस्टर पाडून टाकणाऱ्या निष्कासन मोहिमा हाती घेतलेल्या आहेत. आणि त्यामुळे लोकांचे एका क्षेत्रातून दुसऱ्या क्षेत्रात पुनर्स्थापन होते याची आयोगाला जाणीव करून देण्यात आली आहे. जेथे जेथे अशी पावले उचलण्यात येतील तेथे-तेथे, संबंधित एजन्सींनी कायद्याच्या यथोचित प्रक्रियेचे पालन केल्यानंतर आणि काही वेळा, सक्षम न्यायालयाच्या निदेशांची अंमलबजावणी करून देखील या परिणाम स्वरूप कारवाया करण्यात येत असतील यात कोणतीही शंका नाही. आपल्या कार्यांचे व्यवस्थापन करताना अशी कारवायांसाठी आयोग जबाबदार असलेल्या शासकीय एजन्सींच्या उद्देशांचा आयोग पूर्णपणे गुणगौरव करतानाच लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या बरोबरच एकाच वेळी काही राज्य विधानसभांच्या निवडणुकीच्या संदर्भात, लोकांच्या अशा विस्थापनामुळे आगामी निवडणुकांमध्ये वापरण्यात यावयाच्या मतदार याद्यांच्या विश्वासार्हतावर पडणाऱ्या प्रभामाबद्दल आयोग चिंता व्यक्त करीत आहे.

३. मतदार याही ही, कोणतीही निवडणूक घेण्यासाठीचा मूलभूत दस्तऐवज असून तिच्यावरून संपूर्ण निवडणूक प्रक्रिया आधारित आहे. जेव्हा एखाद्या मतदार संघाला लोकसभेचा किंवा एखद्या राज्याच्या विधानसभेचा सदस्य निवडून देण्यासाठी आवाहन करण्यात येते तेव्हा याचा अर्थ, खचितच ज्यांची मतदार यादीमध्ये नोंदणी करण्यात आलेली आहे अशा मतदारांनाच लोकसभेचा किंवा विधानसभेचा सदस्य निवडून देण्यासाठी आवाहन करण्यात येते. संविधानाचा अनुच्छेद ३२६ अन्वये, विहित केलेल्या अर्हताकाली दिनांकास १८ वर्षे किंवा त्यावरील वयाचा प्रत्येक भारतीय नागरिक हा, (तो साधारणपणे ज्या मतदारसंघात राहतो तो, विहित अनर्हतेमध्ये येत नसेल तर) त्या संसदीय व विधानसभा मतदारसंघाच्या मतदार यादीमध्ये मतदार म्हणून नोंदणी केला जाण्यास हक्कदार आहे. परंतु, अशा मतदारसंघामधील मत देण्याचा हक्क, मतदार संघामध्ये त्या त्या वेळी अंमलात असलेल्या मतदार यादीमध्ये ज्यांच्या नावांची नोंदणी करण्यात आलेली आहेत, त्या मतदार संघाच्या मतदार यादीमध्ये ज्यांच्या नावांची नोंदणी करण्यात आली आहे अशा व्यक्तींनाच केवळ लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ६२ द्वारे प्रदान केला आहे. म्हणून, मुक्त व निष्पक्ष निवडणुका घेण्याकरिता, मतदारसंघाची मतदार यादी, मानवीदृष्ट्या शक्य होईल तितपत अचूक व अद्ययावत असावी. भविष्यात, मतदान होणाऱ्या सर्व राज्यांच्या मतदार याद्या अर्हताकारी दिनांक म्हणून १ जानेवारी २००४ च्या संदर्भात अंतिम करण्यात आल्या आहेत किंवा अंतिम करण्यात आल्या आहेत किंवा अंतिम करण्यात येत आहेत आणि आतापर्यंत कोणत्याही विशिष्ट क्षेत्रामध्ये सर्वसाधारणपणे रहात असलेल्या मतदारांना, संबंधित विधानसभा मतदारसंघाच्या मतदार यादीच्या संबंधित भागामध्ये त्यांच्या नावांचा समावेश असल्याची माहिती आहे. म्हणून जेव्हा-जेव्हा विद्यमान मतदारांना, त्यांच्या सर्वसाधारण निवासाच्या ठिकाणापासून विस्थापित करणाऱ्या नागरी एजन्सीद्वारे कोणतीही निष्कासनाची किंवा बांधकाम पाडून टाकण्याची मोहिम हाती घेण्यात येईल तेव्हा-तेव्हा, विधानसभा मतदारसंघाच्या मतदार यादीचा संबंधित भाग अवश्य बाधित होईल आणि अशा प्रकारे विस्थापित झालेले प्रचंड संख्येतील मतदार, त्यांच्यासाठी नेमून देण्यात आलेल्या मतदान केंद्रांवर मत देण्याचा त्यांचा हक्क गमावल्याने ती मतदार यादी त्याप्रमाणात सदोष होईल. अनेक प्रकरणी, बांधकाम पाडून टाकण्याच्या किंवा निष्कासन मोहिमेच्या परिणामी, अशा प्रकारे विस्थापित झालेल्या मतदारांना ते सर्वसाधारणपणे ज्या मतदारसंघात रहात होते अशा विधानसभा मतदारसंघाबाहेरील इतर क्षेत्रात पुनर्स्थापित होतात आणि ज्या क्षेत्रात त्यांचे पुनर्स्थापन करण्यात आले आहे त्या क्षेत्राच्या मतदार याद्यांमध्ये त्यावेळी त्यांचा समावेश होऊ शकत नाही. या सदोष याद्यांच्या आधारे घेण्यात आलेल्या कोणत्याही निवडणुकीपासून, त्यांच्या मताधिकाराच्या सर्वसाधारण निवासाच्या ठिकाणांपासून ज्यांना विस्थापित करण्यात आले आहे असे मोठ्या संख्येतील मतदारांना वंचित रहावे लागेल. याशिवाय, या सदोष मतदार याद्यांमुळे, विशिष्ट मतदान क्षेत्रामध्ये मतदार संघामध्ये चालविण्यात आलेल्या बांधकाम पाडून टाकण्याच्या किंवा निष्कासनाच्या मोहिमेमुळे जे स्थानांतरित झालेले आहेत अशा मतदारांच्या नावाने, बोगस मतदान करण्याची संधीदेखील समाजविघातक घटकांना मिळू शकते. हे घटक, निष्पक्ष व मुक्त निवडणूक घेण्यास केवळ बाधाच आणत नाहीत तर, संबंधित मतदारसंघामधील निवडणुकीच्या निकालावर विशेष परिणाम देखील करू शकतात.

४. मुक्त व निष्पक्ष निवडणुका घेण्याच्या दृष्टीने आणि मतदार याद्यांमध्ये अचूकपणा राखण्यासाठी आयोगाने असे ठरविले आहे की, बांधकाम पाडून टाकण्याच्या निष्कासनाच्या कोणत्याही मोहिमा, तात्पुरत्या स्थगित करण्यात येतील आणि आता सार्वत्रिक निवडणूक पूर्ण होण्याच्या दरम्यान, कोणत्याही सासकीय/नागरी एजन्सींकडून अशा मोहिमा चालविण्यात येणार नाहीत. जेव्हा-जेव्हा कोणत्याही न्यायालयाने, राज्य शासनाने, किंवा यथास्थिति, केंद्र सरकारने दिलेल्या कोणत्याही आदेशांमुळे आयोगाच्या वरील निर्णयाची अंमलबजावणी करताना कोणत्याही समस्या उद्‌भवतील तेव्हा, न्यायालयाच्या आदेशांचे यथोचित पालन करण्याची सुनिश्चिती करण्यासाठी उचित निदेशांकरिता, ती बाब, आयोगाच्या निदर्शनास आणून देण्यात येईल. टाळता न येण्याजोग्या विस्थापनाच्या अशा प्रकरणी, असे विस्थापित झालेले मतदार त्यांच्या मतदानाच्या हक्कापासून वंचित होणार नाहीत याची सुनिश्चिती करण्यासाठी संबंधित निर्वाचन प्राधिकाऱ्यांनी हाती घ्यावयाच्या सुधारात्मक उपाययोजनांच्या संबंधात उचित आदेश देणे आयोगाला शक्य व्हावे म्हणून शासन योग्य पुनर्वसन योजनेसह, सर्व संबंधित तथ्ये आयोगासमोर मांडील.

## अनुदेश क्रमांक २२

कॅबिनेट सचिव, भारत सरकार, सचिव, माहिती व प्रसारण मंत्रालय, भारत सरकार, सर्व राज्यांचे व संघ राज्यक्षेत्रांचे मुख्य सचिव यांना उद्देशून लिहिलेले आणि सर्व राज्यांच्या व संघ राज्यक्षेत्रांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना प्रत रवाना केलेले निवडणूक आयोगाचे क्रमांक ४३७/६/२००४-पीएलएन-तीन, दिनांक ८ मार्च २००४ चे पत्र.

**विषय :** सरकारी राज्यकोषाच्या रकमेतून जाहिराती व जाहिरातफलक प्रदर्शित करणे.

सत्ताधारी पक्षाच्या कामगिरीचे वर्णन करणारे अनेक जाहिरातफलक केंद्र व राज्य/संघ राज्यक्षेत्र शासने सरकारी राज्यकोषाच्या रकमेतून प्रदर्शित करण्यात येत असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आलेले आहे.

राजकीय पक्ष व उमेदवार यांच्या मार्गदर्शनाकरिता आदर्श आचारसंहिता या पुस्तिकेच्या परिच्छेद सातच्या उप-परिच्छेद (सहा) सत्ताधारी पक्ष याकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. हा उप-परिच्छेद पुढीलप्रमाणे आहे :—

केंद्रातील अथवा संबंधित राज्यातील/संघ राज्यक्षेत्रातील सत्ताधारी पक्षाने त्याच्या निवडणूक प्रचाराच्या प्रयोजनांसाठी आपल्या पदीय अधिकाराचा उपयोग केल्याबाबत कोणतीही तक्रार करण्याकरिता असे कोणतेही कारण ठेवलेले नाही, याची तो पक्ष सुनिश्चिती करील आणि विशेषतः वृत्तपत्रांमध्ये व तिर प्रसार माध्यमांमध्ये सरकारी राज्यकोषाच्या रकमेतून जाहिरात प्रदर्शित करणे आणि सत्ताधारी पक्षाच्या संभाव्य आशादायक भवितव्याला पुष्टी देण्याच्या उद्देशाने राजकीय बातम्यांचे पक्षांध वार्तांकन करण्याकरिता व संपादणुकीबाबतच्या जाहिरातींना प्रसिद्धी देण्याकरिता निवडणूक कालावधीत सरकारी प्रसारमाध्यम्यांचा गैरवापर करणे या (चार) बाबी कटाक्षाने टाळल्या पाहिजेत.

लोकसभेच्या आणि आंध्र प्रदेश, कर्नाटक, ओडिसा व सिक्किम या राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुकांचे वेळापत्रक जाहीर झाल्याबरोबर दिनांक २९ फेब्रुवारी २००४ रोजी आदर्श आचारसंहिता तात्काळ अंमलात आली होती. सरकारी राज्यकोषाच्या रकमेतून सातत्याने प्रदर्शित केले जाणार असे जाहिरातफलक, जाहिराती अथवा भित्तिपत्रके जरी निवडणुका जाहिर झाल्याच्या दिनांकापूर्वी प्रदर्शित करण्यात आली होती तरी, सत्ताधारी पक्षास त्याचा अवाजवी फायदा होत असल्यामुळे आणि मतदारांना सत्ताधारी पक्षाच्या बाजूने प्रभावित करणारा परिणाम साधला जात असल्यामुळे, तो आदर्श आचारसंहितेचा भंग ठरतो.

संबंधित प्राधिकाऱ्यांनी प्रदर्शित करण्यात आलेले असे सर्व जाहिरातफलक जाहिराती इत्यादी तात्काळ काढून टाकावेत आणि त्याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा असा निदेश आयोग देत आहे.

निवडणूक कालावधीत सरकारी राज्यकोषाच्या रकमेतून वृत्तपत्रांमध्ये आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमासह इतर प्रसार माध्यमांमध्ये जाहिराती प्रसिद्ध करण्यात येऊ नयेत आणि सत्ताधारी पक्षाच्या संभाव्य आशादायक भवितव्याला पुष्टी देण्याच्या उद्देशाने राजकीय बातम्यांचे पक्षांध वार्तांकन करण्याकरिता व संपादणुकी बाबतच्या जाहिरातींना प्रसिद्धी देण्याकरिता निवडणूक कालावधीत सरकारी प्रसार माध्यमांचा गैरवापर करणे कटाक्षाने टाळले पाहिजे, असाही निदेश आयोगाने दिली आहे.

केंद्र सरकारचे आणि राज्य शासनांचे सर्व मंत्री/विभाग/कार्यालये यांनी तात्काळ अनुपालन करण्याकरिता आयोगाचा हा निदेश त्यांना कळविण्यात यावा.

## अनुदेश क्रमांक २३

सर्व राज्ये आणि संघ राज्यक्षेत्रांचे मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले भारताच्या निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/आयएनएसटी/२००८-सीसी व बीई, दिनांक १३ एप्रिल २००९.

**विषय :** आदर्श आचार संहिता लागू करणे. सरकारी राज्यकोषाच्या रकमेतून जाहिराती प्रदर्शित करणे व जाहिरात फलक उभारणे.

आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, सरकारी राज्यकोषाच्या रकमेतून केंद्र व राज्ये/संघ राज्यक्षेत्रे यांच्या शासनामार्फत सत्तेत असणाऱ्या पक्षाची कामगिरी जनतेमध्ये प्रदर्शित करण्यासाठी मोठ्या संख्येने जाहिरात फलक उभारले जात आहेत. राजकीय पक्ष व उमेदवार यांच्या मार्गदर्शनाकरिता सत्ताधारी पक्ष-आदर्श आचारसंहिता याच्या परिच्छेद सातच्या उप-परिच्छेद (चार) कडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. हा परिच्छेद पुढीलप्रमाणे आहे :—

“ केंद्रातील अथवा संबंधित राज्यातील/संघ राज्यक्षेत्रातील सत्ताधारी पक्षाने त्यांच्या निवडणूक प्रचाराच्या प्रयोजनांसाठी त्यांच्या शासकीय अधिकाराचा उपयोग केल्याबद्दल कोणतीही तक्रार करण्याकरिता असे कोणतेही कारण ठेवलेले नाही, याबाबत तो पक्ष सुनिश्चिती करील आणि विशेषतः (चार) वर्तमानपत्रांमध्ये आणि इतर प्रसारमाध्यमांमध्ये सरकारी राज्यकोषाच्या रकमेतून जाहिरात प्रदर्शित करणे आणि सत्ताधारी पक्षाच्या संभाव्य आशादायक भवितव्याला पुष्टी देण्याच्या उद्देशाने राजकीय आशयाच्या बातम्यांचे पक्षाच्या फायद्यासाठी वार्तांकन करण्याकरिता व कामगिरीबाबतच्या जाहिरातींना प्रसिद्धी देण्याकरिता निवडणूक कालावधीत सरकारी प्रसारमाध्यमांचा गैरवापर करणे या बाबी कटाक्षाने टाळल्या पाहिजेत. ”

दिनांक २ मार्च २००९ रोजी लोकसभेच्या आणि विविध राज्यांच्या विधानसभांच्या निवडणुकांचे वेळापत्रक जाहिर झाल्याबरोबर आदर्श आचार संहिता तात्काळ अंमलात आली होती. सरकारी राज्यकोषाच्या रकमेतून सातत्याने प्रदर्शित केले जाणारे असे जाहिरात फलक व जाहिराती अथवा भित्तिपत्रके जरी असे फलक व जाहिराती निवडणुका जाहीर झाल्याच्या दिनांकापूर्वी प्रदर्शित करण्यात आली होती तरी सत्ताधारी पक्षास त्याचा अवाजवी फायदा होत असल्यामुळे आणि मतदारांना पक्षाच्या बाजूने प्रभावित करणारा परिणाम साधला जात असल्यामुळे, तो आदर्श आचारसंहितेचा भंग ठरतो.

यापुढे सरकारी राज्यकोषाच्या रकमेतून प्रदर्शित करण्यात आलेले असे जाहिराती फलक व जाहिराती इत्यादी संबंधित प्राधिकाऱ्यामार्फत तात्काळ काढून टाकावेत आणि त्याबाबतचा अनुपालन अहवाल आयोगाला सादर करावा, असा निदेश आयोग देत आहे.

निवडणूक कालावधीत सरकारी राज्यकोषाच्या रकमेतून वृत्तपत्रांमध्ये आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमासह इतर प्रसार माध्यमांमध्ये जाहिराती प्रसिद्ध करण्यात येऊ नयेत आणि सत्ताधारी पक्षाच्या संभाव्य आशादायक भवितव्याला पुष्टी देण्याच्या उद्देशाने राजकीय आशयाच्या बातम्यांचे पक्षाच्या फायद्यासाठीचे वार्तांकन करण्याकरिता व कामगिरीबाबतच्या जाहिरातींना प्रसिद्धी देण्याकरिता निवडणूक कालावधीत सरकारी प्रसारमाध्यमांचा गैरवापर करणे कटाक्षाने टाळले पाहिजे, असाही निदेश आयोगाने दिला आहे.

केंद्र सरकारची आणि राज्य शासनांची सर्व मंत्रालये/विभाग/कार्यालये यांनी तात्काळ अनुपालन करण्याकरिता आयोगाचा हा निदेश त्यांना कळविण्यात यावा.

## अनुदेश क्रमांक २४

भारत सरकारचे सचिव, ग्रामविकास मंत्रालय, ग्रामविकास विभाग, नवी दिल्ली ११० ००१ यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/१६/२००४, दिनांक ९ मार्च २००४.

**विषय :** आदर्श आचारसंहिता.

आपल्या पत्र क्रमांक पीएस/जेएस (आरएल)/०४-२१६, दिनांक २४ फेब्रुवारी २००४ रोजीच्या पत्राच्या संदर्भाबाबत आपणास असे कळविण्याचा मला आदेश आहे की, सर्व संबंधित घटकांचा विचार केल्यानंतर, आयोगाने असा निर्णय घेतला की,–

(१) जे काम या अगोदरच सुरू करण्यात आले आहे ते पुढे चालू ठेवण्यात यावे,

(२) निवडणुका पूर्ण होईपर्यंत कोणतेही नवीन काम सुरू करण्यात येणार नाही आणि

(३) निवडणुकीच्या कालावधीमध्ये कोणत्याही निविदा निश्चित करण्यात येऊ नये.

**प्रत**

—— ग्रामविकास मंत्रालय

एस. विजयकुमार भारत सरकार

सहसचिव ग्रामविकास विभाग

कृषि भवन, नवी दिल्ली ११० ००१

डी.ओ.क्र.पी.एस/जेएस (आर सी)/०४-२१६, २४ फेब्रुवारी २००४.

**विषय :** आदर्श आचारसंहिता आणि पंतप्रधान ग्रामसडक योजने (पीएमजीएसवाय) अंतर्गत कार्यक्रम चालू ठेवणे.

तुम्हाला लिहिलेले मंत्रालयाचे अर्धशासकीय पत्र क्र. १७०१५/१/२००४-जीसी, दिनांक १३ फेब्रुवारी २००४ कृपया पहावे, ग्रामीण जोडणी करण्यासाठी प्रधानमंत्री ग्राम सडक योजना (पीएमजीएसवाय) ही केंद्र पुरस्कृत योजना आपल्या विदित आहे. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना मार्गदर्शक तत्त्वांची प्रत यासोबत जोडलेली आहे. मुख्य वैशिष्ट्यांत पुढील गोष्टींचा समावेश होतो :—

- रस्त्यांच्या बांधकामांचा प्रस्ताव, मुख्य सचिवांच्या प्रमुख असणाऱ्या राज्यस्तरीय स्थायी समितीने मंजूर केला असून तपशीलवार प्रकल्प अहवालांची (डीपीआर) तपासणी आयआयटी, आरईसी इत्यादीसारख्या राज्य तांत्रिक अभिकरणांनी स्वतंत्ररित्या केली आहे.
- राज्याचे प्रस्ताव, समितीचे सदस्य असणाऱ्या ग्रामविकास व सल्लागार (परिवहन) मंत्रालयाच्या, नियोजन आयोगाच्या सचिवाकडून, मार्ग परिवहन व महामार्ग मंत्रालयाच्या प्रतिनिधींकडून आणि संचालक, सी.आर.आर.आय. इत्यादीकडून अध्यक्ष असणाऱ्या आंतर मंत्रीय अधिकार प्रदान समितीद्वारे विचारात घेतले आहेत.
- मंजुरी मिळाल्यानंतर प्रधानमंत्री ग्रामीण सडक योजनेसाठी प्रमाणशीर बोली दस्तऐवजानुसार या कामांसाठी राज्य शासनाने खुल्या निविदा केल्या असून ते काम ९ महिन्यांच्या कालावधीत पूर्ण करावयाचे आहे.

२. वार्षिक प्रस्तावांना मंत्रालयाच्या मंजुरीसह काम सुरू करून कार्यान्वयनाच्या टप्प्यात पुढील गोष्टींचा समावेश होतो :—

- प्रमाणशीर बोली दस्तऐवज तरतुदींनुसार निविदा सुरू करण्याचा अंतिम दिनांक व वेळ विनिर्दिष्ट करून निविदा मागविण्यासाठी नोटिसा निर्गमित करणे.
- कमीतकमी अर्हताकारी बोलीच्या आधारे निविदा निश्चित करणे आणि काम देणे.
- कंत्राट करारानंतर कार्यादेश निर्गमित करणे.
- अपुरा प्रतिसाद मिळाल्यास पुन्हा निविदा मागविणे या प्रयोजनासाठीचे निर्णय राज्याच्या आकृतिबंधानुसार कार्यक्रम कार्यान्वयन युनिट (पी.आर.यु.) किंवा कार्यकारी अभिकरण/विभाग यांच्या स्तरावर घेण्यात आले आहेत.

३. भारताच्या निवडणूक आयोगाद्वारे अंमलात यावयाच्या आदर्श आचारसंहितेमुळे प्रधानमंत्री ग्राम सडक योजना बाधीत होईल किंवा कसे, असा प्रश्न काही राज्य शासनांनी विचारला आहे. यासंबंधात असे निदर्शनास आणून देता येईल की, प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या निकषांअंतर्गत

आणि तपशीलवार प्रकल्प अहवाल (डीपीआर) तयार करण्याची रस्त्यांची कामे, अत्यंत चांगल्या प्रकारे चालविण्यात आली असून ती एक वेळखाऊ प्रक्रिया आहे आणि अधिकार प्राप्त समितीकडे येत असणारे प्रस्ताव हे, गत कितीतरी महिन्यांपासून सुरू असून पद्धतशीर प्रक्रियेमार्फत ते हाती घेण्यात आले आहेत. अधिकार प्राप्त समिती ही, अधिकृत आंतर मंत्रालयीन समिती आहे. प्रधानमंत्री ग्राम सडक योजना हा एक नियमित केंद्र पुरस्कृत कार्यक्रम आहे. या कामांची निविदा द्यावयाची आहे आणि अशी देण्यात येणारी माती काम आणि पक्के रस्ते (वॉटर बाऊंड मकादम) हे सुस्थितीत होण्यासाठी पावसाळ्याचा शेवट होण्यापूर्वी पूर्ण करणे गरजेचे आहे. अशाप्रकारे ही कामे द्यावयाची असतात.

मोठ्या प्रमाणावर बाळगावयाच्या सावधगिरीचा एक भाग म्हणून राज्य शासनाने आदर्श आचरसंहिता जाहीर झाल्याच्या कालाधीत, (जरी तशी प्रथा असली तरी) कामांच्या निविदा काढणे व कामे देणे यासंबंधातील कोणतीही प्रकरणे राजकीय कार्यकारी यंत्रणा व निवडून आलेले प्रतिनिधी यांच्याकडे निर्णयार्थ सोपविण्यात येऊ नयेत.

तद्नुसार, निवडणूक आयोग, आदर्श आचारसंहिता अंमलात येण्या अगोदर प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेचे राज्यांचे वार्षिक प्रस्ताव कार्यान्वित होण्यासाठी मंजूर झाले असल्याची खात्री करील आणि (भारताच्या निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या शर्तीच्या अधीनतेने), प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार ती सुरू ठेवण्यात येईल जेणेकरुन पावसाळ्या संपण्याच्या अगोदर मातीकाम व पक्के रस्ते बांधण्याचे काम पूर्ण होऊ शकेल. आदर्श आचारसंहिता अंमलात असण्याच्या कालावधीत, लोकनेते/सार्वजनिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या व्यक्ती यांना कोणतेही उद्घाटन समारंभ, जाहिरनामे काढणे, कोनशीला बसविणे इत्यादी कार्यक्रम करता येणार नाहीत, हे वेगळे सांगण्याची गरज नाही.

कळावे,

आपला विश्वासू,

(सही/-)

**(एस. विजयकुमार)**

**श्री. ए. एन. झा,**
निवडणूक उपायुक्त,
भारताचा निवडणूक आयोग,
नवी दिल्ली.

## अनुदेश क्रमांक २५

आंध्रप्रदेश, कर्नाटक, महाराष्ट्र, तामिळनाडू व झारखंड यांचे मुख्य सचिव यांना उद्देशून लिहिलेले आयोगाचे क्रमांक ४३७/६/२३/२००४, पी.एल.एन., तीन, दिनांक ११ मार्च २००४ चे पत्र.

**विषय :** सार्वत्रिक निवडणुका २००४ - दुष्काळ निवारण कार्य करणे - यासंबंधी

ज्या क्षेत्रांमध्ये निरनिराळ्या प्रकारे दुष्काळ निवारणाचे कार्य केले जात आहे अशा "दुष्काळग्रस्त " म्हणून जाहीर केलेल्या संबंधित राज्यांमधील राज्य शासनांकडून, आयोगाकडे, विविध प्रतिवेदने करण्यात आली आहेत. यासंबंधातील सर्व घटकांचा विचार करून आयोग खालीप्रमाणे निदेश देत आहे :—

(एक) राज्य शासनाला आपत्ती निवारण्याच्या तातडीच्या उपाययोजना म्हणून दुष्काळ निवारणाचे कार्य हे केवळ केन्द्र शासनाने आपत्ती निवारण निधी व्यवस्थापनासाठीच्या मार्गदर्शक सूचनांखालील निकषांतर्गत " दुष्काळग्रस्त " म्हणून जाहीर केलेल्या क्षेत्रांमध्येच करता येईल. २९ फेब्रुवारी २००४ रोजी निवडणुका जाहीर करण्यात आल्यानंतर, अशा "दुष्काळग्रस्त " क्षेत्रांच्या विद्यमान सूचीमध्ये कोणत्याही नवीन क्षेत्राची भर घालता येणार नाही. यासाठीचा असा निधी वापरण्यासाठी भारत सरकारच्या आपत्ती निवारण निधी/राष्ट्रीय आपत्ती निवारण निधी अंतर्गत सहाय्य मिळविण्यासाठीची यथोचित कार्य पद्धती अनुसरल्यानंतर केवळ आयोगाची पूर्व परवानगी घेण्याच्या अधीनतेने, कोणतेही अतिरिक्त क्षेत्र/गाव यांची त्यात भर घालता येईल.

(दोन) आयोगाने दुष्काळग्रस्त क्षेत्र म्हणून जाहीर करण्यात आलेल्या क्षेत्रात तातडीने निवारणाचे कार्य करण्यासाठीच्या पुढील उपाययोजनांना तात्पुरती मान्यता दिली आहे :—

(क) पाण्याच्या टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याची सोय करणे.

(ख) सध्याच्या विंधण विहिरी/खोदलेल्या विहिरी कोरड्या झाल्यामुळे निर्माण झालेल्या टंचाईग्रस्त क्षेत्रांमध्ये विंधणविहिरी किंवा खोदावयाच्या विहिरींचे खोदकाम करणे.

(ग) आपत्ती निवारण निधी योजनेमध्ये यापूर्वीच विहित केलेल्या व्यवस्थेनुसार कोणताही आधार नसलेल्या निराधारांना आणि जे कोणतेही काम करु शकत नाहीत अशा व्यक्तींना विहित दराने तांदूळ/गहू यांचे वाटप करण्याची तरतूद करणे.

(घ) गुरांना वैरण देण्याची तरतूद करणे.

(ड.) अशा प्रकारची विद्यमान कामे ज्या ठिकाणी पूर्ण झाली असतील त्याठिकाणी (काम केल्याची मजुरी म्हणून अन्न देणे इत्यादी) नवीन कामे निर्माण करून वेतनी रोजगार उपलब्ध करून देणे.

(तीन) आदर्श आचार संहिता सुरू असण्याच्या कालावधीमध्ये दुष्काळ सहायता कार्याच्या व्यवस्थापनामध्ये पर्यवेक्षकीय किंवा इतर कोणत्याही नात्याने शासनाचा कोणताही मंत्री किंवा राजकीय कार्यकर्ते कोणत्याही परिस्थितीत यांचा सहभाग असणार नाही.

(चार) संपूर्ण सहायतेची कामे ही, कोणत्याही स्तरावर निवडून आलेल्या प्रतिनिधींच्या आणि/किंवा अशासकीय प्रतिनिधींच्या समावेशाशिवाय विभाग, जिल्हा व तालुका/उप जिल्हा प्रशासन यांच्याद्वारे हाती घेण्यात येईल.

कृपया आयोगाच्या निदेशांचे अनुपालन होत असल्याची खात्री करावी आणि पोच द्यावी.

## अनुदेश क्रमांक २६

श्रीमती नजमा हेपतुल्ला, उपसभापती, राज्यसभा, ४ अकबर रोड, नवी दिल्ली ११० ००१ यांना लिहिलेले निवडणूक आयुक्तांचे क्रमांक ४३७/६/६/२००४, दिनांक २५ मार्च २००४ चे पत्र

**विषय :** सभापती व उपसभापती यांना आदर्श आचार-संहिता लागू करणे.

आपल्या दिनांक १८ मार्च २००४ रोजीच्या पत्राचा उल्लेख करून आपणास असे कळविण्याचा मला निदेश आहे की, लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या कालावधीत, शासकीय वाहनांच्या वापरावरील निर्बंध हे, लोकसभेचे सभापती, लोकसभेचे उप सभापती व राज्यसभेचे उपसभापती यांच्याबाबतीत देखील लागू करण्यात आले आहेत. जेथवर सुरक्षा प्रदान करण्याचा संबंध आहे तेथवर राज्य शासनांना, कोणत्याही वैयक्तिक बाबीच्या बाबतीत, संभाव्य धोका असण्याच्या आधारावर सुरक्षा प्रदान करण्याचा या अगोदरच सल्ला देण्यात आला आहे.

## अनुदेश क्रमांक २७

श्रीमती आशा स्वरूप, सह सचिव (सु.ग्रा.स्व.यो.), कृषी भवन, नवी दिल्ली ११० ००१ यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे क्रमांक ४३७/६/१६/२००३/पीएलएन-तीन, दिनांक १ एप्रिल २००४ चे पत्र.

**विषय.—** ग्रामविकास कार्यक्रमांच्या अंमलबजावणी संदर्भातील स्पष्टीकरण.

विविध ग्रामविकास योजनांच्या अंबलबजावणीच्या संदर्भातील आपली आयोगाबरोबर २७ मार्च २००४ रोजी झालेल्या बैठकीचा संदर्भ घेण्याचा निदेश मला करण्यात आला आहे. निवडणूका पूर्ण होईपर्यंत अंमलात असलेली आचारसंहिता लक्षात घेता, आयोगाने पुढील निदेश दिले आहेत :—

(एक) **संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना (सं.ग्रा.रो.यो.).**—संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेअंतर्गत चालू असलेली कामे तशीच चालू ठेवण्यात यावी आणि प्रत्येक कामासाठी राखून ठेवण्यात आलेली रक्कम देण्यात यावी. कोणत्योही पंचायतींच्या संदर्भात जेथे सर्व चालू कामे पूर्ण झाली आहेत आणि तेथे **नवीन** वेतनी रोजगार कामे हाती घेण्याची आवश्यकता आहे आणि जेथे ग्रामीण विकास मंत्रालयाद्वारे परस्पर पंचायतींना देण्यात आलेला निधी उपलब्ध आहे, असे असेल तर तेथे जिल्हाधिकारी/जिल्हा निवडणूक अधिकारी यांच्या पूर्व परवानगीने २००३-०४ साठीच्या मंजूर केलेल्या वार्षिक कृती योजनेनुसार नवीन कामे सुरू करता येऊ शकतील. इतर निधींमधून कोणतीही नवीन कामे सुरू करण्यात येऊ नयेत.

(दोन) **इंदिरा आवास योजना (इं.आ.यो.)**.—इंदिरा आवास योजने अंतर्गत ज्या लाभार्थींना गृहनिर्माण योजना मंजूर झाल्या आहेत आणि त्याची कामे सुरू झाली आहेत, त्यांना मानकांनुसार सहाय्य करण्यात येईल. कोणतेही नवीन बांधकामे हाती घेण्यात येणार नाहीत किंवा निवडणूका समाप्ती पर्यंत कोणत्याही नवीन लाभार्थांना सहाय्य मंजूर होणार नाही.

(तीन) **सुवर्णजयंती ग्राम स्वंरोजगार योजना (सु.ग्रा.स्व.यो.)**.–सुवर्णजयंती ग्राम स्वंरोजगार योजनेअंतर्गत ज्या मदत गटांना अर्थसहाय्य/ अनुदानांचा काही भाग मिळाला आहे त्यांना त्याचे शिल्लक हप्ते उपलब्ध करून देण्यात येतील.

निवडणूका समाप्तीपर्यंत कोणत्याही नवीन वैयक्तीक लाभार्थींना किंवा स्वयंम सहाय्यता गटांना वित्तीय सहाय्य देण्यात येणार नाही.

## अनुदेश क्रमांक २८

सर्व राज्ये/संघराज्य क्षेत्रांचे मुख्य सचिव/मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे क्रमांक ४३७/६/२००४/पीएलएन-तीन, दिनांक ८ मे २००४ चे पत्र.

**विषय.—** २००४ च्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूका–मुक्त आणि निःपक्ष निवडणुकीची खात्री घेण्यासाठी वाहनांच्या हालचालींवर वाजवी निर्बंध संबंधीचे स्पष्टीकरण.

मला असे कळविण्याचे निदेश देण्यात आले आहेत की, अशी जी शंका उपस्थित झाली आहे की, आयोगाच्या आदेश क्रमांक ४३७/६/९६/पीएलएन-तीन, दिनांक १६ जानेवारी १९९६ मध्ये अंतर्भूत असणाऱ्या वाहनांच्या चालवण्यावरील निर्बंध हे मोटारसायकल व स्कूटर सारख्या दुचाकींनासुद्धा लागू होतात का आणि कोणत्या कालावधी दरम्यान ते लागू होतात.

हे असे स्पष्ट करण्यात आले आहे की, मुक्त आणि निःपक्ष निवडणुका होण्याच्या दृष्टीने, हे निर्बंध मोटारसायकल आणि स्कूटर यासारख्या (सायकल सोडून) दुचाकींच्या संदर्भात ही लागू होतात, आणि मतदान समाप्तीच्या २४ तास आधी आणि मतदान पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीसाठी हे निर्बंध लागू करण्यात यावेत. तथापि, हे निर्बंध कोणत्याही कामावर असणाऱ्या शासकीय सेवकाला किंवा उपरोक्त आदेशाच्या परिच्छेद ८ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तींबरोबरच रुग्ण, किंवा वृद्ध/विकलांग व्यक्तींची वाहतूक करण्याकरिता वापरण्यात येणाऱ्या दुचाकीच्या बाबतीत लागू असणार नाहीत.

हे पत्र मिळाल्याची कृपया पोच देण्यात यावी.

## अनुदेश क्रमांक २९

महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव व महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले आयोगाचे क्रमांक ४३७/६/१/२००४-पीएलएन तीन, दिनांक ११ ऑगस्ट २००४ चे पत्र.

**विषय.—** महाराष्ट्र विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक—अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे—महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण मुंबई, औरंगाबाद खंडपीठ–यासंबंधात.

कृपया आयोगाचे दिनांक ५ ऑगस्ट २००४ चे समक्रमांकाचे पत्र पहावे (तात्काळ संदर्भासाठी सोबत जोडले आहे.) जेणेकरून जे अधिकारी राज्यातील निवडणुका घेण्याशी संबंधित आहेत, असे अधिकारी, त्यांच्या मूळ जिल्ह्यांमध्ये सेवा बजावणार नाहीत तसेच जे अधिकारी एकाच जिल्ह्यामध्ये चार किंवा त्यापेक्षा अधिक वर्षांसाठी काम करीत आहे त्यांची महाराष्ट्र विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका या मुक्त व निःपक्ष वातावरणात पार पाडण्याच्या दृष्टीने इतरत्र बदली करण्यात यावी, याची खात्री करून घेण्यासाठी आयोगाने परिपूर्ण मार्गदर्शक तत्त्वे निर्गमित केली आहेत. यासंबंधी, रामचंद्र बापुराव पवार विरुद्ध महाराष्ट्र राज्य व अन्य याबाबतीतील २००४ चा मूळ अपील (ओए) क्रमांक २२२ यातील महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ यांच्या दिनांक २२ जून २००४ च्या आदेशाकडे आपले लक्ष वेधण्याचा मला निदेश आहे. पूर्वोक्त मूळ अपिलामध्ये, भारताच्या निवडणूक ओयोगाने प्रतिवादी क्रमांक ३ म्हणून खटला चालविला होता. उक्त मूळ अपील जरी फेटाळण्यात आले असले तरी, सन्माननीय प्राधिकरणाने, त्यांच्या दिनांक २६ जून २००४ च्या आदेशामधील परिच्छेद ११ मध्ये विवक्षित निरीक्षणे नोंदविली आहेत, ती पुढीलप्रमाणे आहेत :—

> " सर्वमान्यतेने लोकसभेच्या निवडणुका सन २००४ मध्ये जानेवारी किंवा फेब्रुवारी महिन्याच्या जवळपास घोषित झाल्या होत्या व शक्यतो, विशिष्ट ठिकाणी शासकीय कर्मचाऱ्यांची नियुक्ती व बदली करण्याचे विशिष्ट धोरण आयोगाने स्वीकारले होते. त्यांनी दिनांक ११ फेब्रुवारी २००४ रोजी परिपूर्ण मार्गदर्शक तत्त्वे निर्गमित केली होती व त्यामध्ये विशेषरीत्या असे नमूद केले होते की, असे सर्व अधिकारी जे निवडणूक घेण्याशी संबंधित असतील व ज्यांची नियुक्ती त्यांचे स्वग्राम असलेल्या ठिकाणी असेल किंवा असे अधिकारी ज्यांनी एकाचठिकाणी चार वर्षांचा कालावधी पूर्ण केला असेल त्यांची, त्याठिकाणाहून अन्य ठिकाणी बदली करण्यात येईल. निवडणूक आयोग व राज्य शासनाचे शासनांग हे या योजनेची विश्वासाने व प्रामाणिकपणे अंमलबजावणी करण्यास बंधनकारक होते. तथापि, मला असे वाटते की, हे दुसरे काहीही नसून, विवक्षित मार्गदर्शक तत्त्वे आखून देण्याचा एक फार्स होता जेणेकरून, विशिष्ट कर्मचाऱ्यास अशा योजनेच्या पेहरावात अडकवून त्याची बदली करता येईल आणि ज्यांचे हितसंबंध गुंतलेले आहेत अशा इतरांना ठेवून घेता येईल. याबाबतचे अर्जदाराने दिलेले उत्कृष्ट उदाहरण हे श्री. डी. एम. बोरुडे, उप जिल्हाधिकारी (रोजगार हमी योजना) यांचे आहे. ते अहमदनगर जिल्ह्यातील होते. त्यांचे रोजगार हमी योजनेचे उप जिल्हाधिकाऱ्याचे पद हे सहायक निवडणूक अधिकारी म्हणून आधीच अधिसूचित केले होते. जिल्हाधिकारी, अहमदनगर, यांनी दिनांक २६ मार्च २००४ रोजी त्यांच्या बदलीचा प्रस्ताव तयार केला होता. तथापि, त्यांना, अपरिचित कारणासाठी त्याचठिकाणी ठेवण्यात आले होते. अर्जदाराने आणखी श्री./श्रीमती दांडगे, लवांडे, जरे इत्यादी यांची उदाहरणे दिली होती व ते सर्व अहमदनगर जिल्ह्याचे रहिवासी आहेत असे अभिकथित केले. श्री. लवांडे हे, उप जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून कार्यरत होते. असे असतानाही, त्यांनी त्याठिकाणाहून अन्य ठिकाणी हलविण्यात आले नव्हते. निवडणूक आयोगाद्वारे विशिष्ट धोरण स्वीकारण्यातील एक फार्स, असा शब्दप्रयोग, मी का वापरला याचे हे एक कारण आहे. विशिष्ट व्यक्तींचा विचार करून, तशी त्याबाबत अंमलबजावणी करण्याच्या दृष्टीने हे धोरण स्वीकारण्यात आले होते व अन्यथा दुसरे काहीही नव्हते. खरे पाहता, निवडणूक आयोग हे स्वायत्त प्राधिकरण आहे. त्याने निवडणुकांच्या न्याय्य निकालांचे हेतू साध्य करण्याचे ठरविले आहे. त्याने, ज्यांची स्वग्राम येथे पदस्थापना असेल किंवा ज्यांनी चार वर्षांचा कालावधी पूर्ण केला असेल, अशा अधिकाऱ्यांची बदली करण्याचे धोरण स्वीकारले होते. तथापि, उक्त धोरणाची प्रामाणिकपणे अंमलबजावणी करण्यात आली नव्हती किंवा असे की, काही व्यक्तींनी असद्‌भावपूर्वक आपकृत्य केले होते व अयोग्य प्रस्ताव तयार केले होते. मला असे वाटते की, निवडणूक आयोग जे एक स्वायत्त प्राधिकरण आहे, त्याने पाहिले पाहिजे की, त्यांचे हाताखालील अधिकारी व विशेषतः उच्च अधिकारी हे, निवडणुकांसारख्या योजनेच्या पेहरावात अडकवून त्या परिस्थितीचा गैरफायदा घेणार नाहीत. जर निवडणूक आयुक्तांनी अशा घटनांना मोकळीक दिली व त्याकडे दुर्लक्ष केले तर, असे अपकृत करणारे व असद्‌भावपूर्वक घटक, त्यांच्या अधिकारांचा, अप्रस्तुत विचार करण्यासाठी असेल असा गैरवापर करतील आणि अशा अधिकाऱ्यांना त्याचा त्रास सहन करण्याशिवाय व बळी जाण्याशिवाय अन्य दुसरा कोणताही मार्ग असणार नाही. मी, काहीशा गांभीर्यपूर्वक दृष्टीकोनातून विचार करण्यासाठी, निवडणूक आयोगाला, याबाबत प्रस्तावित करण्याचे समर्थन करील आणि आयोग, याबाबतीत योग्य ती कारवाई करील."

आयोगाच्या सूचनांचा ज्याप्रकारे गैरवापर करण्यात आला आहे त्याची आयोगाने गंभीर दखल घेतली आहे आणि भविष्यात अशा चुका होणार नाहीत याची खात्री करून घेण्यासाठी, राज्य प्रशासन व मुख्य निवडणूक अधिकारी यांच्याकडून अधिक दक्षता घेण्यात येईल अशी अपेक्षा करतो.

## अनुदेश क्रमांक ३०

कॅबिनेट सचिव, भारत सरकार ; सचिव, भारत सरकार, कार्यक्रम अंमलबजावणी विभाग आणि अरूणाचल प्रदेश, आसाम, आंध्र प्रदेश, बिहार, गोवा, गुजराथ, हिमाचल प्रदेश, जम्मू व काश्मीर, कर्नाटक, महाराष्ट्र, मणिपूर, मध्य प्रदेश, नागालँड, पंजाब, राजस्थान, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि दिल्ली राष्ट्रीय राजधानी क्षेत्र यांना पाठविलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ४३७/६/२००४-पीएलएन-तीन, दिनांक २६ ऑगस्ट २००४.

**विषय :** संसद सदस्य/विधान सभा सदस्य यांच्या स्थानिक क्षेत्र विकास योजनेच्या अंतर्गत निधी देणे.

आयोगाच्या दिनांक २४ ऑगस्ट २००४ च्या प्रसिद्धी पत्राकडे लक्ष वेधण्याचे मला निदेश असून त्यात आयोगाने, राजकीय पक्षांच्या आणि उमेदवारांच्या मार्गदर्शनासाठी आदर्श आचार संहितेच्या अंमलबजावणीची घोषणा केली आहे.

आयोगाने, संसद सदस्यांच्या स्थानिक क्षेत्र विकास योजनेअंतर्गत निधी देण्याचा विचार केला आहे आणि असे ठरविले आहे की,—

(क) जेथे निवडणुकां घेण्यात येत आहे अशा देशातील कोणत्याही भागात संसद सदस्यांना (राज्यसभा सदस्यांसह स्थानिक क्षेत्र विकास निधी अंतर्गत नव्याने निधी देण्यात येणार नाही. त्याचप्रमाणे कोणतीही असल्या, अशी योजना अंमलात असली निवडणूक प्रकिया पूर्ण होइपर्यंत) तरी, संसद सदश्यांच्या विधानसभा सदस्यांच्या स्थानिक क्षेत्र विकास निधीअंतर्गत नव्याने कोणतेही निधी देण्यात येणार नाही.

(ख) हे पत्र जारी होण्यापूर्वी, परंतु प्रत्यक्षात क्षेत्रामध्ये काम सुरू झालेले नसताना ज्या कामासाठी कार्य आदेश काढण्यात आलेला आहे असे काम सुरू करण्यात येऊ नये. ती कामे निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ही कामे सुरू करता येऊ शकतील. तथापि, प्रत्यक्षात काम सुरू झाले असेल तर, ते चालू ठेवता येऊ शकेल.

(ग) संबंधित अधिकाऱ्यांची संपूर्ण खात्री होण्यास अधीन राहून, पूर्ण झालेल्या कामाची रक्कम प्रदान करण्यासाठी कोणतेही बंधन असणार नाही.

## अनुदेश क्रमांक ३१

कॅबिनेट सचिव, केंद्रीय सचिवालय आणि अरूणाचल प्रदेश, महाराष्ट्र, आंध्र प्रदेश, आसाम, बिहार, गोवा, गुजराथ, हिमाचल प्रदेश, जम्मू व काश्मीर, कर्नाटक, मध्य प्रदेश, मणिपूर, नागालँड, पंजाब, राजस्थान, उत्तरांचल, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि दिल्ली राष्ट्रीय राजधानी क्षेत्र यांचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ४३७/६/२००४–पीएलएन–तीन, दिनांक २६ सप्टेंबर २००४.

**विषय.—** गांधी जयंती साजरी करणे–राजकीय पदाधिकाऱ्यांचा सहभाग.

मला असे कळविण्याचे निदेश आहेत की, गांधी जयंती, २ ऑक्टोबर २००४ रोजी असते आणि ती देशभर साजरी केली जाईल. आयोगाने अरूणाचल प्रदेश व महाराष्ट्र यांच्या विधान सभेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकांच्या आणि काही पोट–निवडणुकांच्या दृष्टीने सर्व संबंधित घटक विचारात घेतले आहेत आणि असे ठरविले आहे की, राज्यातील केंद्रीय मंत्री/मुख्यमंत्री/मंत्री यांना पुढील त्यांच्या भाषणाचा विषय, महात्मा गांधीजींचे कार्य व कामगीरी यांचा गुणगौरव करण्यापुरतेच मर्यादित असेल, या शर्तीच्या अधीन राहून गांधी जयंतीच्या सोहळ्यात सहभागी होता येऊ शकेल, आणि या प्रसंगी, सत्तेत असणाऱ्या पक्षांची कामगिरी ठळकपणे निदर्शणास आणणारी राजकीय भाषणे केली जाणार नाही याची सर्वतोपरी काळजी घेण्यात यावी. कोणत्याही परिस्थितीत, हा समारंभ राजकीय प्रचाराचे व्यासपीठ बनता कामा नये. मंत्र्यांच्या नावे देण्यात येणारा संदेश, कोणताही असल्यास, केवळ महात्मा गांधीच्या विषयापुरता मर्यदित आसावा आणि त्यात संबंधित मंत्र्यांचा फोटो असता कामा नये.

उपरोक्त अनुदेश, त्यांचे काटेकोरपणे पालन करण्यासाठी सर्व संबंधितींच्या निदर्शनास आणून द्यावे.

## अनुदेश क्रमांक ३२

श्री. आर. दयाकर, सह सचिव, (जीडी आणि हज) विदेश मंत्रालय, भारत सरकार, साऊथ ब्लॉक, नवी दिल्ली यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ४३७/६/२००४-पीएलएन-तीन, दिनांक २६ सप्टेंबर २००४.

**विषय.—** हज अर्थसहायाशी संबंधित असणारे निवेदन.

मला आपले पत्र क्र. एम/हज/११८३/२४/२००४, दिनांक २८ सप्टेंबर २००४च्या संदर्भात असे कळविण्याचा निदेश आहे की, आयोगाने, महाराष्ट्रातील १३ ऑक्टोबर २००४ चे मतदान पूर्ण होईपर्यंत शासनाने हज प्रवास, इत्यादीबाबतचे अर्थसहाय्य पुनःस्थापित करण्याबाबतचा निर्णय लांबणीवर टाकावा अशी इच्छा व्यक्त केली आहे.

## अनुदेश क्रमांक ३३

सचिव, भारत सरकार, ग्रामीण विकास व दारिद्र्य निर्मूलन, मंत्रालय, ग्रामीण विकास व दारिद्र्य निर्मूलन विभाग, यांना उदेशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ४३७/६/२८/२००४–पीएलएन–तीन, दिनांक २६-०९-२००४.

**विषय.—** ४ ऑक्टोबर २००४ रोजी राष्ट्रीय दैनिक मध्ये जागतिक अधिवास दिनानिमित्त जाहिराती देण्यासंबंधात.

उपरोक्त विषयावरील आपले आपले पत्र क्र. १७०६/डी/डीआयआर (यूपीए), दिनांक २८ सप्टेंबर २००४ कडे लक्ष वेधण्याचे आणि आपल्याला असे कळविण्याचे मला निदेश आहे की, पुढील शर्तीना अधीन राहून जाहीरात देण्यास या आयोगाची कोणतीही हरकत नाही :—

(एक) जाहिरातीमध्ये संबंधित मंत्र्यांचे छायाचित्र असता कामा नये.

(दोन) राजकीय पक्षाचा किंवा सहयोगी पक्षांचा कोणताही उल्लेख टाळण्यात यावा ;

(तीन) मुंबई व कलकत्ता शहरातून प्रसिद्ध होणाऱ्या दैनिकांमध्ये ती (जाहीरात) प्रसिध्द करू नये.

## अनुदेश क्रमांक ३४

सर्व राज्यांच्या व संघ राज्यक्षेत्रांच्या मुख्य सचिवांना आणि मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेले भारताच्या निवडणूक आयोगाचे, क्र. ४३७/६/आयएनएसटी/२००९—सीसीॲन्डबीई, दिनांक २२ फेब्रुवारी २००९ चे पत्र.

**विषय.—** जागतिक अधिवास दिन, पल्स पोलिओ/एचआयव्ही जनजागृती मोहिमा यांसारख्या निमित्तांसंबंधातील तसेच स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, गांधी जयंती, राज्य स्थापना दिन यांसारखे विविध दिवस साजरे करण्याच्या संबंधातील जाहिराती प्रसिद्ध करणे.

ज्या काळात आदर्श आचारसंहिता लागू असेल अशा, लोकसभेच्या/राज्य विधानसभांच्या सार्वत्रिक/पोट-निवडणूकांच्या कार्यक्रमांदरम्यान जागतिक अधिवास दिन, पल्स पोलिओ लसीकरण/ एचआयव्ही जनजागृती मोहिम यांसारख्या जाहिराती प्रसिद्द करण्यासाठी परवानगी मागणारे विविध संदर्भ मंत्र्यांकडून/विभागाकडून आयोगाला प्राप्त होत असतात. महत्त्वाच्या सामाजिक मुद्यांवरील जाहिरातीच्या प्रसिध्द आक्षेप घेणे, हा आयोगाचा कदापिही उद्देश नाही. आयोगास केवळ, सत्ताधारी पक्ष सामाजिक संदेश प्रसारित करण्याच्या बहाण्याने शासकीय यंत्रणेचा गैरवापर करत नाही, याची खात्री करावयाची आहे कारण, ते समान संधी देण्याच्या तत्त्वाच्या विरूद्ध आहे आणि त्यामुळे मुक्त व निःपक्ष निवडणुकांच्या तत्वाचा भंग होतो. म्हणूनच भारताच्या निवडणूक आयोगाने अशी स्पष्ट भूमिका घेतलेली आहे की, ज्या जाहिरातीमध्ये मतदारांना प्रभावित करील आणि आपल्या बाजूने मत देण्यास प्रेरित करील अशा प्रकारचे **कोणत्याही मंत्र्यांचे/राजकीय उच्चपदधारीचे छायाचित्र अथवा राजकीय संदेश नसेल आणि त्यामध्ये पक्षाच्या संपादणूकीवर भर दिलेला नसेल.** अशा जाहिराती प्रसिद्ध करण्यावर कोणताही आक्षेप घेतला जाणार नाही.

स्वातंत्र्य दिन, प्रजासत्ताक दिन, गांधी जयंती, शिवजयंती व राज्य स्थापना दिन यांसारखे अनेक ऐतिहासिक महत्त्वाचे दिन तुतऱ्यांच्या निनादात साजरे केले जातात. या समारंभाना केंद्रांचे/राज्याचे मंत्री उपस्थित असतात. जे सत्ताधारी पक्षांच्या अथवा निवडणूक लढविणाऱ्या त्यांच्या राजकीय पदाधिकाऱ्यांच्या संपादणुकीवर भर देऊन या समारंभांना कधीकधी राजकीय लाभ उठण्याकरिताच मंच बनवतात. आयोगाने याची गंभीर दखल घेतली असून असा निर्णय घेतला आहे की, अशा समारंभामध्ये मंत्री सहभागी होऊ शकतात, मात्र त्यांच्या भाषणाचा विषय हा ऐतिहासिक पार्श्वभूमी ऐतिहासिक मान्यवर व्यक्तिमत्वांची कार्ये व संपादणूक याच बाबीपुरता मर्यादित असला पाहिजे आणि त्या व्यासपीठाचे राजकीय प्रचारकार्याच्या मंचामध्ये रूपांतर होईल असे कोणतेही राजकीय स्वरूपाचे भाषण केले जाणार नाही, याची त्यांनी जास्तीतजास्त दक्षता घेतली पाहिजे.

अशाच कारणाकरिता अशा प्रसंगाचा वस्तुतः, सत्ताधारी पक्षाच्या संपादणुकीवर भर देण्याच्या हेतूने वापर करून घेतला जात असल्याकारणाने, या कालावधीत सत्तेमध्ये ....... वर्षे/दिवस पूर्ण यांसारख्या समारंभावर पूर्णतः बंदी असेल.

## अनुदेश क्रमांक ३५

कॅबिनेट सचिव, केंद्रीय सचिवालय, राष्ट्रपती भवन, नवी दिल्ली ११०००४ यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ४३७/६/२००४-पीएस-तीन, दिनांक ७ ऑक्टोबर २००४ चे पत्र.

**विषय.—** धार्मिक व भाषिकदृष्ट्या अल्पसंख्याकामधील सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास घटकांच्या कल्याणाकरिता राष्ट्रीय आयोग स्थापन करणे.

उपरोक्त विषयासंदर्भात आयोगाच्या दिनांक ३० सप्टेंबर २००४ च्या सम क्रमांकाच्या पत्राकडे आणि सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालय, भारत सरकार यांच्या पत्र क्रमांक १-११/२००४-एमसी (डी), दिनांक १ ऑक्टोबर २००४ द्वारे त्यांच्याकडून मिळालेल्या प्रतिसादाकडे निर्देश करण्याचा मला निदेश दिलेला आहे. धार्मिक व भाषिकदृष्ट्या अल्पसंख्याकांमधील सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास घटकांच्या कल्याणाकरिता राष्ट्रीय आयोग स्थापन करणे हे, राष्ट्रपतींना दिनांक ७ जून २००४ रोजी, संसदेच्या दोन्ही सभागृहांना उद्देशून केलेल्या अभिभाषणास अनुसरून असल्या कारणाने असा आयोग स्थापन करण्याच्या केंद्र सरकारने घेतलेला निर्णय हा आदर्श आचारसंहितेचा भंग ठरत नाही, असे मंत्रालयाने म्हटले आहे.

२. सर्व उमेदवारांना समान संधी मिळेल याची सुनिश्चिती करण्याच्या उद्देशाने आदर्श आचारसंहिता तयार करण्यात आली आहे. ही संहिता सर्वसाधारण शासकीय कामकाजास प्रतिबंध करत नसली तरी, विशिष्ट मतदारांना प्रभारित करणारा परिणाम साधू शकतील असे, आणि परिणामी सत्ताधारी पक्षास अनुचित लाभ मिळवून देणारे व त्या योगे पक्षापक्षांमधील समान संधीचा स्तर कमी अधिक करणारे असे निर्णय घेण्यास मनाई करते.

३. किमान गरजा कार्यक्रम अथवा राष्ट्रपतीचे अभिभाषण यामध्ये अंतर्भूत मुद्दे हे, सत्ताधारी पक्षाच्या किंवा शासनाच्या उद्देशाची निवेदने असतात, परंतु मंत्रिमंडळाने संबंधित मुद्यावर घेतलेल्या निर्णयामुळे त्या उद्देशाचे अंमलबजावणीयोग्य /कृतीयोग्य बाबीमध्ये रूपांतर होते.म्हणून ज्यावेळेस देशातील दोन राज्यांमध्ये निवडणूका घेण्यात येत आहेत अशावेळी धार्मिक व भाषिक दृष्ट्या अल्पसंख्याकामधील सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास घटकांकरिता राष्ट्रीय आयोग स्थापन करण्याच्या मुद्रित माध्यमांद्वारे दिनांक २९ सप्टेंबर २००४ रोजी, जाहीर केलेल्या शासनाच्या निर्णयामुळे मतदारांच्या काही घटकांवर प्रभाव पाडण्याचा उद्देश असल्याचा समज होते.

४. हाज यात्रेकरिताच्या अर्थसहाय्यावरील धोरण बदलण्याच्या मुद्यावर रितसरपणे आयोगाची मते मागवण्यात आली होती आणि आयोगाच्या सल्ल्यावरून या बाबीवर विचार करणे लांबणीवर टाकण्यात आले होते, हे येथे नमूद करणे आयोगास उचित वाटते. राष्ट्रीय आयोग स्थापन करण्याच्या मुद्यामध्ये देखील काही मतदारांना प्रभावित करण्याची तितकीच क्षमता आहे, परंतु हे प्रकरण निवडणूक आयोगाकडे त्याच्या अभिप्रायासाठी निर्दिष्ट केलेल नव्हते धार्मिक व भाषिक अल्पसंख्याकांमधील सामाजिक व आर्थिकदृष्ट्या मागास घटकांच्या कल्याणाकरिता राष्ट्रीय आयोग स्थापन करण्याचा निर्णयदेखील मतदानाच्या तारखेपर्यंत म्हणेजच दिनांक १३ ऑक्टोबर २००४ पर्यंत लांबणीवर टाकलेला असावा असे आयोगाचे ठाम मत आहे. भविष्यामध्ये अशा चुका टाळण्यात येतील, अशी आयोगाला आशा आहे.

## अनुदेश क्रमांक ३६

बिहार व झारखंड यांच्या मुख्य सचिव/मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ४३७/६/२००४--पीएलएन-तीन, दिनांक २४ डिसेंबर २००४.

**विषय.—**सरकारी राज्य कोषातील खर्चाने जाहिराती व जहिराती फलक प्रदर्शित करणे.

आयोगाच्या असे निदर्शनास आले आहे की, राज्यशासन/केंद्र सरकार यांचेकडून निवडणुका घेतल्या जात असताना सरकारी राज्य कोषातील खर्चाने सत्ताधारी पक्षाकडून जाहिराती चित्रीत असणाऱ्या अनेक जाहिरात फलक प्रदर्शित करण्यात येत आहेत. राजकीय पक्ष व उमेदवार यांच्या मार्गदर्शनासाठी असलेल्या आदर्श आचारसंचितेतील सत्ताधारी पक्ष याच्या परिच्छेद सात च्या उप परिच्छेद (चार) कडे आपले लक्ष वेधण्यात येत असून त्याबाबी खालीलप्रमाणे आहेत :—

" सत्ताधारी पक्ष.—मग ते केंद्रातील किंवा संबंधित राज्ये/ संघ राज्य क्षेत्रे किंवा यातील असो —याबाबत खात्री करील की, त्याच्या निवडणूक प्रचाराच्या प्रयोजनासाठी ते त्याच्या सत्ता स्थापनचा वापर करीत आहे. याबाबत कोणतीही तक्रार करण्यास कारणीभूत होणार नाही. आणि विशेषत :—

(चार) सत्ताधारी पक्षाने त्याच्या निवडणूक विषयक भवितव्यास सहाय्य होणाच्या दृष्टीने आपल्या कार्यसिद्धीच्या संबंधात जाहिरातबाजी करणे व राजकीय बातम्याच्या पक्षाभिनिवेशी वार्तांकनासाठी निवडणुकीच्याकालावधीत सरकारी जनसंपर्क माध्यमाचा गैरवापर करणे आणि, वृत्तपत्रे व इतर माध्यमेयात सरकारी राज्य कोषाच्या खर्चाने जाहिराती देणे याबाबी सापेक्षतेने टाळावे.

२. दिनांक १७ डिसेंबर २००४ रोजी बिहार, हरियाणा व झारखंड या राज्याच्या विधानसभेच्या निवडणूकांचे वेळापत्रक जाहिर झाल्यावर लगेचच आदर्श आचारसंहिता लागू झाली. सरकारी राज्य कोषाच्या खर्चाने असे जाहिरातीफलक व जाहिराती यांचे चालू असलेले प्रदर्शन हे, जरी निवडणुकीच्या घोषणेच्या दिनांकाच्या पूर्वी असे जाहिरातफलक जाहीराती किंवा भित्तीपत्रके प्रदर्शित केलेले असले तरी आदर्श आचारसंहितेचा भंग असण्याचे ठरविले जाईल कारण त्यामुळे सत्ताधारी पक्षाला गैरफायदा मिळतो व सत्ताधारी पक्षाच्यावतीने मतदारांना प्रभारीत केले जाते.

३. आयोगाने असा निदेश दिला आहे की, ज्याद्वारे कुटुंबनियोजन समाजसल्याण योजना इत्यादी बाबत जनतेला सर्वसाधारण माहिता देणे, किंवा जनतेपर्यंत सर्वसाधारण संदेश पोहचविणे अभिप्रेत आहे अशा शासनाने लावलेल्या जाहिरात फलक जाहिराती इत्यादींना मुभा देण्यात यावी. तथापि, कोणत्याही विचारसरणीचा राजकीय पदाधिकारी किंवा राजकीय पक्ष यांची कार्यसिद्धि लोकांपुढे मांडण्यात प्रयत्न करीत असलेले किंवा अभिप्रेत असलेले किंवा ज्यांवर त्यांचे फोटो किंवा नावे किंवा पक्षनिशाणी लावलेले असे सर्व जाहिराती फलक, जाहिराती इत्यादी तात्काळ काढून टाकण्यात याव्यात कारण कोणतेही पदाधिकारी किंवा राजकीय पक्ष हा, स्वतःची किंवा खुद्द पक्षाची स्तुती करण्याकरिता किंवा तो स्वःताची/ आपल्या पक्षाची किंवा कोणत्याही राजकीय नेत्याची वैयक्तिक प्रतिमा ठसविण्यासाठी सरकारी राज्य कोषातून खर्च करू शकत नाही. किंवा त्यास तसा प्राधिकार नाही आणि त्यासाठी सार्वजनिक साधनसंपत्तीचा वापर करू शकत नाही. सरकारी खर्चातून केलेल्या अशा जाहिराती फलक इत्यादींच्या खर्च निःसंशयपणे त्याच्या वेयक्तिक पक्ष निवडणूक प्रचाराच्या खर्चात जमा होईल.

४. आयोग असाही निदेश देत आहे की, निवडणुकीच्या कालवधीत यापुढे सरकारी राज्यकोषातील खर्चाने वृत्तपत्रे आणि इलेट्रॉनिक माध्यमासह इतर माध्यमेयांत कोणतीही जाहिरात देऊ नये. आजी सत्ताधारी पक्षाने त्याच्या निवडणूक विषयक भवितव्यास सहाय होण्याच्यादृष्टीने आपल्या कार्यसिद्धिचा संबंधात जाहिरातबाजी करणे व राजकीय बातम्याच्या पक्षाभिनिवेशी वार्तांकनासाठी निवडणुकीच्या कालवधीत सरकारी जनसंपर्क माध्यमाचा गैरवापर करणे. सापक्षतेने टाळण्यात यावे.

५. राज्य शासनाच्या सर्व विभागांना/अधिकाऱ्यांना, तात्काळ अनुपालनासाठी आयोगाचा हा निदेश कळविण्यात यावा.

६. हे पत्र मिळाल्याची पोच देण्यात यावी.

## अनुदेश क्रमांक ३७

कॅबिनेट सचिव, भारत सरकार ; सर्व राज्ये व संघराज्यक्षेत्रांचे मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे क्र. ४३७/६/आयएनएसटी/२०१३-सीसी आणि बीई व दिनांक २५ जून २०१३ रोजीचे पत्र.

**विषय.—** आदर्श आचारसंहिता–लोकसभा/विधानसभा पोट-निवडणुकांमध्ये केंद्र/राज्य शासनांकडून जाहिरातींचे प्रकाशन करण्यासंबंधात

आपणास विदित असल्याप्रमाणे, लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणूक असताना सर्वत्र देशभर आणि कोणत्याही राज्याच्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका असताना संबंधित राज्यभर आदर्श आचार संहिता लागू असते. पोट-निवडणूका असताना, मंत्र्यांचे दौरे, जाहिराती, शासकीय अतिथी गृहांचा वापर अधिकाऱ्याच्याबदल्या इत्यादीसारख्या विवक्षित तरतूदी वगळता मतदान असणाऱ्या मतदारसंघाच्या क्षेत्रात, ज्या जिल्ह्यांत पोट-निवडणूक मतदारसंघ येतो अशा संपूर्ण जिल्ह्यांत आदर्श आचार संहिता लागू असते.

(कृपया पहा आयोगाचे पत्र क्र. ४३७/६/आयएनएसटी/२०१२-सीसीबीई, दिनांक २६ एप्रिल २०१२.).

२. केंद्रात आणि राज्यात दोन्ही शासन गुणसंपन्नता आणि कामगिरीवरील जाहिरातींसह विविध प्रकारच्या जाहिराती प्रसिध्द करीत असल्याचे दिसून आले आहे. अशा जाहिराती प्रजासत्ताक दिन,स्वातंत्र दिन, प्रमुख नेत्यांचे जन्मदिन, शासनाचा वर्धापन दिन इत्यादींसारख्या विशेष, प्रसंगी प्रसारित केल्या जातात. अशा प्रसंगी अश्या जाहिराती प्रकाशित होतात तेव्हा पोट-निवडणूका चालू असतात आणि आदर्श आचार संहितेच्या मुध्दाविषयी प्रश्न उपस्थित होतो. जाहिरात प्रकाशित होत असताना पोट-निवडणुकांमध्ये आदर्श आचारसंहितेखाली विशिष्ट क्षेत्रातील विशेष करून, मुद्रित माध्यमातील अशा जाहिरांतीना रोखणे तांत्रिकदृष्या शक्य नसते.

३. आयोगाने हा मुद्दा विचारात घेतला या विषयाचे सर्व पैलू लक्षात घेऊन आयोगाने, **पोट-निवडणूकांच्या** संबंधी आदर्श आचार संहितेच्या कार्यकाळात, सार्वजनिक राज्यकोषातील खर्चानेजाहिरातींचे वितरण/प्रकाशन पुढीलप्रमाणे विनियमित करण्याचे निर्देश दिले आहेत :–

**(एक) महत्त्वाच्या विशिष्ट प्रसंगाच्या संबंधी सर्वसाधारण स्वरूपाच्या जाहिराती प्रकाशित करता येतील. तथापि, जर,योगायोग विशेष प्रसंगाच्या दिवशीत असे प्रकाशित असल्यास ते निर्बंधित करण्यात येईल, आणि ते इतर दिवशी प्रकाशित करू नये. जाहिरातीत, कोणत्याही मंत्र्यांचे आणि इतर राजकीय व्यक्तींचे छायाचित्रे असता कामा नये.**

**(दोन) मतदारसंघाच्या पोट-निवडणूकीचा अंतर्भाव असणाऱ्या क्षेत्राशी कोणत्याही विनिदिष्ट निर्देशित संदर्भ असणारी किंवा त्याकडे लक्ष वेधून घेणारी कोणतीही जाहिरात, या कालावधीच्या कोणत्याही दिनांकात प्रसिध्द करता कामा नये.**

४. अनुदेश फक्त **पोट-निवडणूकांच्या** बाबीत लागू असतील याची नोंद घ्यावी. सार्वजनिक निवडणूकीच्या वेळी, सार्वजनिक राज्यकोषातील खर्चाने जाहिराती देण्यावर असलेले निर्बंध काटेकोरपणे अंमलात असणे सुरू राहिल.

५. या मार्गदर्शक तत्वांची नोंद घ्यावी. आणि भविष्यात त्याचे अनुपालन होण्यासाठी सर्व संबंधित प्राधिकरणांच्या देखील ते निदर्शनास आणून घ्यावेत.

## अनुदेश क्रमांक ३८

कॅबिनेट सचिव, भारत सरकार ; सर्व राज्ये व संघराज्यक्षेत्रांचे शासनांचे मुख्य सचिव आणि सर्व राज्यांचे क्षेत्रांचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे क्र. ४३७/६/२००४पीएलएन–तीन, दिनांक ३० डिसेंबर २००४.

**विषय.—** आदर्श आचार संहिता व्हिडीओवरून परिसंवाद करण्यास बंदी या संबंधात

आयोगाचे पत्र क्र. ४३७/६/९६ पीएलएन–तीन दिनांक १७ जानेवारी १९९६, (प्रत सोबत जोडली आहे) च्या संदर्भात असे कळविण्याचा मला आदेश आहे की, आयोगाने, निवडणूका जाहिर झाल्यानंतर, राज्यांचे मुख्यमंत्री, मंत्री आणि केंद्रांचे व राज्य शासनाचे इतर राजकीय कार्याधिकारी व अधिकारी यांच्या दरण्यान व्हिडीओवरून होणाऱ्या परिसंवादाचा मुदा विचारात घेतला आहे आणि असे ठरविले आहे की, निवडणूका जाहिर झाल्यानंतर आणि राज्यात किंवा मतदारसंघात आदर्श आचार संहिता अंमलात आल्याचा दिनांकापासून राज्यांचे मुख्यमंत्री आणि केंद्राचे राज्य शासनाचे इतर राजकीय कार्याधिकारी व अधिकारी यांच्या दरम्यान वैयक्तीकपणे किंवा सामुहिकपणे व्हिडीओवरून कोणताही परिसंवाद करण्यात येणार नाही.

कृपया पत्राची पोच देण्यात यावी.

## अनुदेश क्रमांक ३९

भारत सरकार, सचिव मार्ग परिवहन व महामार्ग मंत्रालय यांना उद्देशून लिहिलेले आयोगाचे पत्र क्र. ४३७/६/३३/२००४/पीएलएन–तीन, दिनांक ३१ डिसेंबर २००४.

**विषय.—** बिहार, झारखंड व हरियाणा यांच्या राज्य विधान सभांची सार्वजनिक निवडणूक २००५,– आदर्श आचार संहिता लागू करण्याच्या संबंधात

आपल्या पत्र क्र. आर. डब्ल्यू./एनएच–१२०१४/३३/२००३/बीआर/एनएच–३, दिनांक २८ डिसेंबर २००४ च्या संदर्भात आपणास असे कळविण्याचा मला आदेश आहे की, आयोगाने, प्रकरण काळजीपूर्वक विचारात घेतले आहे आणि असे ठरविले आहे की, राष्ट्रीय महामार्गाच्या नुकसान झालेल्या भागांच्या नियमित देखभाल व दुरूस्तीसाठी मंजुऱ्या देता येतील. तथापि, मंत्रालयाच्या वार्षिक आराखडयामध्ये तरतूद केल्याप्रमाणे राष्ट्रीय महामार्गांच्या विद्यमान भागांच्या सुधारणा/विकास करण्यासाठी, मंजुरी दिलेली असली तरीही देखील मतदान असणऱ्या राज्यांमध्ये आदर्श आचार संहिता लागू असेपर्यंत नवीन मंजुऱ्या देण्यात येऊ नये किंवा नवीन कामे सूरु करू नये.

## अनुदेश क्रमांक ४०

डॉ. रेणुका विश्वनाथन भारत सरकारचे सचिव, ग्राम विकास मंत्रालय, ग्राम विकास विभाग, नवी दिल्ली यांना उद्देशून लिहिलेले आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/२००६ पीएलएन-तीन (खंड-तीन), दिनांक १६ मार्च २००६ आणि यथोचित कार्यवाही करण्याकरिता सर्व राज्यांचे व संघराज्य क्षेत्रांचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना पाठविलेली प्रत

**विषय.—** राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना अधिनियमाची (नरेगा) अंमलबजावणी-आदर्श आचार संहिता लागू करणे-यासंबंधात

वर नमूद केलेल्या विषयावरील आपल्या अर्ध-शासकीय पत्र क्र. २८०१२/११/०५-०६ नरेगा (एनआरईजीए) दिनांक ७ मार्च, २००६, च्या संदर्भात असे कळविण्याच्या मला निदेश आहे की, आयोगाने , या बाबीचा पुनर्विचार केला आहे आणि आता खालीलप्रमाणे ठरविले आहे :—

१. ग्राम विकास मंत्रालय, कोणत्याही राज्यात संघराज्य क्षेत्रात निवडणुका जाहिर झाल्यानंतर, ज्या जिल्ह्यांमध्ये नरेगा (एनआरईजीए) अंमलबजावणी करण्यात येत आहे अशा जिल्ह्यांची संख्या वाढविणार नाही.

२. निवडणुका जाहिर झाल्यानंतर जॉब कार्डधारकांनी कामाची मागणी केली तर चालू असलेल्या कामांमध्ये, त्यांना रोजगार पुरविण्यात येईल.

३. जर चालू असलेल्या कामांमध्ये कोणताही रोजगार पुरविणे शक्य नसल्यास, सक्षम प्राधिकरण, मान्यता देण्यात आलेल्या प्रकल्पांच्या संच्यातून नवीन काम (कामे) सुरू करू शकेल आणि ही वस्तुस्थिती, संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला (डीईओ) कळवू शकेल. चालू कामांमध्ये रोजगार देणे शक्य असेल तोपर्यंत सक्षम प्राधिकारी, कोणतेही नवीन काम सुरू करणार नाही. प्रकल्पाचा कोणताही संच उपलब्ध नसल्यास, किंवा प्रकल्पाच्या संचावर उपलब्ध असलेली पूर्ण झालेली असतील तर, संबंधित सक्षम प्राधिकारी, संबंधित जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यामार्फत ही बाब, मान्यतेसाठी आयोगाकडे निर्दिष्ट करील सक्षम प्राधिकारी , जॉब कार्डधारकांना चालू कामामध्ये कोणताही रोजगार देणे शक्य नसल्याने, नवीन कामांना मंजुरी देण्यात आली आहे अशा आशयाचे प्रमाणपत्रदेखील जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याला सादर करील. या अनुदेशांचे अनपालन करण्याची जबाबदारी नवीन कामांना मंजुरी देणाऱ्या प्राधिकाऱ्याची असेल.

४. आयोगाच्या सम क्रमांकाच्या दिनांक ७ फोब्रुवारी, २००६ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आयोगाचे अनुदेश, आता मागे घेण्यात येतील.

## अनुदेश क्रमांक ४१

कॅबिनेट सचिव, भारत सरकार, सर्व राज्यांचे व संघराज्य श्रेत्रांचे मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ४३७/६/२००६-पीएलएन-तीन (खंड-दोन), दिनांक १ एप्रिल, २००६.

**विषय.—शासकीय अतिथिगृहांचे वाटप-यासंबंधात**

जेथे निवडणुका जाहीर करण्यात आल्या आहेत किंवा निवडणुका होत आहेत अशा राज्यांमधील केंद्र सरकारच्या किंवा राज्य शासनाच्या कोणत्याही शासकीय अतितिगृहामध्ये विश्रामगृहामध्ये किंवा कोणत्याही सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमाच्या अतिथीगृहामध्ये निवडणुकीशी संबंधित असलेले अधिकारी व निरीक्षक यांची निवासव्यवस्था करणे आवश्यक असल्याने, केंद्र किंवा राज्य सरकारच कोणताही मंत्री, संसद सदस्य किंवा विधानसभा सदस्य किंवा राजकीय कार्याधिकारी यांना कोणतीही निवासव्यवस्था पुरविण्यात येणार नाही असे नमूद करणाऱ्या पत्र क्र. ४३७/६/२००६-पीएलएन-तीन (खंड दोन) दिनांक १४ मार्च २००६ नुसार दिलेले आयोगाचे अनुदेश कृपया पहावे.

आता, आयोगाला, विविध राजकीय नेत्यांचा सुरक्षिततेचा प्रश्न लक्षात घेता, हे निर्बंध शिथिल करण्यात यावे अशी विनंती करणारे अभिवेदने विविध राज्य सरकारांकडून व राजकीय कार्यधिकाऱ्यांकडून प्राप्त झाली आहेत.

आयोगाने, प्राप्त झालेल्या विनंत्यानुसार या मुद्यावर आणखी विचार केला आहे आणि असे ठरविले आहे की, विविध राज्य सरकांरकडून त्यांच्या कायद्याच्या तरतुदींअन्वये ज्यांना झेड किंवा त्याहून वरच्या दर्जाची किंवा तत्सम दर्जाची सुरक्षा पुरविण्यात आलेली आहे अशा राजकीय कार्याधिकाऱ्यांना, जेथे निवडणुका जाहिर करण्यात आल्या आहेत किंवा निवडणुका होत आहेत अशा राज्यांमधील (किंवा जिल्ह्यांमधील) केंद्र किंवा राज्य सरकारच्या शासकीय अतिथिगृहांमध्ये/विश्रामगृहांमध्ये किंवा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या अतिथिगृहांमध्ये यापुढे समन्याय तत्वावर निवासव्यवस्था पुरविता येऊ शकेल. असे वाटप, अशी निवासव्यवस्था, निवडणुकीशी संबंधित असलेल्या अधिकाऱ्यांना किंवा निरीक्षकांना अगोदरच वाटप करण्यात आले नसेल किंवा त्यांना भोगवटा केलेला नसेल या शर्तींच्या अधीन असेल. काही राजकीय कार्याधिकाऱ्यांना, वर नमूद केल्याप्रमाणे शासकीय अतिथिगृहे/विश्रामगृहे किंवा सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या अतिथिगृहांमध्ये थांबले असताना, कोणतेही राजकीय कार्यक्रम पार पाडता येणार नाही.

## अनुदेश क्रमांक ४२

कॅबिनेट सचिव, भारत सरकार, सर्व राज्ये व संघराज्य क्षेत्रांचे मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ४३७/६/२००७-आयएनएसटी-पीएल-तीन, दिनांक २१ नोव्हेंबर, २००७.

**विषय.—** लोकसभेच्या व राज्य विधानसभेच्या सार्वत्रिक/पोट-निवडणुकांच्या निवडणूक कालावधीत अधिकृत संकेतस्थळावरील राजकारणी व्यक्ती/ मंत्री यांचे सर्व संदर्भ वगळण्याशी संबंधित असणाऱ्या अनुदेशा संबंधात.

मला असे कळविण्याचे निदेश आहेत की, अनेक शासकीय विभाग व शासकीय संघटना यांच्याशी संबंधित असणाऱ्या राज्य शासनाच्या संकेतस्थळावर/मंत्रालयाच्या अधिकृत संकेत स्थळावर, त्यांची कामगिरी ठळकपणे दर्शविणाऱ्या परंतु राजकारणी व्यक्तींची/मंत्र्यांची वैयक्तिक कामगिरी म्हणून त्यांची प्रशंसा करणाऱ्या सध्या उपलब्ध असलेल्या विविध संदर्भाच्या विवादाचा आयोगाने विचार केला. आयोगाने, असे ठरविले आहे की, लोकसभेच्या राज्य विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या संबंधात जेव्हा आदर्श आचारसंहिता अंमलात असते तेव्हा अशा कालावधित अशा राज्य शासनाच्या/केंद्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध असलेले असे मंत्री, राजकारणी किंवा राजकीय पक्ष यांचे सर्व संदर्भ काढून टाकण्यात येतील त्यामधील दोष निरसन करण्यात येतील. पोट-निवडणुकांच्या कालावधित हे अनुदेश जे राजकारणी/मंत्री इत्यादी अशा पोट-निवडणुकींमध्ये स्वतः उमेदवार म्हणून उभे राहिलेले आहेत असे राजकारणी व्यक्ती/मंत्री इत्यादीनांच केवळ लागू होतील.

त्यांचे काटेकोरपणे अनुपालन करण्यासाठी हे अनुदेश, सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे.

कृपया पोच द्यावी.

**प्रत रवाना :**
कार्यवाहीसाठी
प्रधान सचिव/सचिव/अवर सचिव.

## अनुदेश क्रमांक ४३

सर्व राज्ये व संघराज्य क्षेत्रे यांचे मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ४६४/आयएनएसटी/२००७-पीएलएन-एक, दिनांक ८ जानेवारी, २००७.

**विषय.—** प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर मतदारसंघामध्ये राजकीय पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीवर निर्बंध.

लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १२६ अन्वये, मतदान समाप्र होण्यासाठी निश्चित केलेली वेळ समाप्त होण्याच्या कालावधीत ४८ तासांच्या कालावधीत प्रचारकार्य बंद करण्यात येईल.

२. पोट-निवडणुकीतील प्रचार कार्य दरम्यान, राजकीय पक्ष त्या प्रचार कार्यास मदत करण्याच्या दृष्टीने, मतदान असलेल्या मतदार संघाबाहेरील त्यांच्या समर्थकांना संघटित करतात. प्रचार कालावधी संपल्यानंतर, मतदार संघात कोणताही प्रचार करता येणार नाही ही वस्तुस्थिती लक्षात घेता, ज्यांना मतदारसंघाच्या बाहेरुन आणण्यात आले आहे आणि जे मतदारसंघाचे मतदार नाहीत असे राजकीय पदाधिकारी/पक्ष कार्यकर्ते मिरवणुकीतील कार्याधिकारी/प्रचार मोहिमेतील कार्याधिकारी इत्यादींना मतदारसंघात नियमितपणे उपस्थित राहू देऊ नये, कारण प्रचार कार्य संपल्यानंतर, त्यांच्या उपस्थितीमुळे मुक्त व निष्पक्ष वातावरण धोक्यात येण्याची शक्यता आहे.

३. त्यामुळे आयोगाने असे निगेश दिले आहेत की, प्रचारकार्याचा कालावधी संपल्यानंतर, जिल्हा निवडणूक प्रशासन, पोलीस प्रशासन यांनी प्रचारमोहिमेचा कालावधी संपुष्टात आल्यानंतर तात्काळ, अशा सर्व कार्याधिकाऱ्यांनी मतदारसंघ सोडल्याची खातरजमा करावी. त्याचे अनुपालन करणे त्यांना शक्य व्हावे या दृष्टीने हे अनुदेश सर्व राजकीय पक्ष, उमेदवार व त्यांचे प्रतिनीधी यांच्या निदर्शनास आणण्यात यावे.

४. आयोगाने आणखी असेही निदेश दिले आहेत की, वरील अनुदेशांची अंमलबजावणी केली जात आहे याची सुनिश्चिती करण्याच्या दृष्टीने, निवडणूक प्रशासन/पोलीस प्रशासन आवश्यक त्या सर्व उपाययोजना हाती घेईल त्यामध्ये, पुढील उपाययोजनांचा समावेश असेल :—

(एक) अशा व्यक्तींची जेथे राहण्याची सोय केली आहे असे कल्याण मंडप/समाज मंदिर इत्यादींची तपासणी करणे आणि अशा जागी बाहेरील व्यक्तींची राहण्याची सोय करण्यात आली आहे किंवा कसे याचा शोध घेणे.

(दोन) राहणाऱ्या व्यक्तींची यादी तपासण्यासाठी निवासगृहे व अतिथीगृहे यांची पडताळणी करणे.

(तीन) मतदारसंघाच्या सीमांवर तपासणी-नाके उभारणे व मतदारसंघाबाहेरून येणाऱ्या वाहनांच्या काहतुकीची तपासणी करणे.

(चार) लोक/लोकांचा समूह हे मतदार आहेत किंवा नाही हे, शोधून काढण्याच्या दृष्टीने, त्याच्या ओळखेची पडताळणी करणे व त्यांची ओळख सिद्ध करणे.

५. हे सर्व अनुदेश संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे व त्यांचे कोटेकोरपणे अनुपालन करण्यात यावे. याबाबतीत केलेली कारवाई आयोगाला कळविण्यात यावी.

## अनुदेश क्रमांक ४४

कॅबिनेट सचिव, भारत सरकार, सर्व राज्यांचे व संघराज्य क्षेत्रांचे मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ४३७/६/२००६-पीएलएन-तीन, दिनांक २३ नोव्हेंबर २००७.

**विषय.—** निवडणुकांच्या कालावधीत वाहनांचा गैरवापर करण्यास प्रतिबंध.

आयोगाने, निवडणुकांच्या कालावधीत वाहनांचा गैरवापर करण्यास प्रतिबंध घालण्याबाबत आदर्श आचारसंहिता लागू करण्यासंबंधी यापूर्व, वेळोवेळी विविध अनुदेश दिलेले आहेत. आदर्श आचारसंहिता अंमलात असण्याच्या कालावधीत त्यांचे पालन करण्यासाठी सर्व संबंधितांच्या सोईकरिता आता, या अनुदेशांचे एकत्रिकरण करण्यात आले आहे. निवडणुकांच्या कालावधीत वाहनांचा गैरवापर निर्बंध घालण्यासंबंधीचे हे अनुदेश, संविधानाच्या अनुच्छेद ३२४ अन्वये व या बाबतीत आयोगास समर्थ करण्याऱ्या अन्य सर्व अधिकारांन्वये काढण्यात आलेले आहेत.

**मतदान कालावधीत :**

(एक) लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १२३ (५) मध्ये अशी तरतूद आहे की, मतदान केंद्रापर्यंत व मतदान केंद्रापासून मतदारांची मोफत वाहतूक करण्यासाठी, उमेदवाराद्वारे किंवा त्यांच्या प्रतिनिधीद्वारे किंवा उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने अन्य कोणत्याही व्यक्तीद्वारे, वाहने भाड्याने घेणे किंवा त्याचा पुरवठा (प्रापण) करणे किंवा त्याचा वापर करणे हे, या अधिनियामच्या प्रयोजनासाठी ‘ भ्रष्टाचार ’ असेल अशा ‘ भ्रष्टाचारास ’ लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १३३ अन्वये शास्ती होऊ शकते आणि ते कृत्य पाचशे रुपयांपर्यंत वाढविता येऊ शकेल इतक्या द्रव्यदंडाच्या शिक्षेस पात्र असेल (निवडणूक आयोगाचा अनुदेश क्र. ४३७/६/९६-पीएलएन-तीन, दिनांक १६ जानेवारी १९९६ पहा).

(दोन) लोकसभेच्या निवडणुकीसाठी निवडणूक लढविणारा प्रत्येक उमेदवार, मतदानाच्या दिवशी पुढील वाहणे वापरण्यास हक्कदार असेल :—

(क) संपूर्ण मतदारसंघाच्या बाबतीत त्याच्या स्वतःच्या वापराकरिता एक वाहन ;

(ख) संपूर्ण मतदारसंघासाठी त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या वापराकरिता एक वाहन ;

(ग) याशिवाय, सी/डॉक्युमेंट ॲन्ड सेटींग/ॲडमिनिस्ट्रेटर/डेक्सटॉप/२३-एनओव्ही/००-१-एमसीसी-एनटाईटलमेंट-ऑफ व्हेईकल्स. डीओसी २ संसदीय मतदारसंघामध्ये समाविष्ट असलेल्या प्रत्येक विधानसभा क्षेत्रामधील त्याचा निवडणूक प्रतिनिधी किंवा कार्यकर्ते किंवा यथास्थिती पक्षाचे कार्यकर्ते यांच्या वापरासाठी एक वाहन, (निवडणूक आयोगाचा अनुदेश क्र. ४३७/६/२००६-पीएलएन-तीन, दिनांक २० नोव्हेंबर २००६ पहा).

(तीन) राज्य विधानसभेच्या निवडणूकीसाठी, त्या मतदारसंघातील मतदानाच्या दिवशी, प्रत्येक निवडणूक लढविणारा प्रत्येक उमेदावार पुढील वाहनांसाठी हक्कदार असेल :—

(क) त्याच्या स्वतःच्या वैयक्तिक वापरासाठी एक वाहन ;

(ख) त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या वापरासाठी एक वाहन ;

(ग) याशिवाय त्याचे कार्येकर्ते किंवा पक्ष कार्यकर्ते यांच्या वापरासाठी एक वाहन. (निवडणूक आयोगाचा अनुदेश क्र. ४३७/६/९६-पीएलएन-तीन, दिनांक २४ मार्च २००७ पहा).

(चार) वर नमूद केलेल्या वाहनांचे परवाने, जिल्हादंडाधिकाऱ्याद्वारे/निर्वाचन अधिकाऱ्याद्वारे देण्यात येतील. उमेदवारांनी, संबंधित प्राधिकाऱ्यांकडे त्यांच्या वाहनांची नोंदणी करणे आणि प्राधिकाऱ्यांनी दिलेले परवाने वाहनाच्या समोरच्या काचेवर लावणे आवश्यक आहे. मंत्री, कार्यकर्ते, प्रतिनिधी व कोणत्याही उमेदवाराचे समर्थक यांच्यासह राजकीय पक्षाचे नेते यांना अन्य कोणतीही वाहने वापरण्यास परवानगी दिली जाणार नाही. उमेदवाराचा पद प्रतिष्ठा लक्षात न घेता कोणताही अपवाद करण्यात येणार नाही. (निवडणूक आयोगाचा अनुदेश क्र. ४३७/६/९६-पीएलएन-तीन, दिनांक १६ जानेवारी १९९६ पहा.).

(पाच) असे स्पष्ट करण्यात येते की, उमेदावार किंवा त्याचा प्रतिनिधी किंवा पक्षाचा कार्यकर्ता किंवा कार्यकर्ते यांना यापुढे केवळ चारचाकी/तीनचाकी/दुचाकी वाहने, म्हणजेच कार (सर्व प्रकारच्या) टॅक्सी, ऑटो रिक्षा, रिक्षा व दुचाकी वाहने वापरण्याची परवानगी देण्यात येईल. यामध्ये मतदानाच्या दिवशी, चारचाकी वाहनांमधून चालकासह केवळ ५ पेक्षा अधिक असणार नाही इतक्या व्यक्तींनाच फिरण्याची परवानगी दिली जाईल.

आणखी असेही स्पष्ट करण्यात येते की, मतदानाच्या दिवशी, उमेदवाराला किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीला वापरण्यासाठी दिलेल्या वाहनाचा, अन्य कोणत्याही व्यक्तीला वापर करण्यास परवानगी दिली जाणार नाही. (निवडणूक आयोगाचा अनुदेश क्रमांक ४३७/६/२००६-पीएलएन-तीन, दिनांक २० डिसेंबर २००६ पहा.)

(सहा) हे अनुदेश, मोटारसायकल व स्कूटर्स यांसारख्या (सायकल वगळून) सर्व दुचाकी वाहनांना लागू करण्यात येतील आणि ते, मतदानाच्या समाप्तीसाठी निश्चित केलेल्या वेळेपूर्वी २४ तासाच्या कालावधीसाठी आणि मतदान पूर्ण होईपर्यंत लागू करण्यात येतील तथापि, हे निर्बंध, कर्तव्यावरील कोणत्याही सरकारी कर्मचाऱ्यांना किंवा रुग्णाची किंवा वृद्ध/विकलांग व्यक्तींची वाहतूक करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या वाहनास लागू असणार नाही. (निवडणूक आयोगाचा अनुदेश क्र. ४३७/६/२००४-पीएलएन-तीन, दिनांक ८ मे २००४ पहा.)

(सात) वरील निदेशांचे उल्लंघन करणाऱ्या कोणाहीविरुद्ध मोटार वाहने अधिनियमान्वये कारवाई करण्याशिवाय लोकप्रतिनिधित्त्व अधिनियम, १९५१ आणि भारतीय दंड संहितेच्या प्रकरण-नऊ अ या दोन्हींच्या तरतुदींन्वये दंडणीय कारवाई करण्यात येईल. या निदेशांचे उल्लंघन करताना वापरण्यात येणारी सर्व वाहने, सरकार जमा करण्यात येतील (निवडणूक आयोगाचा अनुदेश क्र. ४३७/६/९६-पीएलएन-तीन, दिनांक १६ जानेवारी १९९६ पहा.)

(आठ) तथापि, मतदानाच्या दिवशी तेथील सर्व वाहनांच्या वाहतुकीवर पूर्णपणे बंदी घालण्याचा आणि त्याद्वारे अडचणी निर्माण करण्याचा किंवा जनतेला त्रास घडविण्याचा आयोगाचा उद्देश नाही. निवडणुकीव्यतिरिक्त इतर खऱ्याखुऱ्या सद्‌भावी प्रयोजनांच्या वापरासाठी, मतदानाच्या दिवशी पुढील प्रकारची वाहने चालविण्यास देखील परवानगी देण्यात येईल आणि त्याला कोणीही अपवाद असणार नाही :—

(क) वाहनांच्या मालकांनी, निवडणुकीशी संबंधित नसलेल्या त्यांच्या खाजगी वापरासाठी खाजगी वाहनांचा वापर करावा ;

(ख) वाहनांच्या मालकांनी, एकतर त्यांच्या स्वतःसाठी किंवा त्यांच्या स्वतःच्या कुटुंबातील सदस्यांसाठी त्यांचा मताधिकार बजावण्यासाठी, मतदान केंद्रावर जाण्याकरिता खाजगी वाहनाचा वापर करावा, परंतु मतदान केंद्राच्या २०० मीटरच्या त्रिज्येमधील अन्य कोठेही जाता येणार नाही ;

(ग) रुग्णालय वाहने, रुग्णवाहिका (ॲम्बूलन्स), दुधाच्या गाड्या, पाण्याचे टँकर, तातडीची वीज पुरवठा वाहने, कर्तव्यावरील पोलिसांची वाहने, निवडणूक कर्तव्यावरील अधिकाऱ्यांची वाहने यांसारख्या अत्यावश्यक सेवांसाठी वापरलेली वाहने ;

(घ) ठराविक वाहनतळांदरम्यान व ठराविक मार्गांनी चालविल्या जाणाऱ्या बसगाड्यांसारखी सार्वजनिक वाहतुकीची वाहने ;

(ङ) टाळता येऊ शकत नाही अशा प्रवासाठी विमानतळ, रेल्वे स्थानके, आंतरराज्यीय बस स्थानके, रुग्णालये येथे जाण्याकरिता टॅक्सी, तीन चाकी, स्कूटर्स, रिक्क्षा, इत्यादी वाहने ;

(च) त्यांच्या स्वतःच्या वापरासाठी आजारी किंवा विकलांग व्यक्तींनी वापरलेली खाजगी वाहने. (निवडणूक आयोगाचा अनुदेश क्र. ४३७/६/९६-पीएलएन-तीन, दिनांक १६ जानेवारी १९९६ पहा).

**उमेदवारी अर्ज भरताना :**

निर्वाचन अधिकारी/सहायक निर्वाचन अधिकारी कार्यालयाच्या १०० मीटर परिक्षेत्रात जास्तीत जास्त तीन वाहने आणण्यास परवानगी देण्यात येईल. (निवडणूक आयोगाचा अनुदेश क्र. ४६४/आयएनएसटी/२००७/पीएलएन-एक, दिनांक ९ फेब्रुवारी २००७ पहा).

**निवडणूककार्य कालावधीच्या दरम्यान :**

(नऊ) असे अनुभवास आले आहे की, निवडणूककार्याच्या कालावधीमध्ये मतदारसंघात एखाद्या उमेदवाराच्या समर्थकांना गाडीतून नेण्यासाठी उमेदवारांकडून, त्यांच्या प्रतिनिधींकडून व पक्षनेत्यांकडून व त्यांच्या समर्थकांकडून खाजगी वाहने वापरण्यात आली आहेत आणि मतदारांच्या मनात भितीची जानीव हळू-हळू बिंबविण्यासाठी समाजविघातक घटनांच्या अनेक प्रसंगामध्ये उघडपणे दंडेलीचे प्रदर्शन केलेले आहे. त्यामुळे मतदार एकतर विशिष्ट पक्षाच्या/उमेदवाराच्या बाजूने मतदान करतात किंवा सर्वथा मतदान ठरण्यापासून दूर राहतात काहीवेळा ही वाहने, निवडणुकीच्या दरम्यान अशांतता निर्माण करणाऱ्याच्या दृष्टीने अनुचित शस्त्रे व शस्त्राच्या यांची तस्करी करण्यासाठी वापरली आहेत. अशा अनिष्ट/बेकायदेशीर कृत्यांना पायबंद घालण्याकरिता आयोगाने आणखी असे निदेश देत आहे की, बेकायदेशीर शस्त्र व हत्यारे जवळ बाळगणे यासारख्या गुन्हेगारी कामांसह कोणत्याही संभाव्य अपकृत्यासाठी निवडणूक लढविणाऱ्या उमेदावारांसोबत व त्यांच्या पक्षांच्या त्यासोबत असणाऱ्या व्यक्तींकडून वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर जिल्हा प्रशासनाने बारीक लक्ष ठेवावे, एकतर एखाद्या पक्षाचे किंवा एखाद्या खाजगी मालकाचे वाहनांपैकी कोणतेही वाहन जर मतदारांच्या मनात दहशत निर्माण करण्यासाठी किंवा त्यांना धाकदपटशा दारवविण्यासाठी समाजविघातक वस्तू घेऊन जाण्यात किंवा कोणत्याही

अशा कृत्यात गुंतले असल्याचे आढळून आले तर, अशा वाहनांना अवरूद्ध करून ठेवणे व निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत त्या वाहनांना मुक्त न करणे हे स्थानिक प्रशासनाचे कर्तव्य असेल. याशिवाय अशा बेकायदेशीर कृत्यांमध्ये गुंतला आहे असा मालक, भोगवटादार (अनेक भोगवटादार) व उमेदवार राजकीय पक्ष यांच्याविरुद्ध कायद्यानुसार फौजदारी कारवाई देखील करण्यात येईल. (पहा : निवडणूक आयोगाचा अनुदेश क्र. ४३७/६/९६-पीएलएन-तीन, दिनांक १६ जानेवारी १९९६)

(दहा) मुक्त, निःपक्ष व शांततापूर्ण निवडणुका होण्याची खात्री करून घेण्यासाठी जिल्हा प्रशासन, निवडणुका जाहीर झाल्यावर लगेचच वाहनांच्या तपासणीची अशी मोहीम सुरू करील व निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत ती मोहीम चालू ठेवील. (पहा : निवडणूक आयोगाचा अनुदेश क्र. ४३७/६/९६/पीएलएन-तीन, दिनांक १६ जानेवारी १९९६).

(अकरा) निवडणूककार्य प्रयोजनासाठी वापरण्यात येत असलेल्या गाड्यांना, वाहनांना कोणत्याही परिस्थितीत, कोणत्याही मतदारसंघातील निवडणूक अधिसूचनेच्या दिनांकापासून निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत तीन वाहनांपेक्षा अधिक वाहनांचा ताफा बरोबर घेऊन जाण्याची मुभा नसेल. सर्व मोठे ताफे मग ते जरी केंद्र सरकारचा किंवा राज्य शासनाचा कोणताही मंत्री घेऊन जात असला तरी त्या ताफ्याची विभागणी करण्यात येईल. तथापि, ही बाब, कोणत्याही अशा व्यक्तीच्या संबंधात दिलेल्या कोणत्याही सुरक्षाविषयक सूचनांच्या अधीन असेल. दुसऱ्या शब्दात असे सांगता येईल की, कोणत्याही स्थितीत वाहनांचा ताफा हा, कोणत्याही व्यक्तीच्या तीन वाहनांपेक्षा नसेल. त्यात अधिक त्या विशिष्ट व्यक्तीच्या सुरक्षा श्रेणीसाठी मुभा असलेली सुरक्षा वाहने असतील. (पहा : निवडणूक आयोगाची अनुदेश क्र. ४३७/६/९७/पीएलएन-तीन, दिनांक १८ मार्च १९९७). ताफ्यांची अशी कोणतीही विभागणी, त्या वाहनांमध्ये किमान २०० मीटर्स इतके अंतर ठेऊनच केली जाईल. (पहा : भारताच्या निवडणूक आयोगाचा अनुदेश क्र. ४६४/यूपी-एलए/२००७, दिनांक ५ एप्रिल २००७).

(बारा) जर कोणतीही व्यक्ती, वरील विहित मर्यादेपेक्षा अधिक असलेल्या वाहनांच्या एका ताफ्यातून फिरत असेल तर, ताफ्याची विभागणी केली असतानासुद्धा स्थानिक प्रशासनाचे हे कर्तव्य असेल की, निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत आयोगाचे अनुदेश उडवून लावत अशा वाहनांना मुभा देण्यात आली नाही याबाबत खात्री करून घेणे.

(तेरा) लोकप्रतिनिधित्त्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ खाली दिलेल्या स्पष्टीकरणाच्या खंड (क) च्या लाभाचा उपयोग करून कोणत्याही राजकीय पक्षांच्या नेत्यांना मार्ग परिवहन पद्धतीचा वापर करावयाचा आहे त्याबाबतीत, मुख्य निवडणूक अधिकाऱ्याकडून संपूर्ण राज्यात निवडणूक प्रचारासाठी कोणत्याही नेत्याकडून तेच वाहन वापरले जाणार आहे किंवा निरनिराळ्या क्षेत्रात अशा पक्ष नेत्यांकडून निरनिराळी वाहने वापरली जाणार आहेत किंवा कसे हे विचारात न घेता केंद्रीभूत पद्धतीने परवाना दिला जाईल. परवाना संबंधित व्यक्तीच्या नावाने देण्यात येईल, ती व्यक्ती कोणत्याही क्षेत्रात त्याच्याकडून, तिच्याकडून वापरण्यात येत आहे त्या वाहनाच्या विडस्क्रीनवर ठळकपणे लावील, मुख्य निवडणूक अधिकाऱ्याने असे दिलेले परवाने हे, उमेदवारांसाठी मुख्य निवडणूक अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी यांच्याकडून देण्यात येणाऱ्या अशा परवानांच्या रंगापासून सुस्पष्टपणे अशा वेगळ्या रंगाचे असतील. (पहा : भारताच्या निवडणूक आयोगाची अनुदेश क्र. ४६४/यूपीएलए/२००७, दिनांक ५ एप्रिल २००७).

(चौदा) राज्यांमधील प्रचारासाठी एखाद्या राजकीय पक्षाकडून वापरण्यात येतील अशा व्हिडिओ-हॅन-इत्यादीच्याबाबतीत, प्रचारासाठी व्हिडिओ हॅनच्या वापरासाठी कोणतीही परवानगी देण्यापूर्वी, मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांकडून याबाबत खात्री करून घेण्यात येईल की, वाहनाचा असा वापर हा, मोटार वाहन अधिनियमाच्या अनुसार आहे. यासंदर्भात, अलाहाबाद उच्च न्यायालयातील रिट विनंती अर्ज क्र. ३६४८ (एमबी, २००६ यावरील दिनांक २३ जून २००६ आणि दिनांक १४ फेब्रुवारी २००७ च्या न्यायनिर्णयांकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे. (पहा : भारताचा निवडणूक आयोगाचा अनुदेश क्र. ४६७/पीयू-एलए/२००७, दिनांक ५ एप्रिल २००७).

(पंधरा) कोणत्याही मतदारसंघातील निवडणुकीच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून ते निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत, जिल्हा प्रशासन हे, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांकडून, निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांसोबत असलेल्या व्यक्तींकडून व इतर पक्षनेत्यांकडून वापरण्यात येत असलेल्या वाहनांवर बारीक नजर ठेवील आणि आयोगाच्या अनुदेशांचा दुरुपयोग होत नाही याबाबत खात्री करील. (पहा : निवडणूक आयोगाचा अनुदेश क्र. ४३७/६/९७-पीएलएन-तीन, दिनांक १८ मार्च १९९७).

(सोळा) निवडणूक प्रचार सुरू होण्यापूर्वी जिल्हा निवडणूक अधिकारी किंवा याबाबत जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याद्वारे विशेषकरून प्राधिकृत करण्यात येईल असा अधिकारी (अनेक अधिकारी) यांचेकडे नोंदवण्यात आलेली, निवडणूक प्रचारात ते वापरणार आहेत अशा सर्व वाहनांचा तपशील मिळविण्यास निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना सांगता येईल कोणात्याही अतिरिक्त वाहनांचा कोणताही अधिकाऱ्यावर केवळ त्याचवेळी करता येऊ शकेल जेव्हा वाहनांच्या प्रत्यक्ष वापराच्या बाऱ्याच आधी उमेदवार किंवा त्याचा प्रतिनिधी यांनी तशा आशयाची नोटीस दिलेली आहे. निवडणूक प्रचारासाठी वापरण्यात येत असेल अशा वाहनांच्या तपशील कळवितांना, ते वाहन ज्या क्षेत्रात, तहसिलीत (तहसिलींमध्ये) चालविण्यात येत आहे त्याबाबतची देखील माहिती देण्यात येईल. (पहा : निवडणूक आयोगाचा अनुदेश क्र. ४३७/६/९७-पीएलएन-तीन, दिनांक १८ मार्च १९९७).

(सतरा) जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याकडून अशारीतीने मिळालेला तपशील, निवडणूक खर्च निरीक्षकांना कळविण्यात येईल. जिल्हा प्रशासनाला, उमेदवारांना किंवा त्यांच्या प्रतिनिधींनी दिलेल्या सूचनेनुसार निवडणूक प्रचारासाठी उपयोग करून घेत असलेली वाहने, प्रशासनाने अधिग्रहित करता कामानये, जिल्हा प्रशासनाकडे ज्या वाहनाची प्रचारासाठी नोंदणी केलेली नाही असे कोणतेही वाहन जर प्रचारासाठी वापरण्यात येत असल्याचे आढळून आले तर, असा प्रचार हा उमेदवाराचा अनधिकृत प्रचार असल्याचे मानन्यात येईल आणि त्यास भारतीय दंड संहितेच्या प्रकरण नऊ-क च्या दंडनीय तरतुदी लावण्यात याव्यात आणि ते वाहन तात्काळ प्रचाराच्या कामातून काढून टाकण्यात येईल (पहा : निवडणूक आयोगाचा अनुदेश क्र. ४३७/६/९७-पीएलएन-तीन, दिनांक १८ मार्च १९९७).

(अठरा) लोकप्रतिनिधित्त्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १६० मध्ये व्याख्या केल्याप्रमामे सायकलरिक्षा हे देखील वाहन आहे. व ते निवडणूक प्रचारासाठी वापरता येऊ शकते, जर रिक्षाचा वापर कारावयाचा असेल तर, उमदेवाराला त्याच्या निवडणूक खर्चाच्या लेखात (हिशोबात) त्याबाबतचा खर्च द्यावा लागेल. याबाबतची खात्री करून घेण्यासाठी, उमेदवाराने त्याच्या निवडणूक प्रचारासाठी वापरत असलेल्या अशा रिक्षेचा तपशील दिलेला असावा आणि जर रिक्षेच्या संबंधात तिची ओळख पटविण्यासाठी कोणतीही नगरपालिकेची नोंदणी/परवाना नसेल तर, निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडून रिक्षाचालकाला त्याच्या वैयक्तिक नावाने एक परवाना देण्यात येईल. रिक्षा चालक जेव्हा त्या रीक्षेचा प्रचाराच्या प्रयोजनासाठी वापर करताना तो परवाना स्वतःजवळ बाळगील, तथापि, सामान्यपणे उतारु घेऊन जाण्याच्या नेहमीच्या प्रयोजनासाठी रिक्षा वापरण्यात येत असताना, जर त्यांनी एखाद्या उमेदवाराचे नाव किंवा पक्षाची निशाणी दर्शविणारे केवळ एखादे पत्रक रिक्षेवर लावले असेल तर, ते त्यांनी स्वतःच्या अखत्यारीत तसे केले असल्याचे गृहीत धरून, यातून सूट देण्यात यावी. (पहाः आयोगाचा अनुदेश क्र. ४३७/६/२००६-पीएलएन-तीन (खंड-नऊ), दिनांक १२ जुलै २००६).

(२) विरील सूचनांचे काटेकोर पालन होण्यासाठी सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्याव्यात.

## अनुदेश क्रमांक ४५

कॅबिनेट सचिव, भारत सरकार, व सर्व राज्ये व संघराज्य क्षेत्रे यांचे मुख्य सचिव आणि मुख्य निवडणूक अधिकारी यांना संबोधून लिहिलेले भारताच्या निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ४३७/६/आयएनएसटी/२००८-सीसी व बीई, दिनांक २८ मार्च २००८.

**विषय.—** निवडणूकाच्या कालावधीत वाहनांचा गैरवापर करण्यास प्रतिबंधचा संबंधीत.

महोदय,

वर उल्लेख कलेल्या विषयावर निर्गमित केलेल्या आयोगाच्या सूचनांकडे पहा आयोगाचे पत्र क्र. ४३७/६/२००६ जीएलएन-तीन, दिनांक २३ नोव्हेंबर २००७ आपले लक्ष वेधण्याचे आणि आयोगाचे प्रत्र क्र. ४३७/६/सूचना/२००८-सीसी आणि बीई, दिनांक ३१ ऑक्टोबर २००८ च्या संबंधात आपणास असे कळविण्याचा मला आदेश आहे की, आयोगाने लोकप्रतिनिधित्त्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ च्या स्पष्टीकरण (१) अन्वये सूट घेणाऱ्या राजकीय नेत्यांच्या संबंधात, एका कार्यालयातून घेऊन जाणाऱ्या वाहनांच्या संख्येवर घातलेले निर्बंध काढून घेतलेले आहेत. आयोगाने, वर नमूद केलेल्या दिनांक २३ नोव्हेंबरच्या आयोगाच्या सूचनांच्या आंशिक फेरबदलामध्ये पुढील मार्गदर्शक तत्त्वे निर्गमित करण्याचे ठरविले आहे.

२. आता असे स्पष्ट करण्यात येत आहे की, एखाद्या काफिल्यात घेऊन जाणाऱ्या वाहनांच्या संख्येवर कोणतेही निर्बंध नाहीत आणि ही बाब सर्व संबंधितांना लागू असेल.

३. या बाबीच्या तात्काळ अनुपालनासाठी ही बाब सर्व राजकीय पक्ष उमेदवार आणि सर्व निवडणूक संबंधित कर्मचारी यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

## अनुदेश क्रमांक ४६

सर्व राज्ये व संघराज्यक्षेत्रे यांचे मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ४६४/आयएनएसटी/२००७-पीएलएन-एक, दिनांक १२ ऑक्टोबर २००७.

**विषय.—** प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर एखाद्या मतदारसंघामध्ये राजकीय पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीवर निर्बंध

लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १२६ अन्वये, मतदान समाप्त होण्यासाठी निश्चित केलेली वेळ समाप्त होण्याच्या ४८ तासांच्या कालावधीत प्रचार मोहिम बंद करण्यात येईल.

२. पोट-निवडणुकीतील मोहीमेच्या दरम्यान, राजकीय पक्ष त्या प्रचार मोहीनेत मदत करण्याच्या दृष्टीने, मतदान असलेल्या मतदारसंघाबाहेरील त्यांच्या समर्थकांना संघटित करून कामास लावतात, प्रचार कालावधी संपल्यानंतर, मतदारसंघात कोणताही प्रचार करता येऊ शकत नाही ही वस्तुस्थिती लक्षात घेता, ज्यांना मतदारसंघाच्या बाहेरून आणण्यात आले आहे आणि जे मतदारसंघाचे मतदार नाहीत असे राजकीय पदाधिकारी/पक्ष कार्यकर्ते/मिरवणुकीतील पदाधिकारी/प्रचार मोहिमेतील पदाधिकारी इत्यादींना मतदारसंघात उपस्थित राहू देऊ नये. कारण प्रचार मोहीम संपल्यानंतर, त्याच्या उपस्थितीमुळे मुक्त व निःपक्ष वातावरणातील मतदान धोक्यात येण्याची शक्यता आहे.

३. म्हणून आयोगाने असे निदेश दिले आहेत की, प्रचार मोहिमेचा कालावधी संपल्यानंतर, जिल्हा निवडणूक प्रशासन/पोलीस प्रशासन यांनी, प्रचारमोहिमेचा कालावधी संपल्यानंतर तात्काळ, अशा पदाधिकाऱ्यांनी मतदारसंघ सोडल्याची खातरजमा करावी. त्यांनी त्यांचे अनुपालन करण्यासाठी हे अनुदेश सर्व राजकीय पक्ष, उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांच्या निदर्शनास आणून द्यावेत.

४. आयोगाने आणखी असेही निदेश दिले आहेत की, वरील अनुदेशांची अंमलबाजवणी केली जात आहे याची खातरजमा करण्याच्या दृष्टीने निवडणूक प्रशासन/पोलीस आवश्यक त्या सर्व उपाययोजनांचा हाती घेऊ शकेल त्यामध्ये, पुढील उपाययोजनांचा समावेश असेल :—

(१) अशा व्यक्तींची जेथे राहण्याची सोय केली आहे अशा कल्याण मंडप/समाज मंदिरे इत्यादींची तपासणी करणे आणि अशा जागी बाहेरील व्यक्तींची निवासव्यवस्था करण्यात आली आहे किंवा कसे याचा शोध घेणे.

(२) राहणाऱ्या व्यक्तीची यादी तपासण्यासाठी निवासगृहे व अतिथीगृहे यांची पडताळणी करणे.

(३) मतदारसंघाच्या सीमांवर तपासणी नाके उभारणे व मतदार संघाबाहेरून येणाऱ्या वाहनांच्या वाहतुकीची तपासणी करणे.

(४) लोक/लोकांचा समूह हे मतदार आहेत किंवा नाहीत हे शोधून काढण्याच्या दृष्टीने त्यांच्या ओळखीची पडताळणी करणे व त्यांची ओळख सिद्ध करणे.

५. हे सर्व अनुदेश संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे व त्यांचे काटेकोरपणे अनुपालन करण्यात यावे. याबाबतीत केलेली कारवाई आयोगास कळविण्यात यावी.

## अनुदेश क्रमांक ४७

सर्व राज्ये आणि संघराज्यक्षेत्रांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ३/८/२००० जेएस-दोन, दिनांक २६ डिसेंबर २०००.

**विषय.—** निवडणूक प्रचारमोहिमांमधील ध्वनिक्षेपकांचा वापर–एकत्रित अनुदेश.

सर्व राजकाय पक्ष, उमेदवार आणि त्याचे कार्यकर्ते, पाठीराखे आणि हितचिंतक आपल्या निवडणूक प्रचार मोहिमांमध्ये ध्वनिक्षेपकाचा वापर करतात. या ध्वनिक्षेपकाचा वापर केवळ व्यासपीठावरच करण्यात येतो असे नाही तर ट्रक, टेम्पो, मोटारगाड्या, टॅक्सी, व्हॅन, तिचाकी स्कूटर, सायकल, रिक्षा इत्यादी वाहनांवर ध्वनिक्षेपक लावून/बसवूनही त्याचा वापर करण्यात येतो. ध्वनिक्षेपक लावलेली अशी वाहने सर्व मार्ग, रस्ते व गल्ल्या यामधून व त्याचप्रमाणे गावागावांमधून, मोहल्ल्यातून, वसाहतींमधून, परिसरांमधून मोठ्या आवाजात ध्वनिक्षेपण करत फिरत असतात आणि हिंडत राहतात यामुळे भयंकर ध्वनिप्रदूषण होते व सर्वसामान्य लोकांच्या जीवनातील शांतता व स्वास्थ्य हरवते. सकाळी भल्या पहाटेपासून संबंध दिवसभर आणि अगदी मध्यरात्रीपर्यंत ध्वनिक्षेपकांची ओरड चालू राहिल्यामुळे विशेषतः विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर विपरीत परिणाम होत असल्याने विद्यार्थीवर्ग तर अगदी हैराण होत असतो. वृद्ध, अपंग आणि रुग्ण यांच्यासारखे तर त्याचे वास्तव्य संस्थामध्ये, रुग्णालयांमध्ये किंवा घरी असले तरीही तेसुद्धा अगदी बेजार होतात.

२. निवडणूक प्रचारकार्यासाठी व जनतेला माहिती पुरवण्यासाठी ध्वनीक्षेपक हे अन्य साधनांपैकीच एक साधन असल्यामुळे निवडणुकीच्या काळांमध्ये ध्वनिक्षेपकाचा वापर पूर्णपणे थांबवणे शक्य नाही, याची आयोगास जाणीव आहे. परंतु, त्याचवेळी सर्वसामान्य लोकांच्या जीवनातील शांततेचा भंग करणाऱ्या व स्वास्थ्य बिघडवणाऱ्या मोठ्या आवाजात अवेळी आणि अयोग्य ठिकाणी ध्वनिक्षेपकांचा बेलगाम व बेबंद अशाप्रकारे जो वापर केला जातो त्यास परवानगी देता येणार नाही. याबाबत रास्त निर्बंध घालण्याची आवश्यकता आहे.

३. यासंबंधात सर्वंकष विचार करून, आयोग, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३२४ अन्वये त्यास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा आणि याबाबतीत त्यास समर्थ करणाऱ्या सर्व अधिकारांचा वापर करून आपल्या आधीच्या अनुदेशांचे अधिक्रमण करून याद्वारे असा **निदेश** देत आहे की, सर्व आगामी निवडणुकांच्या वेळी ध्वनिक्षेपकांचा वापर पुढीलप्रमाणे विनियमित करण्यात येईल :—

(एक) निवडणुकीच्या घोषणेच्या तारखेपासून सुरू होणाऱ्या आणि निवडणुकीच्या निकालाच्या तारखेस संपणाऱ्या निवडणुकीच्या कालावधीत निवडणूक प्रचारासाठीच्या सार्वजनिक सभांसाठी, कोणत्याही प्रकारच्या वाहनांवर बसवलेल्या किंवा स्थितीशील अवस्थेतील ध्वनिक्षेपकांच्या वापरास फक्त (क) ग्रामीण भागात म्हणजेच महानगरपालिका किंवा नगरपालिकांच्या हद्दीबाहेरील क्षेत्रांमध्ये सकाळी ६-०० व रात्री ११-०० च्या दरम्यान : आणि (ख) इतर भागांत म्हणजेच महानगरपालिका किंवा नगरपालिकांच्या हद्दीत येणाऱ्या क्षेत्रांमध्ये सकाळी ६-०० व रात्री १०-०० च्या दरम्यानच परवानगी देण्यात येईल. **(हा परिच्छेद, निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ३/८/२००५/जेएस-दोन, दिनांक २६ सप्टेंबर २००५ द्वारे बाब क्र. १८४ मध्ये केलेल्या परिच्छेदाऐवजी समाविष्ट करण्यात आला) :—**

> "३. (एक) निवडणूक प्रसार कार्यासाठीच्या जाहिर सभांसाठी कोणत्याही प्रकारच्या वाहनांवर बसविण्यात आलेल्या किंवा स्थितीशील अवस्थेतील, सार्वजनिक उद्घोषणायंत्रणा (पब्लिक अॅड्रेस सिस्टिम) किंवा ध्वनीक्षेपक किंवा कोणतेही ध्वनी प्रवर्धक अस्थित यांचा वापर रात्री १०-०० ते ६-०० च्या दरम्यान करण्यात येणार नाही."

(दोन) सार्वत्रिक प्रचारासाठी किंवा जाहिर सभेसाठी अथवा मिरवणुकांसाठी वापरण्यात येमाऱ्या ध्वनिक्षेपकांचा वापर मग ते पिरत्या वाहनांवर अथवा अन्य प्रकारे वापरण्यात येत असो वरील खंड (एक) मध्ये निर्दिष्ट केलेल्या निर्बंधित वेळेतच करण्यात येईल. त्यापलीकडे त्यांचा वापर करता येणार नाही.

(तीन) कोणत्याही ध्वनिक्षेपकांचा वापर, उपरिनिर्दिष्ट वेळेबाहेर करण्यात येत असेल तर त्या ध्वनिक्षेपकाच्या बरोबर जी काही साधने वापरण्यात येतील त्याच्यासह ध्वनीक्षेपक जप्त करण्यात येतील.

(चार) मालमोटारी (ट्रक), टेम्पो, टॅक्सी, गाडी (व्हॅन), तिचाकी स्कूटर्स, सायकलरिक्षा यांचा समावेश असलेल्या पण त्यांच्या पर्यंतच निर्बंधित नसलेल्या फिरत्या वाहनांवर कोणत्याही ध्वनिक्षेपकांचा वापर करणारे सर्व राजकीय पक्ष, उमेदवार आणि अन्य कोणत्याही व्यक्तींनी अशा वाहनांचा नोंदणी ओळख क्रमांक, ध्वनिक्षेपकाच्या वापरास मंजुरी येणाऱ्या प्राधिकाऱ्यास कळवावा आणि संबंधित प्राधिकाऱ्याने दिलेल्या परवान्यावर या वाहनांचा असा नोंदणी ओळख क्रमांक नमूद करण्यात येईल.

(पाच) उक्त लेखी परवान्याशिवाय ज्या कोणत्याही वाहनांवर ध्वनिक्षेपकांचा वापर करण्यात येईल ते वाहन ध्वनीक्षेपक व त्याच्याबरोबरच्या वापरण्यात येणारी सर्व सामग्री यासह तात्काळ जप्त करण्यात येईल.

(सहा) फिरत्या वाहनांवर किंवा कायम जागी कोणत्याही ध्वनिक्षेपकांचा वापर करणाऱ्या सर्व राजकीय पक्षांनी उमेदवारांनी आणि अन्य प्रत्येक व्यक्तींनीसुद्धा :—

(१) मतदारसंघातील मतदार नोंदणी अधिकारी आणि

(२) स्थानिक पोलीस अधिकारी

यांना कोणत्याही ध्वनिक्षेपकाचा वापर करण्यापूर्वी त्यांनी प्राप्त केलेल्या परवान्याचा संपूर्ण तपशील लेखी स्वरूपात कळवला पाहिजे. फिरत्या ध्वनिक्षेपकांच्या संदर्भात, त्यांनी (राजकीय पक्ष व इतर) वाहनांचा नोंदणी ओळख क्रमांक निवडणूक निर्णय अधिकारी आणि स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांकडेसुद्धा नोंद करावी.

(सात) उपरोक्त निदेशांपैकी कोणत्याही निदेशाचे उल्लंघन करून कोणीही ध्वनिक्षेपकांचा वापर करणार नाही ही बाब काटेकोरपणे अंमलात आणणे हे ध्वनिक्षेपकाच्या वापरासाठी परवाना देणाऱ्या राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांची आणि स्थानिक पोलीस अधिकाऱ्यांची जबाबदारी असेल.

४, कोणत्याही प्रकारच्या वाहनांवर बसविलेल्या किंवा जे काही असेल त्या कोणत्याही इतर पद्धतीने, ध्वनिक्षेपकांच्या वापरास, कोणत्याही मतदान क्षेत्रात, मतदान संपण्यासाठी निश्चित केलेल्या ४८ तासांच्या कालावधी दरम्यान वापर करण्याबाबत कोणतीही परवानगी देण्यात येणार नाही. मतदान संपल्यानंतर निकाल जाहीर होऊनसुद्धा निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत, योग्य पद्धतीने कायदा व सुव्यवस्था राखणे गरजेचे असते. सर्वसाधारणपणे ध्वनिक्षेपकाच्या वापरास सार्वजनिक उपद्रवाचे साधन (स्त्रोत) समजण्यात येते आणि बऱ्याचदा ह्यामुळे राजकीय दृष्ट्या तनावाच्या वातावरणात भर पडू शकते. म्हणून, जिल्हा प्रशासनाने, अशा उपरोक्त प्रतिबंधात्मक ४८ तासानंतर ध्वनीक्षेपक वापरण्यासाठीची मंजुरी मागण्यासाठीच्या कोणत्याही अर्जाचा, त्याची गुणवता आणि निवडणूक पूर्ण होईपर्यंत योग्यरित्या कायदा व सुव्यवस्था राखण्याची गरज लक्षात घेऊन, विचार करावा.

५. ध्वनिप्रदूषण व सार्वजनिक शांततेचा भंग व प्रशांतता भंग करणे याबाबत तपासणी करतील, अशा आयोगाच्या वरील निदेशांकडे बारकाईने लक्ष पुरवून, त्यांचे सर्व संबंधित राज्य शासनाच्या प्राधिकाऱ्यांनी काटेकोर कार्यान्वयन केले पाहिजे आणि कडकपणे अंमलबजावणी केली पाहिजे. याचे कोणतेही उल्लंघन झाल्यास याची आयोगाकडून गंभीर दखल घेण्यात येईल आणि कसूरदार अधिकारी त्यांच्या विरुद्ध शिस्तभंगाची कडक कार्यवाही केली जाण्यास पात्र असतील.

६. या आदेशाची प्रत, मान्यताप्राप्त राष्ट्रीय व राज्य पक्षाच्या स्थानिक युनिटांना आणि प्रत्येक उमेदवारांना त्यांच्या नामनिर्देशनाच्यावेळी पोचपावतीसह इंग्रजी/हिंदी मध्ये व स्थानिक भाषेत उपलब्ध करून दिली जाईल.

७. या पत्राची पोच तात्काळ देण्यात यावी.

## अनुदेश क्रमांक ४८

सर्व राज्ये/संघराज्य क्षेत्रांचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ५०९/७५/२००४/जेएस-एक, दिनांक १५ एप्रिल २००४.

**विषय :—** दूरचित्रवाणी वाहिनी व केबल नेटवर्क यांवरील राजकीय स्वरुपाच्या जाहिरातीं संबंधातील दिनांक १३ एप्रिल २००४ रोजीचा सर्वोच्च न्यायालयाचा आदेश.

मला, सन २००४ रोजीच्या एसएलपी (सी) क्र. ६६७९ या प्रकरणात (माहिती व प्रसारण मंत्रालय विरुद्ध मे. जेमिनी टी.व्ही. प्रा. लि. आणि इतर) मा. सर्वोच्च न्यायालयाच्या दिनांक १३ एप्रिल, २००४ च्या आदेशानुसार, आयोगाने दिलेल्या दिनांक १५ एप्रिल, २००४ रोजीच्या आदेशाची एक प्रत यासोबत जोडण्याबाबतचे निदेश देण्यात आलेला आहे.

२. याची नोंद घेता येईल की, एनसीटी, दिल्ली येथे मुख्यालय असणाऱ्या कोणत्याही नोंदणीकृत राजकीय पक्षाने किंवा कोणत्याही गटाने किंवा संघटनेने/संघाने दूरचित्रवाणी वाहिन्या व केबल नेटवर्क यावर प्रसारित करावयाच्या जाहिरातींचे पूर्वविलोकन, छाननी व प्रमाणन करणे यासाठी दिल्ली येथील मुख्य निवडणूक अधिकारी, यांनी आदेशाच्या परिच्छेद ६ (एक) मध्ये निदेश दिल्याप्रमाणे एक समिती घटित करावयाची आहे. त्याचप्रमाणे, इतर राज्यांचे व संघराज्य क्षेत्रांचे मुख्य निवडणूक अधिकारी, परिच्छेद ६ (तीन) अनुसार त्यांच्या राज्य/संघराज्य क्षेत्रांच्या ठिकाणी मुख्यालय असलेल्या राजकीय पक्ष व इतर संघ/गट यांच्या अर्जाचा विचार करण्यासाठी समिती घटित करील. आदेशाच्या परिच्छेद (पाच) नुसार संबंधित मतदारसंघातून निवडणूक लढविणाऱ्या स्वतंत्र उमेदवाराने दिलेल्या जाहिरातीचे पूर्वलोकन, छाननी व प्रमाणन करणे याकरिता प्रत्येक संसदीय मतदारसंघाच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्याला पद निर्देसित अधिकारी म्हणून घोषित करण्यात येईल. आंध्र प्रदेश, कर्नाटक, ओरिसा व सिक्किम येथील विधानसभेच्या चालू सार्वत्रिक निवडणुका आणि काही राज्यातील पोट-निवडणुका लढविणाऱ्या उमेदवारांसाठी संबंधित विधानसभा मतदार संघाचा समावेश असणाऱ्या संसदीय मतदारसंघाचा निवडणूक निर्णय अधिकारी जाहिरातीच्या प्रमाणनासाठीचे अर्ज विचारार्थ स्वीकारील.

३. सर्व राज्यांचे व संघराज्य क्षेत्रांचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना देखील, जाहिरातीच्या प्रमाणनासाठीच्या अर्जावरील समितीच्या पद निर्देशित अधिकाऱ्याचा निर्णयासंबंधातील तक्रारी व गाऱ्हाणी दूर करण्यासाठी आणखी एक समिती घटित करणे देखील आवश्यक आहे.

४. प्रमाणनासाठीचा प्रत्येक अर्ज, आदेशाला जोडण्यात आलेल्या जोडपत्र-क मध्ये विहित केलेल्या नमुन्यानुसार विवरणपत्रात, संबंधित समिती किंवा संबंधित पदनिर्देशित अधिकारी याच्यासमोर सादर करावयाचे आहे. जाहिरातीचे प्रसारण करण्याबाबतचे प्रमाणपत्र, समितीने पदनिर्देशित अधिकाऱ्याने आदेशाला जोडण्यात आलेल्या जोडपत्र-ख मध्ये देण्यात आलेल्या नमुन्यात द्यावयाचे आहे. अर्जदाराने, प्रस्तावित जाहिरातींच्या दोन प्रती, स्वाक्षरित अनुलिपी सोबत इलेक्ट्रॉनिक नमुन्यात सादर करणे आवश्यक आहे.

५. प्रमाणनासाठी मिळालेल्या सर्व अर्जांची एखाद्या नोंदवहीमध्ये योग्य रीतीने नोंद ठेवावी. प्रत्येक अर्जावर, क्रमवार क्रमांक टाकावेत आणि क्रमवार इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील दोन प्रतींवर देखील नमूद करावेत आणि स्वीकृती अधिकाऱ्याने, इलेक्ट्रॉनिक प्रतीवर त्याची स्वाक्षरी करावी. प्रमाणपत्र दिल्यानंतर प्रसारणासाठी प्रमाणित केलेली जाहिरातीची एक इलेक्ट्रॉनिक प्रत समितीने/पदनिर्देशित अधिकाऱ्याने ठेवून घ्यावी.

६. सर्व मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना आपल्या राज्यातील संघराज्य क्षेत्रातील समित्यांद्वारे व पदनिर्देशित अधिकाऱ्यांद्वारे जाहिरातींचे पूर्वालोकन व परिनिरीक्षण करण्याच्या प्रयोजनार्थ, आवश्यक असेल अशी व्हीसीआर, व्हिसीडी दूरचित्रवाणी, इत्यादी सारखी आवश्यक साधनसामग्री/पायाभूत सुविधा भाड्याने किंवा विकत घेऊन त्याचे संपादन करण्याची तात्काळ कारवाई करता येईल. केलेली कोणतीही खरेदी हा, राज्य शासनाने तत्सम बाबींसाठी मान्य केलेले दर व कार्यपद्धती यांअनुसार असावी.

७. आयोगाच्या आदेशास व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी आणि तो, विशेषतः राज्यातील संघराज्य क्षेत्रातील सर्व जिल्हा निवडणूक अधिकारी/जिल्हादंडाधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, दूरदर्शन वाहिन्या, केबल चालक आणि राजकीय पक्ष यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावा.

८. कृपया पोच द्यावी.

प्रत :

**भारताचा निवडणूक आयोग**

निर्वाचन सदन, अशोका रोड, नवी दिल्ली ११० ००१.

क्रमांक ५०९/७५-२००४/जेएस-एक दि. १५ एप्रिल , २००४

**आदेश**

१. **ज्याअर्थी,** केबल टेलिव्हिजन नेटवर्क (विनियमन) अधिनियम, १९९५ याच्या कलम ६ अन्वये, अशी तरतूद केली आहे की, कोणतीही जाहिरात ही, विहित केलेल्या जाहिरात संहितेशी असल्याशिवाय, कोणतीही व्यक्ती अशी कोणतीही जाहिरात, केबल सेवेमार्फत पारेषण किंवा पुनःपारेषण करणार नाही ; आणि

२. **ज्याअर्थी,** वर नमूद केलेल्या कलम ६ च्या संदर्भात जाहिरात संहिता निर्धारित करणाऱ्या केबल टेलिव्हिजन नेटवर्क (विनियमन) नियम, १९९४ याच्या नियम ७ च्या पोट-नियम (३) मध्ये अशी तरतूद केली आहे की, ज्या जाहिरातीचे उद्देश, संपूर्णतः किंवा प्रामुख्याने, धार्मिक किंवा राजकीय स्वरूपाचे आहेत अशा कोणत्याही जाहिरातीला परवानगी दिली जाणार नाही ; कोणत्याही धार्मिक अथवा राजकीय हेतूने जाहिराती दिग्दर्शित केल्या जाणार नाहीत ; " आणि

३. **ज्याअर्थी,** आंध्र प्रदेश उच्च न्यायालयाने, आपल्या डब्ल्यूपीएमपी क्र. ५२१४/२००४ (जेमिनी टी.व्ही. प्रायव्हेट लिमिटेड-विरुद्ध-भारताचा निवडणूक आयोग आणि अन्यमधील दिनांक २३ मार्च २००४ च्या निर्णयाद्वारे व आदेशाद्वारे केबल टेलिव्हिजन नेटवर्क (विनियमन) नियम, १९९४ याचा नियम ७(३) च्या उपरोल्लिखित तरतुदी निलंबित केल्या आहेत ; आणि

४. **ज्याअर्थी,** माननीय सर्वोच्च न्यायालयाने, एसएलपी (दिवाणी) क्र. ६६७९/२००४ (माहिती व प्रसारण मंत्रालय-विरुद्ध- मेसर्स जेमिनी टी.व्ही. व इतर मधील आपल्या दिनांक २ एप्रिल २००४ च्या अंतरिम आदेशाद्वारे, आव्हान दिलेल्या आदेशाऐवजी खालील आदेश दिले आहेत :—

(एक) कोणताही केबल चालक किंवा दूरचित्रवाहिनी, जी देशाच्या कायद्याशी सुसंगत नाही अशी आणि जी नैतिकता, सभ्यता यांचा भंग करते आणि भावना दुखावणारी आहे किंवा जी धक्कादायक, उबग आणणारी व विद्रोहकारी आहे अशी कोणतीही जाहिरात प्रसारित करणार नाही ;

(दोन) भारताच्या निवडणूक आयोगाद्वारे अशा प्रसारणांवर संनियंत्रण ठेवण्यात येईल ;

(तीन) अशा जाहिरातीचा समावेश करण्यावर उमेदवाराने खर्च केला आहे किंवा कसे यासंबंधीचा समाविष्ट करावा किंवा करू नये यावर ५ एप्रिल, २००४ रोजी विचार करण्यात येईल ; आणि

(चार) अशा जाहिराती कायद्याशी अनुरूप आहेत किंवा कसे यांविषयीचे नियम, भारताच्या निवडणूक आयोगाद्वारे निर्धारित करण्यात येतील.

५. **ज्याअर्थी,** माननीय सर्वोच्च न्यायालयाने, एसएलपी (दिवाणी) क्र. ६६७९/२००४ मधील आपल्या दिनांक १३ एप्रिल, २००४ रोजीच्या पुढील आदेशाद्वारे, पुढीलप्रमाणे निदेश दिले आहेत :—

" ——आदेश देण्यापूर्वी, वेळोवेळी सुधारणा केलेल्या केबल टेलिव्हिजन नेटवर्क (विनियमन) अधिनियम, १९९५ चा उल्लेख संक्षेपात " अधिनियम " असा केला आहे, आणि त्याखाली तयार केलेले नियम याच्या विवक्षित तरतुदी विचारात घेणे आम्हांला योग्य वाटले. देशामधील केबल टेलिव्हिजन नेटवर्क चालविण्याचे विनियमन करणे हा या अधिनियमाचा उद्देश आहे. या अधिनियमाच्या कलम ६ मध्ये अशी तरतूद आहे की, जर जाहिरात विहित केलेल्या जाहिरात संहितेशी अनुरूप नसेल तर कोणतीही व्यक्ती, केबल सेवेद्वारे अशी कोणतीही जाहिरात पारेषण किंवा पुनः पारेषण करणार नाही. या अधिनियमाच्या कलम ११ मध्ये अशी तरतूद केली आहे की, जर कोणत्याही प्राधिकृत अधिकाऱ्यास कोणत्याही केबल परिचालनाने, या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केले आहे किंवा उल्लंघन करीत आहे असा विश्वास ठेवण्यास कारण असेल तर, तो, केबल टेलिव्हिजन नेटवर्कचे प्रचालन करण्याकरिता अशा केबल परिचालकाद्वारे वापरण्यात येत असलेली साधन सामग्री जप्त करू शकेल. या अधिनियमाच्या कलम १२ मध्ये या अधिनियमाच्या तरतुदींचे कोणतेही उल्लंघन केल्यास अशी साधन सामग्री सरकारजमा करण्याची तरतूद केली आहे. त्याचप्रमाणे, अधिनियमाच्या कलम १३ मध्ये देखील साधन सामग्री जप्त करण्याची आणि सरकारजमा करण्याची तरतूद केली आहे. कलम १६ मध्ये, या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबाबत शिक्षेची तरतूद देखील केली आहे. कलम १९ मध्ये असे निर्धारित केले आहे की, प्राधिकृत अधिकाऱ्यास, जनहितार्थ तसे करणे आवश्यक किंवा इष्ट आहे असे वाटले तर, तो, आदेशाद्वारे जी जाहिरात विहित केलेल्या कार्यक्रम संहितेशी व जाहिरात संहितेशी अनुरूप नाही आणि जी धर्म, वंश, भाषा, जात किंवा समूह या कारणांवरून शत्रूत्व वाढीस लावण्याचा संभव आहे अथवा कोणत्याही असल्यास अन्य कोणत्याही कारणावरून, विविध धार्मिक, वांशिक, भाषिक किंवा प्रादेशिक गटांमध्ये किंवा जातींमध्ये अथवा समुहांमध्ये विसंवाद निर्माण करण्याचा किंवा शत्रुत्वेची तिरस्काराची भावना किंवा द्वेष भावना निर्माण करण्याचा संभव आहे किंवा जी सार्वजनिक प्रशांततेचा भंग करण्याचा संभव आहे अशी कोणतीही जाहिरात

प्रसारण करण्यापासून वा पुनःप्रसारण करण्यापासून कोणत्याही केबल चालकास मनाई करू शकेल. या अधिनियमाच्या कलम २२ मध्ये या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी नियम करण्यासाठी केंद्र सरकारला प्राधिकार प्रदान केला आहे. केंद्र सरकारला, अधिनियमाच्या कलम २२ द्वारे, त्याला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून, केबल टेलिव्हिजन नेटवर्क नियम, १९९४ ज्याचा निर्देश संक्षेपात असा केला आहे या नावाने ओळखले जाणारे नियम करण्याचा अधिकार प्रदान केलेला आहे. या नियमांच्या नियम ७ मध्ये अशी तरतूद आहे की, जेव्हा केबल सेवेच्या माध्यमातून एखादी जाहिरात केली जाते तेव्हा, ती अशाप्रकारे तयार करण्यात येईल की जी देशाच्या कायद्यांनुरुप असेल आणि ती केबल ग्राहकांची नीतिमत्ता, सभ्यता व धार्मिक भावना दुखावणारी नसावी. इतर गोष्टींबरोबरच, पोट-नियम (२) मध्ये अशी तरतूद केली आहे की, जी जाहिरात, कोणताही वंश, जात, वर्ण, पंथ व राष्ट्रीयत्व भारतीय संविधानाच्या कोणत्याही तरतुदीच्या विरुद्ध असल्याचा उपहास करील आणि जी लोकांना गुन्हा करण्यास चिथावणी देईल, शांतताभंगास व हिंसाचारास कारणीभूत होईल, अथवा कायद्याचा भंग करण्यास कारणीभूत होईल कोणत्याही प्रकारे हिंसाचाराचा किंवा अश्लीलतेचा गौरव करील अशा कोणत्याही जाहिरातीस परवानगी देणार नाही. पोट-नियम (३) मध्ये आणखी अशी तरतूद आहे की, ज्या जाहिरातीचे उद्देश हे संपूर्णतः किंवा मुख्यतः धार्मिक अथवा राजकीय स्वरुपाचे आहेत अशा कोणत्याही जाहिरातीस परवानगी असणार नाही ; कोणतीही धार्मिक अथवा राजकीय हेतूने जाहिराती दिग्दर्शित केल्या जाणार नाहीत. या पार्श्वभूमीवर आता आम्ही पुढील आदेश काढण्याचे प्रस्तावित करीत आहे :

दूरदर्शन वाहिनीवर आणि/किंवा केबल नेटवर्कवर जाहिरात प्रसारित करण्याचे प्रस्तावित असणाऱ्या प्रत्येक नोंदणीकृत राष्ट्रीय व राज्य स्तरावरील राजकीय पक्षाने आणि निवडणूक लढविणाऱ्या प्रत्येक उमेदवाराने अशी जाहिरातीच्या प्रसारणाच्या प्रस्तावित प्रारंभाच्या दिनांकापूर्वी किमान तीन दिवसांच्या आत निवडणूक आयोगाकडे/पदनिर्देशित अधिकाऱ्याकडे (निवडणूक आयोगाने पदनिर्देशित केलेल्या) अर्ज करावयाचा आहे. अन्य कोणत्याही व्यक्तीच्या अथवा बिगर नोंदणीकृत राजकीय पक्षांच्या बाबतीत, त्यांनी प्रसारणाच्या दिनांकाच्या पूर्वी किमान सात दिवसांच्या आत, अर्ज करावयाचा आहे. अशा अर्जासोबत, प्रस्तावित जाहिरातीच्या इलेक्ट्रॉनिक नमुन्यातील यथोचितपणे साक्षांकित अनुप्रमाणित केलेला प्रतिलेख (attested transcript) दोन प्रती जोडण्यात येतील. निवडणुकांच्या पहिल्या टप्प्याच्या बाबतीत, अर्ज, तो मिळाल्यापासून दोन दिवसांच्या आत निकालात काढण्यात येईल आणि त्यावर निर्णय घेण्यात येईपर्यंत आमचा दिनांक २ एप्रिल २००४ चा आदेश लागू असेल. निवडणुकांच्या त्यानंतर टप्प्याच्या बाबतीत, अर्ज, तो मिळाल्यापासून तीन दिवसांच्या आत निकालात काढण्यात येईल आणि त्यावर निर्णय घेण्यात येईपर्यंत, आमचा दिनांक २ एप्रिल, २००४ चा आदेश लागू असेल. असे अर्ज निकालात काढतेवेळी, जाहिरातीचा कोणताही भाग वगळण्याचे/त्यात फेरबदल करण्याचे निदेश देण्यास निवडणूक आयोगास/पदनिर्देशित अधिकाऱ्यास स्वातंत्र्य असेल.

प्रमाणनाकरिता करावयाच्या अर्जामध्ये पुढील तपशिलाचा अंतर्भाव असेल :—

(क) जाहिरात निर्मितीवरील खर्च ;

(ख) अशी जाहिरात दूरदर्शन वाहिनीवर अथवा केबल नेटवर्कवर करावयाच्या प्रस्तावित प्रसारणाचा अंदाजित खर्च आणि ती जाहिरात किती वेळा प्रसारित करावयाची ती संख्या आणि अशा प्रत्येक प्रसारणासाठी आकारण्याचे प्रस्तावित केलेला दर ;

(ग) प्रस्तावित करावयाची जाहिरात ही, उमेदवाराच्या (उमेदवारांच्या)/पक्षांच्या निवडणुकीच्या संभाव्य लाभासाठी प्रस्तारित करण्यात आली आहे किंवा कसे याचे निवेदनदेखील त्यात अंतर्भाव असेल ;

(घ) जाहिरात जर एखाद्या राजकीय पक्षाच्या अथवा उमेदवाराच्या व्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीने दिलेली असेल तर, ती व्यक्ती शपथेवर असे कथन करील की, ती जाहिरात, राजकीय पक्षाच्या अथवा उमेदवाराच्या लाभाकरिता नाही आणि उक्त जाहिरात कोणत्याही राजकीय पक्षाद्वारे अथवा एखाद्या उमेदवाराद्वारे पुरस्कृत किंवा प्रसारित करण्यात आलेली नाही रक्कम तिच्याकरिता प्रदान करण्यात आलेली नाही.

(ङ) सर्व प्रदाने धनादेशाच्या किंवा दर्शनी धनाकर्षाच्या स्वरूपात करण्यात येतील, अशा आशयाचे कथन.

अधिनियमाच्या कलम २ (क) मधील " प्राधिकृत अधिकारी " याची व्याख्या, त्याच्या अधिकारितेच्या स्थानिक सीमांच्या आतील (अ) जिल्हा दंडाधिकारी ; (ब) उप-विभागीय दंडाधिकारी ; किंवा (क) पोलीस आयुक्त अशी केलेली असल्याचे आम्हास दिसून येते.

त्याचप्रमाणे, लोकप्रधिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम २८-क मध्ये अशी तरतूद आहे की, कोणतीही निवडणूक घेण्याकरिता, निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी, मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी व या भागान्वये नियुक्त केलेला अन्य कोणताही अधिकारी आणि राज्य शासनाने त्या त्या वेळी पदनिर्देशित केलेला कोणताही पोलीस अधिकारी हे अशा निवडणुकीचे आयोजन करणाऱ्या अधिसूचनेच्या तारखेस व तेव्हापासून सुरू होणाऱ्या आणि अशा निवडणुकीचे निकाल घोषित होण्याच्या तारखेस संपणाऱ्या कालावधीकरिता निवडणूक आयोगाकडे प्रतिनियुक्तीवर असल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार, असा अधिकारी, त्या कालावधीमध्ये, निवडणूक आयोगाचे नियंत्रण, अधीक्षण व अनुशासन यांस अधीन असेल.

विविध केबल नेटवर्कवरील व दूरदर्शन वाहिन्यांवरील सर्व जाहिरातींचे पूर्व-अभ्यवेक्षण (परिनिरीक्षण) करणे निवडणूक आयोगास प्रत्यक्षात शक्य नसल्याने, निवडणूक आयोगाने, या संबंधातील आपले अधिकार, उप-विभागीय दंडाधिकाऱ्याच्या अथवा राज्य प्रांतिक नागरी सेवेच्या सदस्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेल्या, सर्व राज्यांच्या किंवा संघ राज्यक्षेत्रांच्या संबंधित जिल्हा दंडाधिकाऱ्याकडे सोपविण्यासाठी आयोगास प्राधिकृत करणे आवश्यक झाले आहे. हे निवडणूक आयोगाने दिलेल्या सर्वसाधारण आदेशाद्वारे करता येईल. हे अधिकारी, निवडणूक आयोगाचे नियंत्रण, अधीक्षण व अनुशासन याअंतर्गत कार्य करतील. निवडणूक आयोगास, आपले अधिकार, आळीपाळीने प्रत्येक राज्याच्या, किंवा यथास्थिति संघ राज्यक्षेत्राच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याकडे सोपविता येतील.

प्रत्येक राज्याच्या किंवा संघ राज्यक्षेत्राच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास, जाहिरातीचे प्रमाणन देण्याच्या अथवा ते नाकारण्याच्या निर्णयाच्या बाबतीत, कोणत्याही राजकीय पक्षाच्या किंवा उमेदवाराच्या किंवा अन्य कोणत्याही व्यक्तीच्या तक्रारीची किंवा गाऱ्हाण्यांची दखल घेण्याकरिता समिती स्थापन करता येईल. अशाप्रकारे नियुक्त केलेली समिती आपला निर्णय निवडणूक आयोगाला कळवील.

अशा पद्धतीने गठीत केलेली समिती भारताच्या निवडणूक आयोगाच्या एकूण पर्यवेक्षण, निदेशन आणि नियंत्रणाखाली कार्य करील.

समितीद्वारे देण्यात आलेला निर्णय बंधनकारक असेल आणि वर नमूद केले असेल त्या अधीन राहून इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमांत जाहिराती देण्यासाठी अर्ज करणारे राजकीय पक्ष, उमेदवार किंवा इतर व्यक्ती त्यांचे अनुपालन करतील.

वगळणे व फेरबदल करणे यासंदर्भात, प्रकरणपरत्वे, करण्यात आलेली सूचना भाष्ये आणि अभिप्राय बंधनकारक असतील आणि असे पत्र/संसूचना मिळाल्यानंतर चोवीस तासांच्या आत संबंधित राजकीय पक्ष किंवा निवडणूक लढविणारा उमेदवार किंवा इतर व्यक्ती त्याचे अनुपालन करतील आणि अशा पद्धतीने फेरबदल करण्यात आलेली जाहिरात पुनर्विलोकनासाठी आणि प्रमाणनासाठी पुन्हा सादर करण्यात येईल.

आम्हास असे स्पष्टीकरण करता येईल की, या आदेशाद्वारे समाविष्ट करून घेण्यात आलेल्या जाहिरातींना लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ च्या कलम १२६ च्या तरतुदी लागू असतील.

समिती किंवा पदनिर्देशित अधिकारी/निवडणूक आयोग यांच्याकडून घेण्यात आलेल्या निर्णयाने जर एखादा राजकीय पक्ष, उमेदवार किंवा कोणतीही व्यक्ती व्यथित झाली असेल (पिडीत झाली असेल) तर त्यांना स्पष्टीकरणासाठी किंवा योग्य आदेशांसाठी फक्त या न्यायालयातच दाद मागण्याचा पर्याय असेल आणि अशा जाहिराती विरुद्धच्या तक्रारीशी संबंधित कोणताही विनंतीअर्ज कोणतेही इतर न्यायालय, न्यायाधिकरण किंवा प्राधिकरण किंवा प्राधिकरण विचारार्थ स्विकारणार नाही. १६ एप्रिल, २००४ पासून हा आदेश अंमलात येईल आणि १० मे, २००४ पर्यंत अंमलात राहील.

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १४२ अंतर्गत प्राप्त अधिकारांचा वापर करून हा आदेश जारी करण्यात येत आहे. आणि केबल नेटवर्क आणि/किंवा दूरदर्शन वाहिन्या त्याचप्रमाणे, केबल ऑपरेटर्स यांसह इलेक्ट्रॉनिक प्रसारमाध्यमात जाहिरात देऊ इच्छिणाऱ्या सर्व राजकीय पक्ष, उमेदवार, व्यक्ती, व्यक्तींचा गट किंवा विश्वस्तमंडळांवर बंधनकारक असेल.

अशा जाहिरातींच्या प्रक्षेपणावर संनियंत्रण ठेवण्यासाठी आवश्यक असणारा कर्मचारी वर्ग मागणी करण्याबाबत निवडणूक आयोगास मोकळीक असेल. या आदेशाचे किंवा अधिनियमातील कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन होत असल्याची आयोगास खात्री पटल्यास आयोग, अशा उल्लंघनकर्त्यास असे उल्लंघन तात्काळ थांबविण्याचा आदेश जारी करेल आणि साधन सामग्री जप्त करण्याचे निदेशही देऊ शकेल. ज्या व्यक्ती (व्यक्तीं) वर असा आदेश बजावण्यात आला आहे अशा व्यक्ती/व्यक्तींनी प्रत्येक आदेशाचे तत्परतेना अनुपालन करतील.

जाहिरातींचे संनियंत्रण करण्याबाबतचा खर्च भागविण्यासाठी निवडणूक आयोगास भारताच्या संघराज्यांकडून निधी उपलब्ध करून देण्यात यावा. भारतीय संघराज्यांकडून या आदेशाला आवश्यक ती प्रसिद्धी इलेक्ट्रॉनिक प्रसार माध्यमे आणि मुद्रीत प्रसार माध्यमांद्वारे देण्यात येईल.

न्यायालयाने २ एप्रिल, २००४ रोजी संमत केलेल्या आदेशाच्या अनुषंगाने हा आदेश काढण्यात आलेला आहे आणि १० मे, २००४ पर्यंत, अंतरिम उपाययोजना म्हणून अंमलात राहील.

उपरोक्त आदेशास अधीन राहून, दिनांक २३ मार्च, २००४ रोजी दिलेल्या आंध्र प्रदेशाच्या उच्च न्यायालयाचा न्यायनिवाड्यास स्थगिती राहील. हा आदेश, न्युनिकरण म्हणून नव्हे तर, या अधिनियमाच्या तरतुदींच्या उल्लंघनासंदर्भातील, केंद्र सरकारचे अधिकार कमी करण्यासाठी नाही तर त्यात वाढ करण्यासाठी काढण्यात आला आहे. ”

६. आता म्हणून, माननीय सर्वोच्च न्यायालयाच्या उपरोक्त निदेशांच्या अनुरोधाने, निवडणूक आयोग याद्वारे पुढीलप्रमाणे निदेश देत आहे :—

(एक) मुख्य निवडणूक अधिकारी, दिल्ली यांना याद्वारे खाली दिलेल्या परिच्छेद (दोन) मध्ये नमूद केलेल्या राजकीय पक्ष आणि संघटनांचे अर्ज हाताळण्यासाठी, पुढील व्यक्तींचा समावेश असणारी समिती स्थापन करण्याचे निदेश देण्यात येत आहे :—

(क) सह मुख्य निवडणूक अधिकारी—अध्यक्ष

(ख) दिल्लीतील संसदीय मतदारा संघाचा निवडणूक निर्णय अधिकारी.

(ग) माहिती व प्रसारण मंत्रालयाकडून मागणी करण्यात आलेला, वर्ग-१ अधिकारी दर्जाहून कमी दर्जा नसलेला एक तज्ज्ञ अधिकारी.

(दोन) दूरदर्शन वाहिनी किंवा केबल नेटवर्कमध्ये समाविष्ट करावयाच्या कोणत्याही जाहिरातीसाठीच्या प्रमाणनाबाबत पुढील संस्था/व्यक्तींकडून करण्यात आलेल्या अर्जाचा उपरोक्त समिती विचारार्थ स्वीकार करील :—

(क) दिल्लीच्या राष्ट्रीय राजधानी प्रदेशात त्यांचे मुख्यालय असणारे सर्व नोंदणीकृत राजकीय पक्ष.

(ख) दिल्लीच्या राष्ट्रीय राजधानी प्रदेशात त्यांचे मुख्यालय असणारे सर्व गट किंवा संघटना किंवा संघ किंवा व्यक्ती.

(तीन) खाली परिच्छेद (चार) मध्ये नमूद केलेल्या राजकीय पक्ष आणि संघटनांच्या अर्जांवर कार्यवाही करण्यासाठी पुढील समिती स्थापण्यास इतर राज्य/संघ राज्यक्षेत्राच्या मुख्य निवडणूक अधिकारी यांनासुद्धा याद्वारे निदेश देण्यात येत आहे :—

(क) अपर, सह मुख्य निवडणूक अधिकारी—अध्यक्ष.

(ख) राज्याच्या राजधानीत असलेल्या कोणत्याही संसदीय मतदार संघाचा निवडणूक निर्णय अधिकारी.

(ग) माहिती व प्रसारण मंत्रालयाकडून मागणी करण्यात आलेला, वर्ग-१ अधिकारी दर्जाहून कमी दर्जा नसलेला एक तज्ज्ञ अधिकारी.

(चार) वरील परिच्छेद (तीन) मधील गठित केलेली समिती, दूरदर्शन वाहिन्या आणि केबल नेटवर्क वरील जाहिरातीसाठीच्या प्रमाणनाबाबत पुढील संस्था/व्यक्तींकडून आलेल्या अर्जांच्या विचारार्थ स्विकार करील :—

(क) त्या राज्यात, संघराज्यक्षेत्रात त्यांचे मुख्यालय असणारे सर्व राजकीय पक्ष.

(ख) त्या राज्यात, संघराज्यक्षेत्रात नोदंणीकृत कार्यालये असणाऱ्या सर्व संघटना किंवा व्यक्तींचे गट किंवा संघ.

(पाच) ज्या लोकसभा मतदार संघात पदनिर्देशित अधिकारी हा निवडणूक निर्णय अधिकारी असेल अशा मतदास संघातील स्वतंत्र उमेदवार आणि लोकसभा मतदास संघात येणाऱ्या विधानसभा मतदार संघातून निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने केबल नेटवर्क किंवा दूरदर्शन वाहिन्यांवर देण्यात येतील अशा प्रस्तावित जाहिरातीच्या प्रमाणनाबाबत आलेल्या अर्जांच्या विचारार्थ स्वीकार करण्यासाठी, देशातील प्रत्येक लोकसभा मतदार संघाच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास पदनिर्देशित अधिकारी म्हणून याद्वारे घोषित करण्यात येत आहे. उक्त निवडणूक निर्णय अधिकारी, त्याला अर्ज प्रमाणनाच्या कामात सहाय्य करण्यासाठी राज्य प्रांतिक नागरी सेवेतील उप-विभागीय दंडाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला सहायक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून स्वीकृत करून घेईल.

७. जाहिरातीच्या मंजुरीसाठी किंवा ती नाकारणे यासाठीच्या प्रमाणनासंबंधी कोणताही राजकीय पक्ष किंवा उमेदवार किंवा अन्य कोणतीही व्यक्ती यांच्या, विचारार्थ स्वीकारलेल्या तक्रारी/गाऱ्हाणी यासाठी प्रत्येक राज्याचा/संघराज्यक्षेत्राचा मुख्य निवडणूक अधिकारी पुढीलप्रमाणे समिती घटित करील :—

(एक) मुख्य निवडणूक अधिकारी — अध्यक्ष ;

(दोन) भारताच्या निवडणूक आयोगाने नियुक्त केलेला कोणताही निरीक्षक ;

(तीन) वरील परिच्छेद ६ (एक) आणि ६ (तीन) मध्ये नमूद केलेले ते खेरीजकरून समितीद्वारे स्वीकृत करावयाचा एक तज्ज्ञ.

८. प्रत्येक नोंदणीकृत राजकीय पक्षाकडून व प्रत्येक निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांकडून कोणत्याही जाहिरातींच्या प्रमाणनासाठीचे अर्ज हे, वरील परिच्छेद ६ (एक) आणि ६ (तीन) मध्ये नमूद केलेल्या समितीकडे किंवा यथास्थिति, वरील परिच्छेद ६ (चार) मध्ये नमूद केल्याप्रमाणे पदनिर्देशित अधिकाऱ्याकडे अशा जाहिरातींच्या प्रक्षेपणाच्या प्रारंभीच्या दिनांकापूर्वी ३ (तीन) दिवसांच्या आत करण्यात येतील. निवडणुकीच्या पहिला टप्प्यात असे अर्ज, ते मिळाल्याच्या २ (दोन) दिवसांच्या आत निकालात काढण्यात येतील आणि त्यावर निर्णय घेतला जात आहे तोपर्यंत सर्वोच्च न्यायालयाचा दिनांक २ एप्रिल २००४ चा आदेश लागू होईल.

९. जेव्हा कोणत्याही इतर व्यक्तीकडून किंवा नोंदणी न केलेल्या राजकीय पक्षाकडून जाहिरातीच्या प्रमाणनासाठीचा अर्ज असेल, तेव्हा तेथे तो प्रक्षेपणाच्या दिनांकापूर्वी ७ (सात) दिवसांच्या आत करण्यात येईल.

१०. **जोडपत्र-क** मध्ये विहित केलेल्या नमुन्यातील अशा प्रत्येक अर्जासोबत खालील कागदपत्रे जोडलेली असतील :

(एक) इलेक्ट्रॉनिक स्वरूपातील प्रस्तावित जाहिरातीच्या दोन प्रती त्यांच्या यथोचितरित्या साक्षांकित प्रतिलिपीसह ;

(दोन) प्रमाणनासाठीच्या अर्जात खालील तपशीलांचा समावेश असेल :—

(क) जाहिरातीचा उत्पादनाचा खर्च ;

(ख) समावेशनाची संख्या व खंडित अवधीसह दूरदर्शन वाहिनी किंवा केबल जाळे (केबल नेटवर्क) यावरील अशा जाहिरातीच्या प्रस्तावित प्रक्षेपणाचा अंदाजे खर्च आणि प्रत्येक अशा समावेशनासाठी आकारावयाचा प्रस्तावित दर ;

(ग) जाहिरात ही, एक तर उमेदवाराच्या (उमेदवारांच्या)/पक्षांच्या निवडणुकीच्या संभाव्यतेच्या हिताकरिता तिचे समावेशन केले आहे किंवा कसे, अशा प्रकारच्या निवेदनाचादेखील त्या जाहिरातीमध्ये समावेश असेल ;

(घ) जर जाहिरात ही, राजकीय पक्ष किंवा उमेदवार यांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही व्यक्तीकडून दिलेली आहे तर, ती व्यक्ती शपथेवर निवेदन करील की, ती जाहिरात राजकीय पक्ष किंवा उमेदवार यांच्या हिताकरिता नाही, म्हणजेच उक्त जाहिरात ही कोणत्याही राजकीय पक्ष किंवा उमेदवाराकडून पुरस्कृत करण्यात आलेली नाही किंवा क्रियान्वित केलेली नाही किंवा त्याकरिता रक्कम चुकती केली जाणार नाही ;

(ङ) अशा सर्व प्रदानाचे वितरण हे धनादेश किंवा धनाकर्षाद्वारे करण्यात येईल असे निवेदन.

११. जाहिरातीकरिताच्या प्रमाणनासाठीच्या अर्जावर निर्णय घेताना, जाहिरातीचा कोणताही भाग थेट वगळणे/त्यात सुधारणा करणे यासाठी निदेश देणे हे, वरील परिच्छेद ६ (एक) आणि ६ (तीन) मधील घटित करण्यात आलेली समिती किंवा वरील परिच्छेद ६ (पाच) मधील पदनिर्देशित अधिकारी किंवा वरील परिच्छेद ७ मध्ये घटित केलेल्या आढावा समितीला तसे करणे खुले असेल. असे कोणतेही वगळणे किंवा सुधारणा करणे यावर भाष्य करणे व निरीक्षण करणे यासंबंधातील प्रत्येक असा आदेश हा, असा पत्र व्यवहार प्राप्त झाल्यापासून २४ तासांच्या आत संबंधित राजकीय पक्ष किंवा निवडणूक लढवणारा उमेदवार किंवा कोणतीही इतर व्यक्ती यांना बंधनकारक असेल आणि त्यांच्याकडून तो पाळण्यात येईल. अशाप्रकारे सुधारणा करण्यात आलेली जाहिरात आढावा व प्रमाणनासाठी पुनः सादर करण्यात येईल.

१२. जेथे, वरील परिच्छेद ६ (एक) आणि ६ (तीन) मधील घटित केलेली समिती किंवा वरील परिच्छेद ७ मधील घटित केलेला पदनिर्देशित अधिकारी किंवा घटित केलेली आढावा समिती, यथास्थिति, समाधानी होत असेल की, जाहिरात ही, कायद्याची आणि वरील परिच्छेद ४ आणि ५ मध्ये समावेश केल्याप्रमाणे सर्वोच्च न्यायालयाच्या निदेशांनुसार आवश्यकतांची पूर्तता करते असे त्यांचे समाधान झाले आहे तर त्यावेळी संबंधित जाहिरात प्रक्षेपणासाठी योग्य आहे. अशा अर्थाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. प्रमाणपत्राचा नमुना **जोडपत्र-ख** मध्ये दिला आहे.

१३. सर्वोच्च न्यायालयाद्वारे दिनांक १३ एप्रिल, २००४ रोजीच्या आदेशात अंतर्भूत असलेल्या निदेशांचे प्रत्येक संबंधितांकडून काटेकोरपणे पालन करण्यात येईल व ते १० मे, २००४ पर्यंत अंमलात असणे चालू राहील आणि जे केबल जाळे आणि/किंवा दूरचित्रवाणी वाहिन्या त्याचप्रमाणे केबल चालक यांसह इलेक्ट्रॉनिक माध्यमे यात जाहिरातींचा समावेश करण्याचे प्रस्तावित करत आहेत, असे सर्व राजकीय पक्ष, उमेदवार, व्यक्ती, व्यक्तींचे गट किंवा न्यास यांच्यावर ते बंधनकारक असतील.

## जोडपत्र-क

## जाहिरातीच्या प्रमाणनासाठी अर्ज

### एक

(एक) अर्जदाराचे नाव व पूर्ण पत्ता ..........................................................................................................

(दोन) जाहिरात ही, राजकीय पक्ष/निवडणूक लढविणारा उमेदवार/कोणतीही इतर व्यक्ती/व्यक्तींचे गट/संघ/संघटना/न्यास (नाव घ्यावे) यांच्याद्वारे आहे किंवा कसे ?

(तीन) (क) राजकीय पक्ष असल्यास, पक्षाचा दर्जा (मान्यताप्राप्त राष्ट्रीय पक्ष/राज्य पक्ष/मान्यता नसलेला पक्ष आहे किंवा कसे)

(ख) उमेदवार असल्यास, तो जेथून निवडणूक लढवत आहे त्या लोकसभा मतदारसंघाचे नाव.

(चार) राजकीय पक्ष/व्यक्तींचा गट किंवा संस्था/संघ/संघटना/न्यास (विश्वस्त मंडळ) यांच्या मुख्यालयाचा पत्ता.

(पाच) ज्या वाहिन्यांवर/केबल नेटवर्कवर जाहिरात प्रसारित करावयाचे प्रस्तावित केले आहे त्या वाहिन्या/केबल नेटवर्क.

(सहा) (क) जाहिरात ही, कोणत्या उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) निवडणुकीच्या फायद्यासाठी आहे ?

(ख) असल्यास, मतदारसंघाचा/मतदारसंघाचे संपूर्ण पत्ता व नाव (नावे) यांसह अशा उमेदवाराचे (उमेदवारांची) नाव/नावे देणे.

(सात) जाहिरात सादर केल्याचा दिनांक : .......................................

(आठ) जाहिरातीत वापरलेली भाषा /वापरलेल्या भाषा (यथोचितरित्या साक्षांकित केलेल्या उताऱ्यासह इलेक्ट्रॉनिक नमुन्यातील दोन प्रतीत जाहिरात सादर करावयाची आहे).

(नऊ) जाहिरातीचे शीर्षक

(दहा) जाहिरात निर्मितीचा खर्च

(अकरा) अंतर्वेशन संख्येच्या विभागणीसह आणि अशा प्रत्येक अंतर्वेशनासाठी प्रस्तावित दरांसह प्रस्तावित प्रसारणाचा अदमासे खर्च.

(बारा) अंतर्भूत असलेला एकूण खर्च (रुपयांत).

### दोन

मी, श्री./श्रीमती ....................................................., ....................................................... यांचा मुलगा/मुलगी/पत्नी, राहणार .............................................................................................................................................. (पूर्ण पत्ता) या जाहिरातीच्या निर्मितीशी आणि प्रसारणाशी संबंधित सर्व प्रदाने धनादेश/दर्शनी धनादेश याद्वारे करण्यात येईल असे वचन देतो.

ठिकाण : अर्जदाराची स्वाक्षरी

दिनांक :

### तीन

(एखादृड्ढ राजकीय पक्ष किंवा एखादा उमेदवार यांच्या व्यतिरिक्त एखाद्या व्यक्तीच्या/व्यक्तींच्या जाहिरातीसाठी लागू,)

मी, श्री./श्रीमती ....................................................., .................................................... यांचा मुलगा/ ........................................ यांची मुलगी/ .................................................. यांची पत्नी, राहणार ............................................ ............................................................ (संपूर्ण पत्ता) याद्वारे असे नमूद करते/करतो व असे दृढकथन करते/करतो की यासोबत सादर केलेली जाहिरात (जाहिराती) ही, कोणत्याही राजकीय पक्षाच्या किंवा कोणत्याही उमेदवाराच्या फायद्यासाठी नाही आणि ही जाहिरात/या जाहिराती, कोणत्याही राजकीय पक्षाने किंवा उमेदवाराने प्रायोजित केलेली (केलेल्या)/कार्यादिष्ट केलेली (केलेल्या) किंवा यासाठी रक्कम प्रदान केलेली नाही.

ठिकाण : अर्जदाराची स्वाक्षरी

दिनांक :

## जोडपत्र-ख

## जाहिरात प्रसारणासाठी प्रमाणन करणे

### एक

(एक) अर्जदाराचे/राजकीय पक्षाचे/उमेदवार व्यक्तीचे/व्यक्तींच्या गटाचे/संघाचे/संघटनेचे/न्यास/विश्वस्त मंडळाचे नाव व पत्ता.

(दोन) जाहिरातीचे शीर्षक

(तीन) जाहिरातीचा कालावधी

(चार) जाहिरातीत वापरलेली/वापरलेल्या भाषा

(पाच) जाहिरात सादर करण्याचा दिनांक

(सहा) प्रसारणासाठी दिलेल्या प्रमाणनाचा दिनांक

### दोन

वरील जाहिरात ही भारताच्या मा. सर्वोच्च न्यायालयाद्वारे विहित करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रसारण करण्यासाठी योग्य आहे, असे प्रमाणित केले आहे.

समितीच्या अध्यक्षांची ............................................ / सदस्यांची ............................................ /पदनिर्देशित अधिकाऱ्याची ........................................................ स्वाक्षरी

..............................................................

..............................................................

ठिकाण :

दिनांक :

## अनुदेश क्रमांक ४९

मुख्य निवडणूक अधिकारी, बिहार यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्र. पीएस/एके/२००५, दिनांक १० सप्टेंबर २००५.

**विषय.—** राजकीय पदाधिकाऱ्यांद्वारे मतदानाच्या गुप्ततेचा भंग.

गेल्या वेळेस विवक्षित राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघातील निवडणुकांमध्ये एकतर आपले मत प्रसारमाध्यमांसमोर किंवा त्यांच्या सोबतच्या इतर व्यक्तींसमोर प्रदर्शित करून मताच्या गुप्ततेचा भंग केल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणून दिलेले आहे. त्यांची ही कृती, केवळ अतिपवित्र अशा मतदानाच्या गुप्ततेच्या तत्त्वाचा उघडपणे केलेला भंग नसून, ती कृती लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम १३२ क च्या सांविधिक तरतुदींचे आणि निवडणूक घेण्याबाबत नियमांतील ज्यात अशी मतदानास मुभा नसल्याबद्दलची तरतूद आहे त्या नियम ३९ आणि ४९ ड चे, सुद्धा उल्लंघन आहे.

आयोगाने ही बाब विचारात घेतली असून, कोणत्याही स्थितीत मतदानाची गुप्तता राखली गेली पाहिजे असे आयोगास वाटते. याबाबत, लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ च्या कलम १२८ मध्ये सुद्धा असे विहित केले आहे की,—

"**१२८. मतदान गुप्त राखणे—** जो निवडणुकीच्या वेळी मतनोंदणीच्या किंवा मतमोजणीच्या संबंधात काही काम करतो असा प्रत्येक अधिकारी, लिपिक, प्रतिनिधी किंवा अन्य इसम याला मतदान गुप्त राखावे लागेल, तसेच ते राखण्यास मदत करावी लागेल आणि (कोणत्याही कायद्यानुसार किंवा त्याखाली काही प्रयोजनासाठी अधिकृत केले असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही), ज्यामुळे अशी गुप्तता भंग पावेल असे मानण्याजोगी कोणतीही माहिती, कोणत्याही व्यक्तीला सांगता येणार नाही.

[परंतु, परिषद किंवा राज्यांमधील एक किंवा अनेक जागा भरण्यासाठीच्या निवडणुकीच्या वेळी असे कोणतेही कर्तव्य करणारा असा अधिकारी, लिपिक किंवा अन्य इसम याला या उपबंधातील तरतुदी लागू असणार नाही.]

(२) जी व्यक्ती, पोट-कलम (१) मधील उपबंधाचे व्यतिक्रमण करील ती व्यक्ती, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या करावयास किंवा द्रव्यदंडास, किंवा दोन्ही शिक्षांस पात्र होईल."

आयोगाची अशी इच्छा आहे की, लोकप्रतिनिधित्त्व अधिनियम, १९५१ च्या कलम १२८ व १३२क आणि निवडणूक घेण्याबाबत नियमातील नियम ३९ आणि ४९ड यांतील तरतुदी सर्व मतदार केंद्राध्यक्षांच्या प्रशिक्षणादरम्यान, त्यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात आणि त्यांना प्रत्येक मतदाराकडून त्याच्या/तिच्या मताधिकाराचा वापर होत असताना मतदानाची काटेकोरपणे गुप्तता राखली जाण्याबद्दल खात्री करून घेण्याबाबत सांगण्यात यावे. मतदान केंद्राध्यक्षांनी निवडणूक नियम, १९६१ याच्या नियम ४९ढ अन्वये अंध/अपंग मतदारांच्या संबंधात जे त्यांच्या मदतीसाठी एक सोबती घेऊ शकतात, यांचा अपवाद करता, कोणत्याही बाबतीत, कोणत्याही मतदारासोबत त्याचे/तिचे मत देतेवेळी अन्य दुसरी व्यक्ती नसेल याबद्दलची खात्री केलीच पाहिजे.

मतदानाची गुप्तता राखण्याच्या दृष्टीने आयोगाने आणखी असाही निर्णय घेतला आहे की, मतदानकेंद्रात, प्रसारमाध्यमे किंवा कोणत्याही खाजगी व्यक्तीद्वारे छायाचित्रण किंवा व्हिडीओ चित्रण करण्यास मनाई करण्यात येईल.

या अनुदेशांचा कोणत्याही प्रकारे भंग झाल्यास त्याची गांभीर्याने दखल घेण्यात येईल आणि या बाबतीतील कोणत्याही त्रुटीसाठी मतदानकेंद्राध्यक्षास जबाबदार धरले जाईल.

कृपया, हे अनुदेश, सर्व संबंधित जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, निरीक्षक आणि मान्यताप्राप्त राजकीय पक्ष यांना कळविण्यात यावेत.

## अनुदेश क्रमांक ५०

मुख्य निवडणूक अधिकारी, बिहार, पश्चिम बंगाल, उत्तरांचल आणि हरियाणा यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्र. पीएस/एके/२००५, दिनांक १० सप्टेंबर २००५.

**विषय**.— ज्या राजकीय पदाधिकाऱ्यांना राज्य शासनाकडून सुरक्षा देण्यात आली आहे, त्या राजकीय पदाधिकाऱ्यांचा प्रचार कालावधी संपल्यानंतर आणि त्यांनी त्यांचे मत दिल्यानंतर मतदानाच्या दिवशीच्या उपस्थितीवर निर्बंध.

सर्व जिल्हा निवडणूक अधिकारी व पोलीस अधीक्षक हे, ज्या राजकीय पदाधिकाऱ्यांना राज्य शासनाकडून सुरक्षा देण्यात आली आहे त्या सर्व राजकीय पदाधिकाऱ्यांना प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर जर ते ज्या मतदारसंघातील ते मतदार नाहीत त्या मतदारसंघात उपस्थित राहण्यास परवानगी दिली जाणार नाही याची खात्री करतील **आणि** असे राजकीय पदाधिकारी ज्या मतदार संघाचे खरेखुरे मतदार आहेत त्या मतदारसंघामध्ये मतदानाच्या दिवशी त्यांनी त्यांचे मत देण्यापूर्वी व दिल्यानंतर त्यांच्या हालचालींवर निर्बंध देखील घालतील.

तथापि, या सूचना उमेदवारांना लागू असणार नाहीत. कृपया अनुदेशांचे काटेकोरपणे पालन करण्यासाठी त्या सर्व जिल्हा निवडणूक अधिकारी, पोलीस अधीक्षक व निरीक्षक यांच्या निदर्शनास आणून द्याव्यात. या अनुदेशाच्या प्रती सर्व मान्यताप्राप्त राजकीय पक्षांनादेखील देण्यात याव्यात.

## अनुदेश क्रमांक ५१

आसाम, केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल व पाँडीचेरी यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ४६४/आयएनएसटी/२००६/पीएलएन-एक, दिनांक १७ मार्च २००६.

**विषय.—** आसाम, केरळ, तामिळनाडू, पश्चिम बंगाल व पाँडीचेरी सार्वत्रिक विधानसभांच्या निवडणूका वाहन परवानाच्यासंबंधात.

आयोगाची अशी इच्छा आहे की, मान्यताप्राप्त राष्ट्रीय आणि राज्य स्तरावरील राजकीय पक्षाच्या नेत्यांना आणि नोंदणीकृत मान्यतप्राप्त नसलेल्या राजकीय पक्षाच्या नेत्यांना (ज्यांच्या प्रवास खर्चाला लोकप्रतिनिधीत्व अधिनियमाच्या कलम ७७ अंतर्गत सूट देण्यात आली आहे.) त्यांच्या नावाने पुढील नमुन्यात वाहन परवाने देण्यात यावेत :-

.................. २००६ ची विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक

परवाना अ. क्र. :

राजकीय पक्षाचे नाव :

नेत्याचे नाव :

**टीप.—** १. हा वाहन परवाना केवळ ..................... २००६ च्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रयोजनासाठी नेता ज्या वाहनामधून नेता स्वतः प्रवास करीत आहे त्या वाहनापुरताच वैध आहे.

२. ज्या नेत्याचे नावे हा परवाना देण्यात आला आहे तो अशी खात्री करेल की, इतर कोणत्याही पदाधिकाऱ्याकडून या परवान्याचा गैरवापर करण्यात येत नाही. ज्या नेत्याच्या नावे हा परवाना देण्यात आला आहे त्याला गैरवापराकरिता जबाबदार धरले जाईल.

लोकप्रतिनिधित्व अधिनियमाच्या कलम ७७(१) खालील स्पष्टीकरण २ नुसार विहित केलेल्या कालावधीमध्ये ज्यांची नावे तुम्हाला देण्यात आली आहेत, त्या विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांना असे परवाने देण्यासाठी कृपया आवश्यक कार्यवाही करावी.

असे परवाने लॅमिनिटेड करण्यात येतील आणि योग्य पोचपावती घेऊन संबंधित पक्षाचे अध्यक्ष/सचिव यांच्याकडे सोपविण्यात येतील.

## अनुदेश क्रमांक ५२

सर्व राज्ये व संघराज्यक्षेत्रे यांचे मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ४३७/६/आयएनएसटी/२००८ - सीसी आणि बीई, दिनांक ३१ ऑक्टोबर २००८.

**विषय.—** लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७(१) अंतर्गत देण्यात आलेल्या स्पष्टीकरणाच्या खंड (क) द्वारे लाभ घेऊन पक्ष प्रचारकर्त्यांनी मार्ग परिवहनाचा वापर करण्यासंबंधात.

आपणास पत्र क्र. ४३७/६/२००७//खंड-चार, पीएलएन-तीन दिनांक १६ ऑक्टोबर, २००७ यांद्वारे काढण्यात आलेले आयोगाचे अनुदेश आणि पत्र क्र. ३/७/२००८/जेएस-तीन, दिनांक ७ ऑक्टोबर २००८ यांद्वारे काढण्यात आलेले आयोगाचे अनुदेश यांसंबंधी निर्देश करण्याचा आणि असे कळविण्याचा मला आदेश आहे की, आयोगाने आधीच वाहनांच्या ताफ्यांच्या वापरांवरील आणि वाहनांवर लावावयाचे झेंडे व स्टीकर्स यावरील मार्गदर्शक तत्त्वांमध्ये यापूर्वीच फेरबदल केले आहेत. परिणामी, वर नमूद केलेल्या अनुदेशांमुळे फेरबदल करण्यात आले आहेत आणि लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७(१) अंतर्गत दिलेल्या स्पष्टीकरण (क) चा लाभ ज्या नेत्यांनी घेतला आहे अशा नेत्यांच्या निवडणूक प्रचार मोहिमेच्या कालावधीत रस्त्यावर अनुज्ञेय असलेल्या वाहनांच्या ताफ्यातील वाहनांच्या संख्येबाबतचे अनुदेश अधिक्रमित करण्यात आले आहेत.

वाहनांच्या ताफ्यामधील वाहनांच्या संख्येवरील निर्बंध उठविण्यात आले आहेत तथापि, वर निर्दिष्ट केलेल्या त्यानंतरच्या अनुदेशांमधील शर्तीच्याअनुसार वाहनांच्या ताफ्यातील वाहनांची संख्या असावी.

लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ कलम ७७(१) अन्वये दिलेल्या स्पष्टीकरण (क) चा लाभ घेऊन राजकीय पक्षांना मार्ग परिवहनाचा लाभ घ्यावयाचा आहे अशा प्रकारात राज्यभर निवडणूक प्रचार करण्यासाठी कोणत्याही नेत्याने एकाच वाहन वापरले आहे किंवा निरनिराळ्या क्षेत्रांमध्ये असा पक्षनेत्यांनी निरनिराळी वाहने वापरली आहेत हे लक्षात न घेता, मुख्य निवडणूक अधिकारी यासाठी केंद्रीयभूत परवाने देईल. ज्या संबंधित व्यक्तीच्या नावे परवाना दिला असेल ती व्यक्ती, कोणत्याही क्षेत्रात तो/ती वाहन वापरताना वाहनाच्या समोरच्या काचेवर (Wind-screen) ठळक जागी तो परवाना लावील. मुख्य निवडणूक अधिकाऱ्याने अशारितीने दिलेल्या परनान्यांचा रंग हा जिल्हा निवडणूक अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी यांना उमेदवारांसाठी दिलेल्या परवान्यांच्या रंगापेक्षा सुस्पष्टपणे भिन्न असेल.

(तीन) वरील बाब (दोन) मध्ये अशारितीने परवाना देण्यात आलेल्या वाहनांमध्ये, बाब (दोन) मध्ये निर्देश केलेल्या नेत्यांशिवाय अन्य कोणती व्यक्तीदेखील असेल तर अशा बाबतीत, त्याचा ५० टक्के खर्च त्या मतदार संघातून निवडणूक लढवित असणाऱ्या संबंधित पक्षाच्या खर्च खाती टाकण्यात येईल.

(चार) निवडणूक प्रचाकार्यासाठी व्हिडीयो-व्हॅनचा वापर करण्यासाठी कोणतीही परवानगी घेण्याअगोदर, एखादा राजकीय पक्ष निवडणूक प्रचारासाठी संपूर्ण राज्यात व्हिडीयो-व्हॅनचा वापर करीत असेल तर, मुख्य निवडणूक अधिकाऱ्याने, मोटार वाहन अधिनियमानुसार वाहनाचा असा वापर करण्यात येत असल्याची खात्री करून घ्यावी. या संदर्भात, अलाहाबाद उच्च न्यायालयाकडे करण्यात आलेल्या २००६ चा रिट विनंती अर्ज क्र. ३६४८ (एमबी) या प्रकरणी दिनांक २३ जून २००६ व १४ फेब्रुवारी २००७ रोजीच्या न्यायनिर्णयांकडे लक्ष वेधण्यात येत आहे. यासोबत त्याची प्रत जोडण्यात येत आहे. संबंधित जिल्हा निवडणूक अधिकारी, ज्या ठिकाणी व्हॅन/वाहने वापरली जात आहेत अशा क्षेत्रातील/मतदारसंघातील पक्षाच्या निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराच्या खर्चात अशा वाहनांवर झालेला खर्च समसमान विभागण्यात आल्याची खातरजमा करील.

हे, सर्व राजकीय पक्ष व निवडणुकीशी संबंधित सर्व अधिकारी यांच्या ताबडतोब निदर्शनास आणून देण्यात यावे.

## अनुदेश क्रमांक ५३

सर्व राज्ये व संघराज्य क्षेत्रांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ३/९/२००४/जे.एस.-दोन, दिनांक २४ ऑगस्ट २००४.

**विषय.—** पत्रके, भित्तिपत्रके इत्यादींच्या मुद्रणावरील निर्बंध.

उपरोक्त विषयासंदर्भात आयोगाचे आदेश क्र. ३/९/(ईएसओजीबी)/९४ जे एस-दोन, दिनांक २/९/९४ याकडे आपले लक्ष वेधण्याचा मला आदेश आहे, या आदेशामध्ये, आयोगाने, लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १२७ क मधील उपबंधांनुसार; निवडणूक पत्रके, भित्तिपत्रके इत्यांदीच्या मुद्रण व प्रकाशनाबाबत आपली मार्गदर्शक तत्त्वे घालून दिली आहेत. या तरतुदी खालीलप्रमाणे उद्‌धृत करण्यात आल्या आहेत.

**“ १२७क. पत्रके, भित्तिपत्रके इत्यादींच्या मुद्रणावरील निर्बंध.**

(१) कोणत्याही व्यक्तीला, त्याच्या दर्शनी भागावर त्याच्या मुद्रकाचे आणि प्रकाशकाचे नाव व पत्ता नसेल असे कोणतेही निवडणूक पत्रक किंवा भित्तिपत्रक मुद्रीत वा प्रकाशित करता येणार नाही अथवा मुद्रित किंवा प्रकाशित करवता येणार नाही.

(२) कोणत्याही व्यक्तीला निवडणूकपत्रक किंवा भित्तिपत्रक,—

(क) तो स्वतःच त्याचा प्रकाशक आहे याबद्दलचे स्वतः स्वाक्षरित केलेले आणि ज्या व्यक्ती तिला व्यक्तीशः ओळखतात अशा दोन व्यक्तींनी साक्षांकित केलेले अधिकथन त्याने मुद्रकाला दोन प्रतींमध्ये दिल्याशिवाय, आणि

(ख) तो दस्तऐवज मुद्रित झाल्यानंतर वाजवी मुदतीच्या आत, मुद्रकाने त्या कागदाच्या एका प्रतीसह अधिकथनाची एक प्रत–

(एक) तो राज्याच्या राजधानीच्या ठिकाणी मुद्रीत झाला असेल तर, मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला ; आणि

(दोन) इतर कोणत्याही बाबतीत तो ज्या जिल्ह्यामध्ये मुद्रित झाला असेल त्या जिल्ह्याच्या जिल्हा दंडाधिकाऱ्याला, पाठवल्याशिवाय मुद्रित करता येणार नाही किंवा मुद्रित करवता येणार नाही.

(३) या कलमाच्या प्रयोजनार्थ,–

(क) कागदपत्र हाताने नकलून काढण्याच्या प्रक्रियेहून अन्य कोणतीही अनेक प्रती काढण्याची प्रक्रिया म्हणजे मुद्रण असल्याचे समजण्यात येईल, आणि मुद्रक या संज्ञेचा अर्थ तद्‌नुसार लावला जाईल, आणि

(ख) “ निवडणूकपत्रक किंवा भित्तीपत्रक ” याचा अर्थ, उमेदवाराच्या किंवा उमेदवारांच्या एखाद्या गटाच्या निवडणुकीचे प्रचालन करण्यासाठी किंवा निवडणुकीला बाध आणण्यासाठी वाटण्यात आलेले कोणतेही मुद्रितपत्रक, हस्तपत्रक किंवा अन्य दस्तऐवज किंवा निवडणुकीशी संबंधित असा घोषणा फलक किंवा भित्तिपत्रक, असा होतो. पण निवडणूक- सभेचा दिनांक, वेळ, ठिकाण आणि इतर तपशील किंवा निवडणूक प्रतिनिधी किंवा कार्यकर्ते यांच्यासाठी नेहमीच्या सूचना जाहीर करणारी हस्तपत्रके, घोषणाफलक किंवा भित्तिपत्रक यांचा समावेश होत नाही.

(४) जो व्यक्ती, पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) मधील कोणत्याही उपबंधाचे व्यतिक्रमण करील ती व्यक्ती सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावसास किंवा दोन हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल, ”

२. निवडणुकीच्या काळात विशिष्ट राजकीय पक्ष आणि उमेदवार यांच्याकरिता किंवा त्यांच्याविरुद्ध मुद्रित प्रसारमाध्यमांमध्ये विशेषतः वृत्तपत्रांत प्रातिनिधिक जाहिराती आढळून येतात. बरेचदा अशा जाहिराती विशिष्ट उमेदवाराच्या निवडणूकविषयक भवितव्याकरिता असतात. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७(१) नुसार कोणत्याही उमेदवाराचा निवडणुकीच्या संबंधात अशा जाहिरातीमध्ये अंतर्भूत असलेला खर्च, त्या कलमान्वये हिशेब ठेवणे आवश्यक असलेल्या, उमेदवाराच्या निवडणूक विषय खर्चखाती टाकावयाचा आहे. आणखी असे की, भारतीय दंड संहितेचे कलम १७१ ज यात, उमेदवाराकडून प्राधिकार नसताना, उमेदवाराच्या निवडणुकीला चालना देण्याकरिता किंवा त्यास निवडून आणण्याकरिता इतर अनेक गोष्टींबरोबर जाहिरात, परिपत्रक किंवा प्रकाशन यांवर खर्च करण्यास, प्रतिबंध करण्यात आला आहे.

३. वर नमूद केल्याप्रमाणे कायदेशीर तरतुदींमधील आवश्यक बाबी उपयुक्त ठरण्याच्या दृष्टीने, आयोगाने असे निर्देश दिले आहेत की, निवडणुकीच्या काळात कोणताही राजकीय पक्ष किंवा उमेदवार यांच्याकरिता किंवा त्यांच्याविरुद्ध असलेली मुद्रित प्रसारमाध्यमामधील कोणतीही जाहिरात/निवडणूकविषयक बाब याबाबतीत तो मजकूर जाहिरात यांसह प्रकाशकाचे नाव आणि पत्ता देण्यात यावा.

४. ही बाब माहितीसाठी व अनुपालनासाठी आपल्या राज्यातील जिल्हा निवडणूक अधिकारी आणि मुद्रित प्रसारमाध्यमांसह सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात यावी.

## अनुदेश क्रमांक ५४

सर्व राज्याच्या व संघराज्यक्षेत्रांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेले आयोगाचे पत्र क्र. ४६४/आयएनएसटी/२००८ - ईपीएस, दिनांक ७ जानेवारी २००९.

**विषय.—** डमी उमेदवारांबद्दलच्या प्रतिक्रिया यासंबंधात हाती घ्यावयाच्या उपाययोजना.

मला असे कळविण्याचा निदेश आहे की, अलीकडच्या निवडणूकांमध्ये निवडणूक आयोगास अशा प्रतिक्रिया मिळाल्या आहेत की, निवडणूक खर्चावरील कमाल मर्यादा लपविण्याच्या दृष्टीने आणि याशिवाय पक्षाच्या उमेदवाराच्या हिताच्या दृष्टीने विविध राजकीय पक्षांकडून व उमेदवारांकडून "डमी उमेदवारांना" उभे केले जाते.

निवडणूक कायद्यामध्ये "डमी उमेदवारा" याविषयी कोणताही उल्लेख नाही. ज्या उमेदवाराने वैधरित्या नामनिर्देशन केले आहे आणि जो निवडणूक लढतीत राहण्याची निवड करतो तो उमेदवार असतो आणि त्यामुळे "खराखुरा उमेदवार" आणि "डमी उमेदवार" यांच्यामध्ये कोणताही फरक केला जाऊ शकत नाही. परंतु, अशी वस्तुस्थिती शिल्लक राहते की, "डमी उमेदवार" उभे करण्याची प्रथा अस्तित्वात आहे. मिळालेल्या प्रतिक्रियांनुसार "डमी उमेदवार" सर्वसाधारणपणे पुढील कारणास्तव उभे केले जातात :—

(१) डमी उमेदवारांच्या नावाने घेण्यात आलेली वाहनांची परवानगी, निवडणूक खर्चाची कमाल मर्यादा लपविण्याच्या दृष्टीने प्रत्यक्षात अन्य काही उमेदवाराच्या प्रचारासाठी वापरली जाते.

(२) मतदानाच्या दिवशी, डमी उमेदवारासाठी व त्याचा निवडणूक प्रतिनिधी आणि इतरांसाठी परवानगी देण्यात आलेली वाहने, प्रत्यक्षात अन्य काही उमेदवारांसाठी वापरण्यात येतात.

(३) डमी उमेदवाराचे मतदान प्रतिनिधी व मतमोजणी प्रतिनिधी, प्रत्यक्षात अन्य उमेदवाराचे प्रतिनिधी म्हणून काम करतात आणि त्याद्वारे मतदानाच्या दिवशी मतदान केंद्रात आणि मतमोजणीच्या दिवशी मतमोजणी केंद्रात असलेली समान पातळीवरील लढत भंग पावते.

वरील सर्व बाबींमुळे उमेदवारांना त्यांचे प्रचार कार्य अधिक प्रभावीपणे करता यावे यासाठी अतिरिक्त सुविधा पुरविण्याचा उद्देश असलेल्या निवडणूकविषयक कायद्याच्या वैध तरतुदींचा आणि आयोगाच्या अनुदेशाचा व निदेशांचा दुरुपयोग होतो आणि त्यामुळे समान पातळीवरील लढतीवर परिणाम होतो. दक्ष निवडणूक यंत्रणेला निवडणूक प्रचार प्रक्रियेच्या पहिल्या काही दिवसांमध्येच असा डमी उमेदवार याविषयी नेहमीच लक्षात येऊ शकते.

जेव्हा जेव्हा अशा माहिती प्राप्त होईल तेव्हा तेव्हा, निवडणूक प्रशासनाने, सर्व क्षेत्रीय पदाधिकाऱ्यांना सावध करावे आणि अशा संशयित जमी उमेदवाराच्या प्रचार कार्याचे व्हिडियोचित्रण करण्यात यावे.

अलीकडच्या निवडणुकीमध्ये निवडणूक अधिकाऱ्यांना उमेदवाराच्या प्रचार वाहनांची तपासणी करते वेळी, वाहनामध्ये, दुसऱ्या उमेदवाराचे प्रचार साहित्य नेत असल्याचे आढळून आले आहे. या वस्तुस्थितीवरून असे सुस्पष्ट संकेत मिळतील की, उमेदवार प्रत्यक्षात दुसऱ्या उमेदवाराचा डमी उमेदवार म्हणून काम करत होता. अशा प्रकरणी, व्हिडीओ कॅमेऱ्याचा वापर, साक्षीदारांची निवेदने नोंदविणे, इत्यादीद्वारे स्पष्टपणे पुरावा गोळा करण्यात यावा. त्यानंतर उमेदवाराला नोटीस देण्यात यावी आणि त्याचबरोबर अशा डमी उमेदवाराच्या प्रचारासाठी परवानगी दिलेली वाहने व त्यांचा प्रत्यक्षात वापर याचे पुनर्विलोकन करण्यात यावे. या प्रक्रियेत निरिक्षकानेदेखील ठाम भूमिका पार पाडावी. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांने केलेल्या पुनर्विलोकनातून वाहनांचा दुरूपयोग झाल्याचे सिद्ध झाले की, संबंधित उमेदवार त्याच्या स्वतःच्या उमेदवारीबाबत गंभीर नसल्याने परिणामी त्याला प्रचारासाठी परवानगी दिलेल्या प्रचार वाहनांची आवश्यकता असू शकत नाही असे समजून ती वाहने काढून टाकण्यात होतो. जेव्हा जेव्हा अशी कार्यवाही करण्यात येते तेव्हा तेव्हा यास व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी, जेणेकरून एखादा विशिष्ट उमेदवार दुसऱ्या उमेदवाराचा प्रचार करत होता. ही वस्तुस्थिती जनतेपुढे यावी. निवडणूक निर्णय अधिकारी वाहनांना परवानगी देताना, अशी वाहने मतदानाच्या दिवशी असा डमी उमेदवाराद्वारे वापरली जाण्याची बाब, देखील विचारात घेईल.

कायदा, मतदानाच्या दिवशी, प्रत्येक उमेदवाराला एका मतदान प्रतिनिधी व दोन कार्यमोचक प्रतिनिधी ठेवण्याची परवानगी देतो. डमी उमेदवाराने केलेल्या मतदान प्रतिनिधींच्या नियुक्तीवर देखील लक्ष ठेवले पाहिजे, संबंधित मतदान केंद्रामध्ये सूक्ष्म निरीक्षकांची नियुक्ती करून आणि व्हिडीयो कॅमेरे, इत्यादी बसवून त्याद्वारे अतिरिक्त सावधगिरी घेण्यात यावी, त्याप्रमाणे मतमोजणी केंद्रामध्ये अशा डमी उमेदवारांच्या मतमोजणी प्रतिनिधींच्या हालचालीवर बारीक लक्ष ठेवण्यात यावे.

प्रचाराच्या प्रयोजनासाठी दिलेली वाहने चालवण्यावर आणि मतदानाच्या दिवशी बारीकनजर ठेवण्याबरोबरच भारतीय दंड संहितेच्या कलम १७१ज अन्वये खटला दाखल करून अशा डमी उमेदवारांविरूद्ध त्या कलमान्वये तात्काळ कारवाईदेखील सुरू करण्यात यावी. उमेदवाराच्या प्राधिकाराशिवाय, कोणत्याही रितीने खर्च वाढविणे हा कलम १७१ज खाली अपराध आहे.

निवडणूकनिर्णय अधिकाऱ्याने/निरीक्षकाने, ज्याच्या वतीने डमी उमेदवार काम करीत असल्याचे आढळून आले आहे अशा उमेदवाराला, त्याच्या निवडणूक खर्चामध्ये डमी उमेदवाराने केलेल्या खर्चाचा समावेश करण्याबाबत विचाराणा करणारी नोटीस द्यावी. हा सर्व पत्रव्यवहार, नोटिसा, इत्यादी लोकांसमोर ठेवावा, जेणे करून बाधित/पिडित व्यक्तींना निवडणूकविषयक अपराध/भ्रष्टचार हा मुद्दा सिद्ध करण्यासाठी निवडणूक याचिकेच्या बाबतीत या दस्ताऐवजांचा वापर करणे शक्य होईल.

हे अनुदेश, सर्व संबंधितांच्या निदर्सनास आणून द्यावे. जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी/निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी या गैरवापराबद्दल राजकीय पक्षांच्या उमेदवारांच्या बैठकीत स्पष्ट करावे आणि यासंबंधात करण्यात येणाऱ्या अनुवर्ती कारवाईबद्दल त्यांना माहिती द्यावी. या बाबीस, व्यापक स्वरूपात प्रसिद्धी देण्यात यावी, जेणेकरून जनता या गोष्टीबद्दल जागरूक होईल आणि दुसऱ्या उमेदवारासाठी प्रचार करणाऱ्या कोणत्याही उमेदवाराच्या त्याबाबतीत माहिती पुरविण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळेल.

## अनुदेश क्रमांक ५५

सर्व राज्यांचे व संघराज्य क्षेत्रांचे मुख्य सचिव आणि मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ४६४/आयएनएसटी/२००८ / पीएलएन-एक, दिनांक २७ फेब्रुवारी २००८.

**विषय.—** प्रचाराचा कालावधी समाप्त झाल्यानंतर एखाद्या मतदारसंघांतील राजकीय पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीवरील निर्बंधाच्या संबंधात.

वर उल्लेख केलल्या विषयावरील आयोगाचे पत्र क्र. ४६४/आयएनएसटी/२००७ / पीएलएन-एक, दिनांक ८ जानेवारी २००७. याचा परिच्छेद ३ कडे आपेले लक्ष वेधण्याचा आणि आयोगाने त्यामध्ये अंतर्भूत असलेल्या अनुदेशांचे आणखी पुनर्विलोकन केले आहे हे कळविण्याचा मला निदेश आहे.

२. फेरबदल केल्यानुसार, वर निर्दिष्ट केलेल्या पत्राच्या परिच्छेद-३ प्रमाणे असेल :–

" ३. म्हणून, आयोगाने असा निदेश दिला आहे की, प्रचार कालावधी पूर्ण झाल्यानंतर, जिल्हा निवडणूक प्रशासनाने/पोलीस प्रशासनाने, अशा सर्व पदाधिकाऱ्यांची प्रचार कालावधी संपल्यानंतर तात्काळ मतदार संघ सोडलेला असल्याची खात्री करावी.

तथापि, राज्याचा प्रभारी असलेल्या राजकीय पक्षाच्या पदाधिकाऱ्यांच्या बाबतीत लोकसभेच्या/राज्य विधान सभेच्या सार्वत्रिक निवडणुकांमध्ये उक्त निर्बंधाचा आग्रह धरण्यात येऊ नये राजकीय पक्षाचा असा पदाधिकारी राज्य मुख्यालयातील त्याचे राहण्याचे ठिकाण जाहिर करील आणि विवादित कालावधीतील त्याचे येणे जाणे, हे सर्वसाधारणपणे त्याचे पक्ष कार्यालय व त्याचे राहण्याचे ठिकाण या दरम्यान मर्यादित असेल. याचे अनुपालन करणे त्यांना शक्य व्हावे या दृष्टीने, ही, बाब सर्व राजकीय पक्ष, निवडणूक लढविणारा उमेदवार व त्यांचे प्रतिनिधी यांच्या निदर्शनास आणून द्यावी."

३. ही बाब सर्व जिल्हा निवडणूक अधिकारी/निवडणूक निर्णय अधिकारी/सहायक निवडणूक निर्णय अधिकारी आणि निवडणुकीशी संबंधित असलेले सर्व अधिकारी यांच्या तात्काळ, निदर्शनास आणून देण्यात यावी.

४. या बाबतीत केलेल्या कारवाईबद्दल आयोगाला कळविण्यात यावे.

## अनुदेश क्रमांक ५६

सर्व राजे व संघराज्य क्षेत्रांचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले आयोगाचे पत्र क्र. ३/९/२००७/जे.एस.-दोन दिनांक ३ ऑगस्ट २००७.

**विषय.—** वर्तमानपत्रे व अन्य मुद्रण प्रसार माध्यमातील निवडणुकीच्या संबंधातील जाहीराती - निवडणूक प्रचारमोहीम-यासंबंधात.

खाली उद्धृत केलेल्या लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १२६ च्या तरतुदींकडे आपले लक्ष वेधण्याचा मला निदेश आहे.-

" कलम -१२६ मतदान पूर्ण करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेपर्यंत पूर्ण होणाऱ्या अठ्ठेचाळिस तासांच्या कालावधीत जाहिर सभा भरवण्यास मनाई—

(१) कोणतीही व्यक्ती कोणत्याही मतदान क्षेत्रात, त्या मतदान क्षेत्रातील कोणत्याही निवडणुकीतील मतदान पूर्ण करण्यासाठी निश्चित केलेल्या वेळेपर्यंत पूर्ण होण्याच्या अठ्ठेचाळीस तासांच्या कालावधीत :—

(क) निवडणुकीच्या संबंधात कोणतीही जाहिर सभा किंवा मिरवणूक बोलावणार नाही, भरवणार नाही, त्यास उपस्थित राहणार नाही, त्यात सहभागी होणार नाही किंवा त्यास उद्देशून अभिभाषण करणार नाही, किंवा

(ख) जनतेला चलचित्राच्या, दूरचित्रवाणीच्या किंवा अन्य तत्सम साधनांच्या सहाय्याने निवडणूकविषयक कोणतीही बाब प्रदर्शित करणार नाही; किंवा

(ग) जनतेचे लक्ष आकर्षून घेण्यासाठी कोणतीही संगीत सभा किंवा अन्य नाट्यप्रयोग किंवा कोणताही करमणुकीचा वा मनोरंजनांचा कार्यक्रम आयोजित करून किंवा आयोजित करण्याची व्यवस्था करून निवडणुकविषयक कोणत्याही बाबींचा प्रचार करणार नाही.

(२) जी व्यक्ती, पोटकलम (१) मधील उपबंदाचे व्यतिक्रमण करील ती व्यक्ती, दोन वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासास किंवा द्रव्यदंडास किंवा दोन्ही शिक्षांस पात्र असेल.

(३) या कलमांत " निवडणुकविषयक बाब " या संज्ञेचा अर्थ, निवडणुकीच्या निकालावर प्रभाव पाडण्याचा किंवा परिणाम करण्याचा हेतू असलेली किंवा अपेक्षा असलेली कोणतीही बाब, असा आहे.

२. उपरोक्त ४८ तासांच्या कालावधीमध्ये निवडणूकविषयक बाबींचे आकाशवाणीवरून प्रसारण करता येऊ शकेल काय याबाबत काही राज्यांकडून विचारणा करण्यात आली आहे.

३. कलम १२६ यांच्या पोटकलम (१) च्या खंड (ख) अनुसार दूरचित्रवाणी किंवा तत्सम साधनांद्वारे निवडणूक विषयक बाब प्रदर्शित करण्यास मनाई आहे. असे स्पष्ट करण्यात येत आहे की, आकाशवाणी हे, या प्रयोजनासाठी 'अन्य तत्सम साधन' असल्याचे मानण्यात येईल आणि म्हणून आकाशवाणीद्वारे कोणतीही निवडणुकविषयक बाब प्रसारित करणे/तिचा प्रचार करणे हे खंड (ख) मध्ये अंतर्भूत करण्यात येईल व उक्त कलमामध्ये नमूद केलेल्या ४८ तासांच्या कालावधीत ते अनुज्ञेय राहणार नाही.

४. याबाबतीत कोणतीही शंका असल्यास ती दूर करण्यासाठी राज्यातील सर्व राजकीय पक्षांसह आपल्या राज्यातील सर्व संबंधितांच्या निदर्शनास ही बाब आणून द्यावी.

५. या पत्राची पोच द्यावी.

## अनुदेश क्रमांक ५७

सर्व राज्ये व संघराज्य क्षेत्र यांचे मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ३/९/२००७/जे.एस.-दोन दिनांक १६ ऑक्टोबर २००७.

**विषय.—** पत्रके, भित्तिपत्रके इत्यादींच्या मुद्रणावरील निर्बंध

मला, लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १२७क च्या तरतुदींसंबंधातील आयोगाचे पत्र क्र. ३/९/२००४/जेएस-दोन, दिनांक २४ ऑगस्ट २००४ याकडे आपले लक्ष वेधण्याचा निदेश देण्यात आला आहे.

२. काही प्रतिनिधिक (Surrogate) जाहिराती व काही संस्थांच्या नावे काढण्यात येत असलेल्या जाहिराती मुद्रित प्रसारमाध्यमांद्वारे काढण्यात येत असल्याचे आयोगाच्या निदर्शनास आले आहे.

३. निवडणूक कालावधीत विशिष्ट राजकीय पक्ष व उमेदवार यांच्यासाठी व यांच्या विरोधात विशेष, करून वृत्तपत्रांसारख्या मुद्रित प्रसार माध्यमांमधून निदर्शनास येणाऱ्या जाहिरातींच्या बाबतीत पुढील मुद्दे ध्यानात घेणे आवश्यक आहेत :

(क) ज्या जाहिरातींच्या मूळ स्त्रोताचा माग काढता येणे शक्य असेल त्या जाहिरातीसंबंधात पुढीलप्रमाणे कारवाई करता येईल :—

(एक) जर एखादी जाहिरात उमेदवाराच्या संमतीने किंवा त्याला ज्ञात करून देण्यात आली असेल तर अशी जाहिरात संबंधीत उमेदवाराने (उमेदवारांनी) प्राधिकृत केली असल्याचे समजले जाईल आणि तो निवडणूक खर्च असल्याचे समजून उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) खर्चखाती टाकण्यात येईल.

(दोन) जर जाहिरात उमेदवाराने प्राधिकृत केली नसेल तर भारतीय दंड संहितेच्या कलम १७१ज चा भंग केल्याप्रकरणी (संबंधित उमेदवारांने/उमेदवारांनी) लेखी प्राधिकार दिला नसताना जाहिरातीवर खर्च केल्याप्रकरणी प्रकाशकावर खटला भरण्यात येईल.

(ख) जाहिरातीमध्ये प्रकाशकाची ओळख नमूद करण्यात आली नसल्यास आपणांस संबंधित वृत्तपत्राकडे संपर्क साधून त्याबाबतची माहिती मिळविता येईल आणि वर नमूद केल्याप्रकरणे योग्य वाटेल अशी कार्यवाही करता येईल.

४. जिल्हा निवडणूक अधिकारी, अन्य निवडणूक प्राधिकाऱ्यांसह निवडणूक निर्णय अधिकारी, आयोगाने वर नमूद केलेल्या अनुदेशांचे ते पालन करीत असल्याबाबतची माहिती करून देईल. यासंबंधात करण्यात आलेली कार्यवाही कृपया आयोगाच्या निदर्शनास आणून देऊन जिल्हा निवडणूक अधिकारी, निडणूक निर्णय अधिकारी इत्यादी यांना यासंबंधातील काढण्यात आलेल्या अनुदेशांची प्रत देण्यात यावी.

५. कृपया या पत्राची पोच द्यावी.

## अनुदेश क्रमांक ५८

भारत सरकारचे कॅबिनेट सचिव, सर्व राज्याचे व संघराज्य क्षेत्रांचे मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ४३७/६/२००७/पीएलएन-तीन, दिनांक २४ ऑक्टोबर २००७.

**विषय.—** गुजरात विधानसभा, २००७ ची सार्वत्रिक निवडणूक मंत्री/उमेदवार यांच्या सुरक्षा कवचा संबंधात.

आयोगाचे पत्र क्र. ४३७/६/९६-पीएलएन-तीन, दिनांक ९ एप्रिल १९९६ मध्ये समाविष्ट असलेले आयोगाचे स्थायी आदेश/अनुदेश याच्या परिच्छेद २.५ कडे आपले लक्ष वेधण्याचा मला निदेश असून यामध्ये, इतर गोष्टींबरोबरच अशी तरतूद आहे की, सुरक्षा कवच असलेल्या व्यक्तींच्या बाबतीत, ज्या प्रकरणी गुप्तवार्ता प्राधिकरणांसह, सुरक्षा अभिकरणांना असा वापर करण्यास विहित केलेले आहे अशा सर्व प्रकरणी विशिष्ट व्यक्तीकरिता असलेल्या राज्याच्या मालकीच्या एका बुलेटप्रूफ वाहनाचा वापर करण्यास परवानगी असेल. सुरक्षा प्राधिकरणांद्वारे तसे विशेषरित्या विहित केले असल्याखेरीज राखीव नावाने बहुविध कारचा वापर करण्यास परवानगी असणार नाही. जेथे अशा बुलेटप्रूफ वाहनांचा वापर विनिर्दिष्ट केले आहे, तेथे अशा बुलेटप्रूफ वाहने चालविण्याचा खर्च विशिष्ट व्यक्तीकडून सोसण्यात येईल, मग ती व्यक्ती पदावर असो किंवा नसो, आणि ती व्यक्ती उमेदवार असो किंवा नसो.

२. आयोगाने प्रकरणाची आणखी तपासणी केली आहे आणि वर निर्दिष्ट केलेल्या आपल्या पत्राच्या परिच्छेद २.५ मधील त्याच्या विद्यमान अनुदेशांचा विस्तार करण्यासाठी त्यामध्ये पुढीलप्रमाणे फेरबदल करण्याचे ठरविले :—

" २.५. भारत सरकारच्या, गृह कार्य मंत्रालयाच्या निर्देशान्वये झेड+ (झेड प्लस) सुरक्षा कवच पुरविलेल्या व्यक्तींना विशिष्ट व्यक्तीकरिता असलेल्या राज्याच्या मालकीच्या एका बुलेटप्रूफ वाहनाचा वापर करण्यास परवानगी आहे. अशा विशिष्ट व्यक्तीस,— मग ती पदावर असो किंवा नसो, आणि ती व्यक्ती उमेदवार असो किंवा नसो, आदर्श आचार संहिता लागू असलेल्या निवडणूक कालावधीमध्ये राज्याची मालकी असलेल्या उक्त एका बुलेटप्रूफ वाहनाचा वापर करण्यास परवानगी असेल. कोणत्याही विशिष्ट प्रकरणी सुरक्षा प्राधिकरणांद्वारे तसे विशेषरीत्या विहित केले असल्याखेरीज राखीव नावाने बहुविध वाहनाचा (वाहनांचा) वापर करण्यास परवानगी दिली जाणार नाही. असे बुलेटप्रुफ वाहन (वाहने) चालविण्याचा खर्च, शासनाकडून नव्हे तर, संबंधित व्यक्तीकडून सोसण्यात येईल.

३. संबंधित अनुदेश या सर्व संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आलेले आहेत याच्या पुष्टीसह या पत्राची कृपया पोच देण्यात यावी. याबाबतीत दिलेल्या तशा अनुदेशांची/निदेशांची प्रत, आयोगाला त्याच्या माहिती व अभिलेख्यासाठी देखील पृष्ठांकित करण्यात यावी.

## अनुदेश क्रमांक ५९

मुख्य निवडणूक अधिकारी राजस्थान, जयपूर यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ४६४/आयएनएसटी/२००८/इपीएस, दिनांक २ डिसेंबर २००८ आणि सर्व राज्यांच्या/संघराज्य क्षेत्रांच्या (राजस्थान व्यतिरिक्त) मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना पृष्ठांकित केलेल्या त्याच्या प्रती.

**विषय.—** प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर मतदारसंघात राजकीय पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीवरील निर्बंध

प्रचाराचा कालावधी संपल्यानंतर मतदार संघाबाहेरील राज्याच्या बाहेरील व्यक्तींच्या उपस्थितीवरील निर्बंधाशी संबंधित असणारे आयोगाचे पत्र क्र. ४६४/आयएनएसटी/२००७-पीएलएन-एक, दिनांक ८ जानेवारी २००७ तसेच पत्र क्र. ४६४/आयएनएसटी/२००८ पीएलएन-एक, दिनांक २७ फेब्रुवारी २००८ (प्रत सोबत जोडली आहे) अंतर्भूत असलेले अनुदेश निर्दिष्ट करण्याचा मला निदेश आहे. राजस्थान विधानसभेच्या चालू सार्वत्रिक निवडणुकीमध्ये उक्त अनुदेश लागू करण्यासंबंधी स्पष्टीकरण मागविण्यात आले आहे असे स्पष्ट केले आहे की, उक्त अनुदेशांचे राजस्थान राज्याच्या चालू सार्वत्रिक निवडणुकांच्या संदर्भात, योग्य त्या फेरफारांसह पालन करण्यात येईल. येथे असे नमूद करण्यात येते की, उक्त अनुदेशांची उत्तर प्रदेश, गुजरात, कर्नाटक, मध्यप्रदेश, दिल्ली राष्ट्रीय राजधानी क्षेत्र, छत्तीसगड व मिझोरम यांच्या राज्य विधानसभाच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी, यथोचितरित्या अंमलबजावणी करण्यात आली होती. तद्नुसार, अनुदेशांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्यात येत आहे याची खात्रा करण्यात येईल.

## अनुदेश क्रमांक ६०

भारताच्या निवडणूक आयोगाचे सर्व राज्ये व संघ राज्यक्षेत्रे यांचे मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले पत्र क्रमांक ४३७/६/आयएनएसटी २००९-सीसी व बीई, दिनांक ९ मार्च २००९.

**विषय.—** लोकसभा-२००९ ची सार्वत्रिक निवडणूक-अर्थसंकल्प सादर करणे आदर्श आचारसंहिता-यासंबंधात.

आपणास माहित आहे की, आयोगाने लोकसभेची सार्वत्रिक निवडणूक, २००९ घोषित केली असून दिनांक २ मार्च २००९ रोजी व तेव्हापासून आदर्श आचार संहिता अंमलात आली आहे. सन २००९-१० या वर्षाकरिता अर्थसंकल्प सादर करण्याच्या संदर्भात निरनिराळ्या राज्यांकडून आयोगाला अनेक संदर्भ प्राप्त झाले आहेत.

२. आयोगास अनेक राज्यांनी अनुसरलेली प्रचलित परंपरा निदर्शनास आणून द्याविशी वाटते ती म्हणजे सार्वत्रिक निवडणूक लवकरच घेण्यात येणार आहे किंवा जेव्हा सार्वत्रिक निवडणुक प्रक्रिया घोषित करण्यात आली आहे आणि आदर्श आचार संहिता अंमलात आणण्यात आली आहे तेव्हा अशा प्रकरणांत संपूर्ण अर्थसंकल्प सादर करण्याऐवजी ३-४ महिन्यांसाठीचे लेखानुदान सादर केले जाते. हे निकोप लोकशाही प्रथेस सहाय्यभूत ठरते.

३. आयोगाला, राज्य विधानमंडळाचा आदर राखून आणि अशी परंपरा व औचित्य लक्षात घेऊन, अनुशासन घालून द्यावे किंवा कार्यपद्धती विहित करावी, असे वाटत नाही. तथापि आयोग असा सल्ला देईल की, ज्या राज्यांमध्ये विधानसभेसाठी मतदान होणार आहे त्या राज्यांच्या बाबतीत, लेखानुदान मांडण्यात यावे.

४. वरील अनुदेश सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात यावेत आणि या पत्राची कृपया पोच द्यावी.

## अनुदेश क्रमांक ६१

भारताच्या निवडणूक आयोगाचे सर्व राज्ये व संघराज्य क्षेत्रे यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेले पत्र क्रमांक ४३७/६/आयएन एसटी/२००८-सी सी व बीई, दिनांक ३० मार्च २००९.

**विषय.—** आदर्श आचारसंहिता लागू करणे भारतीय अन्न महामंडळाच्या गोदामांचे अधिग्रहण करणे— यासंबंधात.

महोदय,

आपणास असे कळवण्याचा मला आदेश आहे की, प्रापण हंगाम लक्षात घेऊन, निवडणूक साधनसामग्री साठवण्याकरिता आणि निवडणूक अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याकरिता, भारतीय अन्न महामंडळाची, गोदामे त्यातून वगळण्याच्या संबंधात, ग्राहक व्यवहार, अन्न व सार्वजनिक वितरण मंत्रालयाकडून संदर्भ प्राप्त झाले आहेत. आयोगाने सदर बाब विचारात घेतली आहे. आयोगाने असा निर्णय घेतला आहे की, निवडणूक साधनसामग्री साठवणे आणि निवडणूक अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे अशा निवडणूक विषयक कामांकरिता, भारतीय अन्न महामंडळ व राज्य अन्न महामंडळे यांच्या गोदामांचे अधिग्रहण करण्यात येणार नाही.

तद्नुसार, निवडणूक विषयक कामांकरिता भारतीय अन्न महामंडळाची गोदामे आणि राज्य अन्न महामंडळाची गोदामे यांचे अधिग्रहण करू नये म्हणून जिल्हा दंडाधिकाऱ्यांना सूचना/निदेश द्यावेत अशी आपणास विनंती करण्यात येत आहे.

## अनुदेश क्रमांक ६२

भारताच्या निवडणूक आयोगाचे सर्व राज्ये व संघ राज्यक्षेत्रे यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेले पत्र क्रमांक ४३७/६/आय एन एस टी/२००८-सी सी व बीई, दिनांक १७ एप्रिल २००९.

**विषय.—** आदर्श आचार संहिता लागू करणे केंद्र वखार महामंडळाच्या (केंवम) गोदामांचे अधिग्रहण आणि निवडणूक कर्तव्यातून केंद्रीय वखार महामंडळाच्या अधिकाऱ्यांना सूट देणे—यासंबंधात.

आपणास असे कळवण्याचा मला आदेश आहे की, प्रापण हंगाम लक्षात घेऊन निवडणूक साधनसामग्री साठवण्याकरिता आणि निवडणूक अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्याकरिता, केंद्रीय वखार महामंडळाची गोदामे त्यातून वगळण्याच्या संबंधात केंद्रीय वखार महामंडळाकडून संदर्भ प्राप्त झाले आहेत. आयोगाने सदर बाब विचारात घेतली आहे. आयोगाने असा निर्णय घेतला आहे की, शक्य असेल तेथवर, निवडणूक साधनसामग्री साठवणे आणि निवडणूक अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे अशा निवडणूक विषयक कामांकरिता केंद्रीय वखार महामंडळाच्या गोदामांचे अधिग्रहण करण्यात येऊ नये, आयोगाने असे देखील ठरवले आहे की, शक्य असेल तेथवर, केंद्रीय वखार महामंडळाच्या कर्मचाऱ्यांची निवडणूक कर्तव्याकरिता नियुक्ती करण्यात येणार नाही.

# ए-२ स्वेच्छानिधींतून प्रदान आणि संसद सदस्य खासदार
# विधानसभा सदस्य (आमदार)
# स्थानिक क्षेत्र विकास योजना

## अनुदेश क्रमांक ६३

निवडणूक आयोगाचे (१) कॅबिनेट सचिव, भारत सरकार मंत्रिमंडळ, सचिवालय, नवी दिल्ली, (२) सर्व राज्य शासनांचे व संघ राज्य क्षेत्रांचे मुख्य सचिव, (३) सचिव, भारत सरकार, गृह कार्य मंत्रालय, नवी दिल्ली आणि (४) सर्व मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले पत्र क्रमांक ५७६/१७/८४, दिनांक ९ नोव्हेंबर १९८४.

**विषय.—** सार्वत्रिक निवडणुका किंवा पोट निवडणुक यांच्या अगदी लगतपूर्वीच्या काळात स्वेच्छा निधीमधून रकमा प्रदान करणे.

आपणास असे कळविण्याचा मला आदेश आहे की, १९६७ चे दिवाणी अपील क्र. १६३२ (एन सी ई) (घासीराम विरुद्ध दलसिंग आणि इतर) यामध्ये सर्वोच्च न्यायालयाने पुढील प्रमाणे प्रतिपादन केले आहे.

“ पहिल्या उत्तरवादीची कृती ही, सदोष आहे असे जरी म्हणता येणार नाही असे जरी आम्ही या प्रसंगी म्हटलेले असले तरीही शासनाची धारणा ही निश्चितच स्तुत्य अशा स्वरुपाची नाही, असे आम्हाला म्हणावे लागत आहे. निवडणूक प्रक्रिया ही एक न्याय्य अशाप्रकारे पार पाडणे अनिवार्य ठरेल अशीच प्रक्रीया आहे. निवडणुका ऐन तोंडावर आल्यानंतर निरनिराळ्या मतदार संघांमध्ये अगदी सार्वजनिक हितासाठी जरी असले तरी आणि असे करणे ही भ्रष्ट प्रथा नसली तरीही जेव्हा कोणतीही उक्ती व कृती ही गैर ठरू शकते अशा वेळी पैसे खर्च करण्याची व्यवस्था करणे हे गैर आहे. गैर प्रथा व भ्रष्ट प्रथा यामधील भेद हा अतिसूक्ष्म आहे. सार्वजनिक हितासाठी विधायक शक्तीचा वापर करायचा असेल तर तो निवडणुका ऐन तोंडावर आल्यावर करावयाचा नसून बराच अगोदर करायचा असतो आणि अगदी लहानसहान पुरावा सुद्धा गैरप्रथेचे रुपांतर भ्रष्ट प्रथेमध्ये करू शकतो. निवडणुका ऐन तोंडावर आल्यावर स्वेच्छा अनुदाने देण्याचे टाळावे. ”

आयोगाने यापूर्वीच केंद्र सरकारास व सर्व राज्य शासनांना त्यांनी आवश्यक ते निदेश द्यावेत, अशी शिफारस केलेली होती. मंत्री व अन्य प्राधिकरणे यांनी, निवडणुका अगदी जवळ येऊन ठेपल्यानंतर स्वेच्छा निधीमधून अनुदाने/प्रदाने करू नयेत हा त्यामागील उदेश होता. आयोगाने तयार केलेली राजकीय पक्ष, उमेदवार आणि शासन यांच्या मार्गदर्शनार्थ तयार केलेली आचारसंहिता, यामध्ये इतर गोष्टींबरोबर अशाप्रकारची अनुदाने/प्रदाने न देण्याबद्दलचा उहापोह केलेला आहे.

केंद्र/राज्य/संघ राज्य क्षेत्र शासन या सर्वांनी याबाबतीत एकतर योग्य असे निदेश अनिवार्यरीत्या दिलेले असले पहिजेत किंवा त्यासाठी काही संकेतांचे पालन त्यांच्याकडून होत असले पाहिजे.

हे निदेश अथवा संकेत यांचे शब्दशः आणि सारतः पालन सर्व निवडणुकांच्या - सार्वत्रिक किंवा पोट निवडणुकीच्या वेळी केले गेले पाहिजे.

२. याबाबतीत केलेल्या कार्यवाही बद्दल आयोगाला कळवण्यात यावे.

३. आयोगाचे पत्र क्रमांक ५७६/१७/७६, दिनांक १० ऑक्टोबर १९७९ अन्वये केलेला पत्रव्यवहार हा अधिक्रमित झालेला असल्याचे समजण्यात येईल.

४. या पत्राची पोच देण्यात यावी.

## अनुदेश क्रमांक ६४

निवडणूक आयोगाचे, सर्व राज्य व संघराज्यक्षेत्र यांचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले पत्र क्रमांक ४६७/६/८९/ दिनांक ७ नोव्हेंबर १९८९.

**विषय.—** सार्वत्रिक निवडणुकांच्या अगदी लगतपुर्वीच्या काळात मंत्र्यांच्या स्वेच्छा अनुदानांमधुन रकमा प्रदान करण्याच्या संबंधात.

उपरोक्त विषयावरील गृह मंत्रालय, नवी दिल्लीचे पत्र क्रमांक २६/४/८९ सार्वजनिक, दिनांक ३ नोव्हेंबर १९८९ यांची प्रत आपणाकडे पाठविण्याचे आणि भाराताच्या निवडणूक आयोगाचे एकत्रित निदेश समाविष्ट असलेल्या पुस्तिकेमध्ये निदेश समाविष्ट करण्याची आणि त्या पुस्तिकेत अंतर्भूत असलेल्या स्थायी निदेशांचाच भाग असल्याचे समजण्यात यावे, अशी विनंती आपणास करण्याचे मला निदेश देण्यात आलेले आहे.

कृपया पोच द्यावी.

---

क्रमांक २६/८/८९ सार्वजनिक,
भारत सरकार/गृह मंत्रालय,
भारत सरकार/गृह मंत्रालय, नवी दिल्ली,

प्रति,
मुख्य सचिव, दिनांक ३ नोव्हेंबर १९८९
(सर्व राज्य व संघराज्य क्षेत्र)
यांस,

**विषय.—** लोकसभा निवडणुकांच्या अगदी लगतच्या काळामध्ये मंत्र्यांच्या स्वेच्छाअनुदानामधून रकमांचे प्रदान – एक संकेत.

महोदय,

उपरोक्त विषयावरील या मंत्रालयाचे गोपनीय पत्र क्रमांक २६/४/८४– सार्वजनिक, दिनांक २४ नोव्हेंबर १९८४ याचा निर्देश करण्याचे आणि या मंत्रालयाचे गोपनीय पत्र क्रमांक २०/१/७७– एफ.एफ.जी., दिनांक २८ जानेवारी १९७७ (तात्काळ संदर्भासाठी सहपत्रांची प्रत जोडली आहे.)

यामध्ये निर्दिष्ट केलेल्या संकेतांचे पालन आगामी लोकसभा निवडणुकीच्या संबंधात काटेकोरपणे करण्यात यावे, अशी विनंती करण्याचे निदेश मला देण्यात आलेले आहेत.

सचिव, निवडणूक आयोग, निर्वाचन सदन, अशोका मार्ग, नवी दिल्ली यांना माहितीसाठी प्रत रवाना.

क्रमांक २०/१/७७ एफ एफ जी

---

भारत सरकार/भारत सरकार
गृह मंत्रालय/गृह मंत्रालय,
नवी दिल्ली,
दिनांक २८ जानेवारी, १९७७

प्रति,
मुख्य सचिव,
(सर्व राज्य व संघराज्य क्षेत्र)
यांस,

**विषय.—**निवडणूकांच्या अगदी लगतच्या काळात मंत्र्यांच्या स्वेच्छाअनुदानांमधून रकमांचे प्रदान—एक संकेत.

महोदय,

निवडणुकांच्या अगदी अलिकडच्या काळात मंत्र्यांनी आपल्या स्वेच्छा अनुदानांमधून रकमांचे प्रदान करण्यासंबंधात सर्व राज्य शासन व संघराज्य क्षेत्र प्रशासनांच्या मुख्य सचिवांना उद्देशून लिहिलेल्या या मंत्रालयाचे गोपनीय पत्र क्रमांक ५/३/६८-मतदान-तीन, दिनांक २९ ऑक्टोबर १९६९ (पत्र सोबत जोडले आहे) याचा निर्देश करण्याचे निदेश मला देण्यात आलेले आहेत. मार्च, १९७७ मध्ये घेण्यात येणाऱ्या आगामी निवडणुकांच्या दृष्टीने अनुकंपा तत्वावर अत्यंत निकडीचे झालेले असेल अशा प्रकरणांव्यतिरिक्त, निवडणुकांच्या लगतपूर्वी स्वेच्छाअनुदानांमधून रकमांचे प्रदान करण्याचे टाळण्यासंबंधीच्या त्यामधील संकेतांचे कृपया काटेकोरपणे पालन करण्यात यावे, अशी मी आपणास विनंती करीत आहे.

---

क्रमांक ५०/३/६८-मतदान-तीन

भारत सरकार/भारत सरकार
गृह मंत्रालय/गृह मंत्रालय,
नवी दिल्ली,
दिनांक २९ ऑक्टोबर, १९६९

प्रति,

मुख्य सचिव,

(सर्व राज्य व संघराज्य क्षेत्र)

**विषय.—**सर्वोच्च न्यायालयाचे निष्कर्ष – निवडणुकांच्या अगदी लगतच्या काळात मंत्र्यांकडे सुपुर्द करण्यात आलेल्या स्वेच्छाअनुदानांमधून रकमांचे प्रदान – एक संकेत

निवडणुकांच्या अगदी लगतच्या काळात मंत्र्यांनी त्यांच्या स्वेच्छाअनुदानांमधून रकमांचे प्रदान करण्याबाबत निवडणूक आयोगाचे भारत सरकारच्या सर्व मंत्र्यांना व राज्याच्या मुख्य सचिवांना उद्देशून लिहिलेल्या परिपत्रक पत्र क्रमांक ८२/एच एन/२४/६७, दिनांक २५ जून, १९६८ याकडे आपले लक्ष वेधण्याचे निदेश मला देण्यात आलेले आहेत. आयोगाच्या सूचनेचा काळजीपूर्वक विचार करण्यात आल्यानंतर भारत सरकारने असे ठरविले की, स्वेच्छाअनुदानांमधून रकमा देण्यासंबंधीचे विनियम करणाऱ्या नियमामध्ये तरतूद करण्याऐवजी सार्वत्रिक निवडणूक, मध्यावधी निवडणूक अथवा पोट-निवडणूक या तीन मतदानापूर्वी लगतच्या तीन महिन्यांच्या कालावधीत कोणत्याही मतदारसंघामध्ये मंत्र्यांच्या स्वेच्छाअनुदानामधून कोणतीही खर्च सर्वसाधारणतः केला जाऊ नये, अशा एका संकेताचा अवलंब करण्यात यावा. भारत सरकारच्या सर्व सचिवांना उद्देशून लिहिलेल्या, या मंत्रालयाचे पत्र क्रमांक ५०/३/६८ – मतदान – तीन, दिनांक २८ ऑक्टोबर १९६९ या पत्राची प्रत सोबत जोडली आहे. राज्य शासन/संघराज्य क्षेत्र यांनी अशाच प्रकारच्या संकेताचे पालन करावे.

---

डी.ओ. ५०/३/६८-मतदान-तीन

भारत सरकार/भारत सरकार
गृह मंत्रालय/गृह मंत्रालय,
नवी दिल्ली,
दिनांक २८ ऑक्टोबर १९६९

प्रति,
सचिव,

प्रिय श्री.

निवडणुकांच्या अगदी अलिकडच्या काळात मंत्र्यांनी त्यांच्या स्वेच्छाअनुदानांमधून रकमांचे प्रदान करण्याबाबत निवडणूक आयोगाने भारत सरकारच्या सर्व मंत्र्यांना व राज्य शासनाच्या सर्व मुख्य सचिवांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे परिपत्रक क्रमांक ८८२/एच एन/२४/६७, दिनांक २५ जून, १९६८ (प्रत जोडली आहे), कृपया पहावे. सार्वत्रिक, निवडणूक मध्यावधी निवडणूक अथवा पोट-निवडणूक जवळ येऊन ठेपलेली असताना स्वेच्छाअनुदानांमधून कोणत्याही रकमांचे प्रदान टाळण्यात यावे, या आयोगाच्या सूचनेचा काळजीपूर्वक विचार करण्यात आला आहे आणि शासनाला ती सूचना मान्य आहे. तथापि, आम्हास असे वाटते की, स्वेच्छाअनुदानातून वाटप करण्याबाबतीतील नियंत्रक नियमांमध्ये कोणतीही विशेष तरतूद करण्याच्या ऐवजी असा संकेत तयार करण्यात आला पाहिजे की, कोणत्याही मतदारसंघातील सार्वत्रिक निवडणूका मध्यवधी निवडणुका किंवा पोट-निवडणूका यांच्या मतदानाच्या तीन महिने लगतपूर्वी अनुकंपा तत्वावर खर्च करणे परिपूर्णतया आवश्यक होईल, अशा बाबीव्यतिरिक्त सामान्यतः मंत्र्यांच्या स्वेच्छाअनुदानातून इतर कोणताही खर्च करण्यात येऊ नये.

२. अशी विनंती करण्यात येत आहे की, मंत्र्यांच्या स्वेच्छाअनुदानाच्या वाटपाबाबतीत या संकेताचे काटेकोरपणे पालन करण्यात आले पाहिजे. आपण ही बाब आपल्या मंत्र्यांच्या माहितीसाठी प्रस्तुत केल्यास, मी आपला कृतज्ञ राहीन

३. हे पत्र पंतप्रधानांच्या मान्यतेने काढण्यात येत आहे.

आपला विश्वासू,
सही–
(एल आर सिंह)

प्रति,

भारत सरकारचे सर्व सचिव,

भारताचा निवडणूक आयोग,

तलकटोरा मार्ग, नवी दिल्ली-१.

क्र. ८२/एचएन/२४६७.

दिनांक ५ जून १९६८
आषाढ ४, १८९० (शके)

प्रति,

१. भारत सरकारचे सर्व मंत्री.

२. सर्व राज्य/संघराज्य क्षेत्रांचे मुख्य सचिव.

**विषय.—** निवडणुकांच्या लगतपूर्वी स्वेच्छा निधीतून प्रदान.

महोदय,

सन १९६७ मधील निवडणूक विनंती-अर्ज क्र. २४ मध्ये पंजाब व हरयाणा राज्याच्या उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांविरुद्ध सन १९६७ मध्ये दाखल केलेले नागरी अपील क्र. १६३२ (एन.सी.ई.) बाबतीत सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या नायनिर्णयासंबंद्ध उताऱ्याच्या प्रती सोबत जोडण्याचा आणि निवडणुकांमध्ये सुचिता राखण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाने व्यक्त केलेल्या " निवडणुकांच्या लगतपूर्वी स्वेच्छा अनुदानातून रक्कम वाटप करण्याचे टाळण्यात आले पाहिजे " या दृष्टिकोनाशी आयोगाची सादर समंती असल्याचे स्पष्ट करण्याचा मला निदेश देण्यात आला आहे.

अशा रकमा सर्वसाधारण सार्वजनिक हितासाठी देण्यात येत असतीलही, ती एक भ्रष्ट प्रथा नसेलही तरीसुद्धा ती एक गैर प्रथाच आहे. " गैर प्रथा आणि भ्रष्ट प्रथा यातील भेद अतिसूक्ष्म आहे. सार्वजनिक हितासाठी विधायक शक्तींचा वापर करायचा असेल तर तो निवडणूका ऐन तोंडावर आल्यावर करावयाचा नसून बराच अगोदर करायचा असतो आणि अगदी लहानसहान पुरावासुद्धा गैरप्रथेचे रूपांतर भ्रष्ट प्रथेमध्ये करू शकतो. " अशा निष्कर्ष न्यायालयाने नमूद केलेला आहे.

**२.** इतर काही खटल्यांमध्येही न्यायलयाने असाच प्रकारची निकषवचने नमूद केलेली आहेत. न्यायनिर्णयातील काही संबद्ध उतारे पुढे देण्यात आले आहेत :—

(क) श्री. कादर शरीफ विरुद्ध मुन्नस्वामी गौडर (१९५५) (सर्वोच्च न्यायालय)

" एखादी देणगी धर्मार्थ देणे ही बाब स्पृहणीय असली तरीही ती निवडणुकांच्या वेळी किंवा निवडणुका अगदी जवळ आल्यानंतर दिली गेली तर एखाद्या विशिष्ट उमेदवाराला मतदरांनी मत द्यावे या उद्देशाने ती दिली गेली असा आरोप त्या देणगीच्या संबंधात केला जाऊ शकतो."

(ख) एकोणतिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात इंग्लंडमध्ये होऊन गेलेले एक विख्यात न्यायाधीश श्री. बोवेन यानी विगन प्रकरणामध्ये (२.० एम व एच).

पुढीलप्रमाणे अभिप्राय नमूद केला आहे :—

" दुसरी गोष्ट असी की, ही बाब केवळ औदार्याची होती या विधानाचे उत्तर मी देऊ इच्छितो. निवडणुकीच्या वेळी राजकारण्यांनी औदार्य ही बाब बाजूला टाकली पाहिजे. यावेळी विगन येथील परिस्थिती अतिशय दारूण होती यात काही शंकाच नाही आणि संपूर्ण शहरात आगीच्या भक्षस्थानी न पडलेले आणि प्राणहानी न झालेले असे एखादे दुसरेच घर असेल परंतु अशा बिकट परिस्थितीमध्ये विगनमधील राजकारण्यांचा मदतीचा हात पुढे यायला हवा होता. त्यांना त्यापासून चार हात दूरच उभे रहावे लागले. त्या दिवशी त्यांना आणखी एका कर्तव्याचे पालन करायचे होते. एकाच वेळी त्यांना दोन कामे योग्यप्रकारे पार पाडणे शक्य नव्हते. वस्तुतः निवडणुकीच्या वेळी गरिबांसाठी ज्या भावनेने मदतीचा हात पुढे येतो तो हात मदत करणाऱ्यास त्याची जाणीवही नसेल परंतु तो हात खऱ्याखुऱ्या औदार्याचा नसतो तर औदार्याच्या आवरणाखाली आणि औदार्याच्या ढंगाने सहभावना बाळगून केलेली एक वाटचाल असते."

३. जनतेच्या सर्वसाधारण हिताच्या दृष्टिने मंत्र्यांकडे स्वेच्छा अनुदाने सुपूर्द केली जाणे हे आवश्यक असले तरीही सार्वत्रिक निवडणुकीचे किंवा अगदी पोट-निवणुकीचेही वारे देशभरात वाहू लागतील अशा वेळी स्वेच्छा अनुदानांमधून रकमांचे प्रदान करण्याची बाब विनियमित करणाऱ्या नियमांमध्ये तरतूद करून किंवा अन्य प्रकारे विवक्षित निर्बंध घालण्यात आले पाहिजेत आणि कोणत्याही परिस्थिती अशी कोणतीही निवडणूक जाहीर करणारी अधिसूचना काढण्यात आल्यानंतर तर असे कोणतेही प्रदान करण्यात येऊ नये. अशा अनुदानांमधून मिळणारे लाभ हे शक्योतोवर, राज्यामध्ये समान प्रमाणात दिले गेले पाहिजेत व असे लाभ एखाद्या विशिष्ट जिल्हामध्येच किंवा एका मतदार संघातच मिळता कामा नयेत.

४. मुक्त व निःपक्ष वातावरणात निवडणुका घेता याव्यात म्हणून काही निको, अशा संकेतांचा पायंडा पाडण्याची आवश्यकता आहे. आणि आवश्यक असल्यास निवडणुका ऐन तोंडावर आल्यानंतर मंत्र्यांनी आपल्या स्वेच्छा अनुदानांमधून कोणत्याही रकमांचे प्रदान करू नये अथवा अशा रकमा देण्याचे कबूल करू नये. म्हणून ही बाब विनियमित करणाऱ्या नियमांमध्ये आवश्यक ते बदल करण्यात यावेत असे आयोगाला वाटते. म्हणून मी सर्वोच्च न्यायालय व पंजाब व हरयाणाचे उच्च न्यायालय यांचे अभिप्राय आवश्यक वाटेल अशा कार्यवाहीसाठी संबंधित अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो.

या पत्रांची कृपया पोच देण्यात यावी.

**भारताचे सर्वोच्च न्यायालय**

दिवाणी अपील अधिकारिता

१९६७ ~~चे दिवाणी अपील क्रमांक~~ १६३२

घाशीराम अपीलकर्ता

विरुद्ध

दलसिंग व इतर उत्तरवादी

**न्यायनिर्णय**

** ** ** **

पहिल्या खर्च शिर्षाखाली असे नमूद करण्यात आलेले आहे की, इगरा ग्रामपंचायतीसाठी रुपये २०,०००, रामराय या गावातील पावन तलावासाठी १५ फेब्रुवारी १९६७ रोजी रुपये ५,०००, ब्राह्मणवास ग्रामपंचायतीतील ९ जानेवारी १९६७ रोजी रुपये १,०००, बाबापुर ग्रामपंचायतीसाठी डिसेंबर १९६६ रोजी रुपये २,५०० आणि रामराय ग्रामपंचायत, लजवान कलान येथील धनक सामूहिक केंद्र, मेहरा गावातील वाल्मिकी हरिजन सामूहिक केंद्र यांस सार्वजनिक उपयुक्तेच्या कामासाठी ९ जानेवारी १९६७ रोजी प्रत्येकी रुपये ५०० आणि लजवाना खुर्द येथील हरिजनांच्या विहिरीची दुरुस्ती करण्यासाठी रुपये ५०० एवढ्या रकमा देण्याचे त्याने कबूल केलेले होते. असेही सांगण्यात येते की, या रकमा देण्यात येण्यापूर्वी मंत्र्याने निरनिराळ्या गावी भेटी देलेल्या होत्या. त्यावेळी मंत्र्यांने गावकऱ्यांच्या उद्धारासाठी काहिही केले नसल्याने गावकरी त्यांना मते देणार नसल्याचे मतदारांनी मंत्र्याला सांगितले आणि मंत्र्याने वरील रकमा देण्याचे कबूल केले आणि मतदारांना जिंकले. परिणामी, उत्तरवादीच्या गावांमधून गठ्ठामते मिळाले. उच्च न्यायालयाने या आरोपाबाबतच्या पुराव्याची छाननी केली आणि अधिनियमाच्या कलम १२३ मधील आवश्यकतांमध्ये तो बसत नसल्याचा आपला निष्कर्ष व्यक्त केला. वस्तुस्थितीचा आणि कायद्याचा विचार करता उच्च न्यायालय चुकत आहे असे म्हणणे आमच्यासमोर मांडण्यात आले आहे. या संदर्भात, गैर प्रथा म्हणजे काय याबद्दलचे मत निश्चित करण्यापूर्वी आम्ही तथ्यांबाबतचा निकाल करणार आहोत.

इगरा ग्रामपंचायतीला दिलेली देणगी ही मेहताब सिंग (पो. सा. १०) याच्या साक्षीवरून सिद्ध करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. गट समितीचा अध्यक्ष असलेल्या उत्तरवादीने रुपये ५,००० एवढी रक्कम द्यायचे कबूल केले होते परंतु, त्याने ती प्रत्यक्षात दिलेली नव्हती असे साक्षीदाराने सांगितले त्याने पुढे असेही सांगितले की उत्तरवादी जेव्हा प्रचारासाठी आला होता तेव्हा त्याने आपले वचन न पाळण्याने मतदार त्याला मत देण्यास नाखूष होते. त्यानंतर मतदारांनी त्याला पाठिंबा दिला तर काही रक्कम आपण देऊ असे कबूल करून त्याने त्यांचे मन वळवले. उच्च न्यायालयाने असे निदर्शनास आणून दिले की, हा साक्षीदार हा सेवामुक्त केलेला उप निरीक्षक होता आणि निवडणूक विनंती अर्जदाराचा मतदान प्रतिनिधी होता. हा साक्षीदार हा खोटा असल्याचे आढळून आले. कारण त्याने असे विधान केले होते की, उमेदवाराने असे वचन दिल्यानंतर ७ दिवसांनी ती रक्कम मिळाली. परंतु ती रक्कम मतदान झाल्यावर एक महिन्यानंतर मार्च १९६७ मध्ये देण्यात आल्याचे नोंदीवरून दिसून येते. लखीराम (पो.सा.५) याने गावातील शाळेचे बांधकाम अपुरे झालेले असून ते पूर्ण करण्यासाठी पैशाची आवश्यकता असल्याचे त्याने सांगितले. ती रक्कम ग्रामपंचायतीकडे खर्च करण्यासाठी सुपूर्द करण्यात आली. ही रक्कम कोणत्याही मतदाराला किंवा मतदारांना भेट देण्यात आलेली नव्हती. त्या रकमेचा विनियोग करण्यासाठी ती ग्रामपंचायतीकडे सुपूर्द करण्यात आलेली होती. याचा अर्थ असा की, त्या रकमेचा लाभ उत्तरवादीला पाठिंबा देणाऱ्यांसाठी व त्याचप्रमाणे उत्तरवादीला विरोध करणाऱ्यांसाठी होणार होता. भ्रष्ट प्रथेच्या व्याख्येनुसार आवश्यक असल्याप्रमाणे या प्रकरणात काही सौदा केला गेला असल्याच्या पुराव्यावर उच्च न्यायालयाचा विश्वास बसला नाही. पुराव्याचे वाचन केल्यावर, गावातल्या लोकांनी उत्तरवादीकडे मदत मागितली व उत्तरवादीने सार्वजनिक उपयुक्ततेचे कामा पूर्ण करण्यासाठी मदत देण्याचे कबूल केले. याबद्दल आमची खात्री पटलेली आहे. निवडणूक झाल्यानंतर रक्कम देण्यात आली.

त्याचप्रमाणे रामराय ग्रामपंचायतीला रुपये ५,००० एवढी रक्कम देण्यात आल्याचे देवीदयाळ (पो.सा.११), मंगलसिंग (पो.सा.१२) यांच्या साक्षीवरून सिद्ध झालेले आहे. ही रक्कम ८ डिसेंबर १९६६ रोजी मंजूर करण्यात आली होती. उत्तरवादीला काँग्रेसने निवडणुकीसाठी तिकीट देण्यापूर्वीची ही घटना आहे. हे दोन्ही साक्षीदार उत्तरवादीच्या विरोधातील होते हे उघड झालेले होते. १९५२ च्या निवडणुकीत देवीदयाळ हा उत्तरवादीचा प्रतिस्पर्धी होता, आणि त्याने उत्तरवादीच्या विरोधात जाणारे बरेच अर्जही केलेले होते. ६ डिसेंबर १९६६ रोजी उत्तरवादीने काँग्रेसचे तिकीट मिळवण्यासाठी अर्ज केला होता आणि रक्कम ८ ऑगस्ट १९६६ रोजी देण्यात आलेली असल्याने नामनिर्देशनानंतर रक्कम देण्यात आली ही देवीदयाळची साक्ष निखालस खोटी होती. मंगलसिंग हा एक साप्ताहिक नियतकालिकाचा संपादक आहे. उत्तरवादीच्या विरुद्ध या साप्ताहिकामध्ये बऱ्याच तक्रारी छापण्यात आल्या होत्या. उत्तरवादीने मंत्री होण्यापूर्वीच पावन तलावासाठी त्याने रु. २५,००० एवढी रक्कम गोळा केलेली होती व त्याचप्रमाणे पक्का रस्ता,

दवाखाना, पशुवैद्यक दवाखाना, डाक कार्यालय व पाणीपुरवठ्याची कामे ही सर्व कामे त्याच्या प्रयत्नाचीच फळे असल्याचे त्याने म्हटले आहे. प्राथमिक शाळेचा दर्जाही त्यानेच वाढवला. रामराय हे त्याचे मूळगाव असल्याने पंचायतीच्या कामात त्याला स्वाभाविकपणेच स्वारस्य होते, आणि पाण्याची टंचाई असल्याने त्याने पावन तलावाची डागडुजी करण्यासाठी गावकऱ्यांना मदत करावी या हेतूने ही रक्कम ग्रामपंचायतीला दिली. ही बाब कलम १२३ खाली आणू शकेल असा कोणताही पुरावा उच्च न्यायालयाला सापडलेला नाही. ह्या प्रतिस्पर्धी साक्षीदारांवर विश्वास ठेवण्यास न्यायालय राजी नव्हते आणि पुराव्यावर विचार करता तो निष्कर्ष चुकीचाच होता याबद्दल आमची खात्री झालेली आहे.

ब्राह्मणवास ग्रामपंचायतीला एका प्राथमिक शाळेसाठी रु. १,००० एवढी रक्कम देण्यात आली ही घटना, निवडणुकीपूर्वी एक किंवा सव्वा महिना अगोदरची होती. ही गोष्ट रामदत्तकरवी (पो.सा. २०) शाबीत करून घ्यायची होती. याचा पुरावा हा आहे की, निवडणूक विनंती अर्जदारा बरोबर रामदत्तची मैत्री होती आणि त्याने विनंती अर्जदारास त्याची मालमोटारही वापरायला दिलेली होती. शाळेच्या इमारतीला बऱ्याच दिवसापासून छप्परच नव्हते व मुलांना झाडाखाली बसावे लागत होते, ही गोष्ट लाच असल्याचे म्हणता येणार नाही अशी आमची खात्री झाली आहे.

बिबीपूर ग्रामपंचायतीला रु. २,५०० एवढी रक्कम देण्यात आल्याबद्दलचा कोणताही पुरावा नव्हता आणि आमच्यासमोरही कोणताही पुरावा सादर करण्यात आला नाही. म्हणून या मुद्यावर निवडणूक विनंती-अर्जदाराच्या विरोधात जाणारा रास्त असाच निर्णय करण्यात आला.

सामुहिक केंद्राच्या सुधारणेसाठी प्रत्येक केंद्रास रु. ५०० याप्रमाणे ४ रकमा देण्यात आल्या. या रकमा सौद्याचाच भाग म्हणून देण्यात आलेल्या असल्याचे सिद्ध करण्याचा जो प्रयत्न करण्यात आला तो उच्च न्यायालयात मान्य झालेला नव्हता. लजवाना कलानला दिलेल्या रकमेबाबत रामसिंग (पो. सा. १३) निवडणूक विनंती-अर्जदाराचा मतदान प्रतिनिधी विद्वान न्यायाधीशांनी ज्याच्या बाह्य वर्तणूकीवर टीका केली तो श्री. फुला (पो. सा. १४) एक उमेदवार मंगेराम (पो. सा. १९) आणि दुसऱ्या एका उमेदवाराचा मदतनीस जयलाल (पो. सा. २१) या सर्वांचा साक्षीपुरावा होता यांचे साक्षीपुरावे स्वतःचेच त्यामधील किंवा अन्य उमेदवारामधील हितसंबंध असल्याने किंवा अंतर्गत विसंगती व दोष यामुळे खात्रीचे नसल्याचे आढळुन आले होते. आम्ही त्या साक्षी पुराव्याचे वाचन केलेले आहे आणि आमचे त्याबद्दल दुमत असल्याचे कोणतेच कारण नाही. प्रत्येकी रु. ५०० एवढ्या अन्य रकमांच्या प्रदानाबाबत ही प्रदाने त्या गावामध्ये सामुहिक केंद्रे नसल्याने गावकऱ्यांची मते मिळविण्यासाठीच धनक व वाल्मिकी सामूहिक केंद्रांना रकमा देण्यात आल्या. एवढा एकमेव आक्षेप घेण्यात आला होता. तथापि, या गावांमध्ये हरिजन वस्तीचे पाडे असल्याचे पुराव्यावरून दिसून येते. वस्तुतः विनंती-अर्जात व पुराव्यामध्ये या पाड्यांचाच सामूहिक केंद्रे म्हणून उल्लेख करण्यात आलेला आहे. उत्तरवादीची ही कृती भ्रष्ट प्रथेमध्ये मोडत नसल्याचे दिसून आले आणि पुरावा विचारात घेऊन आमचे मत उच्च न्यायालयाच्या मतांशी मिळतेजुळते असेच झालेले आहे.

** ** ** **

आमच्या मतानुसार लाचलुचपतीचा समावेश असलेली भ्रष्ट प्रथा कायद्यानुसार पूर्णपणे सिद्ध झाली पाहिजे. निवडणुकीत मत देण्यासाठी किंवा मत देण्यापासून अलिप्त राहण्यासाठी मतदाराला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे बक्षीस देण्याचे वचन हे पुराव्यात स्पष्टपणे दाखवले पाहिजे. याबाबत एखाद्या मंत्र्याची परिस्थिती अवघड आहे. जेव्हा त्याची निवडणूक नियत झाली असेल तेव्हा तो आपले काम करण्याचे सोडू शकत नाही. जनतेची गाऱ्हाणी सोडवणे हे त्याला आवश्यक असते. अन्यथा निवडणुकीत त्याचा पराजय होतो. त्याला जनतेसमोर प्रशासनाची प्रतिमा उजळ करायची असते. जर त्याची प्रत्येक अधिकृत कामे त्याने सद्भावनेने केलेल्या कामाचा अर्थ विपरीत करण्यात येत असेल आणि त्याच्या कृतीमधून विपरीत अर्थ काढला जात असेल तर त्याचा अर्थ प्रशासन हे आवश्यकपणे ठप्प होणे असाच होणार. हरियाणा राज्य १ नोव्हेंबर १९६६ रोजी अस्तित्वात आले. निवडणूक नजिकच्या भविष्यकाळात असल्याने राजकीय पक्षाला सार्वजनिक स्वरूपाची कामे करावी लागत होती. सामूहिक विकास प्रकल्पासाठी स्वेच्छा अनुदाने देणे आणि सार्वजनिक गाऱ्हाणी तात्काळ दूर करणे हा सार्वत्रिक योजनेचा एक भाग झाला होता. ही रक्कम तीन महिन्यात खर्च करणे आवश्यक होते. यासाठी मंत्र्याच्या उपविभागाने वारंवार सहमती व दुय्यम अधिकाऱ्यांनी शिफारस केलेली होती. या कारणांमुळे पाण्याच्या पुरवठ्यात सुधारणा करण्याबाबतच्या आदेशासंबंधात जोराची मागणी करण्यात आली नाही. पहिल्या प्रतिवाद्याच्या विरुद्ध त्याचा अर्थ लावणे हे शक्य नव्हते. म्हणून पैशाची वाटणी करण्याच्या मुद्यावर जोर देण्यात आला. पैसे थेट मतदारांना देण्यात आले नाहीत तर पंचायतीस आणि आम जनतेस देण्यात आले. ही रक्कम ज्याच्या भल्यासाठी वापरावयाची होती तीच बाब उमेदवाराच्या विरोधात गेली. असा कोणताही पैसा वापरण्यात आला नसला तरी त्याची मागणी पुढे रेटण्यासाठी त्याचा परिणाम झाला होता. ही एक अपरिहार्य बाब होती यात कोणताही संशय नाही. परंतु चांगल्या प्रशासनामुळे लोकांच्या परिस्थितीत बदल झाला. म्हणून भ्रष्ट प्रथेचा वापर करण्यात येत होता असे आपण म्हणू शकत नाही. मंत्र्याने मतासाठी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे सौदा केला याबाबत चांगला पुरावा असेल तर त्याचा परिणाम वेगवेगळा असू शकेल परंतु असा कोणताही पुरावा नव्हता.

पहिल्या प्रतिवादीची कृती निर्दोष नाही असे सांगण्याचा या खटल्यात आम्ही निर्णय दिला तरी शासनाची प्रवृत्ती ही स्त्युत्य नाही असे म्हणण्यास आम्हास भाग पडत आहे. निवडणूक ही अशी एक बाब आहे की, ती न्याय्य रीतीने पार पाडण्यात आली पाहिजे. सार्वजनिक हितासाठी निवडणुकीच्या आधी निरनिराळ्या मतदार संघात रकमा खर्च करण्याची व्यवस्था करणे ही बाब एक भ्रष्ट प्रथा नसली तरी अनिष्ट प्रथा आहे. अनिष्ट प्रथा आणि

भ्रष्ट प्रथा यामध्ये एक छोटीशी विभेदक प्रणाली आहे. एक गोष्ट ध्यानात घेतली पाहिजे की, केवळ निवडणुका तोंडावर आल्या असताना सार्वजनिक हित साधण्यासाठी शक्ती खर्च न करता त्याच्या बऱ्याच आधी असे सार्वजनिक हित साधण्यासाठी शक्ती खर्च करण्यात आली पाहिजे, आणि एखादा छोटासा पुरावा या अनिष्ट प्रथेचे भ्रष्ट प्रथेत रुपांतर करू शकेल. निवडणुका तोंडावर आल्या असताना स्वेच्छा निधीतून प्रदाने करण्याचे टाळण्यात आले पाहिजे.

** ** ** **

सही/-

एम. हिदायतुल्ला, न्यायाधीश

सही/-

के. एस. हेडगे, न्यायाधीश.

नवी दिल्ली
फेब्रुवारी ०७, १९६८.

## अनुदेश क्रमांक ६५

कॅबिनेट सचिव, सचिव, योजना कार्यान्वयन विभाग आणि सर्व राज्ये व संघराज्यक्षेत्रांचे मुख्य सचिव/मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/७/२००४-पीएलएन-तीन, दिनांक २९ फेब्रुवारी २००४.

**विषय.—** लोकसभा आणि आंध्रप्रदेश, कर्नाटक, ओरीसा व सिक्कीम या राज्यांच्या विधानसभांच्या सार्वत्रिक निवडणुका :—खासदार/आमदार यांच्या स्थानिक क्षेत्र विकास योजने अंतर्गत निधी देणे.

मला आयोगाच्या दिनांक २९ फेब्रुवारी २००४ च्या प्रसिद्धी पत्रकास संदर्भित करण्याचे निर्देश आहेत, ज्यामध्ये, आयोगाने राजकीय पक्ष आणि उमेदवारांच्या मार्गदर्शनासाठी आदर्श आचार संहितेची कार्यपद्धती घोषित केली होती.

२. खासदारांच्या स्थानिक क्षेत्र विकास योजनेअंतर्गत निधीचे वितरण ही बाब विचारात घेऊन आयोगाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे—

एक. निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत देशाच्या कोणत्याही भागात खासदारांच्या (राज्यसभेच्या नामनिर्देशित सदस्यांसह) स्थानिक क्षेत्र विकास निधीअंतर्गत नव्याने निधीचे वितरण करण्यात येऊ नये. त्याचप्रमाणे, निवडणूक प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत विधानसभा सदस्य/विधानपरिषद सदस्य यांच्या स्थानिक क्षेत्र विकास निधी योजनेअंतर्गत, जर अशी कोणतीही योजना कार्यन्वित असल्यास, नव्याने निधीचे वितरण करण्यात येऊ नये.

दोन. हे पत्र जारी होण्यापूर्वी ज्याचे कार्यादेश जारी करण्यात आले होते, परंतु प्रत्यक्ष जागेवर कामास सुरूवात झालेली नाही असे काम सुरू करण्यात येऊ नये. ही कामे निवडणूक प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सुरू करता येतील.

तीन. तथापि, जर कामास प्रत्यक्षात सुरूवात झालेली असेल, तर ते सुरू ठेवता येईल.

संबंधित अधिकाऱ्यांच्या संपूर्ण समाधानाच्या अधीन राहून, पूर्ण झालेल्या कामांची देयके अदा करण्यास कोणताही प्रतिबंध असणार नाही.

# ए-३—मंत्र्यांचे दौरे

## अनुदेश क्रमांक ६६

सर्व राज्यांचे व संघराज्यक्षेत्रांचे मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/ईएस ००२५/९४/एमसीएस, दिनांक २१ ऑक्टोबर १९९४.

**विषय.—** निवडणूक कालावधी – मंत्र्यांचे दौरे

निवडणूक आयोगाने, त्यांच्या पत्र क्रमांक ४३७/६/९३-पीएस-दोन दिनांक ३१ डिसेंबर १९९३ अन्वये, निवडणूक कालावधी प्रचार, निवडणूक कार्य किंवा निवडणुकींशी संबंधित प्रवास यांसाठी शासकीय वाहनांचा वापर करण्यावर संपूर्ण आणि निरपवादपणे बंदी असल्याचा पुनरूच्चार केला होता आणि निवडणुकीशी संबंधित असलेल्या कोणत्याही प्रयोजनाकरिता, कोणत्या राजकीय पक्षाने, उमेदवाराने किंवा निवडणुकीशी संबंधित असलेल्या कोणत्याही व्यक्तीने, कोणत्याही वाहनाचा वापर करण्यावर पूर्णतः बंदी असेल असे निर्देश दिले होते.

२. आयोगाने, त्यांचे पत्र क्रमांक ४३७/६/९४ दिनांक २ फेब्रुवारी १९९४ यान्वये, निवडणूक प्रचाराशी संबंधित असलेल्या मंत्र्यांच्या दौऱ्याबाबतच्या गृह कार्य मंत्रालयाच्या परिपत्रक क्रमांक १०/१७/८९-एम व जी दिनांक १ नोव्हेंबर १९८९ कडे लक्ष वेधले होते आणि हे अनुदेश बेधडकपणे उडवून लावण्यात आल्याचे निरीक्षण नोंदवले होते आणि म्हणून, वर निर्दिष्ट केलेल्या गृहकार्यमंत्रालयाच्या दिनांक १ नोव्हेंबर १९८९ च्या पत्रातील अनुदेशांना आधिभावी न होता, त्यात फेरबदल न करता किंवा बाधा न करता, पुढील अनुदेश दिले होते.

३. सर्वोच्च न्यायालयाने, तामिळनाडूच्या मुख्यमंत्र्यांच्या बाबतीत सूट देण्याची मागणी करणारी रिट याचिका (दिवाणी) क्रमांक १९९४ चा ३१२ (तामिळनाडू राज्य-विरुद्ध-मुख्य निवडणूक आयुक्त व इतर) यामध्ये दिलेल्या आपल्या दिनांक २९ एप्रिल १९९४ च्या आदेशात, पुढीलप्रमाणे निदेश दिले होते :—

> “ निवडणूक प्रक्रीयेतील स्वच्छतेची सुनिश्चिती करण्यासाठी आणि मुक्त व निःपक्ष मतदानांच्या सुरक्षेसाठी व सुनिश्चिती करण्याकरिता निवडणूक आयोगाकडून केले जात असलेले प्रयत्न आम्ही जाणून घेत असताना, दहशतवादी आणि अतिरेकी कारवाया व काही राजकीय व्यक्तींच्या जीवाला असलेला धोका विचारात घेता, ज्यांना उच्च दर्जाची सुरक्षा आवश्यक आहे अशा काही राजकीय व्यक्तींच्या सुरक्षाविषयक गरजांकडे निवडणूक आयोग, दुर्लक्ष करू शकत नाही. परंतु, या ठिकाणी तसे होत असल्याचे दिसते याचा आम्हाला खेद वाटतो. निवडणूक आयोगाने केल्याप्रमाणे फक्त देशाच्या पंतप्रधानांपुरतीच सुरक्षा मर्यादित करणे, आणि आयोगाच्या ३१ मार्च १९९४ च्या पत्रातून दिसून आल्याप्रमाणे, इतर सर्वांना ती नाकारणे, यातून समस्येचा योग्य बोध किंवा आकलन झाले असल्याचे दिसून येत नाही. सर्वच प्रसंगात, निवडणूक आयोगाने, सांविधिक तरतुदींची नोंद घ्यायला हवी. तथापि, आम्हाला एक बाजू स्पष्ट केली पाहिजे, की, निवडणूक प्रक्रियेचे पावित्र्य राखण्यासाठी निवडणूक आयोगावर असलेली जबाबदारी व दायित्वे यांचा विचार करता, कायद्यांन्वये तामिळनाडू विशेष सुरक्षा गटाच्या संचालकांनी केलेली सुरक्षाविषयक आवश्यकतांची निर्धारणे उघडपणे आणि बेसुमारपणे इतकी अत्याधिक स्वरुपाची आहेत की जी अप्रत्यक्षपणे पक्षाभिनिवेशी निवडणूक विषयक हितसंबंधांना बढावा देण्यासारखी आहेत असा संशय घेण्यास आयोगास जागा असेल तर, यथोचित सुधारात्मक उपाययोजना करण्यासाठी असे प्रकरण राज्य शासनाच्या निदर्शनास आणून देण्यास निवडणूक आयोग मुक्त आहे. ”

४. मंत्रिमंडळ सचिवालयाने, आपल्या पत्र क्रमांक १०/२२/०९४. इएस, दिनांक ३/५ मे १९९४ यामध्ये असे अनुदेश दिले होते की, विशेष सुरक्षा गट अधिनियम, १९८८ च्या तरतुदींअन्वये, पुढील व्यक्तींच्या निकट सुरक्षेसाठी संरक्षणाची तरतूद केली आहे :—

(एक) पंतप्रधान आणि त्यांच्या लगतच्या कुटुंबातील सदस्य ;

(दोन) कोणतेही भूतपूर्व पंतप्रधान किंवा त्यांच्या लगतच्या कुटुंबातील सदस्यांना, भूतपूर्व पंतप्रधानांनी, पंतप्रधान पद धारण करण्याच्या समाप्त केल्याच्या दिनांकापासून ५ वर्षांच्या कालावधीपर्यंत.

५. सर्वेच्च न्यायालयाचा वरील आदेश विचारात घेता, आयोगाने दिनांक ८ मे १९९४ च्या समक्रमांकाच्या पत्रातील परिच्छेद ६ द्वारे आपल्या पत्र क्रमांक ४३७/६/९३ पीएस-दोन दिनांक ३१ डिसेंबर १९९३ चा परिच्छेद ३ बदलला होता त्यात असे म्हटले आहे की, “ आयोगाने असे ठरविले की, आपल्या वरील संदर्भित परिपत्रक क्रमांक ४३७/६/९३-पी- दोन दिनांक ३१ डिसेंबर १९९३ च्या परिच्छेद ३ ऐवजी पुढीलप्रमाणे परिच्छेद दाखल करण्यात येतील :—

३(क) वरील परिच्छेद २ मध्ये नमूद केलेल्या प्रतिबंधामधून फक्त पंचप्रधानाचा आणि दहशतवादी व अतिरेकी कारवांया आणि राजकीय व्यक्तींच्या जीवास असणारा धोका लक्षात घेता, ज्यांना उच्च दर्जाची सुरक्षा व्यवस्थेची आवश्यकता आहे आणि ज्यांच्या सुरक्षाविषयक आवश्यकतांचे नियमन, याबाबतीत संसदेने किंवा राज्य विधानमंडळाने केलेल्या सांविधिक तरतुदींद्वारे केले जाते अशा राजकीय व्यक्तींचा अपवाद करण्यात येईल.

३(ख) निवडणूक प्रक्रियेचे पावित्र्य राखण्याची सुनिश्चिती करण्याच्या त्याच्या जबाबदाऱ्या व दायित्वे विचारात घेऊन आयोगास असे स्पष्ट करावेसे वाटते की, वर निर्दिष्ट केलेल्या विशेष अधिनियमितींन्वये किंवा शासनाच्या इतर कोणत्याही विशेष अनुदेशांन्वये प्राधिकरणांनी करण्यात केलेले सुरक्षाविषयक आवश्यकतांची निर्धारणे, उघडपणे किंवा बेसुमारपणे इतकी अत्याधिक स्वरुपाची, आहेत की जी अप्रत्यक्षपणे पक्षाभिनिवेशी निवडणूक विषयक हितसंबंधांना बढावा देण्यासारखी आहेत असा संशय घेण्यास आयोगास जागा असेल तर, यथोचित सुधारात्मक उपाययोजना करण्याकरिता, आयोग, असे प्रकरण, केंद्र सरकारच्या आणि/किंवा यथास्थिती, राज्य शासनाच्या निदर्शनास आणून देईल.

३(ग) ही गोष्ट साध्य करण्याकरिता, आयोग, अशा कोणत्याही व्यक्तींच्या बाबतीत केलेल्या सुरक्षाविषक आवश्यकतांच्या निर्धारणाच्या संबंधात केंद्र सरकारकडून किंवा संबंधित राज्यशासनाकडून कोणतीही माहिती मागवू शकेल. संबंधित शासनाद्वारे अशी माहिती, तात्काळ आयोगास सादर करण्यात येईल. ”

६. आयोगाने आपल्या पत्र क्रमांक ४३७/६/९४ दिनांक १४ मे १९९४ मध्ये आणखी असेही सप्ष्ट केले होते की, सर्व राज्यशासनांनी आणि संघ राज्य क्षेत्राच्या प्रशासनाने, सर्वेच्च न्यायालयाच्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करावे अशी विनंती आहे. याशिवाय, सांविधीक अधिकाराखाली किंवा अन्य अधिकारांखाली काढलेल्या व्यक्तींच्या सुरक्षेच्या संबंधातील आदेशांचा, संपूर्णपणे सन्मान केलाच पाहिजे.

७. आयोग आणखी असेही निदेश देत आहे की, जेव्हा अशा व्यक्ती, निवडणूक कार्यासाठी व निवडणुकीशी संबंधित असलेल्या कामांसाठी, राज्यास मतदारसंघास भेट देतात तेव्हा, सुरक्षाविषयक अडथळे/व्याख्यानपीठ, इत्यादींसारख्या सुरक्षाव्यस्थांवर केलेला खर्च, संबंधित राजकीय पक्षांकडून सोसण्यात येईल.

## अनुदेश क्रमांक ६७

मुख्य सचिव (सर्व राज्ये व संघराज्यक्षेत्रे) यांना उद्देशून लिहिलेले व मुख्य निवडणूक अधिकारी (सर्व राज्ये व संघराज्य क्षेत्रे) यांना पुनःप्रेषित केलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/९६/पीएलएन-तीन/दिनांक १७ जानेवारी १९९६.

**विषय.—** सार्वत्रिक निवडणुका – मंत्र्यांचे दौरे.

मला असे कळविण्याचे निदेश आहेत की, गृह कार्य मंत्रालय, भारत सरकार यांनी, आपल्या परिपत्रक क्रमांक १०/१७/८९-एम व जी, दिनांक १ नोव्हेंबर १९८९ या अन्वये, निवडणूक प्रचाराशी संबंधित असलेल्या मंत्र्यांच्या दौऱ्याबाबतच्या आपल्या अनुदेशांचा सारसंग्रह उद्धृत केला आहे. या अनुदेशांमध्ये इतर गोष्टींबरोबरच, निवडणुकीच्या कालावधीत भारत सरकारच्या मंत्र्यांच्या शासकीय व खाजगी दौऱ्यांबाबत, विशेषतः असे दौरे, सर्वसाधारपणे परस्परव्याप्त असतात या वस्तुस्थितीच्या संदर्भात, स्वतंत्रपणे पालन करण्याच्या काही विशिष्ट औपचारिकता निर्धारित केल्या आहेत. गृहकार्य मंत्रालयाच्या, दिनांक १ नोव्हेंबर १९८९ च्या उपरोल्लिखित परिपत्रकाची प्रत, जोडपत्र-१ येथे जोडलेली आहे.

२. निवडणूकविषयक कालावधीमध्ये केंद्र सरकारच्या आणि ज्या राज्यामध्ये निवडणुका घेण्यात येत आहे त्या राज्याच्या तसेच ज्या राज्यांचे मंत्री, निवडणुका असणाऱ्या राज्यांना भेट देतात अशा अन्य काही शेजारच्या व अन्य राज्यांच्या शासनाच्या असा दोन्हीही मंत्र्याद्वारे गृह कार्य मंत्रालयाच्या उपरोक्त अनुदेशांचे पालन करण्यात येत असल्याबाबत आयोग बारकाईने लक्ष ठेवीत आहे. गृह मंत्रालयाच्या उपरोक्त आदेशांचे, ते मोघम, अनेकार्थी आणि मुक्त स्वरूपाचे असल्याने, त्यांची अनिर्बंधपणे अवज्ञा केली जात आहे आणि निवडणूक कालावधी दरम्यान जोपासणे व जतन करणे अत्यावश्यक असलेल्या उच्च सर्वजनिक पदस्थ व्यक्तींच्या निःपक्ष अशी प्रतिमेचा ढळढळीतपणे अनादर करून गैरवापर होत असल्याने, केवळ तत्वतः व शब्दशः नव्हे तर, निवडणूक प्रक्रियेतील पावित्र्य राखण्याच्या आणि केंद्र व राज्यशासन या दोहोतील विशेष अधिकार असलेल्या सत्ताधारी पक्षाच्या चातुर्यपूर्ण डावपेचांपासून, मतदारांनी बजावयाचा मताधिकारांचा मुक्त हक्क अलग ठेवण्याच्या दृष्टीने देखील पालन करण्यासाठी, आयोग भाग पाडीत आहे.

३. अलिकडील वर्षांमध्ये आयोगाने अधीक्षण केलेल्या निवडणुकांमध्ये, केंद्रातील आणि काही राज्यातील सत्ताधारी पक्षाचे सदस्य या नात्याने, मंत्र्यांनी, त्यांच्या अधिकारात पक्षांच्या निवडणूक प्रचारातील सहभागाच्या छुप्या उद्देशाने, शासकीय कार्यक्रमांचे संनियंत्रणाकरिता शासकीय दौरे करण्याच्या वरकरणी प्रयोजनार्थ, अतिथिगृहे आणि तत्सम शासकीय पायाभूत सुविधा यांसह शासनाच्या मालकीच्या यंत्रणेचा गैरवापर केला आहे असे प्रतिपादन करतांना, आयोगास दुःख वाटते. असे मंत्री, वर वर्णन केलेल्या " शासकीय " दौऱ्यांच्या वेळी त्यांच्या राजकीय पक्षाच्या कार्यकर्त्यांना जाणूनबुजून सोबत घेतात.

४. आयोगाने गंभीर आक्षेपासह असे देखील प्रतिपादन केले आहे की, ज्यांनी निवडणुका घेण्याशी असलेली सांविधानिक व इतर कामे देखील पार पाडावयाची असतात अशा जिल्हा प्रशासनाच्या व राज्य शासनाच्या स्थानिक अधिकाऱ्यांना, प्रशासकीय व सुरक्षा व्यवस्थांच्या नावाने, अशा मंत्र्यांची सेवा करणे भाग पडते, त्यामुळे, निवडणुकीशी संबंधित असलेल्या अधिकाऱ्यांच्या निःपक्षपातीपणावर जे खचितच जासतीत जास्त स्वतंत्र असले पाहिजे, आणखी संशय निर्माण होतो.

५. वरील परिस्थितीमध्ये, आयोगाने संविधानाच्या अनुच्छेद ३२४ च्या आधारे त्याच्याकडे निहित असलेल्या पूर्ण अधिकारांचा आणि याबाबतीत त्याला समर्थ करणाऱ्या इतर सर्व अधिकारांचा वापर करून, निःपक्ष व मुक्तपणे मतदान घेण्याच्या दृष्टीने त्यांचे स्वतःचे निदेश देण्याचे ठरविले आहे.

६. आयोगाचे अनुदेश वर निर्दिष्ट केलेल्या गृह कार्य मंत्रालय, भारत सरकार क्रमांक १०/१७/८९-एम ॲन्ड जी, दिनांक १ नोव्हेंबर १९८९ च्या अनुदेशांवर, कोणत्याही प्रकारेअधिभावी ठरणार नाहीत. त्यात फेरबदल करणार नाहीत किंवा त्यास बाधा करणार नाहीत. आयोग, त्याच्या आधीच्या अनुदेशांचे अधिक्षण करून पुढीलप्रमाणे निदेश देत आहे :—

६.१ यापुढे, एकतर केंद्राचा किंवा राज्य शासनाचा कोणताही मंत्री आयोगाद्वारे जेथून निवडणुकांची घोषणा करण्यात आलेली आहे अशा कोणत्याही मतदार संघात निवडणुकांची घोषणा केल्याच्या प्रारंभापासून ते निवडणूक प्रक्रिया समाप्त होईपर्यंतच्या कालावधीमध्ये शासकीय भेट देणार नाही.

६.२ आयोग असेही निदेश देत आहे की, कोणताही मंत्री ज्यामध्ये कोणत्याही निवडणुका घोषित करण्यात आलेल्या आहेत त्या मतदारसंघाच्या किंवा राज्याच्या संबंधातील कोणत्याही निवडणूक अधिकाऱ्यास अशा मतदारसंघामध्ये निवडणुकांची घोषणा केल्याच्या प्रारंभापासून ते निवडणूक प्रक्रिया समाप्त होईपर्यंतच्या कालावधीत, कोणत्याही शासकीय चर्चेसाठी उपरोक्त मतदारसंघाच्या बाहेरी एखाद्या ठिकाणी किंवा कार्यालयात किंवा विश्रामगृहात बोलावणार नाही.

६.३ जेव्हा एखादी मंत्री संबंधित विभागाचा प्रभारी मंत्री या क्षमतेत, किंवा मुख्यमंत्री, एखाद्या मतदारसंघात कायदा व सुव्यवस्था राखण्यात निष्फळ ठरणे किंवा नैसर्गिक आपत्ती किंवा ज्यामुळे असा मंत्र्यांची/मुख्यमंत्र्यांची देखरेखकारी परीक्षण नुकसान सहायता या व यांसारख्या विशिष्ट प्रयोजनासाठी वैयक्तिक उपस्थितीची आवश्यकता आहे अशी कोणतीही आणिबाणीची परिस्थिती यासंबधात, शासकीय भेट देतो, किंवा मतदारसंघाच्या बाहेरील ठिकाणी या मतदारसंघाच्या निवडणुकांशी संबंधित असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यांना बोलावतो तेव्हाच केवळ या अनुदेशांचा अपवाद असेल.

७. असे स्पष्ट करण्यात येते की, मंत्री त्यांच्या निवासस्थानाच्या ठिकाणापासून ते कार्यालयीन कामासाठी त्यांच्या कार्यालयापर्यंत तेथील मुख्यालयांमधील त्यांच्या शासकीय वाहनांचा वापर करण्यास हक्कदार आहेत, परंतु अशा प्रवासाची कोणत्याही निवडणूक कार्याशी किंवा कोणत्याही राजकीय कार्यक्रमाशी सांगड घालण्यात येणार नाही.

८. या अनुदेशांच्या कोणत्याही भंगामुळे केवळ आदर्श आचारसंहितेचेच नव्हे तर लोकांच्या खऱ्याखुऱ्या निवडीचे प्रतिबिंब उमटणाऱ्या शांततापूर्ण, निपक्ष व मुक्त वातावरणातील मतदानाची सुनिश्चिती करण्यासाठी त्यास आवश्यक वाटतील असे अनुदेश प्रख्यापित करण्याच्या आयोगाच्या प्राधिकाराचे देखील मोठ्या प्रमाणात उल्लंघन असल्याचे समजण्यात येईल. आणि यांमुळे विशिष्ट परिस्थितीच्या गुणावगुणांवरून आयोगाला उचित वाटत असेल त्या प्रमाणे गंभीर परिणामांना तोंड द्यावे लागेल.

## अनुदेश क्रमांक ६८

सर्व राज्यांचे व संघराज्य क्षेत्राचे मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले दिनांक ५ एप्रिल २०११. भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/आयएनएसटी/२०१०-सीसी आणि बीई/खंड दोन.

**विषय.—** निवडणूक प्रचारासाठी वाहनांचा वापर सुरक्षेच्या कारणांस्तव पुरविलेली बुलेट-प्रुफ वाहने अनुदेशांसंबंधीत

मला उपरोक्त विषयांवरील आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/आयएनएसटी/२००९. सीसी व बीई, दिनांक २५ मार्च २००९ (प्रत सोबत जोडली आहे) कडे आपले लक्ष वेधण्याचा निदेश आहे.

२. सुरक्षेच्या कारणास्तव ज्यांना बुलेट प्रुफ वाहने पुरविण्यात आले आहेत असे राजकीय कार्याधिकारी जर असे वाहन पैसे भरून निवडणूक प्रचारासाठी वापरत असतील तर, अशा वाहनासह प्रवास करण्यासाठी इतर व्यक्तींना देखील परवानगी असू शकेल किंवा कसे यासंबंधी स्पष्टीकरण मागविणारा निर्देश आयोगास प्राप्त झाला आहे.

३. आयोगाकडून ही बाब विचारात घेण्यात आली आहे. आयोगाने असे ठरविले आहे की, ज्याना बुलेट प्रुफ वाहन पुरविले आहे व त्यासाठी ज्याच्याकडून किंवा त्याच्या पक्षाकडून रक्कम प्रदान करण्यात येत आहे. व्यक्ती, असा कोणताही राजकीय कार्याधिकारी किंवा उमेदवार यांसह अन्य कोणत्याही व्यक्तीस झेड प्लस दर्जाच्या राजकीय कार्याधिकाऱ्यांसोबत प्रवास करण्यासाठी कोणतीही हरकत असणार नाही.

४. आणखी असेही स्पष्ट करण्यात येते की, बुलेट-प्रुफ मोटार वाहन (कार) पुरविलेला राजकीय कार्याधिकारी हा, लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७(१) च्या स्पष्टीकरणानुसार, प्रमुख प्रचारक (स्टार प्रचारक) असेल तेव्हा, बुलेट प्रुफ मोटार वाहन (कार) वापरण्यावरील खर्च हा कोणत्याही उमेदवाराने केलेला किंवा प्राधिकृत केलेला खर्च असल्याचे मानण्यात येणार नाही.

५. तथापि, जर असा राजकीय कार्याधिकारी हा प्रमुख प्रचारक (स्टार प्रचारक) नसेल तर, बुलेट-प्रुफ मोटार वाहनाचा (कार) वापर करण्यावरील खर्च ज्यांच्या निवडणूक प्रचारासाठी अशा मोटार वाहनाचा (कारचा) वापर केला आहे. त्या उमेदवाराच्या (उमेदवारांच्या) हिशेबात (हिशेबांत) समाविष्ट होईल.

## अनुदेश क्रमांक ६९

सर्व राज्यांचे व संघराज्यक्षेत्रांचे मुख्य मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले भारताच्या निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/आयएनएसटी/२००९-सीसी आणि बीई, दिनांक १८ फेब्रुवारी २००९.

**विषय.—** आदर्श आचार संहिता—लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ याचे तत्वतः व अक्षरशः अनुपालन यासंबधीत निवडणूक कार्याच्या संबंधात आदर्श आचार संहिता, निवडणूक कायदा, भारतीय दंड संहिता, इत्यादीच्या तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्यासंबंधी, सर्वच्या मान्यताप्राप्त राष्ट्रीय व राज्य राजकीय पक्षांना पाठविलेल्या स्वयंस्पष्ट पत्राची प्रत, सोबत जोडली आहे.

२. यासंदर्भात, आयोगाने असे निदेश दिले आहे की, मुख्य निवडणूक अधिकारी/जिल्हा निवडणूक अधिकारी/निर्वाचन अदिकारी/निरीक्षक यांनी एक पुढील कारवाई करण्याची आवश्यकता आहे :—

(एक) कलम ७७(१) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या नेत्यांनी, प्रमुख प्रचारकांनी (स्टार प्रचारकींनी) प्रचार माोहिमेचे काटेकोरपणे पालन करावे. कोणत्याही मान्यताप्राप्त पक्षाने उभ्या केलल्या उमेदवाराने किंवा प्रमुख प्रचारकाने, (स्टार प्रचारकाने) प्रचार माोहिमेच्या कालावधीत कोणताही भंग केल्यास ही बाब, आयोगाला न चूकता कळविण्यात यावी, आयोगाच्यास्तरावर तात्काळ अनुवर्ती कारवाई करण्यासाठी जेणेकरून केलेल्या कारवाईस आवश्यक ती दृश्यमानता प्राप्त होईल.

(दोन) मुख्य निवडणूक अधिकारी व जिल्हा निवडणूक अधिकारी, विविध उमेदवारांनी व विविध राजकीय पक्षाच्या प्रचारकांनी केलेल्या आचारसंहितेच्या भंगाच्या घटनांचा मागोवा घेण्यासाठी पक्षनिहाय नोंदवही ठेवतील. उमेदवारांची, प्रचारकाची व राजकीय पक्षाची नावे, संहिता भंगाचे संक्षिप्त वर्णन, भंग केल्याचा दिनांक, केलेली अनुवर्ती कारवाई, निवडणूक अधिकाऱ्याने/आयोगाने दिलेले कोणतेही असल्यास, आदेश, नमूद करणाऱ्या दैनिक नोंदवहीच्या स्वरूपात हे करावे.

(तीन) वरील दस्तऐवज (भंग निर्देशांक) जनतेसमोर देखील ठेवावे, म्हणजे प्रसारमाध्यमांसह इछुक पक्ष, ही माहिति घेऊ शकतील व यामुळे कोणताही संहिताभंगापासून उमेदवारांना व राजकीय पक्षांना अटकाव करण्याचे काम करता येईल.

३. हे अनुदेश राज्यातील जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांच्या व निर्वाचन अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावे, राजकीय पक्षांना उद्देशून लिहिलेल्या प्रत सोबत जोडलेल्या पत्राची नोंदणीकृत बिगर मान्यताप्राप्त पक्षांसह तुमच्या राज्यातील संघ राज्याक्षेत्रातील प्रत्येक मुळ राजकीय पक्षांना सुपूर्द करण्यात यावा. सर्व मान्यताप्राप्त राष्ट्रीय व राज्य राजकीय पक्षांना उद्देशून लिहिलेले भारताच्या निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/आयएनएसटी/२००८-सीसी व बीई, दिनांक १८ फेब्रुवारी, २००९.

**विषय.—** आदर्श आचारसंहिता–अक्षरशः तव तत्त्वतः अनुपालन, यासंबंधात

निवडणुका घोषित झाल्यावर तात्काळ राजकीय पक्ष व उमेदवार यांच्यासाठी आदर्श आचारसंहिता अंमलात येते. निवडणुकीदरम्यान, आदर्श आचारसंहितेच्या तरतुदींचे उल्लंघन केल्याच्या अनेक घटना निर्णयासाठी आयोगाकडे येतात. उल्लंघनांच्या या घटना वैयक्तिक कार्याधिकारी स्वतः उंमेदवारांशिवाय राजकीय पक्षांचे पुढारी यांच्याकडून घडल्याचे कळविण्यात येते. निवडणूक प्रचारमोहिमेत जातीचा धार्मिक संदर्भ असणे, चारित्र्य हनन करणे, निवडणूक प्रयोजनासाठी धार्मिक स्थानांचा वापर करणे, मतदारांना लाच देणे, इत्यादी ही उमेदवाराने व राजकीय पक्षांच्या प्रतीनीधींनी उल्लंघन केल्याबाबत कळविण्यात आलेल्या प्रकरणांपैकी काही नोहमीची प्रकरणे आहेत.

आदर्श आचारसंहितेचे किंवा कायद्याच्या तरतुदींचे उल्लंघन केल्याची प्रकरणे जेव्हा आयोगाच्या निदर्शनास आणून देण्यात येतात तेव्हा, आयोग, योग्य प्रकरणी, संबंधित व्यक्तीला नोटीस पाठविते, जर उल्लंघनाचा राजकीय पक्षांच्या महत्त्वाच्या पुढाऱ्यांशी कारण संबध जोडला गेला असेल तर, संबंधित राजकीय पक्षांना देखील अशा नोटीशी पाठविण्यात येतात. अशा बाबींमध्ये स्पष्टता व एकरूप आणण्यासाठी, आयोगाने ठरविले आहे की, भविष्यात पक्षाद्वारे योग्यरित्या उभ्या केलेल्या कोणत्याही उमेदवाराने, किंवा लोकप्रतिन्धित्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ च्या पोट-कलम (१) अन्वये स्पष्टीकरणे १ व २ अनुसार निवडणूक आयोग/मुख्य निवडणूक अधिकारी यांना पक्षाद्वारे ज्यांची नावे कळविण्यात आली आहेत, अशा राजकीय पक्षांच्या पुढाऱ्यांनी आदर्श आचारसंहिता किंवा कायद्याच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करण्याच्या प्रकरणी, कोणत्याही अशा पुढाऱ्याला किंवा राजकीय पक्षाच्या कोणत्याही उमेदवाराला नोटीस पाठविण्यात आली असेल तर संबंधित राजकीय पक्षालासुद्धा नोटीस

पाठविण्यात येईल. याची नोंद घेण्यात यावी की, " राजकीय पक्षाच्या प्रचार कार्यक्रमासाठी " पूर्वोक्त स्पष्टीकरणात्मक खंडान्वये, पुढाऱ्यांना राजकीय पक्षांनी नामनिर्देशित केले, म्हणून, अशा पुढाऱ्यांच्या कृती वा आकृतीसाठी संबंधित राजकीय पक्षाला जबाबदार धरणे केवळ संयुक्तिक व तर्कसंगत ठरेल यासंदर्भात, निवडणूक चिन्हे (राखीव व वाटप) आदेश, १९६८ याच्या परिच्छेद १६ क च्या तरतुदींकडेदेखील राजकीय पक्षांचे लक्ष वेधण्यात येत आहे.

वरील बाब विचारात घेता, सर्व राजकीय पक्षांना असा सल्ला देण्यात येत आहे की, त्यांनी आपण नामनिर्देशित केलेल्या पुढाऱ्यांना योग्य ती माहिती द्यावी जेणेकरून, अशा आदर्श आचार संहितेचे व कायद्याच्या तरतुदींचे, सर्व संबंधितांकडून अक्षरशः व तत्त्वतः पालन केले जाईल.

## अनुदेश क्रमांक ७०

कॅबिनेट सचिव, बारत सरकार, सर्व राज्ये व संघराज्य क्षेत्रांचे मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/२००७-पीएलएन-तीन, दिनांक २३ नोव्हेंबर, २००७.

**विषय.—** मंत्र्यांचे दौरे-सार्वत्रिक निवडणुका

**संदर्भ.—** (१) आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/९६/पीएलएन-तीन, दिनांक १७ जून १९९६.

(२) आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/९९/पीएलएन-तीन, दिनांक १५ जुलै १९९९.

(३) आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/४/२००३-पीएलएन-तीन, दिनांक १२ जानेवारी २००३.

आपणास असे कळविण्याचा मला आदेश आहे की, जेथे निवडणूका घेण्यात येत आहे किंवा घोषित करण्यात आली आहे व निवडणूकीच्या संबंधात आदर्श आचारसंहितेच्या तरतुदी अंमलात आणल्या आहेत तेथे त्या राज्याला (राज्यांना) मंत्र्यांनी जबाबदारी स्वीकारून भेटी द्याव्यात. आयोगाने, मुक्त व निःपक्ष निवडणूका पार पाडण्यासाठी जी पूर्वशर्त आहे ती म्हणजे सर्वांना समान संधी, याची खात्री करून घेण्यासाठी मंत्र्यांच्या अशा दौऱ्यांचे नियमन करण्याकिता वेळोवेळी, अनुदेश निर्गमित केले आहेत व असा दौरा करणाऱ्या प्रतिष्ठित व्यक्तींकडून निवडणुकीसंबंधीत कोणत्याही कार्यात, शासकीय यंत्रणा कोणत्याही मार्गाने, राबणार नाही याची खात्री करून घेण्यासाठी, विवक्षित मार्गदर्शक तत्त्वे विहित केली आहेत मार्गदर्शकतत्त्वे नरेंद्रकुमार गौर विरूद्ध भारताच्या निवडणूक आयोग या प्रकरणी दिनांक १६ ऑगस्ट १९९९ रोजीची १९९९ ची रिट याचिका क्रमांक ३३९ यामध्ये भारताच्या सर्वोच्च न्यायालयाने कायम ठोवलेली आहेत.

२ वरील संदर्भात नमूद केलेल्या पत्रांत अंतर्भूत असलेल्या आयोगाचे अनुदेश हे, सोयीचे होण्यासाठी पुढील परिच्छेदात एकत्रित करण्यात आले आहेत :—

(१) जर एखादा केंद्रीय मंत्री त्याच्या/तिच्या मुख्यालयापासून निव्वळ कार्यालयीन कामासाठी, निवडणूक घेण्यात येत असलेले राज्य/जिल्हा येथे प्रवास करीत असेल, जो सार्वजनिक हिताच्या दृष्टीने टाळता येऊ शकत नसेल, तर अशा अर्थाचे प्रमाणन करणारे पत्र, विभागाचे सचिव/भारत सरकारचे संबंधित मंत्रालय यांनी, मंत्री ज्या राज्याला भेट देणार आहेत त्या राज्याच्या मुख्य सचिवांना पाठवावे व त्याची एक प्रत आयोगाला पाठवावी. केंद्रीय मंत्र्यांनी निव्वळ कार्यालयीन भेट प्रस्तावित केली आहे व अशा दौऱ्यात कोणत्याही प्रकारचे कोणतेही राजकीय कार्य अभिप्रेत नाही अशी माहिती सचिवाकडून प्राप्त झाल्यावर, मुख्य सचिव, त्यांच्या अधिकृत दौऱ्यासाठी शासकीय वाहन व निवासव्यवस्था पुरविल व त्यांना अन्य नियमित शिष्टाचाराची वतर्णूक देईल. असे करताना, ज्यांच्यावर आदर्श आचरसंहितेची अंमलजावनी करण्यासह, राज्यातील निवडणूक कार्यक्रम संनियंत्रित करण्याचे कार्य सोपविण्यात आले आहे त्या राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला मुख्य सचिवामार्फत त्याबाबत आगाऊ सूचना देण्यात येईल.

आयोग, आपल्या मुख्य निवडणूक अधिकाराऱ्यांशी विचारविनिमय करून, अशा व्यवस्थेवर लक्ष ठेवील. अशी आशा आहे की, केंद्रीय मंत्री, त्यांच्या गृहराज्यांना, मतदारसंघ असलेल्या राज्यास व विशेषतः जेथून ते निवडणूका लढवित आहेत, त्या मतदारसंघाना, खाजगी भेटी देण्याची त्यांना मुभा असल्याने, शासकीय भेटी देण्याचे काळातील (पहा भारताचा निवडणूक आयोग अनुदेश क्रमांक ४३७/६/९९-पीएलएनतीन, दिनांक १५ जुलै १९९९).

(२) आयोग असेही निदेश देत आहे की,—–

(एक) राज्य शासनाचा कोणताही मंत्री, आयोगाद्वारे ज्या मतदार संघासाठी निवडणुका घोषित करण्यात आल्या आहेत अशा कोणत्याही मतदार संघाला निवडणुकांच्या घोषणेच्या प्रारंभापासून ते निवडणूक प्रक्रिया समाप्त होण्यापर्यंतच्या कालावधी दरम्यान शासकीय भेट देणार नाही.

(दोन) कोणताही मंत्री, ज्यामध्ये कोणत्याही निवडणुका घोषित झाल्या असतील अशा मतदार संघाच्या किंवा राज्याच्या निवडणुकीशी संबंधित असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला त्या निवडणुकांच्या घोषणेच्या प्रारंभापासून ते निवडणूक प्रक्रिया पूर्ण होण्यासह समाप्त होण्याच्या कालावधीमध्ये, कोणत्याही शासकीय चर्चेसाठी उपरोक्त संघातील किंवा त्याबाहेरील ठिकाणी किंवा कार्यालयात किंवा अतिथिगृहात बोलावणार नाही.

(तीन) कायदा व सुव्यवस्था बिघडल्याच्या किंवा नैसर्गिक आपत्ती किंवा ज्या परिस्थितीत देखरेखीचा आढावा घेण्याच्या बचाव कार्याच्या / सहाय्य करण्याच्या विशिष्ट प्रयोजनासाठी आणि अन्य तत्सम प्रयोजनांसाठी असा मंत्र्यांची मुख्यमंत्र्यांची वैयक्तिक उपस्थिती आवश्यक आहे अशी कोणतीही आपतकालीनची परिस्थिती उद्‌भवणे या संबंधात जेव्हा संबंधित विभागाच्या प्रभारी म्हणून त्याच्या क्षमतेत एखादा मंत्री, किंवा मुख्य मंत्री, एखादा मतदार संघाला शासकीय भेट देतो किंवा अशा मतदार संघाच्या निवडणुकीशी संबंधित असलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यांना त्या मतदार संघाच्या बाहेरील ठिकाणी बोलाविते तेव्हाच केवळ या अनुदेशांचा अपवाद राहील.

(३) असे स्पष्ट करण्यात येत आहे की, मंत्री, शासकीय कामासाठी, त्यांच्या निवासस्थानापासून ते त्यांच्या कार्यालयापर्यंत, त्यांच्या मुख्यालयातील त्यांच्या शासकीय वाहनांचा वापर करण्यास हक्कदार असतील, परंतु, अशा प्रवासाची कोणतेही निवडणुकविषयक कार्याशी किंवा ज्यामध्ये पक्ष कार्यालयाला भेट देण्याचा जरी ते मार्गवर असले तरीही, समावेश असेल अशा कोणत्याही राजकीय कार्याशी सांगड घालता येणार नाही. कोणताही मंत्री, त्याच्या/तिच्या निवडणूकविषयक भेटीमध्ये, जरी असा भेटीवर जाण्यासाठी राज्य प्रशासनाने त्याला त्याच्या सोबत सशस्त्र कर्माचाऱ्यांची उपस्थिती आवश्यक असणारे सुरक्षा कवच दिलेले असले तरी देखील त्याची उपस्थिती ठळकपणे दर्शविणारे कोणतेही पथदर्शक वाहन (वाहने) किंवा कोणत्याही रंगांचे संकेतदिप असेलेले मोटारवाहन (वाहने) किंवा कोणत्याही प्रकारांचे भोंगे बसविलेले वाहन (वाहने) यांचा वापर करणार नाही. (पहा. भारताच्या निवडणूक आयोग अनुदेश क्रमांक ४३७/६/९६/पीएलएन-तीन, दिनांक १७ जानेवारी १९९६).

(४) एकतर लोकसभा किंवा विधानसभा यापैकी कोणत्याही मतंदारसंघातील पोट-निवडणुकांमध्ये गंभीर आपत्कालीन परिस्थितीचा समावेश असणाऱ्या, वरील परिच्छेद २ (तीन) मध्ये नमूद केलेल्या अपवादांस अधीन राहून, मंत्र्यांच्या दौऱ्यांच्या संबंधात पुढील निर्बंध लागू असतील :—

(एक) सर्व मंत्री, मग ते केंद्रीय किंवा राज्यातील मंत्री असो, पोटनिवडणुकांची घोषणा झाल्यानंतर, त्यांच्या शासकीय दौऱ्यांची कोणत्याही रीतीने, निवडणूक कार्याशी सांगड घालणार नाही. त्यांचे शासकीय दौरे पूर्ण झाल्यानंतर, ते त्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी परत येतील. जेथे पोटनिवडणूका घेण्यात येत आहेत आणि जेथे आदर्श आचार संहिता लागू आहे अशा जिल्ह्यातील (जिल्ह्यांमधील) सर्व व कोणत्याही भेटी संपूर्णतः खाजगी स्वरूपाच्या असल्या पाहिजे आणि असा खाजगी भेटींची सुरुवात व शेवट, मंत्र्याच्या मुख्यालयात व्हायला हवा.

(दोन) जेव्हा शासकीय कामासाठी प्रवास करणारा मंत्री हा, जेथे पोटनिवडणूक घेण्यात येत आहे असा जिल्हा (जिल्हे), शासकीय भेटीवरील अन्य कोणत्याही जिल्ह्याच्या मार्गात येत असेल तेव्हा, अशा जिल्ह्यातून (जिल्ह्यामधून) प्रवास करीत असेल, तेव्हा असा प्रकरणी, त्याने /तिने, जेथे आदर्श आचार संहिता लागू आहे असा जिल्ह्यात (जिल्ह्यांमद्ये) थांबू नये व कोणत्याही राजकीय कार्यास उपस्थित राहू नये.

(तीन) जेथे पोटनिवडणूक घेण्यात येत आहेत अशा जिल्ह्याच्या (जिल्ह्यांच्या) कोणत्याही दर्जाच्या अधिकाऱ्यास, मंत्र्याने, कोणत्याही जिल्ह्यातील म्हणजेच जेथे निवडणुका घेण्यात येत नाहीत अशा अन्य जिल्ह्यामधील देखील कोणत्याही बैठकीस उपस्थित राहण्यासाठी बोलविणार नाही.

(चार) जेथे पोटनिवडणुका घेण्यात येत आहेत अशा मतदारसंघात त्याच्या खाजगी भेटीवर असताना, जो कोणताही अधिकारी, मंत्र्याची भेट घेईल असा अधिकारी संबंधित सेवा नियमांन्वये गैरवर्तणुकीबद्दल दोषी असेल ; आणि जर तो, लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ याच्या कलम १२९ (१) मध्ये नमूद केलेल्या पदावर असेल तर, त्याने त्या कलमाच्या सांविधिक तरतुदींचा भंग केला असल्याचेदेखील अतिरिक्तपणे समजण्यात येईल आणि त्याखाली तरतूद केलेल्या दंडात्मक कारवाईस तो पात्र असेल.

(पाच) कोणताही मंत्री, जेथे पोट निवडणूक घेण्यात येत आहे अशा मतदार संघाला त्याची/तिची खाजगी भेट देत असताना, जरी अशा भेटीवर जाण्यासाठी राज्य प्रशासनाने त्याला त्याच्यासोबत त्याच्या संरक्षणासाठी सशस्त्र कर्मचाऱ्यांची उपस्थिती आवश्यक असणारे सुरक्षाकवच दिलेले असले तरीदेखील, त्याची उपस्थिती ठळकपणे दर्शविणारे कोणतेही पथदर्शक वाहन (वाहने) किंवा कोणत्याही रंगाचे संकेतदिप असलेले वाहन (वाहने), किंवा कोणत्याही प्रकारचे भोंगे बसविलेले वाहन (वाहने) यांचा वापर करणार नाही. (पहा. भारताचा निवडणूक आयोग अनुदेश क्रमांक ४३७/६/४/२००३-पीएलएन तीन, दिनांक १२ जून २००३).

(५) आयोग आणखी असेही निदेश देत आहेत की, ज्याच्याकडे आदर्श आचारसंहितेची अंमलबजावणी करण्यासह राज्यातील निवडणूक कार्यक्रमांचे संनियंत्रण करण्याचे काम सोपविण्यात आले आहे अशा राज्याच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्याला जेथे पोटनिवडणूक घेण्यात येत आहे त्या जिल्ह्याला, राज्य शासनाच्या कोणत्याही मंत्र्याने किंवा कोण्त्याही केंद्रीय मंत्र्याने भेट देण्याचे प्रस्तावित केलेल्या कोणत्याही भेटीची माहिती जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याद्वारे आगाऊ स्वरूपात कळविण्यात येईल आणि मुख्य निवडणूक अधिकारी ही माहिती तात्काळ निवडणूक आयोगाला, कळवील. (पहा. भारताचा निवडणूक आयोग अनुदेश क्रमांक ४३७/६/४/२००३-पीएलएन तीन, दिनांक १२ जून २००३)

(३) या अनुदेशांच्या कोणत्याही भंगामुळे केवळ आदर्श आचारसंहितेचेच नव्हे तर जनतेची खऱ्याखुऱ्या निवडीचे प्रतिबिंब उमटणाऱ्या शांततापूर्ण, मुक्त व निःपक्ष मतदानाची सुनिश्चिती करण्यासाठी आवश्यक वाटतील असे आदेश प्रख्यापित करण्याच्या आयोगाच्या प्राधिकाराचे देखील मोठ्या प्रमाण असल्याचे समजण्यात येईल आणि विशिष्ट परिस्थितींच्या गुणावगुणांवरून आयोगाला उचित वाटेल अशी कारवाई करण्यात येईल.

# भारत सरकार

## गृह कार्य मंत्रालय

## कार्यालयीन ज्ञापन

**विषय.—** लोकसभेची सार्वत्रिकनिवडणूक. निवडणूक प्रचाराच्या संबंधातील मंत्र्यांचे निवडणूक दौरे.

खाली सही करणार याला असे सांगण्याचा आदेश आहे की, जेव्हा जेव्हा लोकसभेच्या निवडणुका घेण्यात येतात, तेव्हा तेव्हा, निवडणूक प्रचाराच्या संबंधात मंत्र्यांनी केलेल्या दौऱ्यांविषयी संसदेमध्ये न चुकता प्रश्न उपस्थित केले जातात. त्याच्या उत्तरात, सर्वसाधारण धोरण म्हणून नेहमी असे स्पष्ट केले जाते की, विद्यमान अनुदेशानुसार, निवडणूक प्रचाराशी संबंधित असणारे दौरे हे, शासकीय दौरे असल्याचे समजण्यात येणार नाहीत आणि शासकीय कार्यालयांची सेवा या, पक्षाच्या निवडणूक कार्यासाठी वापरता येऊ शकणार नाहीत. गृह कार्य मंत्रालयाने, निवडणूक दौऱ्यांसह अशासकीय प्रयोजनासाठी केलेल्या मंत्र्यांच्या दौऱ्यासंबंधी, वेळोवेळी, अनुदेश दिलेले आहेत. हे अनुदेश सारसंग्रहित करण्यात आले असून त्याची एक प्रत दिनांक ३१ जुलै, १९७० रोजी लोकसभेच्या पटलावर ठेवण्यात आली होती. लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका नोव्हेंबर १९८९ मध्ये नियत वेळेत घेण्यात येणार असल्याने, या अनुदेशांच्या सारसंग्रहाची एक प्रत, त्यातील मजकूर मंत्र्यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावा अशी विनंती करून त्यासोबत जोडण्यात आली आहे.

निवडणूक दौऱ्यासह अशासकीय प्रयोजनांसाठी घेण्यात येणाऱ्या मंत्र्यांच्या दौऱ्यासंबंधीचे अनुदेश, हे वेळोवेळी निर्गमित केलेल्या व पुर्निर्गमित केलेल्या कित्येक पत्रव्यवहारांमध्ये अंतर्भूत आहेत.

**सर्वसाधारण अनुदेश :**

(१) जोपर्यंत मंत्री पदाचा राजीनामा देत नाही तोपर्यंत तो सार्वजनिक कार्याचा प्रभारी असतो व त्यानुसार तो दौऱ्यांवर असला तरी देखील एकतर– मग तो शासकीय प्रयोजनासाठी असो किंवा खाजगी प्रयोजनांसाठी असो, त्याला मंत्री म्हणून अखंडपणे जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात म्हणून,–

(क) तो, या प्रयोजनासाठी आवश्यक असलेला किमान वैयक्तिक कर्मचारीवर्ग आपल्यासोबत घेऊ शकतो आणि असा कर्मचारीवर्ग, या नियमान्वये प्रवास व दैनिक भत्ता मिळण्यास हक्कदार असतो.

(ख) जेव्हा तो कोणत्याही ठिकाणी भेट देतो तेव्हा, जिल्ह्याच्या अधिकाऱ्यांनी, नियमित राजशिष्टाचार व सुरक्षा याची व्यवस्था केली पाहिजे.

(२) मंत्री, शासकीय प्रयोजनांसाठी करण्यात येणाऱ्याच्या म्हणजेच मुख्यालयाच्या ठिकाणी तो जी कर्तव्ये पार पाडू शकत नाही अशा कर्तव्यासाठी प्रत्यक्षपणे आवश्यक असलेल्या दौऱ्यांच्या बाबतीतच येणारे दौरे यांबाबतीत केवळ प्रवास व दैनिक भत्त्यांची मागणी करील. जर शासकीय दौऱ्यासोबत, पक्षकार्याचा समावेश असलेल्या मंत्र्यांच्या खाजगी कामाची सांगड घालण्यात आली असेल, तर आणि या प्रयोजनासाठी त्याला कोणताही अतिरिक्त प्रवास करावयाचा असेल तर तो, अशा अतिरिक्त प्रवासासाठी कोणताही प्रवासभत्ता मिळण्यास हक्कदार असणार नाही. जर मंत्री शासकीय दौऱ्यावर असताना, त्याने, त्याचा मुक्कामाचा कोणताही दिवस केवळ खाजगी कामासाठी व्यतित केला असेल तर, तो, तो दिवसासाठीचा दैनिक भत्ता मिळण्यास हक्कदार असणार नाही.

**निवडणूक दौऱ्यांशी संबंधित असणारे विशेष अनुदेश :**

(३) जेव्हा जेव्हा मंत्री त्याच्याद्वारे संबंधित केली जाणारी बैठक ही निवडणूक बैठक आहे असे ठरवील तेव्हा तेव्हा, त्याने, त्याच्या वतीने त्यासाठी अशासकीयरीत्या व्यवस्था करण्यास सांगावे आणि शासकीय कर्मचाऱ्यांद्वारे व्यवस्था करण्यास सांगू नये. निवडणूक दौऱ्यांमध्ये शासकीय बैठका क्वचितच घेण्यात येतील आणि सामान्यतः सार्वजनिक बैठकांना निवडणूक बैठका म्हणूनच समजण्यात यावे आणि कायदा व सुव्यवस्था राखण्याशी संबंधित असलेल्या खर्चाव्यतिरिक्त इतर सर्व खर्च, खाजगीरीत्या करण्यात यावा.

(४) निवडणूक बैठकांच्या ठिकाणी शासकीय कर्मचाऱ्यांची भूमिका ही, कायदा व सुव्यवस्था राखण्यापुरती आणि मंत्र्यांना नियमित संरक्षण देण्यापुरती मर्यादित असावी.

(५) ज्या प्रवासांचा मुख्य उद्देश हा निवडणूक प्रचार हा असेल, अशा प्रवासासाठी, मंत्र्यांनी कोणत्याही प्रवास खर्चाची किंवा दैनिक भत्त्यांची मागणी करून नये. मतदानाच्या पूर्वीच्या काही आठवड्यांसाठी, दौऱ्यावर असलेल्या मंत्र्यांचे कार्यक्रम हे, त्यांच्या, शासकीय कर्तव्यापेक्षा अधिक निवडणुकीशी संबंधित असतात असे गृहित धरता येईल.

(६) एखाद्या मंत्र्याने नामनिर्देशन पत्र भरण्यासाठी केलेला प्रवास व त्यानंतरचे त्याच्या मतदारसंघाचे दौरे हे, निवडणूक प्रयोजनांसाठी असल्याचे समजण्यात यावे.

(७) जर त्याच्या स्वतःच्या खर्चाने निवडणुकीच्या प्रयोजनासाठी त्याच्या मतदारसंघात गेलेल्या मंत्र्यास कर्तव्यावरील अन्य काही ठिकाणी जावयाचे असेल तर, त्याला त्याच्या मुख्यालयांपासून अन्य ठिकाणापर्यंत व परत मुख्यालयांपर्यंत याकरिता अनुज्ञेय असलेल्या रकमेच्या मर्यादेतच प्रवासभत्ता आहारित करता येईल. जर त्याला, त्याचे निवडणूक कार्य मध्येच खंडित करून जनहितार्थ त्याच्या स्वतःच्या मंतसंघापासून मुख्यालयापर्यंत परत यावे लागले असेल तर, तो, केवळ परतीच्या विमान किंवा रेल्वे भाड्याची मागणी करू शकेल. जनहितामध्ये, स्वाभाविकपणे सर्व मंत्रिमंडळ उप-समितीच्या बैठकांना उपस्थित राहण्याचा समावेश असेल. शक्यतोवर मुख्यालयांतील अन्य बैठका किंवा परिषदा टाळाव्यात.

(८) जेव्हा मंत्र्याला केवळ राज्याच्या खर्चाने मोटारगाडी पुरविण्यात आली असेल तेव्हा, अशी मोटारगाडी निवडणूक प्रयोजनांसाठी वापरण्यात येऊ नये. जेव्हा राज्याद्वारे मोटार गाडी पुरवण्यात आली असेल परंतु, मंत्र्याला अशा वाहनाच्या परिरक्षण भत्ता देण्यात येत असेल तरी देखील , निवडणूक प्रयोजनांसाठी असे वाहन वापरणे इष्ट होणार नाही.

## अनुदेश क्रमांक ७१

श्री. व्ही. एन. माथूर, सचिव रेल्वे मंडळ, रेल्वे मंत्रालय, रेल भवन, नवी दिल्ली यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ४३७/६/७/२००४/पीएलएन-तीन, दिनांक २८ डिसेंबर २००४.

**विषय.—** केंद्रीय रेल्वे मंत्री यांचे दौरे.

खालील मुद्यांवरील स्पष्टीकरणे मागविण्याबाबत आपले पत्र क्र. २००४/जी/३२/१, दिनांक २५ डिसेंबर २००४ कृपया पहावे.

१. जेव्हा माननीय रेल्वे मंत्र्यांना रेल्वे अर्थसंकल्पाशी संबंधित प्रकरणांवर लक्ष देण्यास किंवा मंत्रिमंडळाच्या बैठकींना न मंत्रिमंडळाच्या उपसमितींच्या बैठकींना पाटणा येथून त्यांच्या दिल्ली येथील मुख्यालयामध्ये उपस्थित राहण्याची आवश्यक असेल; तेव्हा त्यांच्या दिल्लीच्या भेटी शासकीय म्हणून समजण्यात येऊ शकतात.

२. माननीय रेल्वेमंत्री, पश्चिम बंगालमधील विविध रेल्वे कार्यक्रमांना उपस्थित राहण्यासाठी पाटणा येथून कोलकता येथे अधिकृत भेट देऊ शकतात (जेथे ते राजकीय प्रचार मोहीम करत आहेत) किंवा कसे एकतर पाटणा ते कोलकता असा प्रवास आणि रेल्वे कार्यक्रमांना उपस्थित राहण्यासाठी हेलिकॉप्टरने पश्चिम बंगाल मधील विविध ठिकाणांना मंत्र्याची भेट अधिकृत म्हणून समजण्यात येऊ शकते किंवा कसे.

३. माननीय रेल्वे मंत्री, राजकीय कामासाठी पाटणा येथे जाण्याकरिता आणि दिल्ली येथील मुख्यालयात परत येण्यासाठी रेल्वे/विमान प्रवासात संसद सदस्य म्हणून आणि केंद्रीय मंत्री म्हणून विमान प्रवासात त्यांचे ओळखपत्र/विशेषाधिकार याचा फायदा करून घेऊ शकतात किंवा कसे.

आयोगाने ही बाब विचारात घेतली आहे आणि उपस्थित झालेल्या प्रश्नांवर पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण दिले आहे :—

१. माननीय मंत्री महोदय, पाटणा येथे राजकीय प्रचार मोहिमेसाठी असतांना पाटणा येथून दिल्लीला रेल्वे अर्थसंकल्पाशी संबंधित बैठकींना किंवा मंत्रीमंडळ बैठकींना अथवा मंत्रीमंडळाच्या उप समित्यांच्या बैठकींना उपस्थित राहण्यासाठी अधिकृतपणे येऊ शकत नाहीत.

२. मा. मंत्री महोदय जरी स्वतःच्या संपूर्ण प्रवासाचे पैसे देत असतील तरी त्यांची राजकीय किंवा वैयक्तिक भेट पाटणा येथून कोलकता येथे किंवा इतरत्र अधिकृत भेटीसहित, जरी एकत्र करू शकणार नाहीत. माननीय मंत्री महोदयांना अधिकृत प्रवास सुरू करण्याकरिता त्यांच्या मुख्यालयात परत यावे लागेल. कोणत्याही परिस्थितीत, बिहार किंवा झारखंड किंवा हरयाणा या राज्यांतील केंद्र किंवा राज्य सरकारच्या मंत्र्यांच्या राजकीय किंवा वैयक्तिक भेटी, भारतातील कोणत्याही इतर ठिकाणच्या अधिकृत भेटींबरोबर एकत्र करता येऊ शकणार नाहीत.

३. माननीय मंत्री महोदय हे, संसद सदस्यांसाठी उपलब्ध मोफत रेल्वे/विमान पासच्या सामान्य विशेषाधिकारांचा लाभ घेऊ शकतील, मात्र ते पाटणा येथे जाण्यासाठी व दिल्ली येथील मुख्यालयामध्ये परत येण्यासाठी केंद्रीय रेल्वे मंत्री म्हणून रेल्वे/विमान प्रवासांसाठी विशेषाधिकारांचा लाभ घेण्यास ते हक्कदार नाहीत.

## अनुदेश क्रमांक ७२

कॅबिनेट सचिव, नवी दिल्ली, सर्व राज्यांचे व संघराज्य क्षेत्रांचे मुख्य सचिव आणि सर्व राज्यांचे व संघराज्य क्षेत्रांचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले भारताच्या निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/आयएनएसटी/२०११-सीसी आणि बीई, दिनांक २४ मार्च २०११.

**विषय.—** मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यासंबंधात.

१. आपणास असे कळविण्याचा मला आदेश आहे की, वर उल्लेख केलेल्या विषयातील आयोगाच्या विद्यमान अनुदेशानुसार, आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत मुख्यमंत्र्यांच्या किंवा इतर मंत्र्यांच्या वैयक्तिक कर्मचारीवर्गास त्यांच्या खाजगी दौऱ्यांच्या कालावधीत त्यांच्या सोबत जाण्याबाबतची मूभा दिली जाणार नाही.

२. आयोगाने या बाबीचा फेरविचार केलेला आहे.आदर्श आचार संहितेच्या कालावधीमध्ये, राज्यांच्या/संघराज्य क्षेत्रांच्या मुख्यमंत्र्यांच्या वैयक्तिक कर्मचारीवर्गापैकी एका कर्मचाऱ्यास वैयक्तिक/खाजगी दौऱ्यावर त्यांच्यासोबत जाण्यासाठी मुभा देणयात यावी असे ठरविण्यात आले आहे. तथापि, असा वैयक्तिक कर्मचारी हा कोमत्याही राजकीय कार्यात भाग घेणार नाही किंवा मुख्यमंत्र्यांना त्यांच्या राजकीय कामात सहाय्य करणार नाही.

३. ही बाब सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावी.

## अनुदेश क्रमांक ७३

कॅबिनेट सचिव, नवी दिल्ली, सर्व राज्यांचे व संघराज्य क्षेत्रांचे मुख्य सचिव आणि सर्व राज्यांचे व संघराज्य क्षेत्रांचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले भारताच्या निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/आयएनएसटी/२०११-सीसी आणि बीई, दिनांक १ एप्रिल २०११.

**विषय.—** मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यासंबंधात

मुख्यमंत्र्यांच्या दौऱ्यांसंबंधी आयोगाच्या दिनांक २४ मार्च, २०११ रोजीच्या सम क्रमांकाच्या त्यांच्या पत्राच्या परिच्छेद (२) मध्ये समाविष्ट असलेल्या आयोगाच्या अनुदेशांमध्ये अंशतः फेरबदल करून आयोगाने असे ठरविले आहे की, आदर्श आचारसंहितेच्या कालावधीत राज्याच्या/संघराज्यक्षेत्रांच्या मुख्यमंत्र्यांच्या वैयक्तिक कर्मचारी वर्गापैकी एका कर्मचाऱ्यास, मुख्यमंत्र्यांच्या वैयक्तिक/खाजगी दौऱ्यावर बरोबर जाण्यासाठी मुभा देण्यात आलेली असून तो अराजपत्रित अधिकारी असावा. आणखी असे की, आधी दिलेल्या अनुदेशानुसार अशा वैयक्तिक कर्मचाऱ्याने कोणत्याही राजकीय कार्यात भाग घेऊ नये किंवा मुख्यमंत्र्यांना त्यांच्या राजकीय कामात सहाय्य करू नये.

आयोगाने असे देखील ठरविले आहे की, हे अनुदेश पंतप्रधान/केंद्रीय कॅबिनेट मंत्री यांच्या बाबतीत सुद्धा लागू असतील.

## अनुदेश क्रमांक ७४

कॅबिनेट सचिव, नवी दिल्ली, सर्व राज्यांचे व संघराज्य क्षेत्रांचे मुख्य सचिव आणि सर्व राज्यांचे व संघराज्य क्षेत्रांचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले भारताच्या निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/आयएनएसटी/२०११-सीसी आणि बीई, दिनांक २७ एप्रिल २०११.

**विषय.—** मुख्यमंत्री व केंद्र सरकारच्या मंत्र्यांच्या दौऱ्यांसंबंधात

दिनांक १ एप्रिल २०११ रोजीच्या आयोगाच्या अनुदेश क्र. ४३७/६/आयएनएसटी/२०११-सीसी आणि बीई यांमध्ये अंशतः फेरबदल करून आयोगाने असे ठरविले आहे की, **वैयक्तिक/खाजगी दौऱ्यावर असतांना सोबत असणाऱ्या वैयक्तिक कर्मचारी वर्गावर असणारे निर्बंध हे प्रधान मंत्री यांना लागू असणार नाही.**

## अनुदेश क्रमांक ७५

सचिव, भारत सरकार, गृह मंत्रालय (प्रधानमंत्री विभाग) जैसलमेर हाऊस, नवी दिल्ली यांना उद्देशून लिहिलेले दिनांक ७ जून २०१० रोजीचे भारताच्या निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/आयएनएसटी/२०१०-सीसी व बीई.

**विषय.—** निवडणूक मोहिमेसाठी विशेष सुरक्षा गटाचे संरक्षण असणाऱ्यांसाठी (प्रधान मंत्र्यांशिवाय इतरांना) बुलेटप्रुफ वाहनांचा वापर करण्यासंबंधात.

मला आपणांस, आपल्या दिनांक ६ मार्च २०१० व ७ एप्रिल २०१० च्या पत्र क्र. सहा-२३०१४/६१/२०१०-व्हीएस संदर्भात उपरोक्त विषयावर त्यातील परिच्छेद ३ मध्ये उद्भवणाऱ्या मुद्यांबाबत पुढीलप्रमाणे स्पष्टीकरण देण्याबाबतचे निदेश आहेत :—

(एक) आयोगाचे दिनांक २५ मार्च २००९ चे पत्र क्रमांक ४३७/आयएनएसटी/२००९-सीसी व बीई मधील अंतर्भूत अनुदेशांखाली विशेष सुरक्षा गटाचे संरक्षण असणाऱ्या व्यक्तींचे संरक्षण करण्याचे निश्चित केले आहे.

(दोन) जर सुरक्षिततेच्या कारणांसाठी सुरक्षा प्राधिकाऱ्यांनी विशेष सुरक्षा गटाचे संरक्षण असणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत अतिरिक्त बहुविध वाहनांच्या वापराकरिता विहीत केली असतील तर, त्यांचा खर्च शासकीय खर्चातून करण्यास मुभा देता येईल (विशेष सुरक्षा गटाचे संरक्षण असणाऱ्या व्यक्तीद्वारे वापरली गेलेली वाहने वगळून).

(तीन) बुलेटप्रूफ वाहनामध्ये उक्त संरक्षण असणाऱ्या व्यक्तिसोबत विशेष सुरक्षा गटाचे संरक्षण असणाऱ्या व्यक्तिच्या वैयक्तिक कर्मचाऱ्यांबाबत कोणताही आक्षेप असणार नाही, अशा बुलेटप्रूफ वाहनापुढे चालविण्याचा खर्च हा, जेथे लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ याच्या कलम ७७ (१) अन्वये अशा विशेष सुरक्षा गटाचे संरक्षण असणाऱ्या व्यक्तिचे संरक्षण करण्यात येत आहे (याचाच अर्थ संबंधित पक्षाचा नेता यालाच पक्षाचा प्रमुख (स्टार) प्रचारक असे म्हटले आहे). त्या संरक्षण असणाऱ्या व्यक्तिने किंवा त्याच्या राजकीय पक्षाने करावयाचा आहे.

जर एखाद्या अन्य पक्षाची मान्यवर व्यक्ती विशेष सुरक्षा गटाचे संरक्षण असणाऱ्या व्यक्तीसोबत राहण्यास मुभा दिली असेल, जर परिस्थितीचे समर्थन करीत असेल तर आयोगाच्या दिनांक ३१ ऑक्टोबर, २००८ रोजीचे पत्र क्र. ४३७/६/आयएनएसटी/२००८-सीसी आणि बीई यामध्ये पूर्वीच स्पष्ट केल्याप्रमाणे संबंधित विशिष्ट मतदारसंघातील पक्षाच्या उमेदवाराच्या, निवडणूक खर्चात वाहने चालविणाच्या ५० टक्के एवढ्या खर्चाची नोंद घेण्यात येईल. तथापि, उक्त कलम ७७ (१) अन्वये जर असे सोबती ही प्रमुख (स्टार) प्रचारक असल्यास येथे यापुढे स्पष्ट करण्यात येत आहे की, अशा खर्चाचे संविभाजन मागविण्यात आलेले नाही.

# ए ४-विमान/शासकीय वाहने यांचा वापर

## अनुदेश क्रमांक ७६

(१) निवडणूक आयोगाचा कॅबिनेट सचिव, राष्ट्रपती भवन, नवी दिल्ली,

(२) सचिव, भारत सरकार, गृह मंत्रालय, नवी दिल्ली,

(३) सचिव, भारत सरकार, विधी, न्याय व कंपनी व्यवहार मंत्रालय, नवी दिल्ली,

(४) सर्व राज्य व संघराज्य क्षेत्र यांचे मुख्य सचिव,

(५) सर्व राज्ये व संघ राज्य क्षेत्र यांचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना निर्गमित केलेला आदेश क्रमांक ४३७/६/९४/एमसीएस-खंड पाच , दिनांक २०-१०-१९९४.

**विषय.—** विमाने व हेलिकॉप्टर भाड्याने देणे.

**आदेश**

आयोगाने या आधीच निवडणूक प्रचार मोहीम निवडणूक कार्य किंवा निवडणुका या दरम्यान निवडणुकांशी संबंधित प्रवास करण्यासाठी शासकीय वाहनांचा वापर करण्यावर पूर्णपणे आणि कायम बंदी घालण्याबाबत अनुदेश दिले आहेत.

२. आयोगाच्या असे निदर्शनास आणून देण्यात आले आहे की, राजकीय पक्ष, निवडणूक कार्याकरिता राज्य/सार्वजनिक क्षेत्राताल उपक्रम यांची खाजगी कंपन्या इत्यादींमार्फत चालवण्यात येणारी विमाने/हेलिकॉप्टर अशा प्रकारे भाड्याने घेतात की, त्यामुळे ती विमाने/हेलिकॉप्टर अन्य पक्षांना भाड्याने मिळू शकत नाहीत. त्यामुळे त्या पक्षांचा तोटा होतो. म्हणून आयोगाने असा निदेश दिला आहे की, शासकीय विमाने/हेलिकॉप्टर (जी सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम व महामंडळ यांच्या मालकीची आहेत त्यासह) भाड्याने द्यावयाकरिता अनुसरण्याची कार्यपद्धती ही संपूर्णपणे समन्याय्यतेवर आधारित असावी व तिला व्यापकपणे प्रसिद्धी द्यावी. ही कार्यपद्धती संपूर्णपणे समन्याय्यतेवर आधारलेली असावी म्हणून, त्यामध्ये काही किमान शर्ती समाविष्ट असल्या पाहिजेत त्या खालीलप्रमाणे आहेत :—

२.१ सत्ताधारी पक्ष आणि अन्य पक्ष निवडणूक लढविणारे उमेदवार यांच्यामध्ये कोणताही भेदभाव करता कामा नये.

२.२ राजकीय पक्ष किंवा निवडणूक लढविणारे उमेदवार हे त्याबाबतचे प्रदान करतील व त्याबाबतचा योग्य तो अभिलेख ठेवतील.

२.३ त्याबाबतचे दर आणि अटी व शर्ती ह्या सर्वांकरिता समान असल्या पाहिजे.

२.४ जो प्रथम अर्ज करील त्याला प्रथम वाटप या तत्त्वावर प्रत्यक्ष वाटप करण्यात यावे. ह्या प्रयोजनाकरिता, अर्ज स्वीकारण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या प्राधिकाऱ्याने अर्ज मिळाल्याचा दिनांक व वेळ नोंदवून ठेवली पाहिजेत.

२.५ क्वचित प्रसंगी जेव्हा दोन किंवा त्यापेक्षा अधिक अर्जदारांचा दिनांक व वेळ सारखीच असेल तर, त्याबाबतचे वाटप चिठ्ठ्या काढून निश्चित करण्यात येईल.

२.६ काही विशिष्ट तपशील नमूद करण्यामध्ये कसूर करणे किंवा अशा प्रकारच्या अन्य तांत्रिक आधारावर अर्ज नाकारण्याच्या कोणत्याही प्रसंगाचे निवारण करण्याकरिता अर्जाचा नमुना तयार करण्यात यावा आणि ज्यांना ही सुविधा घ्यावयाची असेल त्या सर्वांना तो उपलब्ध करून द्यावा.

२.७ व्यक्तीगत, भागीदारी संस्था किंवा उमेदवार यांना विमाने/हेलिकॉप्टर भाड्याने देताना एकाच वेळी ती दिवसापेक्षा अधिक कालावधीसाठी देण्याची परवानगी देण्यात येऊ नये, या आवश्यक बाबींशी जो अर्ज अनुरूप नसेल, तो अर्ज फेटाळण्यात आला पाहिजे.

३. या कार्यपद्धतीमध्ये समाविष्ट करावयाच्या वरील शर्ती/अटी ह्या विशदीकरणात्मक असून त्या परिपूर्ण नाहीत. ही पद्धती शक्य असेल तेवढी समन्याय्यी व न्याय्य बनवण्याच्या दृष्टीने प्रयत्नांची शिकस्त करण्यात आली पाहिजे.

४. ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक असली पाहिजे आणि जर आवश्कता असेल तर तिला मुद्रण इलेक्ट्रानिक माध्यम यामधून या संपूर्ण कार्यपद्धतीबाबत आधीच व्यापकपणे प्रसिद्धी देण्यात आली पाहिजे. वापर करावयाच्या कार्यपद्धतीचा कोणताही भाग गुप्ततेच्या नावाखाली केला होता, याला वाव राहता कामा नये.

५. ह्यासंबंधात निर्गमित केलेल्या अनुदेशांची प्रत ती निर्गमित केल्यावर त्वरित आयोगाला पाठविण्यात आली पाहिजे.

## अनुदेश क्रमांक ७७

निवडणूक आयोगाचे सर्व राज्ये व संघ राज्यक्षेत्रे यांचे मंत्रिमंडळ सचिव, मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले पत्र क्रमांक ४३७/६/९६-पीएलएन-तीन, दिनांक ९ एप्रिल १९९६.

**विषय.—** सार्वत्रिक निवडणूका-मंत्री/उमेदवार यांना सुरक्षा कवच.

१. राजकीय व्यक्तींनी, मग ते कार्यालयात असोत किंवा कार्यालयाच्या बाहेर असोत, निवडणुकीच्या कामा संबंधात विमान/हेलिकॉप्टर आणि मोटारगाड्या व वाहने यांचा वापर करण्याच्या प्रशानावर वेळोवेळी अनुदेश देण्यात आले आहेत. यासंबंधातील इतर सर्व अनुदेशांचे एकत्रीकरण करून/अनुदेशांस फेरबदल करून पुढील अनुदेश देण्यात आले आहेत आणि त्यांचे तात्काळ काटेकोरपणे अनुपालन करण्यात यावे :—

२.१ सध्याच्या अनुदेशांच्या कोणताही भाग प्रवासाच्या संबंधातील विद्यमान अनुदेशांच्या बाबतीत आणि पंतप्रधान देखील, जेव्हा ते विनिर्दिष्टरित्या पक्ष किंवा निवडणूक कामाकरिता प्रवास करीत असतील तेव्हा त्यांच्याकरिता वाहतूक व सुरक्षा यांसह सुविधांच्या तरतुदीच्या बाबतीत जे कोणतेही फेरबदल करण्यात आले आहेत त्या फेरबदलाला, बाधा आणत असल्याचे मानण्यात येणार नाही. विद्यमान अनुदेशांचे काटोकोरपणे पालन करण्यात यावे.

२.२ पदावर असलेल्या म्हणजेच केंद्र सरकारचे मंत्री किंवा राज्य सरकारचे मुख्यमंत्री किंवा मंत्री अथवा राज्य महामंडळ किंवा सहकारी संस्था इत्यादींचे अध्यक्ष अशा कोणत्याही इतर सार्वजनिक पदांचे पदाधिकारी यो दोहोंसह उर्वरित सर्व राजकीय व्यक्ती आणि कोणत्याही सर्वजनिक पदावर नसलेल्या व्यक्ती यांच्याबाबतीत या आदेशाद्वारे नियमन करण्यात येईल.

२.३. सुरक्षेव्यतिरिक्त कोणत्याही कारणाकरिता शासनाच्या मालकीच्या/शासनाने निधी पुरविलेल्या /शासनाने भाड्याने घेतलेल्या वाहतुकीच्या साधनांच्या वापरावरील निरपवाद बंदीच्या संबंधात, कोणत्याही व्यक्तीला शिथिलता मिळू शकरणार नाही. ही वगळणूक उदाहरणार्थ, वय, आरोग्याची स्थिती इत्यादीं आणि वाहनांचे सर्व प्रकार यांकरिता निर्देशित केली आहे.

२.४. राज्याच्या मालकीच्या आणि राज्याच्या खर्चाने चालवण्यात येणाऱ्या किंवा राज्याच्या खर्चाने भाड्याने घेण्यात आलेल्या विमानाच्या (मग ते पक्क्या बसवलेल्या पंखाचे असो किंवा हेलिकॉप्टर असो) वापराला, सुरक्षेसह कोणत्याही कारणासाठी परवानगी देण्यात येणार नाही. यासंबंधात कोणताही अपवाद करण्यात येणार नाही.

२.५. सुरक्षाकवच असणाऱ्या व्यक्तींच्या बाबतीत, गुप्तवार्ता अधिकाऱ्यासह, सुरक्षा एजनसींनी, सर्व बाबतीत तशा वापरला विहित केलेले असेल तर विशिष्ट व्यक्तीकरिता राज्याच्या मालकीच्या बुलेटप्रफ अशा एका अभेद्य वाहनाच्या वापरासाठी परवानगी देण्यात येईल. सुरक्षा प्राधिकरणांकडून राखीव व्यक्तीच्या नावे बहुविध मोटारगाड्यांच्या वापराला त्याने तसे विनिर्दिष्टरीत्या विहित करण्यात आलेले असल्याखेरीज परवानगी देण्यात येऊ नये. जेथे बुलेटप्रुफ अशा अभेद्य वाहबनांच्या वापराला विनिर्दिष्ट करण्यात आले आहे. तेथे, अशी बुळेटप्रुफ वाहने चालवण्याच्या खर्च विशिष्ट व्यक्तीद्वारेच करण्यात येईल, मग अशी व्यक्ती पदाधिकारी असो किंवा नसो आणि अशी व्यक्ती उमेदवार असो किंवा नसो.

२.६. वैमामिक, संरक्षक दल इत्यादींसह मोटारींच्या ताफ्यासोबत जाणाऱ्या वाहनांची संख्या ही सुरक्षा प्राधिकाऱ्यांकडून घालून देण्यात आलेल्या अनुदेशांनुसार असेल आणि कोणत्याही परिस्थितीत त्यात वाढ होणार नाही. अशा सर्व वाहनांच्या मग अशी वाहने सरकारी मालकीची असोत किंवा भाड्याने घेतलेली असोत चालनाचा खर्च राज्य शासनाकडून भागवण्यात येईल. पुरविलेल्या मनुष्यबळाच्या खर्चाची कोणतीही वसुली करण्याची आवश्यकता नाही.

२.७. जेथे कोणत्याही कारणास्तव एखादा पक्ष किंवा उमेदवार खाजगी विमान / हेलिकॉप्टर भाड्याने घेतो अशा सर्व बाबतींत, संपूर्ण खर्चाचा, अपवादाशिवाय निवडणूक खर्चाचा भाग म्हणून समावेश करण्यात येईल.

२.८. माजी पंतप्रधान या प्रवर्गात समावेश असलेल्या सर्व व्यक्तींना हे अनुदेश लागू आहेत आणि अशा व्यक्ती, पदावर असलेल्या पंतप्रधानांकरिता तरतूद केलेल्या विशेष अटींकरिता हक्कदार नाहीत.

२.९. ध्वनिक्षेपकांच्या, मग ते वाहनांवरे किंवा अन्यथा बसवलेल असोत, वापराच्या संबंधात, सुरक्षेसह कोणालाही, कोणत्याही मोबदल्यात कोणतीही शिथिलता देण्यात येणार नाही.

## अनुदेश क्रमांक ७८

निवडणूक आयोगाचे कॅबिनेट सचिव, नवी दिल्ली, सर्व राज्ये व संघ राज्य क्षेत्रे यांचे मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशन पत्र क्रमांक ४३७/६/९८/पीएलएन-तीन, दिनांक ८ जानेवारी १९९८.

**विषय.—** राजकीय पक्षांकडून विमानाचा वापर यासंबंधात.

आयोगाने शासन व सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम याच्या मालकीच्या शासकीय विमानाच्या वापराच्या संबंधात यापूर्वीच तपशीलवार अनुदेश दिलेले आहेत, या विद्यमान अनुदेशांनुसार निवडणूक प्रक्रियेत, मुख्यमंत्री व मंत्री यांसह राजकीय कार्याधिकाऱ्यांद्वारे विमानाच्या वापरावर संपूर्ण बंदी आहे. केवळ अपवाद हा पदावर असलेल्या पंतप्रधानांकरिता आहे. आयोगाद्वारे दिनांक १६ डिसेंबर १९९७ रोजी या अनुदेशांचा पुनरुच्चार करण्यात आला आहे.

सुरक्षेच्या कारणासहित निरनिराळ्या कारणांकरिता हे निर्बंध शिथिल करण्यासाठी काही मुख्यामंत्र्यानी विनंती केली आहे.

आयोगाने सदर विषयाचा सखोल आढावा घेतला व यासांबंधात योग्य विभागाकडून आणखी माहिती मिळवली. सर्व संबद्ध घटक विचारात घेतल्यावर आयोगाने असो निर्णय घेतला की, सदर विषयासंबंधातील विद्यमान अनुदेश तसेच राहतील आणि कोणत्याही कारणास्तव या विषयात शिथिलता आणली जाणार नाहीत.

तथापि, आयोगाच्या विद्यमान निर्बांधामुळे मुख्यमंत्र्यांसह अशा राजकीय पदाधिकाऱ्यांद्वारे खाजगी विमानाच्या वापरला मनाई होत नाहीत. तद्नुसार, आयोगाने असे स्पष्ट केले आहे की, मुख्यमंत्रांसह असे राजकीय कार्यकर्ते, जर आवश्यक असेल तर, खाजगी विमाने भाड्याने घेऊ शकतात आणि त्यांच्या, त्यांच्या राजकीय प्रचार मोहिमा व निवडणुकीशी संबंधित इतर कामे यांकरिता वापर करून शकतात.

अशा विमानाच्या वापराचा खर्च हा संबंधित राजकीय पक्षाला प्रदान करण्यात येईल आणि त्यांनी त्यांच्या लेख्यांमध्ये योग्य प्रकारे हिशेब दर्शविला पाहिजे.

कृपा पोच द्यावी.

## अनुदेश क्रमांक ७९

सर्व राज्यांच्या व संघराज्यक्षेत्रांचे कॅबिनेट सचिव, मुख्य सचिव आणि मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/९८-पीएलएन-तीन, दिनांक १८ ऑगस्ट १९९९.

**विषय.—** निवडणुकीच्या कालावधी दरम्यान विमानाचा वापर.

आयोगाने, शासनाच्या व सार्वजनिक क्षेत्र उपक्रमांच्या मालकीच्या शासकीय विमानाच्या वापरासंबंधात, या आधीच सविस्तर सूचना जारी केल्या आहेत. ह्या विद्यमान सूचनांनुसार, निवडणूक कालावधी दरम्यान मुख्यमंत्री व मंत्री यांच्यासह राजकीय पदाधिकाऱ्यांकडून विमानाचा वापर करण्यावर पूर्णता मनाई करण्यात आली आहे. याला केवळ पंतप्रधानांचा अपवाद आहे. सूचनांचा आयोगाने दिनांक १४ जुलै १९९९ रोजी पुनरुच्चार केला आहे.

(क) काही मुख्यमंत्र्यांकडून कारणासह विविध कारणांमुळे हे निर्बंध शिथिल करण्यासाठी विनंती प्राप्त झाली आहे.

(ख) आयोगाने याबाबतीत सखोल आढावा घेतला आणि यासंबंधात योग्य ठिकाणांहून आणखी माहिती प्राप्त केली आहे. सर्व संबंधित घटकांचा विचार केल्यानंतर, यासंबंधातील विद्यमान सूचना तशाच कायम ठेवण्यात येतील आणि याबाबतीत, कोणत्याही कारणासाठी सूट दिली जाणार नाही, असे आयोगाने ठरविले आहे.

(ग) तथापि, आयोगाचे विद्यमान निर्बंधांमुळे मुख्यमंत्र्यांसह अशा राजकीय पदाधिकाऱ्यांकडून खाजगी विमानाचा वापर करण्याला मनाई नाही. त्यानुसार, मुख्यमंत्र्यांसह असे राजकीय पदाधिकारी त्यांना आवश्यक असेल तर, ते खाजगी विमान भाड्याने घेऊ शकतात आणि त्याचा वापर त्यांच्या राजकीय प्रचारासाठी व निवडणुकीशी संबंधित अन्य कामांकरिता करू शकतात. अशा विमानाच्या वापराचा खर्च, संबंधित राजकीय पक्ष देऊ शकतील आणि तो खर्च त्यांनी लेख्यांमध्ये योग्यपणे हिशेबात घ्यावयाचा आहे.

(घ) कृपया पोच द्यावी.

## अनुदेश क्रमांक ८०

सचिव, भारत सरकार, नागरी विमान चालन विभाग, नवी दिल्ली यांना उद्देशून लिहिलेले, आणि सचिव, महसूल विभाग, भारत सरकार, महासंचालक, नागरी विमानचालन, नवी दिल्ली आणि सर्व राज्यांचे / संघ राज्यक्षेत्रांचे मुख्यसचिव / मुख्य निवडणूक अधिकारी यांना, त्याची प्रत पाठविण्यात आलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/९८-पीएलएन-तीन, दिनांक १८ ऑगस्ट १९९९.

**विषय.—** राजकीय पक्षांकडून व शासकीय पदाधिकाऱ्यांकडून अनुसूचित वाणिज्यिक विमानांखेरीज अन्य खाजगी मालकीच्या विमानांचा वापर.

बारावी लोकसभा विसर्जित करण्यात आली असून तेरावी लोकसभा घटित करण्यासाठी निवडणुका घेण्याबाबत अधिसूचना काढण्यात आली आहे हे, आपणास माहीत आहे. ही प्रक्रिया दिनांक १० ऑक्टोबर १९९९ पूर्वी पूर्ण करावयाची आहे. मुख्यमंत्री व केंद्र सरकारचे मंत्री त्याचप्रमाणे वरिष्ठ राजकीय पदाधिकारी आणि पक्षांचे नेते यासारख्या अति प्रतिष्ठित (महत्वाच्या) व्यक्ती, विविध राजकीय बैठकांना व प्रचारांना उपस्थित राहण्यासाठी अनुसूचित केलेल्या वाणिज्यिक विमानांखेरीज अन्य खाजगी मालकीच्या विमानांचा वापर करण्याची शक्यता आहे.

२. संबंधित कायदे व नियमानुसार समुचित प्राधिकरणांकडून अशा सर्व अनुसूचित उड्डाणांची संपूर्ण नोंद ठेवण्यात येते, हे महत्त्वाचे आहे. प्रवाशांची यादी, विविध ठिकाणची विमान सुटण्याची व पोहोचण्याची निश्चित वेळ यासारखा तपशील ठेवण्याची आवश्यकता आहे. आयोग, वेळोवेळी प्राप्त होणाऱ्या तक्रारीची पडताळणी करण्यासाठी या तपशिलासंबंधीची माहिती मागवू शकेल.त्यानुसार, या तपशिलांची काटेकोर नोंद ठेवण्यासाठी केंद्र सरकारच्या व राज्य शासनाच्या समुचित प्राधिकरणांनी दक्ष राहावे अशी आपणास विनंती करण्याचा मला आयोगाने निदेश दिला आहे.

आयोगाच्या निदर्शनास आणून दिलेला दुसरा मुद्दा

अशा प्रयोजनांसाठी केलेल्या विमानाच्या वापराबद्दल देण्यात आलेल्या रकमांशी संबंधित आहे. काही प्रकरणी, व्यक्तींनी/राजकीय पक्षांनी, अशा रकमा रोखीने दिल्याचे कळविण्यात आले आहे.

३. या पत्राची प्रत, माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी सचिव, भारत सरकार, महसूल विभाग आणि सर्व राज्य शासनांचे मुख्य सचिव व सर्व मुख्य निवडणूक अधिकारी, यांना देखील पृष्ठांकित करण्यात येत आहे.

## अनुदेश क्रमांक ८१

सर्व राज्ये व संघराज्य क्षेत्रे यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४/२००१/जे. एस. - दोन, दिनांक ३० मार्च २००१.

**विषय.—** निवडणुकीच्या काळात शासकीय वाहनांच्या गैरवापरास प्रतिबंध करण्याबाबत—स्पष्टीकरण.

वरील विषयावरील आयोगाचा आदेश क्रमांक ४३७/६/९६-पीएलएन-तीन, दिनांक १५ जानेवारी १९९६ च्या आदेशाकडे आपले लक्ष वेधण्याचे निदेश मला देण्यात आले असून आयोगाच्या अनुदेशांचा सारसंग्रह, १९९८ यामध्ये पी. पी. १७१—१७३ यावर ते पुन्हा उद्धृत करण्यात आले आहेत.

२. वरील आदेशात आयोगाने असे निदेश दिले आहेत की, लोकसभेचे अध्यक्ष व उपाध्यक्ष आणि राज्यसभेचे उपसभापती याच्या बाबतीत, लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांच्यावेळी प्रचार मोहिम, निवडणूक कार्य किंवा निवडणुकीशी संबंधित प्रवास करण्यासाठी शासकीय वाहनांच्या वापरावर निर्बंध लागू होतील.

३. निर्भय व निःपक्षपातीपणे निवडणुका घेण्यासाठी आणि निवडणूक प्रक्रियेमध्ये सुचिता राहावी यासाठी दिनांक १५ जानेवारी १९९६ च्या आयोगाच्या आदेशात नमूद केल्याप्रमाणे प्रचार मोहिम, निवडणूक कार्य किंवा निवडणुकीशी संबंधित प्रवास करण्यासाठी शासकीय वाहनांच्या वापरावरील निर्बंध हे, कोणत्याही राज्याच्या विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी राज्य विधानसभेच्या अध्यक्ष व उपाध्यक्ष यांना—मग असे विधानसभा अध्यक्ष आणि/किंवा उपाध्यक्ष राज्य विधानसभेची सार्वत्रिक निवडणूक लढविणारा उमेदवार असो किंवा नसो—त्यांना जसेच्या तसे लागू होतील.

४. हे निदेश, तुमच्या राज्यातील सर्व मान्यताप्राप्त राष्ट्रीय व राज्यातील पक्षांच्या युनिटांसह सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणू देण्यात यावेत.

५. मुख्य निवडणूक अधिकारी, तामिळनाडू यांच्याकडून आलेला संदेश क्र. २२४३/२००१—१, दिनांक १६ मार्च २००१ पाठविण्याची व्यवस्था करण्यात यावी.

६. या पत्राची पोच तात्काळ देण्यात यावी.

## अनुदेश क्रमांक ८२

सर्व राज्ये व संघराज्यक्षेत्रे यांचे मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४/२००१/जे. एस. - दोन, दिनांक ८ मे २००१. प्रत अग्रेषित—

१. महासंचालक, नागरी विमाचालन, नवी दिल्ली.

२. सचिव, भारत सरकार, पर्यटन व नागरी विमानचालन, नवी दिल्ली.

३. कॅबिनेट सचिव, भारत सरकार, नवी दिल्ली.

४. सर्व राज्य व संघराज्यक्षेत्रे यांच्या राज्य शासनांचे मुख्य सचिव.

**विषय.—** मतदान व मतमोजणीच्या दिवशी खाजगी स्थिर पंखे असलेली विमाने व हेलिकॉप्टर्स यांचा वापर करून राजकीय पक्षाच्या नेत्यांनी मतदान व मतमोजणी यांच्या प्रक्रियेवर देखरेख ठेवणे व संनियंत्रण करणे—याबाबात.

मतदानाच्या व मतमोजणीच्या दिवशी एका मतदार संघातून दुसऱ्या मतदारसंघात ये-जा करण्यासाठी खाजगी स्थिर पंखे असलेली विमाने व हेलिकॉप्टर्स यांचा वापर करून मतदान व मतमोजणी याच्या प्रक्रियवर देखरेख ठेवणे व तिचे संनियंत्रण करणे यांसाठी राजकीय पक्षांच्या नेत्यांना परवानगी द्यावी किंवा नाही याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत.

२. निवडणूक आयोगाने, या प्रश्नाचा सर्व बाजूंनी काळजीपूर्वक विचार केला असल्याचे सांगण्याचा मला निदेश देण्यात आला आहे. या नेत्यांना मतदान व मतमोजणी प्रक्रियेवर देखरेख ठेवण्यासाठी व तिचे संनियंत्रण करण्यासाठी परवानगी देण्यात आल्यास निवडणुकांबाबतचे अधिक्षण, निदेशन व नियंत्रण निवडणूक आयोगाच्या ठायी निहित असेल अन्य कोणच्याही नाही असे संविधानाच्या अनुच्छेद ३२४ मध्ये देण्यात आल्यामुळे निवडणूक आयोगाची कार्ये पार पाडण्यात यामुळे हस्तक्षेप होऊ शकतो आणि त्याचे अधिकार बळकावले जाऊ शकतात. त्याशिवाय, सर्व राजकीय पक्षांच्या बऱ्याचशा नेत्यांना विविध प्रकारच्या सुरक्षांचा दर्जा देण्यात आला आहे आणि अशा दर्जानुसार त्यांना सुरक्षा पुरविण्यात येते. मतदानाच्या व मतमोजणीच्या दिवशी जर त्यांना एका मतदार संघातून दुसऱ्या मतदार संघात जायचे असेल तर त्यांना बरोबर पुरेशी सुरक्षा व्यवस्था न्यावी लागते आणि त्यासाठी त्या प्रत्येकास सुरक्षा उपलब्ध करून द्यावी लागते. मतदानाच्या आणि मतमोजणीच्या दिवशी, पोलीस व सुरक्षा कर्मचारी हे, मतदारांना, राजकीय पक्षांना व मतदान केंद्रे व मतमोजणी केंद्रे यामध्ये व यासभोवती असलेले मतदान साहित्य यांना सुरक्षा पुरविण्यासाठी आणि कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी व शांततापूर्ण वातावरण निर्माण करण्यासाठी मतदार संघांमध्ये गस्त घालण्याच्या कामात पूर्णपणे गुंतलेले असतात. त्यामुळे राजकिय पक्षाच्या नेत्याना एका मतदार संघातून दुसऱ्या मतदार संघात ये-जा करण्यासाठी सुरक्षा व्यवस्था पुरविण्यामुळे या व्यवस्थेत व्यत्यय किंवा अडथळा निर्माण होऊन निर्भय व निःपक्षपाती मतदान घेण्यावर व निवडणुका सुरळीतपणे व शांततापूर्ण पार पाडण्यावर याचा परिणाम होतो. यांपैकी अनेक राजकीय नेते काही सुविधांचे हक्कदार असतात व राजशिष्टाचाराच्या आवश्यकतेनुसार त्यांच्या दौऱ्यांच्या दरम्यान शिष्टाचार पाळावा लागतो, यामुळे या दिवसांमध्ये अगोदरच या यंत्रणेवर अतिताण आलेला असल्यामुळे जिल्हा व उपविभागीय पातळीवरील प्रशासनिक यंत्रणेवरदेखील अतिरिक्त ताण येतो. तसेच, विशेषकरून मतदानाच्या दिवशी त्यांच्या येण्या-जाण्यामळे ४८ तासांच्या प्रचारकार्य प्रतिबंधित कालावधीत प्रचार केल्यासारखे होऊ शकते. मतदानाच्या व मतमोजणीच्या दिवशी राजयीक पक्षांच्या नेत्यांना खाजगी स्थिर पंख असलेले विमान किंवा हेलिकॉप्टर्स वापरल्यामुळे निवडणूक खर्चात भरीव वाढ होते हे या संदर्भांत वेगळे सांगायलाच नको आणि निवडणुकीच्या स्पर्धास्तरात व्यत्यय आल्यामुळे कमी साधनसंपत्ती असलेल्या राजकीय पक्षांच्या दृष्टीने ते अहितकारक ठरू शकते ही बाब वगळता, निवडणुकांवर होणाऱ्या मोठ्या खर्चाला वाजवी रीतीने पायबंद घालण्याच्या दृष्टीने हे चुकीचे पाऊल ठरू शकते.

३. वरील संबंधित बाबी विचारात घेऊन, आयोगाने कोणत्याही राजकीय पक्षाच्या नेत्याला, मतदानाच्या व मतमोजणीच्या प्रक्रियवेर देखरेख ठेवण्यासाठी व तिचे संनियंत्रण करण्यासाठी खाजगी स्थिर पंख असलेल्या विमानाचा व हेलिकॉप्टर्सचा वापर करता येणार नाही असे ठरविले आहे.

४. आयोगाने असे देखील ठरविले आहे की, नागरी विमान चालन महासंचालक यांनी, आयोगाचे वरील निदेश ध्यानात घेऊन, कोणत्याही आणीबाणीच्या प्रसंगी घेण्यात आलेली निवडणूक आयोगाची पूर्वपरवानगी वगळता, मतदानाच्या व मतमोजणीच्या दिवशी वरील प्रयोजनांसाठी राजकीय पक्षांच्या नेत्यांना खाजगी स्थिर पंख असलेली विमाने व हेलिकॉप्टर्स यांचा वापर करण्यास परवानगी देऊ नये.

५. आयोगाच्या सूचनेनुसार, तुमच्या राज्यातील सर्व राजकीय पक्षांच्या कार्यकर्त्यांच्या माहितीसाठी, मार्गदर्शनासाठी व अनुपालनासाठी आयोगाचे वरील निदेश तात्काळ निदर्शनास आणण्यात यावेत.

## अनुदेश क्रमांक ८३

कॅबिनेट सचिव, भारत सरकार, सर्व राज्ये व संघराज्य क्षेत्रे यांचे मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले भारताच्या निवडणूक आयोग यांचे पत्र क्रमांक ४३७/६/आयएनएसटी/२००८–सीसी आणि बीई, दिनांक ९ एप्रिल २००९.

**विषय.—** राजकीय पक्षांनी विमाने/हेलिकॉप्टर यांचा वापर करणे—यासाठी आचारसंहिता लागू करणे—याबाबत.

शासकीय व सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांच्या मालकीच्या शासकीय विमानांचा/हेलिकॉप्टर्सचा वापर करण्यासंबंधातील तपशिलवार अनुदेश यापूर्वीच आयोगाने काढले असल्याचे सांगण्याचे मला निदेश देण्यात आले आहेत. विद्यमान अनुदेशांनुसार मुख्यमंत्री आणि मंत्री यांसह राजकीय कार्यकर्त्यांना निवडणूक प्रक्रिया सुरू असताना विमानांचा वापर करण्यावर पूर्णतः बंदी घालण्यात आली आहे. याला केवळ पदावर असलेल्या पंतप्रधानांचा अपवाद आहे.

यासाठी सुरक्षेसह विविध कारणांसाठी हे निर्बंध शिथिल करावेत, याकरिता काही मुख्यमंत्र्यांकडून विनंत्या करण्यात आल्या आहेत.

आयोगाने या प्रकरणी सकोल आढावा घेतला असून यासंबंधात समुचित दिशेने आणखी माहिती मिळवली आहे. यासंबंधातील सर्व घटक विचारात घेऊन, या प्रकरणात विद्यमान अनुदेश तसेच राहतील आणि कोणत्याही कारणास्तव या प्रकरणी निर्बंधाचे शिथिलीकरण करण्यात येणार नाही असे आयोगाने ठरविले आहे.

तथापि, आयोगाच्या विद्यमान निर्बंधांमुळे मुख्यमंत्र्यांसह अशा राजकीय कार्यकर्त्यांना खाजगी विमानांचा वापर करण्यास मनाई करता येणार नाही. त्यानुसार, आयोगाने, मुख्यमंत्र्यांसह अशा राजकीय पदाधिकाऱ्यांना आवश्यक असल्यास, खाजगी विमाने भाड्याने घेऊन त्यांचा वापर त्यांच्या राजकीय प्रचार मोहिमेसाठी व अन्य निवडणूकविषयक कार्यासाठी करावा असे स्पष्ट केले आहे.

## अनुदेश क्रमांक ८४

(१) छत्तीसगड–रायपूर, (२) जम्मू व काश्मिर - जम्मू, (३) मध्यप्रदेश - भोपाळ, (४) मिझोराम - अझवल, (५) एन.सी.टी. दिल्ली - दिल्ली, (६) राजस्थान - जयपूर यांच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोग यांचे पत्र क्रमांक ४३७/६/२००८/सीसी आणि बीई, दिनांक १९ ऑक्टोबर २००८.

**विषय.—** विधानसभा, २००८ च्या सार्वत्रिक निवडणुका-विविध मंडळे/आयोग इ.च्या पदाधिकाऱ्यांकडून शासकीय वाहनांच्या वापरासंबंधात.

आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले आहे की, राज्य शासनाने अशासकीय पदाधिकाऱ्यांना म्हणजेच विविध स्वायत्त संस्थांचे सभापती, उपसभापती, अध्यक्ष, उपाध्यक्ष, आयुक्त इत्यादींना पुरविलेल्या वाहनांचा निवडणूक कालावधी दरम्यान गैरवापर होण्याची शक्यता आहे. आदर्श आचार संहितेच्या तरतुदी आणि वेळोवेळी देण्यात आलेल्या विविध सूचना ह्या निवडणूक लढविणारे पक्ष व उमेदवार यांच्यामधील समान संधीची खात्री देण्याकरिता, निवडणुकीच्या प्रयोजनासाठी शासकीय वाहनांच्या वापरास प्रतिबंध करतात.

आयोगाने, सर्व संबद्ध घटक विचारात घेतल्यानंतर असे ठरविले आहे की, सर्व स्वायत्त संस्थाच्या पदाधिकाऱ्यांना ते केवळ घरापासून कार्यालयापर्यंत जाण्यायेण्याकरिता आणि मुख्यालयामधील कार्यालयीन बैठकीला उपस्थित राहण्याकरिता शासकीय वाहनांचा वापर करू शकतील अशा सूचना देण्यात याव्यात. जिल्हा प्रशासनाला अशा वाहनांच्या हालचालींवर कडक पहारा ठेवण्याबाबत व कोणत्याही वाहनांचा गैरवापर होताना दिसून आल्यास ती तात्काळ सरकार जमा करण्याबाबत सूचना द्याव्यात.

या अनुदेशाचे काटेकोरपणे अनुपालन करण्याकरिता सर्व संबंधिताच्या निदर्शनास आणून द्यावे.

## अनुदेश क्रमांक ८५

आसाम, पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू व पुदुचेरी या राजांच्या निवडणूक अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेले भारताच्या निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४६४/आयएनएसटी/२०११ - इपीएन, दिनांक २३ मार्च २०११.

**विषय.—** विधानसभांच्या सार्वत्रिक निवडणुका - निवडणूक प्रचार मोहिमेच्या प्रयोजनाकरिता उमेदवार, राजकीय पक्ष, नेते इत्यादींकडून हेलिकॉप्टरचा वापर—त्याची योग्य नोंद ठेवणे यासंबंधात.

आपणास असे कळविण्याचा मला आदेश आहे की, निवडणूक काळात उमेदवार, राजकीय पक्षाचे वलयांकित प्रचारक (निवडणूक प्रचार करणारे तारे-तारका) आणि इतर राजकीय पदाधिकारी हे निवडणूक प्रचाराकरिता व इतर प्रयोजनाकरिता हेलिकॉप्टर/विमाने यांचा वापर करत असतील आणि विविध जिल्ह्यांत हेलिकॉप्टर / विमाने उतरविण्यात येत असतील. यासंबंधात मला असे कळविण्याचा आदेश आहे की, या प्रयोजनाकरिता, राजकीय पक्षांना त्यांच्या प्रवासासंबंधात व जी व्यक्ती प्रवास करणार असेल त्या व्यक्तीचा आणि जी साधनसामग्री हेलिकॉप्टर / विमानामधून नेण्यात येणार असेल तिचा तपशील याबाबत तीन दिवस आधी सूचना देण्याची विनंती करण्यात यावी.

आयोगाने आणखी असे निदेश दिले आहेत की, जिल्हा प्रशासन / जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यानी नोंदवही (लॉगबुक) ठेवावी आणि त्या नोंदवहीत त्यांच्या जिल्ह्यामध्ये हेलिकॉप्टर / विमाने केव्हा उतरली व त्यांनी केव्हा उड्डाण केले व ज्या प्रयोजनाकरिता ती उतरली ते प्रयोजन आणि त्या उक्त हेलिकॉप्टर / विमानामधून कोणत्या व्यक्ती आल्या तसे्च हेलिकॉप्टर / विमाने उतरविम्यासाठी परवानगी घेण्यात आली होती किंवा नाही याचा तपशील नोंदवावा. जिल्हा निवडणूक अधिकारी, अशा हेलिकॉप्टर / विमानांचे आगमन व प्रयाण याविषयीचा दैनंदिन अहवाल संबंधित मुख्य निवडणूक अधिकाऱ्याकडे पाठविल आणि त्याची एक प्रत आयोगाला पृष्ठांकित करील. ही बाब अनुपालन करण्याकरिता सर्व जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून देण्याची आपणास विनंती करण्यात येत आहे.

## अनुदेश क्रमांक ८६

आसाम, पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू व पुदुचेरींच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४६४/आयएनएसटी/२०११ - ईपीएस, दिनांक २३ मार्च २०११.

**विषय.—** वरील राज्याच्या विधानसभांच्या सार्वत्रिक निवडणुका - निवडणुकीत युती करणाऱ्या किंवा जागांची विभागणी करणाऱ्या पक्षांचा पक्ष ध्वज फडकाविण्यासाठी परवानगी यासंबंधात.

मला असे कळविण्याचा निदेश दिला आहे की, आयोगाच्या अलीकडील बिहारच्या भेटीदरम्यान राजकीय पक्षांनी, ज्यांच्याशी त्यांनी युती केली आहे किंवा ते जागा विभागून घेत आहेत अशा राजकीय पक्षाचा ध्वज त्यांच्या प्रचार वाहनांवर लावण्याची त्यांच्या उमेदवारांना परवानगी असावी, अशी आयोगाला विनंती केली आहे आयोगाने या बाबीवर विचार केला आहे असा निर्णय घेण्यात आला आहे की, निवडणुकीसाठी युती करत आहे किंवा जागा विभागून घेत आहे असा कोणताही पक्ष असे कोणतेही पक्ष ज्यांच्यासोबत ते अशी युती करत आहे. / जागा विभागून घेत आहेत अशा पक्षांच्या ध्वज निवडणूक प्रचार वाहनावर प्रदर्शित करण्यासाठी त्याच्या पूर्ण तपशीलासह अर्ज करेल/अर्ज करतील तर त्यांना अशी परवानगी देता येईल. तथापि, वाहनांवर ध्वज वापरणे हे मोटार वाहन अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीन असेल.

सर्व संबंधित राजयीक पक्षांसह सर्व संबंधितांच्या हे निदर्शनास आणून द्यावे.

## अनुदेश क्रमांक ८७

आसाम, पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू व पुदुचेरीच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४६४/आयएनएसटी/२०११ - ईपीएस, दिनांक २३ मार्च २०११.

**विषय.—** राज्य विधानसभांच्या सार्वत्रिक निवडणुका - प्रसिद्धी साहित्याची वाहतूक करण्यासाठी वाहन परवानगीकरिता राजकीय पक्षांची विनंती यासंबंधात.

आयोगाने असा निर्णय घेत आहे की, राजकीय पक्षाने राज्यातील त्यांच्या विविध पक्ष कार्यालयात प्रसिद्धी साहित्याचे वितरण करण्यासाठी वाहन परवाना देण्यासाठी मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांस विनंती केल्यास, मुख्य निवडणूक अधिकारी अशा वाहनांकरिता परवानगी देईल. तथापि, संबंधित राजकीय पक्षाने (अर्जदाराने) वरील प्रयोजनार्थ ज्यासाठी वाहने आवश्यक असतील, अशा जिल्ह्याचे नाव, रस्त्याचा नकाशा आणि दिनांक याचा विनिर्देश करणे आवश्यक असेल अशा वाहनांसाठी मुख्य निवडणूक अधिकारी परवानगी देऊ शकेल. परंतु तो अशी वाहने ही सर्वसाधारण तपासणीच्या अधीन असतील आणि निवडणूक प्रचारासाठी त्यांचा उपयोग केला जाणार नाही. याची देखील खात्री करून घेईल. अशा वाहनांवरील खर्च ज्यासाठी वाहन परवानगी मागण्यात आली असेल अशा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविणाऱ्या पक्षाच्या उमेदवारांमध्ये समानतेने विभागण्यात येईल.

(शा.म.मु.) वाय २८५६–२० (११,०००–८–२०१४)

## अनुदेश क्रमांक ८८

भारतीय निवडणूक आयोगाचे आसाम, पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू व पद्दूचेरीच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेले पत्र क्रमांक ४६४/अनुदेश/२०११ - ईपीएस, दिनांक २३ मार्च २०११.

**विषय.—** राज्य विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका, २०११, - मान्यताप्राप्त राजकीय पक्षांच्या जिल्हा पदाधिकाऱ्यांना वाहन परवाना देण्याबाबत.

आपणास असे कळविण्याचा मला आदेश आहे की, जर कोणत्याही राजकीय पक्षाने, निवडणूक कार्याच्या प्रयोजनार्थ एका जिल्ह्यातील बहुसंख्य विधानसभा मतदारसंघांना भेटी देण्याकरिता त्यांच्या जिल्ह्यास्तरावरील पदाधिकारी /(नेते प्रमुख प्रचारकांव्यतिरिक्त) यांच्या वापरासाठीच्या वाहनांकरिता परवानगी मिळण्यासाठी अर्ज केला असेल तर संबंधित जिल्ह्याच्या जिल्हा निवडणूक अधिकाऱ्याने अशी आवश्यक परवानगी द्यावी. अशा प्रकरणांमध्ये, परवाना हा व्यक्तीच्या नावे असावा व सोबतच त्यावर वाहनाचा नोंदणीक्रमांक सुद्धा नमूद केलेला असावा. या वाहनावरील खर्च त्याने ज्या ठिकाणी भेट दिली आहे. त्या जिल्ह्यातील पक्षाच्या उमेदवाराच्या / (उमेदवारांच्या) निवडणूक खर्चात नोंदवावा / वितरित करावा. इतर जिल्ह्यांमध्ये प्रवास करण्यासाठी या परवान्यांचा वापर करू नये.

आणखी असेही नमूद करण्यात येते आहे की, जारी केलेल्या परवान्यावर राजकीय नेत्याचे नाव वाहनाचा (नोंदणी) क्रमांक आणि ज्या कालावधीसाठी तो जारी करण्यात आला आहे तो कालावधीसुध्दा दर्शविण्यात यावा. उमेदवार आणि प्रमुख प्रचारकांना परवाने जारी करण्यासाठी वापरलेल्या रंगापेक्षा वेगळ्या रंगाच्या कागदावर हा परवाना द्यावा. जेणेकरून तो सहजपणे ओळखता येईल. वाहनाच्या समोरच्या बाजूवरील काचेवर परवान्याची साक्षांकित प्रत ठळकपणे दर्शविण्यात यावी आणि मूळ प्रत ही पोलीस किंवा इतर कोणतेही प्राधिकारी यांच्याकडून तपासणी होण्यासाठी स्वतःजवळ ठेवावी. याबाबतीत संनिरिक्षण पथकांना सुध्दा माहिती द्यावी.

# ए—५. अधिकाऱ्यांची पदस्थापना आणि अधिकाऱ्यांच्या बदल्यांवरील बंदी.

## अनुदेश क्रमांक ८९

सर्व राज्ये आणि सघराज्यांच्या मुख्य सचिवांना आणि मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्रमांक ४३७/६/आयएनएसटी २००९/सी.सी. ॲण्ड बीई दिनांक ४ फेब्रुवारी २००९.

**विषय.—** लोकसभेची सार्वत्रिक निवडणूक, २००९ अधिकाऱ्यांच्या पदस्थाने संबंधी.

आपणास माहीतच असेल की २००९ च्या लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुका लवकरच घेण्यात येणार आहेत. आयोगाने, त्यांचे निर्भय आणि निःपक्षपाती वातावरणात निवडणुका घेण्याचे नेमून दिलेले कार्य पार पाडताना, राज्यातील निवड्णुकांशी संबंधित अधिकारी, त्यांच्या स्वतःच्या जिल्ह्याच्या ठिकाणी किंवा दीर्घकाळ सेवा बजावलेल्या ठिकाणी काम करणार नाहीत हे निश्चित करण्यासाठी सुसंगत धोरणाचे अनुसरण केले आहे आणि असे ठरविले आहे की, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे निवडणुकांशी संबंधित कोणताही अधिकाऱ्यास,

(क) जर तिची त्याची तिच्या/त्याच्या स्वतःच्या जिल्ह्यातच नियुक्ती केली तर :—

(ख) जर तिने/त्याने, मागील चार वर्षात त्या जिल्ह्यात नियुक्तीच्या वर्तमान ठिकाणीच काम करण्यास मंजुरी देण्यात येणार नाही. तीन वर्ष पूर्ण केली असतील किंवा ३१ मे २००९ ला किंवा त्याआधी ३ वर्षे पूर्ण केली असतील तर—

(दोन) ह्या अनुदेशांत केवळ जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी आणि सहायक निवडणूक निर्णय अधिकारी यांसारख्या विनिर्दिष्ट निवडणूक सेवांसाठी नियुक्त अधिकाऱ्यांचा समावेश असणार नाही तर अतिरीक्त जिल्हा दंडाधिकारी, उप जिल्हाधिकारी, उप विभागीय दंडाधिकारी, तहसिलदार, गट विकास अधिकारी किंवा निवडणूक कामांसाठी वापरण्यात येणारे इतर कोणतेही अधिकारी यांसारख्या/इतर जिल्हा स्तरीय अधिकाऱ्यांचा सुद्धा यात समावेश असेल, जेथवर पोलीस विभागातील अधिकाऱ्यांचा संबंध आहे तेथवर हे अनुदेश महानिरीक्षक, उप महानिरिक्षक, राज्य सशस्त्र पोलीसांचे समादेशक, पोलीस अधीक्षक, अतिरिक्त पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस प्रमुख, निरीक्षक, फौजदार, सार्जंट मेजर किंवा निवडणुकीच्या काळात जिलह्यात पोलीस दल तैनात करण्यास जबादार असणारा तत्सम अधिकारी यांना लागू असतील, या अनुदेशांतर्गत संगणकीकरण, विशेष शाखा, प्रशिक्षण इ. सारख्या कार्यात्मक विभागात नियुक्ती असणाऱ्या अधिकाऱ्यांचा यात समावेश करण्यात आलेला नाही, या व्यतिरिक्त, फौजदार स्तरावरील पोलीस अधिकाऱ्यांना त्यांच्या स्वतःच्या विधानसभा मतदारसंघात नियुक्ती देण्यात येऊ नये. फौजदार स्तरावरील पोलीस अधिकाऱ्यांनी, त्यांच्या पोलीस उप-विभागात चार वर्षांच्या कालावधीत तीन वर्षांचा कालावधी पूर्ण केला असल्यास, त्या उपविभागा बाहेर त्यांची बदली करण्यात यावी.

(तीन) आयोगाची आणखी अशी इच्छा आहे की, लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या आधी सर्व जिल्ह्यांमध्ये सविस्तर आढावा घेण्यात यावा आणि तात्काळ अशा सर्व अधिकाऱ्यांची, तात्काळ, नियुक्ती त्यांच्या मूळ जिल्ह्याच्या किंवा जेथे त्यांनी, मागील चार वर्षांत तीन वर्षांच्या पदावधी पूर्ण केला असेल अशा जिल्ह्याच्या बाहेर करण्यात यावी. ज्यांनी एखादया जिल्ह्यात मागील चार वर्षांत तीन वर्षांचा पदावधी पूर्ण केला असले अशा अधिकाऱ्यांना हलविताना, त्यांची नियुक्ती त्यांच्या मूळ जिल्ह्यात करण्यात येणार नाही याची काळजी घ्यावी. **तीन वर्षांच्या कालावधीची गणना करताना, जिल्ह्यातच देण्यात आलेल्या बढतीचा कालावधी सुद्धा गृहीत धरण्यात यावा.** असे पुनःविलोकन करताना हे लक्षात घेतले पाहिजे की, हे अनुदेश संबंधित विभागांच्या राज्य मुख्यालयात नियुक्त असलेल्या अधिकाऱ्यांना लागू होत नाहीत.

(चार) आयोगाची अशीही इच्छा आहे की, आयोगाने ज्यांच्या विरुद्ध शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस केली आहे किंवा कोणत्याही निवडणूक किंवा निवडणूक संबंधित कामात चूक बद्दल दोषारोप करण्यात आलेल्या किंवा पूर्वी ज्याची आयोगाच्या आदेशानुसार बदली करण्यात आली आहे अशा अधिकाऱ्यांना/कर्मचाऱ्यांना निवडणूक संबंधिचे कोणतेही काम देण्यात येऊ नये.

(पाच) आयोगाची अशीही इच्छा आहे की, न्यायालयात ज्यांच्या विरुद्ध गुन्हेगारीचे प्रकरण प्रलंबित आहे अशा अधिकारी/कर्मचाऱ्याला निवडणूकीचे किंवा निवडणूक संदर्भातले कोणतेही काम देण्यात येऊ नये.

(सहा) आयोगास पूर्वी अशा तक्रारी मिळाल्या आहेत की, आयोगाकडून जारी करण्यात आलेल्या निदेशांचा पाठपुरावा करताना, ज्यावेळेस राज्य शासन वरील प्रवर्गातील अधिकाऱ्यांची, बदली करते, तेव्हा ती व्यक्ती रजेवर जाऊन किंवा ज्या जिल्ह्यातून तिची बदली करण्यात आली आहे तेथून प्रत्यक्षात बाहेर न जाऊन त्या आदेशावर कुरघोडी करण्याचे प्रयत्न करते. आयोगाने याकडे गांभीर्याने लक्ष दिले आहे आणि अशी इच्छा व्यक्त केली आहे की, उपरोक्त अनुदेशांनुसार बदली करण्यात आलेल्या अधिकाऱ्याला बदलीचे आदेश मिळताच तात्काळ जिल्हा सोडण्यास सांगण्यात यावे.

(सात) असे अपेक्षित आहे की, निवडणुकांची अधिकृत घोषणा होण्याची वाट न बघता आयोगाच्या धोरणांची अंमलबजावणी करण्यात यावी. जेणेकरून निवडणुकांच्या घोषणेनंतर मोठ्या प्रमाणावर अधिकाऱ्यांची बदली करावी लागू नये.

(आठ) आणखी असे की, आयोगाची अशी इच्छा आहे की, उपरोक्त निदेशांची अंमलबजावणी करताना, आयोगाच्या धोरणानुसार वर्तमान बदली करण्यात आलेल्या वर्तमान पदधारकाच्या जागेवर नवीन व्यक्तीची नियुक्ती करताना मुख्य निवडणूक अधिकाऱ्याशी अवश्य विचारविनिमय करण्यात यावा. या निदेशांनुसार देण्यात आलेल्या बदलीच्या आदेशांच्या प्रती संबंधित मुख्य निवडणूक अधिकाऱ्यास न चुकता देण्यात याव्यात.

(नऊ) मतदार याद्यांच्या पुनरीक्षण कामात गुंतले आहेत, अशा अधिकारी/कर्मचारी यांच्या संबंधातील बदली आदेश हे मुख्य निवडणुक अधिकाऱ्याशी विचारविनिमय करून, मतदार याद्यांच्या अंतिम प्रकाशना नंतरच कार्यान्वित करण्यात येतील.

(दहा) सहा महिन्यांमध्ये रीतसर सेवानिवृत्त होणार आहेत, अशा कोणत्याही अधिकाऱ्याला आयोगाच्या वर नमूद केलेल्या निर्देशांच्या कक्षेतून सूट देण्यात येईल. तसेच अशा अधिकाऱ्यांना निवडणुकांमधील निवडणूक कर्तव्ये पार पाडण्याच्या कामावर घेण्यात येऊ नये.

(अकरा) आणखी असे स्पष्ट करण्यात आले आहे की, सेवा वाढदिली आहे किंवा विविध हुद्यांवर पुनःनियुक्त केलेले आहेत, अशा राज्यांचे/संघराज्य क्षेत्रांचे सर्व कर्मचारी जे मुख्य निवडणूक अधिकाऱ्याच्या कार्यालयात आहेत त्यांच्या खेरीज इतर कोणीही निवडणुकीबाबतच्या कामाशी संबंधित असणार नाहीत.

२. केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर तपशील आयोगाला त्यांच्या माहितीसाठी तातडीने आणि कोणत्याही बाबतीत २० फेब्रुवारी २००९ च्या आत कळविण्यात यावा.

३. मागील सार्वत्रिक निवडणुकीच्या काळात असे निदर्शनास आले आहे की, वैयक्तिक प्रकरणांमध्ये बदली आदेश जारी करण्याच्या संबंधात स्पष्टीकरण मागविण्याबाबत विविध राज्यांमधून अनेक संदर्भ मिळाले आहेत. आयोगाचे असे निदेश आहेत की, हे सर्व प्रश्न मुळातच मुख्य निवडणूक अधिकाऱ्याच्या स्तरावर हाताळण्यात यावेत. जेव्हा अत्यंत आवश्यक असेल तरच वैयक्तिक संदर्भ, मुख्य निवडणूक अधिकाऱ्याच्या स्तरावर सर्वबाजूंनी विचार केल्यानंतर त्याच्या/तिच्या विशिष्ट शिफारशीसह आयोगाकडे पाठवण्यात यावेत.

४. वरील अनुदेश, अनुपालनासाठी सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देण्यात यावेत.

कृपया या पत्राची पोच देण्यात यावी.

## अनुदेश क्रमांक ९०

सर्व राज्यांच्या आणि संघराज्यक्षेत्रांच्या मुख्य सचिवांना व मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांना उद्देशून लिहिलेले भारताच्या निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ४३७/६/आयएनएसटी/२००९-सीसी आणि बीई, दिनांक १८ फेब्रुवारी, २००९.

**विषय.—** अधिकाऱ्यांची पदस्थापना करण्यावरील आयोगाचे दिनांक ४ फेब्रुवारी २००९ च्या अनुदेशाबाबतचे स्पष्टीकरण.

दिनांक ४ फेब्रुवारी २००९ च्या सम क्रमांकाच्या अनुदेशांकडे आपले लक्ष वेधण्याचा आणि आपणास असे कळविण्याचा मला आदेश आहे की, मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांच्या परिषदेमध्ये आणि मुख्य सचिवांसह झालेल्या आयोगाच्या बैठकींमध्ये काही स्पष्टीकरणे मागविण्यात आली आहेत.

आयोगाने या प्रश्नाचा सविस्तर विचार केला आहे आणि यासंबंधी खालीलप्रमाणे आणखी मार्गदर्शक तत्त्वे जारी करण्याचे ठरवले आहे :—

जेथे, मोठ्या महानगरांमध्ये/कमी संख्येची निवडणूक क्षेत्रे असणाऱ्या लहान राज्यांमध्ये आयोगाच्या वर नमूद केलेल्या सूचनांमध्ये निर्धारित केलेल्या धोरणाच्या अनुपालनार्थ पोलीस ठाण्याचा प्रभारी आहे, अशा पोलीस अधिकाऱ्याची बदली करणे कठीण जात असते, अशी प्रकरणे असावित. अशा प्रकरणांमध्ये, अशा पोलीस अधिकाऱ्याचा प्रादेशिक अपवाद म्हणून उपविभाग असावा. उर्वरित इतर प्रकरणांमध्ये आयोगाच्या पूर्व मान्यतेने प्रादेशिक अधिकारिता जिल्हा असावी.

हा अनुदेश पोलीस उपनिरिक्षकास लागू आहे किंवा कसे असा एक प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. असे स्पष्ट करण्यात येते की, जेथे पोलीस उप-निरीक्षक, ठाणे प्रभारी असेल तर तो या अनुदेशाअंतर्गत आहे आणि म्हणून वर निर्धारित केलेल्या मार्गदर्शक तत्वांनुसार त्याची बदली करणे आवश्यक आहे.

# अनुदेश क्रमांक ९१

कॅबिनेट सचिव, भारत सरकार आणि जम्मु व काश्मिरचे मुख्य सचिव व मुख्य निवडणूक अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ४३७/६/१/२००८, दिनांक १९ ऑक्टोबर, २००८.

**विषय.—** आदर्श आचार संहितेचे उपयोजन-राज्य विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुकांबाबत...........

आपणास असे कळवण्याचा मला आदेश आहे की, निवडणूक आयोगाने जम्मू व काश्मिर राज्याच्या राज्य विधानसभेच्या सार्वत्रिक निवडणुका घेण्याबाबत वेळापत्रक घोषित केलेले आहे.

२. या घोषणेबरोबरच, राजकीय पक्ष आणि उमेदवारांच्या मार्गदर्शनासाठी आदर्श आचार संहितेच्या तरतुदी या तात्काळ अंमलात आल्या आहेत. शासन, सर्व मंत्रालये विभाग आणि केंद्र सरकार आणि जम्मू व काश्मिर चे राज्य शासन यांच्या इतर सर्व कार्यालयांच्या हे निदर्शनास आणून देण्यात यावे.

३. आदर्शि संहितेच्या खंड पाच (पाच) कडे आपले विशेष लक्ष वेधण्यात येत आहे, त्यामध्ये इतर गोष्टीबरोबरच असे नमूद आहे की :—

" आयोगाकडून निवडणूकांची घोषणा झाल्याच्यावेळेपासून, मंत्री आणि इतर प्राधिकारी—

(क) कोणत्याही स्वरुपातील कोणत्याही वित्तीय अनुदानाची घोषणा करणे किंवा त्यासंबंधातील आश्वासने देणे ; किंवा

(ख) कोणत्याही प्रकारचा प्रकल्प किंवा योजना यांची कोनशिला बसवणे इत्यादी (नागरी सेवक वगळता) ; किंवा

(ग) रस्त्यांचे बांधकाम, पिण्याच्या पाण्याच्या सुविधांची तरतूद इत्यादीबाबत कोणतेही आश्वासन देणे ; किंवा

(घ) मतदारांवर सत्ताधारी पक्षाला अनुकूल असा प्रभाव पाडू शकतील अशा शासन, सार्वजनिक उपक्रम इत्यादीमधील कोणत्याही तदर्थ नेमणुका करणे.

या गोष्टी करणार नाहीत.

४. निवडणुका पार पाडण्याबाबत संबंधित असलेले सर्व अधिकारी/अधिकारीवर्ग यांची बदली करण्यास पूर्णतः बंदी असेल असा आयोगाचा आदेश आहे.यामध्ये पुढील अधिकारी/अधिकारीवर्गाचा समावेश आहे परंतु त्यांच्यासाठी निर्बंधीत नाही :—

(एक) मुख्य निडणूक अधिकारी आणि अपर/सह/उप मुख्य निवडणूक अधिकारी ;

(दोन) विभागीय आयुक्त ;

(तीन) जिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक निर्णय अधिकारी, सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी आणि निवडणूक पार पाडण्याशी संबंधीत इतर महसूल अधिकारी ;

(चार) निवडणूकांच्या व्यवस्थापनाशी संबंधित पोलीस विभागाचे अधिकारी, जसे की, महानिरीक्षक व उपमहानिरीक्षक श्रेणीचे, वरीष्ठ पोलीस अधीक्षक व पोलीस अधीक्षक, उप विभागीय पोलीस अधिकारी, जसे की पोलीस उप अधीक्षक आणि लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ याच्या कलम २८ क अन्वये आयोगाकडे प्रतिनियुक्तीवर आहेत असे इतर पोलीस अधिकारी ;

(पाच) उक्त श्रेणीतील अधिकाऱ्यांच्या बाबतीत बदली करण्याचे आदेश घोषणेच्या दिनांकापूर्वी काढण्यात आले परंतु या दिनांकापर्यंत त्यांची अंमलबजावणी झालेली नाही अशा आदेशांच्या बाबतीत आयोगाकडून विशिष्ट ने परवानगी घेतल्याशिवाय अंमलबाजवणी करण्यात येऊ नये.

(सहा) निवडणूक पूर्ण होईपर्यंत हा निर्बंध असेल आयोग आणखी असेही निर्देश देत आहे की राज्य शासनाने, राज्यातील निवडणूकांच्या व्यवस्थापनात भुमिका बजावणाऱ्या वरीष्ठ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यापासून दूर रहावे.

(सात) जेथे प्रशासकीय निकडीच्या कारणांमुळे एखाद्या अधिकाऱ्याची बदली करणे आवश्यक आहे अशा प्रकरणांमध्ये राज्य शासनास पुर्णतः न्यायोचित दृष्टीकोन बाळगून आयोगाची मान्यता घेता येईल.

शासकीय मध्यवर्ती मद्रणालय, मुंबई